# दादशायणि-पत्रे



श्रीगुलाबराव महाराज विरचित

…काशन, बडकस चौक
महाल, नागपूर

धा-१८८
0९0९४ ७३

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबराव महाराजविरचित सूक्तिरत्नावलीतील

# द्वादश यष्टि

## उपदेशामृत पत्रे व लेख

४५

तृतीय आवृत्ती
कलिवर्ष ५०७५
इ. स. १९७४

मधुर प्रकाशन, घटाटे बिल्डींग, पं. बच्छराज व्यास चौक,
महाल, नागपूर–२

पाच रुपये

□ **सर्व हक्क :**

श्री ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ,
दहिसाथ, अमरावती.

□ **प्रकाशक :**

निळकंठ माधव घुई,
मधुर प्रकाशन, पं. बच्छराज व्यास चौक महाल, नागपूर

□ **मुद्रक :**

भा. वै. वराडपांडे,
तरुण भारत प्रिन्टर्स अॅण्ड प्रोसेसर्स प्रा. लि. रामदासपेठ, नागपूर-१०

□ **प्रमुख विक्रेते :**

हिंदुस्थान साहित्य,
३०९, शनिवार पेठ, मोतिबाग, पुणे-२

□ **प्रथमावृत्ती :**

इ. स. १९२०

# निवेदन

श्रीगुलाबराव महाराजांच्या पत्रांचा व लेखांचा संग्रहरूप असलेली ही द्वादशयष्टि वाचकांचे हाती देताना आनंद होत आहे. अनेक विषयांचे मार्मिक मुद्देसूद विवेचन या पत्रातून आढळेल. आधुनिक ज्ञानक्षेत्रात ज्या डार्विनच्या उत्क्रांतिवादाचा ठसा जागोजाग उमटलेला दिसतो तो उत्क्रांतिवाद तर्काच्या कसोटीवर मुळीच टिकाव धरू शकत नाही हे दाखवून देण्याचे महत्वाचे कार्य पहिल्या पत्रातून झाले आहे. काही पत्रांतून वेदान्त, योग, राजयोग, हठयोग, हिप्नॉटिझम् व भोंदुगिरीचा परिस्फोट वगैरे आध्यात्मिक विषयांवर मूलभूत विवेचन असून त्यातून महाराजांची नवीन दृष्टि व्यक्त झाली आहे. "हिंदुधर्मावरील संकट बाह्य नसून अन्तर्गत आहे." हा विचार मांडताना महाराजांनी मोठमोठ्या धर्मसुधारकांचा समाचार घेतला आहे. मानभावांचे योगवासिष्ठ किंवा थियॉसॉफीचे संस्कृत ग्रंथ आपल्या प्राचीन धर्मात घोटाळे करणारे कसे आहेत ते परखड युक्तिवादांनी सिद्ध केले आहे. संगीतावरील भातखंडेंशी पत्रव्यवहार आधुनिक विज्ञानावर आधारलेला आहे. बहिणाबाईंच्या अभंगांचे रसग्रहण आणि बाबा गर्दे यांना लिहिलेली पत्रे काव्यरसपूर्ण आहेत. भुताखेतांसंबंधीची माहिती उद्बोधक आहे. मुसलमान व ख्रिश्चन धर्म हे आचाराने हिंदुधर्माशी भिन्न असले तरी विचाराने एकरूप आहेत हे प्रमाणपुरस्सर दाखवून दिले आहे. श्रीशंकराचार्य व श्रीज्ञानेश्वरांचा वेदान्त एकच आहे हेही सिद्ध केले आहे. याप्रमाणे आध्यात्मिक, धार्मिक, नैतिक व्यावहारिक वगैरे विषयांवरील मूलगामी विवेचन नवीन असले तरी "प्राचीन आर्य परंपरेला यत्किंचितही सोडून नाही" आधुनिक हिंदुनेत्यांमध्ये मुळीच न आढळणारा हा 'विशेष' महाराजांच्या विचारातून नेहमी प्रमाणे येथेही व्यक्त झालेला आहे. ब्राह्मण ब्राह्मणेतर वादासंबंधीचे महाराजांनी केलेले निरपेक्ष मूल्यमापन आजच्या परस्परांसंबंधी उफाळून आलेल्या द्वेषभावनेला शांत करणारे आहे. म्हणून विचारवंतानी या विचारांचा परामर्श घेणे देशहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे असे हे पुस्तक वाचल्यानंतर कळून येईल.

**ज्ञानेश्वर उद्धव मांढरे**
१२८, रास्तापेठ, पुणे.

[ प्रत्येक पत्राच्या आधी विषयांची यादी व परिच्छेदांना क्रमांक देण्याचा नवीन उपक्रम या आवृत्तीत केला आहे. ]

# मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराज

इ. स. १८८१ मध्ये अमरावतीजवळ माधान येथे श्रीमहाराजांचा जन्म झाला. आणि १९१५ मध्ये त्यांनी आपले अवतारकार्य संपविले. या चवतीस वर्षांच्या आयुष्यात स्वतः जन्मांध असून देखील अफाट ग्रंथनिर्मिती केली. अलौकिक बुद्धिमत्तेने आणि स्वानुभवाने मंडित करून ज्ञान भक्तीचे सूक्ष्मातिसूक्ष्म वेदान्तसिद्धान्त त्यांनी ग्रंथनिविष्ट केले. भारतीय तत्त्वज्ञानाचे सर्वश्रेष्ठत्व आणि सर्वकषता प्रतिपादन करताना त्यांनी पाश्चात्य विद्वत्मतांचा पुरेपूर समाचार घेतला. डार्विनचा उत्क्रांतिवाद, स्पेन्सरचा अज्ञेयवाद, मानसशास्त्रातील आधुनिक प्रमेये, अणुवाद, जडवाद वगैरे पाश्चात्य मतांचे, अगदी सहजरीतीने पटेल अशा सोप्या पण सडेतोड युक्तिवादाने खंडन केले. त्यांचे सर्व वाङमय युक्तिप्रचूर असून त्यातील युक्तिवाद श्रुतिसंमत आहे. वैदिक समर्थनावर आधारलेला आहे.

आधुनिक वेदांत्यांच्या आणि महाराजांच्या लिखाणात एक फार मोठा फरक जाणवतो. एखादा मुद्दा मांडताना वेदांत्यांना अनेक परिच्छेद आणि अनेक पृष्ठे लिहून काढावी लागतात आणि त्यात एखादा युक्तिसंपन्न विचार चांगल्या रीतीने मांडला गेला असतो. परंतु महाराजांच्या वाङ्मयात मात्र एकेका परिच्छेदामध्ये ५–६ युक्तिवाद तर अगदी सहज आलेले असतात. वादामध्ये एखादा अवैदिक मताचा चुकून स्वीकार केला तर आपल्याला अभिप्रेत नसलेल्या अपसिद्धांतांची मालिका आपल्याच गळयात कशी येऊन पडते, हे महाराज दाखवू देतात. ते वाचताना आपण गोंधळून जातो, आश्चर्यचकित होतो आणि शेवटी नतमस्त होतो !

## समन्वय विचार

श्रीमहाराजांनी श्रुति, स्मृति, रामायण, महाभारतादी इतिहास आणि पुराणे यांचा उत्तम रीतीने समन्वय केला आहे. संतांची वचने, स्वानुभव, आणि युक्तिवाद यांच्या साह्याने आपला समन्वय विचार प्रामुख्याने मंडित केला आहे. सुखवरसुधेत महाराज म्हणतात––'ज्ञानेश्वर माउलीने अनुग्रह दिल्याप्रमाणे अनुभव घेऊन उगीच धर्माधर्मामध्ये द्वेष वाढू नये म्हणून शांकरमताचे (अद्वैत) ज्ञान व इतर मतांच्या भावना यांची योजना मात्र मी केली आहे." कोणत्या आचार्यापासून कोणती भावना घेतली आहे, ते संप्रदायकुसुममधु नांवाच्या ग्रंथांत सविस्तर आले आहे.

एके ठिकाणी महाराज म्हणतात, "पुराणे वेदतुल्य असून ईश्वरप्रणीत आहेत. म्हणून वेदांचा जसा कशाने बाध होत नाही. तसा पुराणांचाहि बाध कशाने होत नाही. म्हणज पुराणांचा व वेदांचा विरोध आहे असे वाटल्यास समन्वयच केला पाहिजे. किंवा समजत नाही म्हणून सोडून दिले पाहिजे. हा आमच्यात 'विशेष आहे."

असा हा समन्वयाचा महाराजांचा आग्रह आजच्या दृष्टीने किती महत्वाचा आहे, हे दिसून येते. प्रत्येक हिंदुधर्माच्या हितकर्त्यांने समन्वयाचे हे मूलभूत सूत्र हृदयात कोरून ठेवण्याजोगे आहे. त्याशिवाय इतर संप्रदायाविषयी किंवा विचारसरणीविषयी पूज्यबुद्धि कायम राहू शकत नाही आणि भारतीय एकताही टिकू शकत नाही 'परिस्थितीनुसार पूर्वीच्या आचार्यांनी आजच्या कालात अयोग्य आचारविचार घालून दिले आहेत.' असा त्यांच्यावर ठपका देणे हे विचारांच्या शुद्धतेचे लक्षण नाही मनाची अपरिपक्वताच त्यात

व्यक्त होते. पूर्वीच्या ऋषीमुनींना दोष देणे म्हणजे पर्यायाने त्यांना मूर्ख ठरवून स्वतःला शहाणे ठरविण्याचा प्रयत्न करणे होय. म्हणूनच श्रीमहाराजांची समन्वयाची पद्धती विस्तारपूर्वक समजावून घेणे अगत्याचे आहे.

## श्रीमहाराजांचे तत्त्वज्ञान व संप्रदाय

श्रीशंकराचार्यांचे अद्वैत तत्त्वज्ञान आणि संतांची परमप्रेमरूपा पराभक्ति यांचा मधुर संगम या मधुराद्वैतात झालेला आहे. समाधीत अद्वैताचा निर्गुण अनुभव आणि व्युत्थानात सगुण भगवंताचे अर्पणरूप परमप्रेम असा आंत बाहेर ब्रह्मानुभव आल्यानंतर अखंड समाधि साधली जाते. हिचीच उत्कट अवस्था माधुर्यभक्ति म्हणजे पराभक्ति होय. अशी ज्ञानोत्तर माधुर्यभक्ती ध्येयरूपाने असली तरी सामान्यतः पुरुषांना दास्य व लालनभक्ती आणि स्त्रियांना वात्सल्य भक्ती करण्याचा दंडक श्रीमहाराजांनी घालून दिला. उपासना पूर्ण झाल्यानंतर अद्वैतज्ञानप्राप्ती होते आणि नंतरच माधुर्यांचा अधिकार येतो.

श्रीमहाराजांचा श्रीकृष्णाचे ठिकाणी माधुर्यभाव होता ते स्वतःला ज्ञानेश्वरकन्या आणि श्रीकृष्णपत्नी म्हणत. गळचात मंगळसूत्र, कपाळाला कुंकू आणि वेणी ही सौभाग्य चिन्हे सतत धारण करीत. श्री आदिनाथ भगवान शंकर, मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, निवृत्तिनाथ आणि ज्ञानेश्वरमहाराज ही त्यांची गुरुपरंपरा आहे म्हणून हा नाथसंप्रदाय असून, वारकरी पंथाची एक शाखा आहे. गुरुरूपाने शिवाची पार्थिव पूजा व उपास्यरूपाने श्रीकृष्णाची पूजा करण्याचा यात नियम आहे. संप्रदायाचा आश्रम गृहस्थाश्रम हाच आहे.

महाराजांच्या नंतर श्रीबाबाजीमहाराज पंडित यांनी संप्रदायाची धूरा १९६४ पर्यंत चालविली. त्यानंतर मात्र सांप्रदायिक मंडळ सर्व व्यवस्था पाहते. कात्यायनीव्रत, श्रीकृष्णजन्मोत्सव, शिवरात्री वगैरे उत्सव पूर्वीप्रमाणेच होत असतात. श्रीमहाराजांच्या स्वतःच्या ग्रंथसंग्रहालयाची व्यवस्था ठेवणे, श्रीमहाराजांचे वाङ्मय पुनः पुनः प्रकाशित करणे, आणि परंपरेप्रमाणे यथासांग उत्सव करणे वगैरे गोष्टी सर्व सांप्रदायिक मिळून करीत असतात.

## वाङ्मयीन कार्य

श्रीमहाराजांचे वाङ्मय बरेच मोठे आहे. एकूण ग्रंथरचना एकशे सत्तावीस पावेतो जाते. छापील पाने ६०००, ओवी संख्या २३०००, अभंग २२५०, पदे २२५०, गीते १२५०, श्लोक १००० याशिवाय आर्या, दोहे, चौपाई, सवैय्या, चर्णिका वगैरे बऱ्याच वृत्तात रचना केली आहे स्वतः नवीन तयार केलेली मात्रा वृत्ते १२२ आहेत. ती सर्व चाली, राग व ताल यांनी युक्त आहेत. ही सर्व वाङ्मय निर्मिती संस्कृत, मराठी, व्रजभाषा व वऱ्हाडी या पांच भाषेत झालेली आहे. महाराजांनी स्वतः जन्मांध असून वयाच्या केवळ ३४ वर्षात येवढी प्रचंड वैचारिक ग्रंथनिर्मिती करून, हिंदुधर्माचा मूलभूत वैचारिक पाया मजबूत केला आहे. या कार्यावरून अल्पवयीन श्री शंकराचार्य आणि ज्ञानेश्वर महाराज यांचीच आठवण होते. महाराजांच्या ग्रंथांना सूक्तिरत्नावली हे नामाभिधान आहे. प्रत्येक खंडाला यष्टि म्हटले आहे. अशा एकूण २० यष्टि आहेत त्यातील सर्व ग्रंथांची विषयावर विभागणी करून तद्नुसार सूची खाली जोडली आहे. त्यात ग्रंथनामापुढील आकडा यष्टीचा आहे.

# सर्व ग्रंथांची सूची

## सूत्रग्रंथ ९

१. अन्तर्विज्ञानसंहिता १६
२. ईश्वरदर्शन „
३. समसूत्री „
४. दुर्गातत्त्वम् „
५. काव्यसूत्रसंहिता „
६. शिशूबोध व्याकरण „
७. न्यायसूत्राणि „
८. एकादशीनिर्णयः „
९. पुराणमीमांसा „

## भाष्यग्रंथ २५

१०. नारदीयभक्त्याधिकरण न्यायमाला „
११. „ भक्तिसूत्रभाष्यम् „
१२. „ „ भाष्य १४
१३. प्रियलिलामहोत्सव आमंत्रणविलास ३
१४. आगमनविलास १४
१५. श्रीधरोच्छिष्टपुष्टिः १६
१६. श्रीधरोच्छिष्टलेशः १६
१७. ब्रह्मसूत्रव्याख्या १५
१८. निगमांतसुभा „
१९. ब्रह्मसूत्रांवर निरूपणे १७ उ
२०. भगवद्गीतासंगति १
२१. मनोहारिणी १८
२२. गीतेवरील निरूपणे १७पू
२३. „ प्रवचने „
२४. „ निरूपणे „ उ
२५ „ स्फुट „ „ उ
२६. ऐश्वर्यार्थदीपिका „
२७. षट्पदध्वनि १६
२८ ईशावास्योपनिषद १५
२९. ऋग्वेदटिप्पणी १६
३०. चौसष्टीं १
३१. चिरंजीवपदाभ्यास २ पू.
३२. बालवासिष्ठ १६
३३. योगवासिष्ठ तत्त्व १७पू.
३४. „ निरूपणे १७उ.

## शास्त्रग्रंथ ११

३५. सुखवरसुधा १३
३६. वेदान्तपदार्थोद्देश-दीपिका „
३७. शास्त्रसमन्वयः १६
३८. आगमदीपिका „
३९. युक्तितत्त्वानुशासनम् „
४०. प्रेमनिकुंज १०
४१. शांतिसुधाकर २ पू.
४२. वेदान्तप्रक्रिया-समुच्चय १५
४३. वेदान्तनिरूपण „
४४. तत्त्वबोधः १६
४५. षड्दर्शनलेशसंहः „

## आकरग्रंथ १

४६. संप्रदाय सुरतरू ११

## भक्तिग्रंथ १०

४७. भक्तिपदतीर्थामृत १
४८. निगमांतपथसंदीपक „
४९. भगवद्भक्तिसौरभ २
५०. प्रीतिनर्तन „
५१. नित्यतीर्थ „
५२. प्रिय पाहुणेर „
५३. भक्तितत्त्वविवेक १६
५४. प्रियप्रेमोन्माद „
५५. गोपिकापादपीयूष-लहरी १५
५६. गोविंदानंदसुधा २ उ

## योग ८

५७. निदिध्यासनप्रकाश १
५८. ध्यानयोगदिवाकर २ उ.
५९. सोपानसिद्धी २ पू.
६०. हिरण्ययोग १५
६१. योगांगमयलक्षण „
६२. योगप्रभाव „
६३. योगप्रभाव १–२
६४. ज्ञानेश्वरानिरूपण १५

## सांख्य ४

६५. सांख्यसुरेंद्र १४
६६. „ सूत्रावरील विचार १५
६७. निबंध „
६८. सांख्यसार १७ उ.

## संगीत २

६९. छंदप्रदीप १५
७०. गानसोपान „

## आयुर्वेद ३

७१. मानसायुर्वेद १५
७२. मानसायुर्वेद १६
७३. भिषगिंद्रशचीप्रभा „

## प्रकरणग्रंथ ९

७४. स्वमतनिर्णयः „
७५. संप्रदायकुसुममधु „
७६. सच्चिन्निर्णयः १६
७७. कांताकांतवाक्यपुष्पम् १
७८. चित्तोपदेश २
७९. सद्वैजयंती „
८०. बाराखडी „
८१. त्रिकांडसार „
८२. प्रमादकल्लोळ १५

### गाथा २

८३. अभंगाची गाथा ९ पू.
८४, पदांची गाथा ९ उ.

### निबंध १०

८५. अलौकिक प्रवास २ पू.
८६. अमोघनिरूपण २ पू.
८७. बौद्ध निबंध १५
८८. वेदान्तनिरूपण ,,
८९. सिद्धीसार ,,
९०. अलौ. व्याख्यानमाला ५
९१. युक्त्या १७ उ.
९२. गुरुचरणकौमुदीं ,,
९३. निरूपणे ,,

### संवाद ८

९४. साधुबोध ८
९५. मणिमजुषा २ पू.
९६. सुवर्णकण १७ उ.
९७. स्वमंतव्याश सिद्धान्त-तुषार ६
९८. दुर्मतहृदयभंजन १५
९९. प्रश्नोत्तरे ,,
१००. वृत्तिक्षीरसागर ,,
१०१. बालबुद्धिविवर्धिनी

### पत्र व्यवहार ११८

१०२. अकरा पत्रे १
१०३. बावीस पत्रे २
१०४. सदतीस पत्रे ७
१०५. पंचेचाळीस पत्रे १२
१०६. एक पत्र १५

### लोकगीते ४

१०७. स्त्रीगीत ४
१०८. स्त्रीगीतसंग्रह ,,
१०९, तुंबडी २
११०. रुक्मिणीस्वयंबर ९ उ.
१११. ,, पत्रिका ९ उ.

### स्तोत्रे ३

११२. ज्ञानेश्वर-मातृपितृ-भावनाष्टक २
११३, कृष्णपंचपदी
११४. गुरुपंचपदी २ पू

### चरित्र-आख्याने ३०

११५. आत्मचरित्र २
११६. सूचना प्रकरण १
११७. ,, ,, २
११८. अभंगात्मक १९आ.९पू.
११९. पदात्मक ११ आ.९उ.
१२०. पतिव्रताचरितामृत १५

### विविधरचना ७

१२१. सुखपर्व (नाटक) ,,
१२२. मात्रामृतपानम् १६
१२३. पत्नीप्रेमपराग २ उ.
११४. नवीन भाषानावंग १५
१२५. शब्दकोष १५
१२६. श्रौतक्रिडा विशेष मोक्षपट
१२७. हरिपाठाच्या प्रतिज्ञा

---

**ग्रंथप्राप्तव्यस्थाने :**

- श्री ज्ञानेश्वर संस्थान, दहिसाथ, अमरावती, विदर्भ.
- मधुर प्रकाशन, बच्छराज व्यास चौक, महाल, नागपूर.
- श्री. ज्ञा. उ. मांढरे, १२८, रास्तापेठ, पुणे.
- हिंदुस्थान साहित्य, मोतीबाग, ३०९, शनिवार पेठ, पुणे
- सरोज प्रकाशन, रामदासपेठ, नागपूर

# व्दादशयष्टि : अनुक्रमणिका


१. रामकृष्णराव जठार – उत्क्रांतिवाद खंडन पा. १
मानभावमत समीक्षा – डार्विनचा उत्क्रांतिवाद – स्पेन्सरचा अज्ञेयवाद)

२. हरिभाऊ केवले (पत्र १) ओवी १२ पा. ११

३. हरिभाऊ केवले (पत्र २) ओवी १३ पा. १३

४. गणपतराव सावळीकर ओवी १९ पा. १५
ब्रह्मानुभवासाठी काय करावे ?

५. गोविंदशास्त्री पंचभाई पा. १६
स्वतःचा अपमान करून घेण्याकडे लक्ष – माझी निंदा.

६. हरिभाऊ केवले (पत्र ३) पा. २०
अमृतानुभवाच्या एका आर्येचा १०० जन्म अभ्यास – राधाविलास आख्यान.

७ विठ्ठलराव केकरे श्लोक ५३ पा. २१
वेदान्त रहस्य–अध्यारोप व अपवाद–सहा अनादि पदार्थ–जगताचे मूळ कारण –वेदान्तसिद्धान्त–आत्मक्रीड आत्मरति–परिणाम आणि विवर्त–भक्तिरसानंद–मोक्षाचे मार्ग–कर्ममार्ग–ज्ञानमार्ग-जीव एक की अनेक ?–वाचस्पतींचे मत–नैयायिकांचे पदार्थचतुष्क–पांच भेदकल्पना–जीवाचे स्वातंत्र्य–प्रारब्ध की प्रयत्न ?–आत्म्याची अविनाशता–तत्पदाची व्याख्या–त्वंपदाची व्याख्या–स्वरूपज्ञानाचे साधन–सत्, चित् व आनंद–जगदुत्पत्तिक्रम–ईशसृष्टि व जीव-सृष्टि–स्थूल भूतांची उत्पत्ति–वेद अपौरुषेय कसे ?–विश्वाचा स्वरूपनिर्णय–श्रवणमनन व निदिध्यास–केवळ शब्दच तारतात–त्रिविध अधिकारी-आत्मा कोणता ?–सच्चिदानंदरूप आत्मा–जगत हे काय आहे ?–कर्ता कोण ?–जन्ममरण कोणाला ?–मरणोत्तर दोन मार्ग–ज्ञानोत्तर स्थिति.

८. बाळकृष्णपंत केकरे श्लोक ३२ पा. ४०
जगताचे कारण–उत्क्रांतिवाद–जगदुत्पत्तीचा मनोसंवेग सिद्धान्त–साधनांचा क्रम–चित्तजयाचे मार्ग.

९. श्रीतुकोजी महाराज पवार संस्थानिक देवास (अभंग १३) पा. ४७
मी दीन आपण भाग्यवंत–नाही चमत्कार नाही पांडित्य–शीलनाथ महाराज दीनता–शेवटचे मागणे.

१०. श्रीतुकोजीराव पवार संस्थानिक देवास (पत्र २) अभंग ५ पा. ४९
पूर्वकर्म बलवत्तर–श्रद्धा व विवेक–चार पुरुषार्थ.

११. श्रीजगदेवराव पवार, देवास मोठी पाती पा. ५१
इंग्रजीपेक्षा संस्कृत शिक्षणाची आवश्यकता-प्रेमसमाधि–चमत्कार–बाह्यसमाधि व आन्तर समाधि–व्यवहारदशा–नास्तिकवादावर प्रश्न–माझा उणेपणा.

**१२. भय्यासाहेब तांबे** पा. ५५.

लेखीवाद–उमाजी नायकाचे चरित्र.

**१३. तांबे तहसीलदार – प्रेतयोनि** पा. ५६.

उन्मादविषयक माहिती–भूते आहेत की नाहीत ?–भूतोन्माद–भूत लागण्याचे कारण–भतांची वेळ–भूत कसे लागते ?–भूत लागल्याची खूण

**१४. महादेव वामन भट (पत्र १)** पा. ५९.

कर्माचा नियम–चित्तशुद्धिकारक कर्म–न शरीरकृतं कृतम्–ध्यान कसे करायचे? –मंत्राचे न्यास–केशवादी नावांचा अर्थ–प्रारब्धाचा नाश–आपले वैद्यक शास्त्र–सद्गुरूची भेट.

**१५. भट वकील (पत्र २)** पा. ६९.

जाति जन्मसिद्ध – प्राणायाम – ध्यान–धारणा–जप–शब्दब्रह्म – स्फोट–मंत्राचे सामर्थ्य–वैद्यक ग्रंथ–अजपाजप.

**१६. बडबडे संस्थान फलटण — मंत्रशास्त्र** पा. ७५.

मंत्राचे प्रकार–नैगम व साबर मंत्र–महानुभावांचे वैदिकत्व–दोन कृष्णांची उपपत्ति.

**१७. बाबा गर्दे (पत्र १) श्लोक ३०** पा. ७९.

**१८. काशिनाथ धर्माधिकारी श्लोक १८** पा. ८४.

नामस्मरण–कर्माग्रह नको व कर्मत्यागही नको–विषयदोष–यतमान वैराग्य–व्यतिरेक वैराग्य–एकेंद्रिय, वशीकार व पर वैराग्य–अपरा व परा विरक्ती.

**१९. बाबा गर्दे (पत्र २) श्लोक ३५** पा. ८७.

प्रांजळपणा–नामस्मरणाचे कारण–संधिसमाधि–समता कोठे व विषमता कोठे योजावी ?–भक्ताने कर्म सोडूं नये व कर्मठाने भक्ताला हासू नये–शूद्र व ब्राह्मण यांचे धर्म–प्रारब्धाने धर्म सुटला तरी त्याचे दु:खफल सत्पुरुष आनंदाने स्वीकारतात–उपासना व भक्तीतील भेद–निर्गुण होऊन सगुण भक्ती करावी.

**२०. विठ्ठल रामचंद्र सी. – राजयोग** पा. ९१.

मनाचा निरोध कसा करावा ?–राजयोगातही स्वप्रयत्न–योगाचा अधिकार–एका स्त्रीची गोष्ट–मस्तकावर हात ठेवणे व स्वप्रयत्न–शास्त्रप्रत्यय, गुरुप्रत्यय व आत्मप्रत्यय यांचा मेळ.

**२१. श्रीनिवासशास्त्री हरिदास – धर्मसुधारकांचा समाचार** पा. ९५.

मला धुळीतून बाहेर काढले–लोककल्याण करणाऱ्या आधु. धार्मिकांची धर्मावर कुऱ्हाड–कान्हेरे शास्त्रींचे खंडन–माझ्यातील विशेष प्रक्रियाप्रावीण्य–देशहित-पटूंच्या चुका–विवेकानंदांचे खंडन–माझ्या वर्णसंशयवादाचा अभिप्राय–माझे वर्णसंशयपर उद्गार परलोकोपयोगी–स्वामी रामतीर्थाचे खंडन–दोन प्रकारचे आपत्काल–दयानंद, केशवचंद्रसेन, विवेकानंद–सुधारकांचे स्वरूप–ब्राह्मण व

शूद्र दोघेही माझ्या विरुद्ध–चमत्कार–वारकरीही विरुद्ध–शंकराचार्यही विरुद्ध –धर्माचे कार्य–महाराजांना साह्य करण्याचे दहा प्रकार–वेदान्त मजजवळूनच शिकावा.

२२. **विष्णु नारायण भातखंडे – संगीत** **पा. १०३**
लक्ष्यसंगीत–जयदेवांचा मणिप्रकाशिका ग्रंथ–ॲटोमिक थियरी–इलेक्ट्रॉनिक थियरी–टिंडालचे मत–मारुत संहिता–गाण्यानें रोग निवारण–मार्गी संगीत–समय महत्व–औमापत्य ग्रंथ.

२३. **दत्तात्रय खापरे – मजवरचे आक्षेप** **पा. १०९**
चमत्कार खरे कसे मानणार ? कारण कृष्ण, गोपिका, राम, शंकराचार्य व्यास, तुकाराम यांचे विषयीही शंका घेणारे आहेत तर माझे काय ?–दुसऱ्याच्या महत्वाकांक्षा मी मारीत नाही–सर्व युक्ती जुन्याच हे दाखवून द्यावे–युक्ती जुन्या तर योजना नवीन–नव्या युक्ती नवा अवयव नियम–अनुभव जुना परिभाषा नवीन–दुसऱ्यांच्या युक्तीवर मी कां चिडतो ? पूर्वोपलब्धि परिहार या दोषामुळे-शिक्षणाची व्याख्या–मननाची व्याख्या–शब्दाचे अर्थ फिरविता येत नाही हा नवा नियम : आगमनिर्णय–मी वादातून पळून कां जातो ?–वाद, जल्प, वितंडा व अतिवाद यांच्या व्याख्या–माझा प्रमाद.

२४. **भय्यासाहेब बाबुराव तांबे – साधुपरीक्षा** **पा. ११७**
वेदान्त शिकविणे–वैय्यक्तिक दोषदृष्टि–सामाजिक दोषदृष्टी–शास्त्रीय दोषदृष्टी–ढोंगी साधू–साधुपरीक्षेचे १२ प्रश्न.

२५. **आनंदस्वामीकृत आर्यराष्ट्रीय विज्ञानवादाची समीक्षा –** **पा. १२६**

२६. **तुकाराम महाराजांचे प्रयाण (१)** **पा. १२८**
पूर्वपक्ष––देहाची पांचभौतिकता–रसाने तेजसप्रधान देह होतो–मंत्राने, कुंडलिनीसामर्थ्याने किंवा जात्यंतर परिणामाने दिव्यदेहत्व येते–उदा: नदीश्वर, राजसेवक, अर्जुन, धर्मराज–मायिक देह–विश्वासाचे जतन हाच हेतू.

२७. **तुकाराममहाराजांचे प्रयाण (२)** **पा. १३२**
श्रीतुकारामांनी आत्महत्या केली नाही–अर्थवाद : १ गुणवाद, २ अनुवाद, ३ भूतार्थवाद–ज्ञान्याला मृत्यूची इच्छा ?–ज्ञानी व यथेष्टाचरण–वासिष्ठातील तीव्र संवेग–मनुष्य व देवतांची भेट–विश्वरूप पाहण्यास व्यापक सत्वदृष्टीची अपेक्षा–शंकराचार्यांचे भाष्यप्रामाण्य–लेखकाचे दोष.

२८. **यज्ञोपवीत धारणाचा हक्क** **पा. १३७**
जानवे घालून ब्राह्मण, क्षत्रिय की वैश्य व्हायचे ?–जाती गुणकर्माने मानावी काय ?–संस्कार कोणावर करावयाचे ?–जन्माने जाती मानावी काय ?–यज्ञोपवीतादी भेदचिन्हे कशाला ?–धर्मात आग्रह नको–हे यज्ञोपवीत प्रकरण मत्सर वाढविणारेच आहे.

२९. **शिवगंगामठाधिपति शंकराचार्य : धर्माचे स्वरूप** पा. १४१

धर्मांत बदल करावा काय ?–धर्माचे स्वरूप–विकाररहित धर्म पालन–महात्म्यांचे विकार–यशोधनराजा–जगदुद्धाराची काळजी–क्षेपकवादाची सोपी रीती–शिवगंगा मठाचे शंकराचार्य–जगन्नाथपुरीचे शंकराचार्य–महाराजांचा वेदोच्चार.

३०. **स्वजातिबांधवांचे चरणी विनंती–ब्राह्मणब्राह्मणेतरवाद** पा. १४५

मराठा बांधवांचे चरणीं विनंती–ब्रांह्मणब्राह्मणेतर वाद अर्धवट शिक्षणामुळे–वेदाधिकार अर्थाबद्दल, अक्षरांचे उच्चाराबाबत नव्हे–जैनातील जातिभेद–दयानंदांचा वदतोव्याघात.

३१. **ब्राह्मणब्राह्मणेतर वाद** पा. १४८

खानपानादि व्यवहार–ब्राह्मणांनी विद्या चोरली काय ?–धर्मांतर व देशांतर–धर्मातील अनीतीचे प्रकार–पतितपरावर्तन–सर्व धर्मांचे ऐक्य विचाराने, आचाराने तव्हे–ब्राह्मणांना कठीण धर्म व इतरांना सोपा कां ?–धर्माचे ऐहिक प्रयोजन मुळीच नाही-विश्वकुटुंबी महात्मे कसे वागतात ?–जातिभेद रजोगुणाच्या संकोचासाठी–दयेचा अर्थ–हिंदुधर्म नष्ट होईल काय ?–कठीण शास्त्रांचे प्रयोजन.

३२. **मुसलमान, ख्रिश्चन व हिंदुधर्म** पा. १५४

हिंदुमुसलमानांत धार्मिक दृष्टीने सख्य की द्वेष ?–धार्मिक लढाया–कर्म, उपासना व ज्ञान म्हणजे शर्यत, तारिकत व हकीकत हे ईश्वरापासून आले–ख्रिश्चन धर्मात क्रिया ईश्वरापासून तर तत्त्वज्ञान जीवबुद्धीतून म्हणून धर्म व तत्त्वज्ञानाची फाटाफूट–तापसी व सुफी मनाने एकच–ख्रिश्चन मुसलमानांचे ऐक्य–हिंदुमुसलमानांचे ऐक्य–गवताप्रमाणे ७७० वेळा जन्म–ईश्वर विसरणे म्हणजेच संसार, बायका मुले संसार नव्हे–अज्ञानाने बंध–अल्ला म्हणजे आई–कुराणात ईश्वरमातृत्व–हिंदुख्रिश्चनांचे ऐक्य–बुद्ध हिंदूंचा अवतार–विचार दृष्टीने सर्व धर्मांचे ऐक्य पण आचार भिन्नता–हिंदुमुसलमानातील द्वेष धार्मिक नसून राजकीय–धर्म तत्त्वांचा ध्यानाने शोध घ्यावा.

३३ **योगाचा विपर्यास आणि भोंदुगिरी** पा. १५८

वैराग्यावाचून योगाभ्यास–चमत्काराने फसगत–योगाचा अधिकार कोणाला ?–वैराग्य व अभ्यासाची जरूरी–चमत्कारांनी योग नष्ट प्राय होईल–योग ology ऐवजी ism झाला–योगावरील प्रश्न–सविकल्पातून निर्विकल्प कसे होते ?–प्रमाणवृत्तीचा निरोध प्रमेयात की विषयात ?–प्राणायाम व ईश्वर प्रणिधान–कुंडलिनीची प्रथम भावना की प्रथम साक्षात्कार ?–साक्षात्कार ही योगाची अन्त्यदशा की मध्य दशा ?–सत्व व तमाचा निरोध कसा करावा ?–योगात या सर्वांची उत्तरे आहेत.

३४. बहिणाबाईंची कविता – रसग्रहण पा. १६४

वेदरहित आत्मज्ञानी–ब्रह्मज्ञान्याला प्रारब्ध नाही–बहिणाबाई वसिष्ठांचा अवतार–भोंदूंच्या तोंडावर पैजारा–श्रवणादिकांनी व गुरुकृपेने आत्मज्ञान होते–भक्तीचे वर्म-ज्ञानोत्तर भक्ती–माझ्या ग्रंथांत यापेक्षा अधिक काही नाही.

३५. पाश्चात्यांचा वेदान्त, – हिप्नॉटिझम् व योग पा. १६८

वेदान्त व व्यवहार–प्लेटोचे तत्त्वज्ञान आणि नीचता–सॉक्रेटीसचे वाक्य–डेकार्ट, कांट, थियॉसॉफी–आर्यांचे शील–हिप्नॉटिझम् मुसलमानाचा योग हिंदूला कशाला ?–धर्माचरणाचे महत्व–हिप्नॉटिझम्ने धनप्राप्ती–योगात प्रथम वैराग्य नंतर अभ्यास व पुन: परवैराग्य–आज अभ्यासच सर्वस्व–भोंदू योग्यांना प्रश्न–विकार आणि चक्रे–धारणा आणि समाधिलय–योगातील दृष्य रंग–योग व हिप्नॉटिझम्चे अधिकारी वेगवेगळे.

३६. योगाने गुरुपरीक्षा पा. १७२

संसारतप्तांचे दोन प्रकार–वर्णाश्रमाने चित्तशुद्धी झालेले व दु:खाने पश्चात्तापदग्ध–साधूची लक्षणे–श्रीएकनाथांनी व तुकारामांनी सांगितलेल्या कसोट्या–संशयी साधकांचे तीन प्रकार–१ अधिकार नसलेले, २ फसलेले, ३ साधनसंपन्न–मूर्धाधारणेत द्विदल चक्रावर गुरुदर्शनाची रीती–शिष्य परीक्षा.

३७. श्रीहरी केशव वाळिंबे – वर्णाश्रम व ब्रह्मज्ञान पा. १७५

बहिणाबाईचा अभंग–कर्म आणि ब्रह्म एकच–सिद्ध व साधक स्थितीतील फरक–घृतायन्र्याय–सिद्धावस्थेत कर्म सोडणे हाही अहंकार; म्हणून धर्माचरण सुटत नाही–कर्म व ब्रह्माची विषमसत्ता म्हणून अविरोध–कृष्ण, शुक, जनक, राम, वसिष्ठ हे सर्व समान–ज्ञानी कसाही वागू शकतो पण पूर्वसंस्कारानुसारच वागतो–वर्णाश्रमाला तुच्छ समजणे देहाभिमानाचे लक्षण–अज्ञानी, मंदज्ञानी व दृढज्ञानी यांची विहित कर्मांने किंवा उपासनेने हानी होत नाही–जीवन्मुक्तीत भजन हा स्वभाव.

३८. मानभावी योगवासिष्ठ (१) – धर्मसंकट पा. १७८

धर्मोपदेशक होण्याची हाव–पुराण भाकडकथा ?–सर्वधर्म ऐक्याचा खटाटोप–धर्मोपदेशकाचे कार्य १) तत्त्वसारायण हा थियॉसॉफीचा संस्कृत ग्रंथ शांकरज्ञानविरोधी–खलात कुटून केलेला समन्वय– २) सिद्धान्तसूत्रे निरंजन भाष्यातील आधु. उत्क्रांतिवाद– ३) महानुभावांचे योगवासिष्ठ, युगधर्म, अन्य व्यावृत्ती व वज्रसूचिउपनिषद्–श्रीतुकाराम व मध्वमुनींच्या नावावर मानभावांचे अभंग–गुरूची कोणती आज्ञा पाळावी ?–स्तन्य देणारे श्रीज्ञानेश्वर –वंशप्रचारक शंकराचार्य–बीजपुरुष उपनिषद्–अंकुर वासिष्ठ–वेदान्ती चर्चा कोणाशी करीत नाहीत ?– वेदान्त्यांचा समज.

**३९. मानभावी योगवासिष्ठ (२)** पा. १८६

पंडुगीतेतील मानभाव धर्म व महंतवर्य दत्तराज–मी यौक्तिक भाषा वापरणारा–आत्म्याचे अनेक अर्थ–आत्मा चैतन्यरूप की चेतनाच्या पलीकड ?–आत्मा जड की चेतन ?–तीन प्रकारचे चैतन्य–देवतांची नावे व चक्रांचा क्रम भलताच–मणिपूराचा घोटाळा–पवनाने कर्मयोग कसा साधतो ?–योगविरुद्ध प्रतिपादन–संप्रदायवेदान्ताचा अर्थ.

**४०. मानभावी योगवासिष्ठ (३)** पा. १९७

या योगवासिष्ठातील 'युगधर्म' मानभावांचा आहे, श्रुतिपुराणोक्त नव्हे–मूळ योगवासिष्ठ शांकरमताचे–मानभावाला मी वाईट म्हणत नाही–वेदान्त ग्रंथातील घोटाळे–इतिहासदृष्टी मला नको.

**४१. आचार्य व ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान एकच.** पा. १९८

**४२. माझ्यासंबंधी गैरसमजुती** पा. २००

स्वत:ला शूद्र म्हणण्याचे कारण–ग्रंथरचना महाराजांची की ब्राह्मणांची ?–महाराज ग्रंथ ऐकून इकडचे तिकडचे लिहितात–शौचाचे वेळी ग्रंथवाचन–यक्षिणीसाधन?–गृहस्था श्रमाच्या आग्रहाचे कारण–ब्रह्मचर्याच्या दोन परीक्षा–परिस्थितीने अधर्मात गेलो तरी दुसऱ्याला धर्म सुचवून मरेन.

**४३. गोरक्षण : धार्मिक व वैद्यक दृष्टी** पा. २०३

वचनबळ असेल तर परमेश्वर व्यक्त होतोच असा वैदिक सिद्धान्त–वैदिकधर्म नि:पक्षपाती–गोरक्षणाला मुसलमानधर्माचाही विरोध नाही–गोमांस भक्षणाने रोगोत्पत्ती असा वैद्यकातील इतिहास–क्षय, संग्रहणी वगैरे रोगांवर पंचगव्याचा उपयोग–धर्मत:, अर्थत: व कामत: गोरक्षणाची जरूरी–ब्राह्मणातील धर्म जाईल पण गायीतील धर्म कधीच जाणार नाही.

**४४. श्रीबाबाजीमहाराज पंडितांचा लेख–शंकराचार्य व ज्ञानेश्वर** पा. २०७

श्रीगुलाबरावमहाराजांचा मनोरथ पूर्ण करण्याचा प्रयत्न–शंकराचार्य मतातील मायावाद-ज्ञानदेवांनी अज्ञानी लोकांच्या दृष्टीने केलेला अविद्येचा अंगीकार–अज्ञानखंडन व ज्ञानखंडन–आचार्यांचा व विद्यारण्यांचा चिद्विलास–विवर्तवाद–समसत्ता व विषमसत्ता–अज्ञान शब्दमात्र–तिघांचेही ऐकमत्य.

**४५. श्रीबाबाजी महाराजांचा लेख (२) शंकराचार्य व ज्ञानेश्वर** पा. २१५

**टीपेतील संदर्भ पत्रे**

१. श्रीरामकृष्णराव जठार ग्वालेर यांचे पत्र पा. ११
२. श्री हरिभाऊ केवले यांचे पत्र पा. १३
३. श्री. म. वा भट वकील यांचे पत्र पा. ५९
४. श्री. बडबडे संस्थान फलटण यांचे पत्र पा. ७५

५. श्री. बाबा गर्दे यांचे पत्र पा. ८२

६. श्री. काशिनाथ धर्माधिकारी यांचे पत्र पा. ८५

७. श्री. बाबा गर्दे यांचे पत्र पा. ९०

८. श्री. भातखंडे यांचे पत्र पा. १०७


९. श्री. व्यं. शुक्ल यांचे मुमुक्षूत पत्र पा. १४३

१०. श्रीज्ञानेश्वरांचे योगवासिष्ठ (मुमुक्षु) गोविंदसुत पा. १९३

११. बाळशास्त्री हुपरीकरांचे पत्र पा. २११

**शुद्धिपत्र** **पा. २२०**

□□□



मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराज

इ. स. १८८१ ते १९१५

## १. श्रीमंत रामरावकृष्ण जठार यांना पत्र

[श्रीमंत रामरावकृष्ण जठार, संस्थान ग्वाल्हेर, स्वानंद साम्राज्यकर्ते यांस तारीख १६ जून १९०२ ला श्रीमहाराजांनी पाठविलेल्या पत्रांतील मानभाव, डार्विन, स्पेन्सरादि मतांची समीक्षा]

।।श्री ज्ञानेश्वर माऊली समर्थ।।

# मानभाव मत समीक्षा

'मळरचना' नांवाच्या प्रकरणातील मतवाद

**जीव व परमात्मा दोन्ही भिन्न आहेत. व नित्य आहेत. जीव हा अविद्येने बद्ध आहे व ईश्वर हा मायेचा देह घेऊन जीवाला उद्धरण्याकरता अवतार घेत असतो. ती अविद्या अनित्य आहे. तिचे निरसन झाले म्हणजे जीव परमेश्वराचे ठिकाणी जातो, परंतु परमेश्वर होत नाही.**

वरील मतांवर शंका

शंका १– **जीव नित्य आहे आणि अविद्या अनित्य आहे, तर जीवाला अविद्या केव्हापासून लागली ? आणि ती लागण्याचे कारण काय ? अनादि आहे म्हणाल तर तिचे निरसन कसे होईल? उत्पन्न झाली नाही परंतु तिचे निरसन होते म्हणाल तर जी उत्पन्नच झाली नाही तिचे निरसन होणे म्हणजे वांझोटीचा पुत्र मेला असे म्हणण्यासारखे होय.**

शंका २–– **ईश्वर हा मायेचा देह घेतो तर तो उपाधिबद्ध होईल, मग त्यास मुक्त म्हणता येणार नाही.**

शंका ३–– **ईश्वर मुक्त आहे परंतु तो जीवाकरिता मुद्दाम मायाबद्ध होतो, असे म्हणाल तर त्याला एवढी उपाधि घेण्याची गरज काय?**

शंका ४–– **त्याला करुणाच तशी आहे म्हणून तो मायेचा देह घेतो, असे म्हणाल तर करुणा हा गुण मायेचा आहे असे तुमच्याच महावाक्यात सांगितले आहे, म्हणून ईश्वरही मायाबद्ध आहे काय?**

शंका ५––– **जीव जर परमेश्वर होत नाही तर त्याला स्वतंत्र सुख मिळणार नाही. त्यामुळे भीति कायम राहील. मग मोक्ष कशाचा? म्हणून परमेश्वराने जीवाला परमेश्वरच केले पाहिजे.**

शंका ६–– **जीव व ईश्वर एक कसा होईल असे म्हणाल तर 'ईश्वराच्या आंगी अघटित सामर्थ्य नाही', असे कबूल करा; आणि तसे म्हणाल तर तुमचे मत स्वीकारून अर्थ कोणता ?**

**वरील साही शंकांचे उत्तर मानभावांना देता आले नाही.**

# डार्विन मत समीक्षा

डार्विनचे मत

या मतात मनुष्याची उत्क्रांति मानली आहे. मनुष्यप्राणी हा पूर्वीचा मासा होता व नंतर माकड होऊन हळुहळु मनुष्य झाला. तशीच पृथ्वी वायुरूप होती व ती घनरूप झाली. या सर्वांचे कारण एक काहींतरी आहे.

आशंका

डार्विन जे कारण मानतो ते उपादान मानतो की निमित्त मानतो कोण जाणे? निमित्त मानत असल्यास ते जगदोपादानाहून भिन्न असले पाहिजे, व त्याची उत्क्रांति न झाली पाहिजे. आणि तसे मानल्यास उत्क्रांतीचे उपादान कोणते?

बरे, निमित्त कारणच नाही, तर उपादानाचे ठायी उत्क्रांतीचे सामर्थ्य कोठून आले? अनादिच आहे असे म्हणेल तर सर्वच गोष्टी त्या कारणात अनादि असल्या पाहिजे, आणि एका बरोबर सर्वांचीच उत्क्रांती झाली पाहिजे, परंतु तसे होत नाही. काही गोष्टींची अपक्रांतीही होते. हल्ली जे पृथ्वीत हाडांचे अश्मीभूत सापळे (Fossils) सांपडतात, त्यापेक्षा आपले शरीर किती (तरी) अंशाने कमी आहे. बरे असो.

त्याच मतात एके ठिकाणी म्हटले आहे की "मनुष्याची बुद्धि जास्त वृद्धिगत होऊन स्तुतिप्रियत्व हा गुण हळु हळु नष्ट होईल."

येथे एक शंका येते की, स्तुतिप्रियत्व आणि कर्तव्यशक्ति हे दोन्ही धर्म चित्ताचे किंवा बुद्धीचे असून त्यातच एका गुणाची उत्क्रांति व्हावी, व एका गुणाची अपक्रांति व्हावी याचे कारण काय?

आकाश हे स्वतंत्र सत्व असून त्याची उत्क्रांति कां होत नाही ?

बरे, दृश्यपदार्थांमध्ये तरीं ज्ञानाची उत्क्रांति होते की शरीराची होते? शरीराचीच होते म्हणाल तर ज्या पदार्थापांसून त्याची उत्क्रांति होत असेल त्या पदार्थाची हळु हळु अपक्रांति झाली पाहिजे. जसे माशाचा माकड झाला म्हणजे मासा नष्ट झाला पाहिजे, आणि माशाचे नष्ट होणे म्हणजे त्याची अपक्रांतीच होय.

आणि असाच सिद्धान्त मांडला तर मग कारणाचे अनादित्व व अनंतत्व कोठे राहिले? अनंतत्व जे ठरवावयाचे ते एका ( च ) नियमावरून व एका ( च ) उदाहरणावरूनच ठरत नाही, तर त्याला सर्व नियम सर्व उदाहरणे व सर्व आधार सारखेच असले पाहिजेत.

"ज्ञानाची उत्क्रांती मानली" तर माशांची व मनुष्याची जाणीव शक्ति एकच आहे. माशालाही स्वपोषक विषय व स्वविषयानंदाचे भान

**आहे. आणि मनुष्यालाही स्वपोषक पदार्थ व स्वविषयानंदाचे भान आहे. म्हणून दोघांचीही जाणीव शक्ति एकच आहे. त्यात ज्ञानाची उत्क्रांति कोणती ?**

माशांपेक्षा मनुष्याचे ज्ञान ऊंच आहे, हीच त्याची उत्क्रांति हे म्हणणे संभवत नाही, कारण दोघांच्याही विषयांची भिन्नता आहे.

**मनुष्याच्या विषयांचे ठिकाणी माशाला सुख होत नाहीं. म्हणूनच त्यास मानव-विषयांची प्रतीति नाही. जसे घृताने मासा मरतो म्हणून त्यास घृत सुखकर नाही. व इच्छा नसल्यामुळे त्यास त्याची प्रतीति नाही. तसेच माशांचे विषयाने मनुष्यास सुख होत नाही. जसे––शेवाळादिक पदार्थ मासा भक्षितो व मनुष्य भक्षित नाही, कारण त्यास शेवाळाची सुख प्रतीति नाही.**

"आतां दोघांचेही दृष्टि विषय एकच आहेत म्हणजे शेवाळ आणि घृत हे दोन्ही पदार्थ माशास व मनुष्यास सारखेच दिसतात मग विषय भिन्न कशाचे?"**— हे म्हणणे सम्यक नाही, कारण विषयांची दृश्यता दोघांसही समान घडते तर १–विषयांचे रूपांतर, २–ज्ञानाची एकता, ३–काही शक्तींचे समानत्व, ४–काहीं शक्तींचे पृथगत्व, ५–आकृतींचे विलक्षणत्व हे गुण माशांमध्ये व मनुष्यामध्येही आढळतात. मग ह्याचेच नांव कां उत्क्रांति ?**

**बरे,** "मृत्तिकेपासून सर्वांची उत्क्रांति मानावी" **तर वृक्षादिकांची व्यवस्था कशी ?** वृक्षादिकांपासून हळूहळू जीवप्राणी झाले **असे मानावे तर हे घडत नाही. कारण हे परिणामी कार्य कारणात न मिळाले पाहिजे; परंतु जगात तर क्रिया अत्यंत भिन्न आढळतात. वृक्षाचे बीजाचा वृक्षच होतो आणि मनुष्याचे वीर्याचा मनुष्यच होतो. याप्रमाणेच अन्य गोष्टी—मनुष्याचे प्रेताची माती होते आणि झाड तुटून पडलेल्या काष्टाचीही माती होते. त्यात काही मातीचे, निमित्त कारण जो कुलाल त्याच्या द्वारा, घट होतात. काही मातीमध्ये किडेही आढळतात. त्यांत कांही किडे नियमित काली असतात. जसे मृग, देवगायी, शिदोड इत्यादि. त्यात शिदोडावर मीठ घातले म्हणजे पाणी होते. याप्रमाणे रसायनरीत्या काही पदार्थ विरुद्धत्व पावतात, मग या नाना पदार्थांची कारणे निरनिराळी मानावी काय ?**

**असेच दुसरे उदाहरण––शेण आणि गर्दभमूत्र यांच्या मिश्रणाने विंचू उत्पन्न होतात. परंतु शेण आणि मूत्र हे तरी काय? तर अन्नाची व पाण्याची अपक्रांति. व विंचू हे काय ? तर शेणाचे व मूत्राचे रूपांतर ! असा दृष्टांत घेणे रूपांतराचा व सिद्धान्त ठरविणे उत्क्रांतीचा ! हे शोभेल तरी पण ?**

**बरे,** "निर्जीव पदार्थांचे सजीव पदार्थ होणे ह्याचे नाव उत्क्रांति असे मानावे तर मग जे काही मूळ कारण असेल ते अत्यंत निर्जीव होते व हळु हळु आता सजीव होत चालले आहे असे मानावे लागेल. आणि तसे मानल्यास अत्यंत भविष्यकाली सर्व प्राणी सजीव झाले पाहिजेत व त्यांच्या जातीही न ठरविता आल्या पाहिजेत"**––पण असे होणे संभवनीय नाही. कारण आताच एकमेकाविरुद्ध क्रिया जगात आढळतात· सजीव प्राणी सजीवास विरुद्ध आहेत, म्हणजे नाशक आहेत. व निर्जीव पदार्थ निर्जीवास नाशक आहेत. जसे––सर्प, व्याघ्र हे मनुष्यादि सजीवनाशक; तसेच अग्नि, जल हे कर्पूरलवणादि निर्जीवनाशक. आता निर्जीव पदार्थही सजीवनाशक आहेत जसे––लवण शिरोडादि.**

"सर्वांना, कारण जी मृत्तिका तिचे ठायी लय होतो" **म्हणाल तर कर्पूरादिकांचा लय मृतिकेचे ठायी कोठे होतो ? शिवाय धात्वादिकांचा विचार राहिलाच.**

**आणि गुरुत्वाकर्षणक्तीची उत्क्रांति कशी होते हे कळत नाही. म्हणून–**

**कांही वस्तूंचे समानत्व, कांही वस्तूंची उत्क्रांति, कांही वस्तूंची अपक्रांति, कांही वस्तूंचे रूपांतर, कांही वस्तूंचे अखंडत्व, या सर्वांस उत्क्रांतीच नांव द्यावयाचे की काय ? हे वैविध्य एकाच कारणात राहते तर मग तेथे प्रतिबंध करणारी शक्ती कोणती व उत्क्रांति होण्याचे निमित्त काय ?**

**बरे, उत्क्रांति कारणासहित होते किंवा नुसत्या शक्तीची होते ?** "कारणासहित होते" **म्हणाल तर वरील गोष्टींप्रमाणे त्या कारणाची अपक्रांति होत होत त्यापासून होणाऱ्या कार्यांची हळुहळु उत्क्रांति झाली पाहिजे. असे मानले असता कारणाचे अनंतत्व नष्ट होईल. आणि तसे मानल्यास कारण सांत झाल्यामुळे अत्यंत भविष्यकाली सर्वांचे काहीतरी सजीव–निर्जीव, विरुद्ध–अविरुद्ध एक कार्य झाले पाहिजे. तसे झाले म्हणजे उत्क्रांतिवाद खुंटला.**

**येथे कोणी अशी शंका करतील की,** "उत्क्रांतिवाद खुंटला कशाचा? कार्याची आणखी उत्क्रांति होईल" **तर त्यास मी विचारतो की–अत्यंत भूतकाली जे कारण मानतो ते देखील कोण्या भूतकालीन कारणाचे कार्यच** असेल; **असे जर मानले तर "कार्यच कार्याचे कारण व कार्यच कार्याचे कार्य"** असे **मानावे लागेल.**

"शक्तीची उत्क्रांति होते व कारण निराळे राहते" **असे म्हणावे, तर ही उत्क्रांति होण्याची शक्ति कारणात आली कोठून ?** "स्वभावाने आली" **हे म्हणणे शोभत नाही. कारणाचा स्वभाव व कारणाची शक्ति त्यांची उत्क्रांति म्हणणे म्हणजे वरील गोष्टीप्रमाणेच आहे.**

बरे, "कोणी ती शक्ति कारणामध्ये आणन ठेवली व नंतर तो आणणारा तिची उत्क्रांति करू लागला" असे मानावे तर ती शक्ति आणणाऱ्यास किती काळ लोटला? व ते आणण्याचे निमित्त काय? ही आणण्याची क्रिया आकाशरूप पोकळीतच घडली की आणखी कोठे घडली?

"आकाशातच घडली" असे म्हणाल तर त्याची (आकाशाची) उत्क्रांति कां होऊ नये ?

"आकाश व काल ह्यांची उत्क्रांति होत नाही केवळ द्रव्याचीच उत्क्रांति होते" असे म्हणाल, तर मग ते "उपादान कारण" अथवा त्याचेमध्ये शक्ति आणून ठेवणारा जो कोणी असेल तो "निमित्त कारण" हे दोघेही द्रव्यरूप मानावे की द्रव्य रहित मानावे? १–द्रव्यरूप मानले तर त्या द्रव्याची उत्क्रांति कोण्या कारणापासून झाली? २—द्रव्यरहित मानले तर त्यापासून द्रव्याची उत्क्रांति कशी संभवेल ?

बरे, "एक कारण द्रव्यरूप मानणे व दुसरे कारण द्रव्यरहित मानणे" हे सम्यक् नाही. कारण जेथे द्रव्य आहे तेथे कोणत्याही ( कोणत्यातरी ? ) द्रव्याची उत्क्रांति असली पाहिजे, आणि द्रव्यरहित आहे त्यापासून तर द्रव्योत्क्रांति संभवत नाही. आणि "द्रव्यच नित्य आहे–त्याची उत्क्रांती होत जाते"–हे म्हणणे संभवत नाही. कारण त्या द्रव्याचे परमाणू कोणत्या तरी शक्त्याश्रित असले पाहिजेत. आणि तसे मानावे तर त्या शक्तीलाही स्थान पाहिजेच.

ही क्लृप्ति बसविता येत नाही म्हणून आग्रहाने "द्रव्यच नित्य आहे त्याची उत्क्रांति होते" असे म्हटले तर पुन्हा वरील प्रमाणे त्या द्रव्याच्या 'एका अवस्थेची अपक्रांति व दुसऱ्या अवस्थेची उत्क्रांति' मानावी लागेल. आणि तसे केले म्हणजे शेवटची जी अवस्था होईल तेथे तरी उत्क्रांतिवाद खुंटलाच पाहिजे.

कोणी म्हणेल की "उत्क्रांतीला शेवटची अवस्थाच नाही. कोणतीही अवस्था तिची पहिलीच ( अवस्था) आहे," तर मग कोणत्याच वस्तूची अपक्रांति न झाली पाहिजे.

असो, अशा अनियमित सिद्धान्तासच तुम्ही उत्क्रांति म्हणता काय ? आणि आग्रहाने तसे मानत असाल तर डार्विनमताभिमानियांनो! तुम्ही उत्क्रांति प्रत्यक्ष अथवा अनुमान यापैकी कोणत्या प्रमाणाने सिद्ध करून दाखविता ? या सर्व प्रश्नांची उत्तरे डार्विनकृत उत्क्रांतिमतात मिळत नाहीत. असो; कोणत्याही बाजूंनी पाहिले असता हे डार्विनचे मत अगदी असिद्ध आहे.

॥ इति उत्क्रांतिमतखंडन समाप्त ॥

# स्पेन्सर मत समीक्षा

**नास्तिकमतापेक्षा हा गृहस्थ अंमळसा आत शिरलेला आहे, अशी माझी खात्री झाली म्हणून त्या मताचे येथे दिग्दर्शन करतो स्पेन्सरचे दहा ग्रंथ उपलब्ध आहेत. त्यात प्रथमग्रंथ आदितत्त्व हा होय. त्याचे दोन भाग आहेत. पहिल्या भागाचे नांव** अज्ञेयमीमांसा **व दुसऱ्याचे** ज्ञेयमीमांसा **या दोन्ही भागांशी (परस्पर) अत्यंत विरोधच म्हटला पाहिजे. ज्ञेयमीमांसेमध्ये उत्क्रांतितत्त्वाचेच अनुकरण केले आहे व आणखीही काही गोष्टी सांगितल्या आहेत. त्यामध्ये असेही सांगितले आहे की** "देहापुरतेच ज्ञान असल्याने आपले भागत नाही. आणखीही काही गोष्टींचे ज्ञान पाहीजे" **हा मुद्दा ध्यानात ठेवण्यासारखा आहे. ह्यापेक्षा हा भाग वर्णन करण्याचे प्रयोजन नाहीं.**

**अज्ञेयमीमांसा नामक प्रथम भागात** "धर्म आणि शास्त्रांचे एकीकरण" **सांगितले आहे. व ते सर्वांशी (सर्व अंशी) अगम्य आहे, असे म्हणतात.**

"आकाश, काल, द्रव्य, गति, शक्ति, मन, जीव हे सर्वच पदार्थ अज्ञेय आहेत व त्यांच्या मूळाशी काही अज्ञेय अधिकरणहीं आहे, अशीं आपलीं भावना अनपेक्ष ज्ञानद्वारा आपणास शिकविते. हे अनपेक्ष ज्ञान म्हणजेच भावनेचे अस्तित्व, दुसरे काही नाहीं"

**या प्रतिपादनावरून बऱ्याच शंका येतात.**

शंका

"या सर्वांसच जर अज्ञेय मानावे" **तर ही एकदेशीय ज्ञानशक्ति कशीं उत्पन्न झाली ?** "तिचेहि अंतःस्वरूप अज्ञेय आहे" **असे म्हणाल तर मग भावनाच नष्ट होईल. आणि तसे न मानले तर बाह्यस्वरूप ज्ञानमय असणे व अन्तःस्वरूप अज्ञेय असणे या प्रश्नाचा उलगडा कसा?**

**बरे, जे काही अज्ञेय आहे ते सर्वदेशीय आहे की एकदेशीय आहे? 'सर्वदेशीय म्हणाल' तर एका देशाचे ठायीं ही ज्ञानशक्ति स्थित कशीं झाली ? आणि 'एकदेशीय म्हणाल' तर सर्वदेशीय ज्ञेयाचे ठायी एकदेशीय अज्ञेयत्व कसे राहिले ?**

**आता बाह्य पदार्थांकडे वळू. आकाश व काल हे आहेत किंवा नाहीत? नाहीत म्हणावे तर त्यांच्या अस्तित्वाची भावना करता येते. बरे, शक्तीचे अन्तःस्वरूप जरी सांगता येत नाही तरी द्रव्य परमाणूंशी आणि तिजशी बरेच तादात्म्य आहे.**

**आता द्रव्याचे स्वरूप पाहू--द्रव्यघटक परमाणूला धरून भावना, आत गेल्यावर द्रव्यान्तःस्वरूप नेणीवेमुळे परत येत असेल तर मी पृच्छा**

करितो की, भावनेचे स्वरूप द्रव्यरहित काय राहते ? द्रव्यरहित वस्तंचें स्वरूप आहे की नाही? "नाही' म्हणाल तर ते बरोबर नाही कारण—सर वुईल्यम ह्यामिल्टन मताच्या अनुयायीयांनी अशी एक क्लृप्ति बसविलेली आहे की त्याचे स्पेन्सरकडून उत्तर देवविल्या जात नाही. सर वुइल्यमचे अनुयायी म्हणतात– द्रव्याचे जे अत्यंत सूक्ष्म परमाणू व त्यांचे तुकडयांचे तुकडे जरी घेतले तरी ते कोणत्या शक्तीवर कायम राहणार ? संयोग-शक्तिवरच की नाही? येथे स्पेन्सरला होय म्हणावे लागते. यावरून विचार करू––

सर वुइल्यम मतानुयायांनी मानलेली ही संयोगशक्ति ती सर्वाधिष्ठानी आश्रित असली पाहिजे. अधिष्ठानच नाही अशी जर कल्पना कराल तर ते बरोबर नाही. कारण शक्तीला कोणत्या तर पदार्थाचा आश्रय असल्यावाचून तिची स्वरूपसिद्धी होत नाही. □ ही शक्ति परमाणूंचीच आहे. असे कदाचित म्हणाल तर ते कार्यरूपी परमाणू कशाचे बनले ? किंवा स्वयंभू आहेत? स्वयंभू मानल्यास नास्तिकांप्रमाणे विश्वातील द्रव्य तेवढे स्वयंभू आहे असे कबूल करावे लागेल.

स्पेन्सरनी जीं धर्मांची मूलतत्त्वे विवरून दाखविली त्यात नास्तिक, अद्वैत, एकेश्वरवादी, आदिकरून सर्व धर्मांचे खंडन केले. पण अद्वैत धर्मास त्यांनी जो बाध आणला होता त्याची सिद्धि बरोबर केली नाही, कारण त्यांनीच पांचव्या प्रकरणात एके ठिकाणी म्हटले आहे कीं, " आपणास विश्वात जे दृश्यादृश्यरूप चमत्कार भासतात ते सर्व मिळून बनलेले विश्व कोणत्यातरी एका अज्ञेय कारणरूप महाशक्तीचा प्रादुर्भाव आहे. आणि ती शक्ति सर्वव्यापीही असेल."

यावर एक शंका येते की, नानाविध चमत्कारांनी भरलेले हे दृश्यादृश्य विश्व ज्या शक्तींचा प्रादुर्भाव आहे ती शक्ति पूर्वी नानाविध चमत्कारांची एकत्र झालेली साठवण असावी आणि तसे मानले तर नास्तिकांप्रमाणे 'विश्व स्वयंभू आहे' असे कबूल करणे भाग पडते.

अद्वैतवाद्यांनी तरी एका बीजाचे विश्व बनले असे सांगितले, आणि तुमच्या मतात तर "सर्वच पदार्थ त्या अज्ञेयशक्तिरूप कारणात बीजरूपाने नित्य आहेत" मग तुमच्या मतात व नास्तिकांच्या मतात भेद तो काय? तुम्ही अज्ञेय शक्ति मानलेली आहे व त्यांनी परमाणू मानलेले आहेत. असेच जर तुम्हाला विश्वाचे बीज कायम राखणे होते तर नास्तिकांचेच अनुकरण केले पाहिजे होते. अस्तु.

ती अज्ञेय शक्ति सर्वव्यापी असेल असे जे तुम्ही संशयात्मक सांगितले, त्यावरून असे दिसते की, तुमचा निश्चय कोणत्याच मतावर झाला नाही कारण सर्वव्यापित्वात आपली ज्ञानशक्तीही आली, आणि संशय आणि निश्चय हे दोन्ही आपल्या ज्ञानशक्तीचे घटक आहेत. त्यात कोणत्या घटकावर तुम्ही आहात?

येथे कदाचित् असे म्हणाल की, आम्ही संशयवादी नाही, तर हे सम्यक नाही; कारण तुम्ही 'जे केवलाचे अस्तित्व मानता ते अज्ञेय आहे' असे म्हणता. तर मग आपली ही जी ज्ञानशक्ति ती नाहीं कीं आहे? नाहीं म्हणाल तर तुम्हीच तुम्हाला अज्ञेय झाले. मग व्यवहार कसा चालणार? आणि केवलच्या अस्तित्वाचे ज्ञान तरी कसे होणार? कारण जे अस्तित्व मानावे लागते ते कोण्यातरी पदार्थाचे आश्रित असले पाहिजे. कारण जगात कोठेही अशी उत्पत्ति आढळत नाही की वस्तूचा आहेपणा वेगळा काढून वस्तु वेगळी करावी. वस्तूचा 'आहेपणा' निराळा करणे म्हणजे त्या वस्तूला 'नाहीपणाच देणे होय. तात्पर्य, जी वस्तु 'आहे' ती 'मुळीच नाही' असे म्हटले म्हणजे झाले. मग असाच तुम्ही व्यवहार चालविणार कीं काय? 'नाही' म्हणाल तर हे कबूल करावे लागेल की, अस्तित्व ज्या वस्तूचे मानावयाचे त्या वस्तूचा आभास आपल्या ज्ञानशक्तीस झाला पाहिजे, त्यावाचून अस्तित्वच ठरविता येणार नाही. आणि आभास मानला तर ज्ञानशक्ति मानलीच पाहिजे, कारण अज्ञेयाचा अज्ञानात आभास संभवत नाही; म्हणून ज्ञानशक्ति मानल्यावांचून गत्यंतर नाही.

मग ज्ञानशक्ति जी मानली ती क्षणिक आहे की स्वयंभू आहे? 'क्षणिक आहे म्हणाल' तर ती कोण्या कारणापासून उत्पन्न झाली? अज्ञेयापासून म्हणाल तर ज्ञेयानुसार ज्ञान असते हा नियम आहे. मग ते ज्ञेय प्रत्यक्ष असो वा अनुमेय असो, यथारूप असो किंवा आभासरूप असो, पण ज्ञान म्हटले की तेथे ज्ञेयाचे अस्तित्व पाहिजेच. अस्तित्व तर आभासावाचून ेतच नाही.

आता एवढे मात्र खरे की 'तुमची भावना अज्ञात विषयिणी असल्यामुळे त्याचे गुणधर्म तुम्हास कळत नाहीत.' म्हणून इतक्यानेच ज्ञानशक्तीचे क्षणिकत्व ठरत नाही.

आणखी अज्ञेयापासून ज्ञान होणे म्हणजे आंधारापासून प्रकाश उत्पन्न होण्यासारखे विरुद्ध म्हणणे होय.

ही सर्व भ्रांति आहे असे म्हणाल, तर अज्ञेयास भ्रांति व्हावयाची नाही, भ्रांति जी व्हावयाची ती ज्ञेयानुसार ज्ञानशक्तीसच झाली पाहिजे, आणि असाच सर्वत्र नियम आहे.–कदाचित् म्हणाल की, "ज्याप्रमाणे आंधारात घुबडास प्रकाश दिसतो, त्याप्रमाणे ज्ञानशक्ति भ्रांतीने आपणास भासते, हे म्हणणे असिद्ध आहे. कारण घुबडास आंधारात जो प्रकाश भासतो तो अंशतः त्याच्या डोळ्यात असतो. आणि बाह्य आंधार अत्यंत प्रकाशाभावरूप नसल्यामुळे त्या आंधारातील भावरूप जो प्रकाश त्याचा घुबडाच्या डोळ्याशी संबंध झाल्यामुळे त्याला आंधारात प्रकाश भासतो.

या दृष्टांताचा वरील गोष्टीशी मेळ घालू–आपणास जे ज्ञान होते ते दृश्यरूप विश्वाचे असो, किंवा केवलाच्या आभासास्तिक्याचे असो पण ते ज्ञेयानुसार असलेच पाहिजे आणि तसे म्हटले की, जे कांही भावरूप सत्य आभासरूपाने ज्ञेय होत असेल ते ज्ञानमय असले पाहिजे. अज्ञानमय मानले तर ज्याप्रमाणे अंधाराचे प्रतिबिंब पडत नाही, त्याप्रमाणे त्याचाही आभास न झाला पाहिजे. पण येथे तर आभासावाचून भागत नाही, म्हणून प्रकाशाप्रमाणे हे सत्यही ज्ञानमय असले पाहिजे.

आता एवढे खरे की, घुबडाचे डोळ आकुंचित असल्यामुळे हा प्रकाश सूर्याचाच आहे असे त्यास ज्ञान होत नाही, परंतु त्याचा व्यवहार मात्र प्रकाशातच चालतो. इतक्यानेच सूर्य प्रकाशमय नाही असे होईल काय ?

त्याचप्रमाणे ही आभास घेणारी ज्ञानशक्ती व्यष्टिरूप असल्यामुळे समष्टिरूप ज्ञानाचे तिजकडून आकलन होत नाही, इतक्यानेच ती अज्ञेय ठरते काय? असो ही आभास घेणारी ज्ञानशक्ति स्वयंभूच मानली पाहिजे.

"ती वीर्यात कोठे होती?" म्हणाल तर ज्याप्रमाणे घुबडाचे डोळे सूक्ष्मरूपाने अंड्यामध्ये होते, त्याचप्रमाणे विषय आकुंचित असल्यामुळे ही ज्ञानशक्तीही सूक्ष्मरूपाने वीर्यातच होती. "त्याचा आपणास अनुभव कां येत नाही?" असे म्हणाल तर तुम्हास निद्रेतील ज्ञानाचा तरी अनुभव कोठे येतो? परंतु जागृतीत स्मृति मात्र होते. त्यावरून असे अनुमान होते की, निद्रेत लीन रूपाने ज्ञान आहे, त्याचप्रमाणे जाग्रदादि अवस्थात असणारी आपली ज्ञानशक्ति वीर्यात लीनरूपाने होती, असे कार्यपद्धति द्वारा अनुमान निघते. म्हणून ज्ञानशक्ति स्वयंभूच मानली पाहिजे.

**मग** ती स्वयंभू ज्ञानशक्ति व अज्ञेय महाशक्ति या दोहोंचे बनलेले ते महासत्य आहे काय? **तसे मानाल तर आपली ज्ञानशक्ति अज्ञेयापेक्षा बलवत्तर होईल; कारण प्रकाशामध्ये जसा घुबडाचा व्यवहार चालतो, त्याच प्रमाणे आपलाही व्यवहार आभासरूप ज्ञानामध्ये चालतो. क्रिया जी करावयाची तो ज्ञानावांचून घडत नाही, अज्ञानाला क्रिया करण्याचे सामर्थ्य नाही. यावरून जगद्रूप क्रिया ज्या शक्तीने होते ती शक्ति ज्ञानमय असली पाहिजे. इतकेही करून अज्ञेयच म्हणाल, तर हा पोरखेळ हट्ट आहे, त्यास काही प्रमाण नाही.**

"सर्व वस्तूंचे मनाने आकलन होत नाही, हेच आमचे प्रमाण" **असे म्हणाल तर सर्व वस्तू अनाकलनीय आहेत आणि केवलही भावरूप आहे. अशा आपल्या अनपेक्ष ज्ञानरूप भावनेचे अस्तित्व कोठे जाईल? जेथे अस्तित्व आहे तेथे आभास असलाच पाहिजे. आभास आहे तर ज्ञान असलेच पाहिजे, आणि ज्ञान आहे ते ज्ञेयानुसार असले पाहिजे. ज्ञेय असून आभास कसा अंगीकारिला असे म्हणाल, तर ज्याप्रमाणे सूर्याचे अवघड प्रकाशाचा डोळ्याच्या सूक्ष्म प्रकाशामध्ये प्रतिबिंबरूप आभास घडतो, त्याप्रमाणे समष्टिरूप ज्ञेयाचा व्याष्टिरूप ज्ञानशक्तीमध्ये आभास घडतो. अर्थात् हे सिद्ध झाले की, जगत्क्रिया करणारी महाशक्ति कोणत्या तरी एका सर्वव्यापी सदधिष्ठानावर आश्रित आहे हे निर्विवाद आहे. पुरे, आता पुष्कळ प्रमाणे देत बसत नाही. विचारवंताने विचार करून आणखी उपपत्ति जुळवून घ्याव्या.**

**मग अधिष्ठानाचा पक्का बोध झाला म्हणजे ते अधिष्ठान द्रव्याचे अन्तःस्वरूप व भावनेचे अन्तःस्वरूप आहे हे तुम्हासच कळेल. मग** "ह्या अन्तःस्वरूपासच अज्ञेय" म्हणावयाचे काय? **"होय" म्हणाल तर मग ही ज्ञानशक्ति कशी झाली?** "ही भ्रांति आहे" **म्हणाल तर अज्ञात अधिष्ठानावर भ्रांति होण्याचा संभव नाही, असे पूर्वीच सांगितले.** ते काहीही असो त्या सर्वांचे मनाने आकलनच होत नाही" **म्हणाल तर ते बरोबर नाही. कारण ज्याचे मनाने आकलनच होत नाही त्याच्या अस्तित्वाचे ज्ञान तरी कसे होईल?** "अस्तित्वाचे ज्ञान होण्याचे प्रयोजन काय?, **असे म्हणाल तर तुमच्या मताने सर्वच अज्ञेय झाले, मग अर्थात् तुम्हीही तुम्हाला अज्ञेयच झाले. असे असता** "देहापुरत्या ज्ञानाने आपले कार्य भागत नाही आणखी काही ज्ञान पाहिजे **"हे दुसऱ्या भागात कशाला म्हटले?** "ते काही असो शब्दाने सांगता येत नाही" **असे म्हणाल तर मी विचारतो की, मनाने जे तुम्हाला**

अज्ञेय वाटते ते शब्दांनी सांगताच जर येत नाही, तर ग्रंथामध्ये तुम्ही काय लिहून ठेविले? भलतेच काही प्रतिपादन केले असेल की नाही?

सारांश, तुम्हाला जे अज्ञेय वाटते ते तुमच्या अज्ञानामुळे, एरव्ही जे काही आहे ते अज्ञेय मुळीच नाही. तर "ज्ञेयाज्ञेयातीत स्वयमानंदरूप तटस्थ आहे आणि त्याचाच आभास हे जगत आहे." –हा सिद्धान्त सोडून अज्ञेय म्हणत होत्साते घोटाळयाचे ग्रंथ लिहिणे हेच का तुमचे मतभेद सहिष्णुत्व? वाहवा, काय सुबक उपदेश हा! अहो, मलाही कळाले नाही व दुसऱ्यालाही कळत नाही असे म्हणून आपले ठाम मत कशावरही न देता, निसटून जाणे हे गुरुत्वाचे लक्षण नव्हे. तर गुरू तोच म्हणावा की, शिष्याच्या सर्व शंका जो हरण करतो–इत्यादी प्रश्न मीं स्पेन्सर मतानुयायांपुढे मांडले. परंतु एकाही शंकाचे उत्तर त्यांनी दिले नाही. त्यावरून मला असे वाटले की कोणत्याही बाजूने पाहिले असता हे स्पेन्सरचे मत अगदी असिद्ध आहे.

॥ इति स्पेन्सरमत खंडनम् ॥

**टीप**––वरील पत्राचें उत्तर श्रीमंत जठार साहेबांनी ता० २४ जून १९०२ ला लिहून पाठविलें तें येणेप्रमाणे:––

"तुमचा लेख एकंदर वाचल्यानंतर फार मौज वाटली. मयूरपक्ष्याच्या डोळ्यांप्रमाणे डोळे बाळगण्यापेक्षा तुमच्यासारखे प्रज्ञाचक्षुच होणे फार उत्तम आहे. डार्विन, स्पेन्सर वगैरेची मते जितकी तुम्ही धुंडाळून चिकित्सा केली तितकी दुसऱ्याने केलेली आढळली नाही. हे तुमचे लेख कोणत्या तरी मासिक पत्राकडे अथवा केसरीसारख्या वर्तमान पत्राकडे जरूर पाठवून प्रसिद्ध करावे अशी आमची आग्रहानें शिफारस आहे."

□□□□

## २. रा. रा. हरिभाऊ केवले यांस पाठविलेले पत्र १ ले

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली समर्थ ॥

ॐनमो श्रीगोपीरमणा। गोकुळवासी करुणाघना। कालियांतका दानव-भंजना। विश्वव्यापका विश्वपते ॥ १ ॥ अहो श्रीहरिरूपें भगिनी। तुम्हा-माथां ओळगो चरणीं। आणि सलगीयें विनवणीं। करित असों ॥ २ ॥ तरी अंतका [1] न भितां। दोघीं आळवूं नंदसुता। सेवेमांजीं जन्मानंता[2]। आक्रमूं सुखें ॥३॥ आणिकही साह्यकारिणी। कृष्णललना चातुर्यखाणी। बैसल्या पाहुनी हरिदिनीं। प्रतीक्षे तुझ्या ॥४॥ स्त्रीपुरुष नव्हे आत्मा। ऐसी न धरावी प्रमा[3]। सेवकप्रीतीमुळे स्त्री जीवात्मा। सेव्यत्वें परमात्मा

[1] मृत्यूला. [2] अनंत जन्म. [3] निश्चय.

पुरुष ॥५॥ दोहीं दिठीं एक कांत । येंणें सुखें जन्मानंत । क्षणैक क्षमभांत[४] । आपजेल ॥६॥ यालागीं ऐसे कीजे। आपजे[५] तरी हा ठावो[६] पविजे[७] । हरिगायनीं उवाइजे[८] । अंतःप्रेमा ॥७॥ अथवा शारीरत्रासें[९] । आजिचिया दिना नुमसे[१०] । येथूनि पुढें कुवासें । नियमबद्धे ॥८॥ आणि निद्रेचा उल्हासू । चाखिजे वृंदावनसौरसू[११] । दोन्ही सांडूनि पौरुषु । [१२] कामिन्या यावें ॥९॥ नाना[१३] पुरुषाचें संवर्धन । तो पातिव्रत्यांशधर्म । म्हणूनि द्रोपी पुरुषोत्तम । वशत्वा आणूं ॥१०॥ अहो अरुष[१४] वाणी इया । ठावों न द्यावा कोपचया[१५] । आपजे तरी या । ना हरी म्हणावा ॥११॥ श्रीज्ञानेश्वर माऊली । वंदूनि तत्पाउली । विनती या संपविली । पत्रिका ही ॥१२॥

ॐतत्सदिति श्रीज्ञानेश्वर माऊली समर्थं. ॥

मुक्कःम उमरावती, मिति ज्येष्ठ वद्य ११ शके १८२५.

□□□□

## ३. रा. रा. हरिभाऊंस पाठविलेले पत्र २ रे

॥ श्रीज्ञानेश्वर माऊली समर्थ ॥

ॐनमो श्रीगुरु निष्पापा । विश्वात्मया ब्रह्मरूपा । भक्तवत्सला मायबापा । त्रिविधतापा अनकल[1] ॥१॥ भूर्भुवस्वः ही पूरत्रिपुटी[२] । गोविली प्रणवें एके गाठी । ते विश्वपट सूत्रकंठीं । मिरवित असे ॥२॥ म्हणोनिया जो वेदमूर्ति । ही त्रयपुरी कीर्ति । गाजे परी श्रुति । अभिप्राय ॥३॥ हा अविद्याभ्रमू नाथिला आम्हां । तो हरुनी दाविली सच्चितप्रमा । येणे अर्थें हरीशर्मा । नाम तुम्हां विराजे ॥४॥ तुम्हां करावे कुंठित । हा तो नाही मम हेत । परी काही कारणनिमित्त । लिहिणे असे ॥५॥ तुम्ही मागील पत्रोत्तरी □ । लिहिलीं वाक्ये मानकृसरी । ही अकृपा लेकुरावरी । काय म्हणोनियां ॥६॥ हो जी आपुलिया लेंकुरा । घालिता मानवचनें पाखरा । तैं तो दुरभिमानीं थारा । साधियाचि घे ॥७॥ यालागी ऐसे न करावे । मज चिरंजीवचि लिहावे । एवढे मागत जीवे भावे । कृपाळु बा गुरुमूर्ति ॥८॥ आणि दुसरीं विज्ञापना । श्रीरामराव गुरुराणा । जो ग्वाल्लेर संस्थाना । वास्तव्य करी ॥९॥ तन्मुख-

---

४ एका क्षणासारखे भासतील. ५ साधेल. ६ स्थान. ७ प्राप्त करून घ्यावे ८ वाढवावा. ९ जीवाच्या भीतीनें. १० साधत नसेल. ११ वृंदावनातील गोडी. १२ प्रयत्न. १३ नाहींतरीं? १४ बोबडीं. १५ क्रोध.

1 प्राप्त न होणारा. २ तीन लोक.

**निर्गत सुधाकुंड । जो स्वानंदसाम्राज्य उत्तरखंड । तो आगत तरी प्रचंड । पाठवावा ॥१०॥ आणि सदाचारस्मृति । तेही पाठवा शीघ्रगती । पत्रोत्तर तत्संगतीं । पाठवावे कृपेनें ॥११॥ माझे अरुष हे बोल । अप्रसादिक फोल । परी हे बोबडे बोल । ग्रहण कीजे गुरुमाये ॥१२॥ अहो तनुमने सहित । केला साष्टांग प्रणिपात । चरणी अर्पिले आर्षलिखित । ते तुम्हा समस्त प्रीति पावो ॥१३॥ ॥ ॐतत्सत् श्री हरिभाऊ समर्थ ॥**

मुक्काम माधान, श्रावण शके १८२५ आपला, **गुलाबराव.**

* * * * *

□हे **पत्रोत्तर** सूक्तिरत्नावलि, द्वि० यष्टि, उत्तरार्धाच्या दहाव्या पृष्ठावरील महाराजांच्या पत्राचे उत्तर असून ते वेदान्तप्रचुर असल्यामुळे येथे घेतो:––

हरिः ॐतत्सत् श्रीगुरुदेवदत्त प्रसन्न.

(वृत्त भुजंगप्रयात.)

जयाची जगी एक सर्वत्र सत्ता । जयाची कृपा चेतवी स्फूर्ति चित्ता ।
असे जो सदा सच्चिदानंदठायी । नमस्कार माझा गुरुदत्तपायी ॥१॥
जया सेवितां दैन्य कोठे दिसेना । जयाच्या कृपे नासती भाव नाना ।
जयाची कृपा मुक्तिकैवल्यदानी । नमस्कार माझा गुरुपादपद्मीं ॥२॥

अहो जी गुरु गुलाबराया । डोई ठेवूनि उभय पायां । नमन करी हरि सखया । कृपामूर्ते ॥१॥ लक्षिता आपले प्रसादपत्र । आनंदे रोमांचित सर्वगात्र । की ते उपदेशसुधापात्र । मज गमे ॥२॥ पत्रिका असे लहान । निर्देशी सच्चिदानंदपद गहन । दीपज्योति दिसे सान । परी प्रकाश थोर ॥३॥ चंद्रसूर्य आकृति सान । प्रकाशी कोर त्रिभुवन । की नेत्रबाहुली बिंदुप्रमाण । दीप्ति बहु ॥४॥ ऐसिया पत्रिके द्यावया उत्तर । सामर्थ्य नाही किंचिन्मात्र । विषयही गूढ फार । मी तो मतिहीन ॥५॥ न जाणे ओवीपद्यश्लोकरचना । संबंधही पडला नाही जाणा । काय हो मी मूढ तुम्ही नेणा । मजसी महाराजा ॥६॥ असो प्रसंगी पाहिजे बोलिले । म्हणूनि स्मरूनि तुमची पाउले । बोलेन जे बोलविले । आपुले प्रसादे ॥६॥ सूत्रधार सूत्राधारे । बाहुली नाचवी एकसरे । तैसे आपुलेच पत्राधारे । करी प्रयत्न ॥८॥ आता मी सांगू काही स्वतंत्र । तरी न्यून काय जी तुमचे पत्र । जे मूर्तिमंत कैवल्यदानपात्र । तात्पर्येसी ॥९॥ वंद्यवंदक करूनि मिस । सूत्रप्राय बोलिले केवळ

सारांश । की जे कैवल्य-कनक-मूस । अद्वैतसिद्धान्ताची ॥१०॥ वेद नेति-नेतीति अनुवादी । परी भेटी नाही साम्राज्यपदी । मग मौन्येचि अनेकांची मांदी । सारूनि सुखरूप होई ॥११॥ की जो जो भेटी करावा लाग । तो तो सुखैकघनी होय अलाग । जे वस्तूसी नसे अंगप्रत्यंग । वस्तु अंगे स्वत:सिद्ध ॥१२॥ सूर्य सर्वांसी प्रकाशी । मा स्वत: काय अप्रकाशी । वस्तु सूर्यासीहि प्रकाशी । तरी काई नाही म्हणो ये? ॥१३॥ वस्तु अनाम अरूप । वस्तुनांवही मिथ्या जल्प । परी करावा लाग आरोप । जे द्वैतनिषेधे अद्वैत-प्राप्ति ॥१४॥ हेचि व्यतिरेके जडनिषेधे । दाविले निजात्मस्वरूप प्रसिद्धे । जे ब्रह्मसत्य जगन्मिथ्या श्रुत्यनुरोधे । प्रमाणा येई ॥१५॥ ऐसेचि ज्ञानी जाणती । व्यतिरेके वस्तूते ओळखती । परी जनी जनार्दन न जाणो लाहती । जे मुख्य वर्म ॥१६॥ म्हणूनि तयाही पूर्णपणे न कळे । की देहाकारे जागृतिवेळे । हे दृश्यजात देखता डोळे । चैतन्यासी अभाव ॥१७॥ हेचि ज्ञानियाचे न कळणे । जे स्वरूपच्युति ऐसे बरळणे । आणि तत्प्राप्ति-साधन करणे । जडमूढ समाधि ॥१८॥ ते चुकती हे वर्म । जे सत्यज्ञानमनंतं ब्रह्म । जे अनेकी व्याप्त एक पूर्ण । सदोदित अन्वये ॥१९॥ तेही सर्वं खविल्दं ब्रह्म या श्रुती । अन्वयी दाविली उपपत्ति । जे जाणणें सर्वाप्रति । ते चैतन्य अनेकी एकत्वे ॥२०॥ आणि ज्ञानी सगुणभक्ति निषेधिती । तेणे प्रारब्धकर्मी तया गुंता गुंती । जे नित्य समाधीसी अप्राप्ति । देहवंता ॥२१॥ ते भक्तिरहस्य अतिगूढ । दाविला त्याचाही निवाड । जे विश्वरूपे स्वानंदतरूवाढ । सुवर्णा-लंकारदृष्टान्ते ॥२२॥ वरी अमृतबिंदुसिंधुन्याय । एक अमरत्व जैसा प्रत्यय । तैसेचि सगुण रामकृष्ण ब्रह्ममय । हेही प्रतिष्ठिले ॥२३॥ एकेक निरूपणाची नवाई । काय वानूं सद्‌गुरुआई । की सच्चिदानंदरूपे आई । मजसी पान्हावली ॥२४॥ शेवटी शिवो भूत्वा शिवं यजेदिति । श्रुति घेउनी प्रमाणभूती । सगुणस्फुरण सोहंभावप्रतीति । विशद करूनी दिधली ॥२५॥ की ते पूर्ण समाधी सहजस्थिति । कैवल्यमुक्ति विदेहस्थिति । चरमाख्य जियेते ज्ञानी म्हणती । अल्पमती मज वाटे ॥२६॥ जी नव्हे जडमूढवत् । चैतन्य नाही काष्ठपाषाणवत् । कर्मी नैष्कर्म्य जिचेनि प्राप्त । तीच समाधि श्रेष्ठ जी ॥२७॥ जेणें गुरुशिष्यसंप्रदाय । ब्रह्मप्राप्ति असे उपाय । वेदान्तग्रंथांही न ये विपाय । सारासार मध्यवर्ती जे ॥२८॥ इतुके सान निरूपण । या रीती कळसासी आणून । प्रेमपान्हा ओसंडला पूर्ण । माउलिये बाळका ॥२९॥ की तो अनुग्रहामृतघट भरून । देऊ पातलीस दासालागून । की हा अनुभवा-

मृतचि संपूर्ण । बालरूपे अवतरला ॥३०॥ ऐसे पुढतपुढती किती वाखाणूं । का खद्योत जैसा प्रकाशी भानू । की बालहरिण पंचाननू पुढे धावे ॥३१॥ येथे बोलावया नसे उरी । परी धैर्य केले समर्थापुढारी । जे अंजुली भरून समुद्राभीतरी । जलराज पूजिला ॥३२॥ की पक्कान्नाचे भरूनि ताट । माता भरवी बाळका गोमट । तो बाळकचि लीले उलट । मातेलागी जेववी ॥३३॥ ऐसा समर्थाचा अपराधी । नसतेचि करी अनधिकारी । परी शरण जाणूनि अनन्यधी । क्षमापिजे दयाळा ॥३४॥ आता कधी होईल दर्शन । बाळाची आर्त पुरवाल कृपेकरून । हे उत्तरी सविस्तर लेखन । व्हावे ही विनती माझी ॥३५॥ पुढती हीच विज्ञापना । जे लेखनी न्यून ते पूर्णपणा । करूनि लिहिजे सुधारणा । जैसी महाराजा ॥३६॥ दैवयोगे झाली भेटी । का करूं दैन्य-गोष्टी । धनी कराल कृपादृष्टी । हाचि पूर्ण विश्वास ॥३७॥ माता लक्षी अज्ञान बालका । तैसे पाळा लळे सेवका । हेचि मागणे नायका । ऐसे होऊ नये ॥३८॥ सद्गुरू चरणकमळी । प्रेमभावे होऊनी अळी । गुंजारव करो मन्मती भुलली । कृपामृता कारणे ॥ ३९ ॥ वेडे वाकुडे लेखन । सद्गुरुचरणी असो अर्पण । हेचि वंदन विज्ञापन । पुढतपुढती ॥४०॥ सद्गुरू दत्ता वंदन । तैसेचि सर्वात्मानंदालागून । तोचि भाव तव पदीही पूर्ण । सर्वदा समानत्वे ॥४१॥

हरि: ॐतत्सत् श्रीगुरुदत्तात्रय अवधूत प्रसन्न.

उमरावती मि. श्रावण शुद्ध ५ बुधवार. } समर्थांचा आज्ञांकित **हरि गणपत केवले.**

□□□□

## ४. रा. रा. गणपतराव सावळीकरांना पत्र

[ ब्रह्मानुभवासाठी काय करावे ?[

॥ श्रीज्ञानेश्वर माऊली समर्थ ॥

**ॐ नमो जी देवदेवा । स्वामी सद्गुरु ज्ञानदेवा । त्वद्दासपदरज–धूळसेवा । जन्मोजन्मी घडो की ॥१॥ नलगे मोक्ष नलगे मुक्ति । नलगे विद्या नलगे युक्ति । तुमचिया सेवेची आसक्ति । राहो चित्ती महाराजा ॥२॥ अहो गणपती चिरंजीवा । जरी तुम्हा ब्रह्मानुभव व्हावा । तरी सद्गुरु ज्ञानदेवा । शरण प्रेमे जावे की ॥३॥ हृदयी असावा अनुताप थोर । क्षणिक पहावा संसार । मनासक्ति विषयावर । ठेवूं नये सर्वथा ॥४॥ मृत्यूचे बाळगावे भय । चिंतावे श्रीगुरूचे पाय । आत्मानुभवाची सोय ।**

नित्य धरावी ॥५॥ वाईट कर्मासाठी परतत्र । उत्तम परमार्थी असावे स्वतंत्र । मुखे प्रणवसहित मंत्र । गुरूपदिष्ट जपावा ॥६॥ आंगीचे जे उच्छृंखल गुण । समूळ सांडावे निरीक्षून । गुरुशास्त्रमुखे ज्ञान । प्रेमे ऐकत असावे ॥७॥ आगीं राखावे वैराग्यबळा । इंद्रिया वळावे सकळा । प्राणायामे प्राणकळा । अभ्यासावी ॥८॥ अंतरी असावी श्रीगुरुभक्ति । बुद्धिसी ब्रह्मविचारासक्ति । जीवासी द्यावी जीवन्मुक्ति । ब्रह्मानुभवे ॥९॥ तुमचे प्रेमबद्ध पत्र । अक्षरशः वाचले स्वतंत्र । तेणें आनंद झाला थोर । परी दुःखही वाटले ॥१०॥ काही पत्र सहज सुरस । कोठे केले दिसती सायास । करुणा नसताही भाव विशेष । आणिला बळे ॥११॥ तरी ऐसे न करावे । आधी प्रेममूळ धरावे । मग कारुण्य स्वभावे । चढे आंगी ॥१२॥ ताई ऐसा चित्ती । प्रेमा आणावा निश्चिती । मग सहज कारुण्यसंपत्ति । वचनी भरे ॥१३॥ यालागी सांडोनि देहाभिमान । सदा करावे भगवद्भजन । संतसेवा सद्गुरुस्मरण । हे मुख्य साधन प्रेमाचे ॥१४॥ इतर योगादि करिती साधने । प्रेम उत्पन्न नव्हे तेणें । जैसे घटाचिया जलसिंचने । गंगाप्रवाह चालेना ॥१५॥ तुम्हाते सर्वथा नाही भीति । आत्मब्रह्मैक्य स्मरावे चित्ती । मग जेथे जाल तेथे खंती । वाटो न द्यावी ॥१६॥ तुम्ही कोठेही असावे । परी ताईते सांभाळावे । पूर्ववचन पाळावे । स्वीकारिले जे ॥१७॥ मिळवूनि प्रेमाचा कळस । द्यावा ज्ञानसुधारस । सांडावे संसृतिसायास । काबाडकष्ट ॥१८॥ घेउनि तनुमनधन । जावे ज्ञानेश्वरा शरण । मग मोक्ष धरील चरण । निश्चय जाणा हा चित्ती ॥१९॥ इति श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु.

□□□□

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

## ५. वे. शा. सं. गोविंदशास्त्री पंचभाईना पत्र

[ माझी निंदा ]

श्रीगुरु आचार्य वेदमूर्ति गोविंदशास्त्री पंचभाई महाराज यांचे चरणीं चिरंजीवी पंचलतिका हिचा शिरसाष्टांग प्रणिपात. विनंती:–आपल्या एकाएका उपकाराचे स्मरण केले म्हणजे हृदयच्छेद होऊं पाहतो; पण आम्ही मात्र दुर्दैवी असल्यामुळे आमच्या हातून काहीच सेवा होऊ शकत नाही. त्याविषयी वाईट न वाटता उलटे, आपण येथे कां येत नाही असे पुष्कळ वेळ उद्गार काढले, पण आपण काहीच उत्तर न देता उलट भय मात्र धारण केले;

एवढा आपला माझे ठिकाणी विश्वास बसण्यापूरती माझी योग्यता नाही. माझ्या आंगी एवढा कोणताच मोठा चमत्कार नाही की, मी बोलेन तसे होऊं शकेल, व पुढेही तो चमत्कार यावयाचा नाही. त्यामुळेच माझी निंदा लोकांनी मागे केली, आता करतात व पुढेही करतील; आणि माझे वर्तनही सहजच असे असते की, ज्याच्या योगाने लोकांनी माझी निंदाच करावी. ही गोष्ट सांगण्यासारखी नव्हे, पण तुम्हाला मात्र काही कारणामुळे सांगणे भाग पडले. म्हणून आपल्या समक्ष माझी निंदा कोणी केली असतांना आपणास वाईट वाटणे साहजिकच आहे; कारण पुत्राची निंदा पिता सहन करीत नाही. परंतु तसे आपण वाटूं देऊं नये. कारण श्रीकृष्णास जर मी पति मानीत आहे, तर त्यांच्या आज्ञेप्रमाणे वागणें हे आमचे सर्वस्वी कर्तव्य आहे. म्हणूनच "अमानित्वमदंभित्वमहिंसा क्षांतिरार्जवम्" या गीतेंतील श्लोकांत सांगितल्या-प्रमाणें अपमान करून घेण्याकडेच माझे फार लक्ष असते. शिवाय "तुल्य-निंदास्तुतिर्मौनी संतुष्टो येन केनचित् । अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः" हे भगवद्वाक्य सोन्याच्या अक्षरांनी लिहून ठेवण्यासारखे आहे. चमत्कार वगैरे जे कांही होतात ते व्यावहारिक लोकांना खुष ठेवण्याकरिता असतात; परमार्थात त्यांचा लेशही उपयोग नाही. म्हणूनच श्रीतुकाराम महाराज म्हणतातः––

२) सोन्याचे पर्वत करवती पाषाण । अवघे रानोरान कल्पतरू ।।१।।
करवेल मंत्रयंत्र अनुष्ठान । नेंववेल प्राण ब्रह्मांडासी ।।२।।
ब्रह्माविष्णुशिव होतील चाकर । नित्यचि किंकर इंद्रचंद्र ।।३।।
परी तें दुर्लभ श्रीकृष्णाचे पाय । तेथे हे उपाय न चलती ।।४।।
तुका म्हणें माझा ऐसाचि निश्चय । आठवीन पाय तुझे देवा ।।५।।

या अभंगात प्रत्यक्षच चमत्काराचा निषेध केला आहे. आता निंदेविषयीही तुकाराममहाराज असेच म्हणतात––

निंदकाचे घर असावे शेजारी । येताती बाहेरी गुणदोष ।।१।।
निंदक हा माझा कंठीचा ताईत । त्याने सर्व हित केले माझे ।।२।।

याचप्रमाणे कौषीतक्युपनिषदांत एक श्रुति आहे.––

"तस्य ते गृह्णन्ति सुहृदः साधुकृत्यान् द्विषतः पापकृत्यान् पुत्रादयो धनान् स वै पापपुण्ये विधूय निरंजनं शाश्वतमुपैति दिव्यम् ।"

श्रुत्यर्थः–'जो ब्रह्मनिष्ठ असतो त्याची स्तुति करणारे जन त्याचे पुण्य घेतात, द्वेष करणारे जन पाप घेतात, आणि त्याचे पुत्रनातू आदिक

त्याचे धन घेतात. तो स्वत: तर पापपुण्य या दोहोंचाही नाश करून शाश्वत जे निरंजन पद त्याचे ठिकाणी प्राप्त होत असतो' या श्रुतींत ब्रह्मनिष्ठांना पुत्र असावेत असे सांगितले, म्हणूनच श्रीगरु-आज्ञेवरून मनर्कर्णिकाचे ठिकाणी मी गर्भ स्थापन केला आहे. त्याहींबद्दल पुष्कळ पुरुष विशेषेकरून निंदा करितात, पण त्याबद्दल मला काहीच वाटत नाही. आता आपणच सांगावे महाराज की, मी श्रुतिस्मृति आणि संताच्या आचरणाप्रमाणे चालावे किंवा लोकांना खूष ठेवण्याकरीता व्यावहारिक चमत्कार दाखवून त्याप्रमाणे चालावे ? कबीरमहाराज म्हणतात:-

निंदक हमारे इष्ट है वे माबापसे पार।
आप डूबे मंझारमे हमे उतारत पार ॥१॥

३) या सर्व वचनांवरून माझा पक्का निश्चय झाला आहे की, मला चमत्काराची अगर कोणी साधु म्हटले पाहिजे याची बिलकूल आवश्यकता नाही, आणि म्हणूनच कोणी मजविषयी काहींही उद्‌गार काढले तरी आपण वाईट वाटूं देऊ नका. ऋषिपत्न्यांनी श्रीकृष्णाला अन्न नेऊन देतांना आणि गोपींनीही श्रीकृष्णाबरोबर रासक्रीडा करतांना त्यांचीही निंदा अतिशयच झाली; तितकी तर माझी अजून झालीही नाही. तितकी व्हावी अशी माझी फार इच्छा आहे. परंतु आपल्या कृपेनें प्रभु तसें केव्हा घडून आणील कोण जाणे. शिवाय तुकारामबोवांनी एका बाईचे पोट आले असताना आपले नांव सांगून लोकांकडून आपणास गध्याचावर बसवून घेतलें, अशीहि उदाहरणे दिसतात आपणास ठाऊकच आहे की, कुंभारे बोवानें मला 'ज्ञानेश्वर सोडा' असे म्हटले होते, त्यावरून त्यांच्याशी मीं भाषण वर्ज केले. असो. आपणाला मात्र माझ्यामळेच फार त्रास होत आहे. पण ही गोष्ट नेमानें व्हावयाचीच, त्याबद्दल खेद करून उपयोग नाही. कारण,

"त्वां सेवतां सुरकृता बहवोंऽ तरायाः"

या भागवतातील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें भगवद्‌भक्ति पूर्ण बाणे-पर्यंत देवता विघ्नें करीत असतात. म्हणून जे कोणी आपणास त्रास देतात. त्यांच्या मनामध्ये देवताच स्वतः प्रेरणा करीत असतात. त्या बिचाऱ्यांचा कांहीच अपराध नसतो. शिवाय "सुखस्य दु:खस्य न कोऽपि दाता, परो ददातीति कुबुद्धिरेषा" इत्यादि श्लोकात नेंहमी समाधानवृत्तिच ठेवण्यास सांगितलें आहे. महाराज, आपलें संचित तर दग्ध होत चाललें आहे. क्रियमाणही हळुहळु अभ्यासानें क्षीण होईल. पण प्रारब्ध जे कर्म ते मात्र भोगलेंच पाहिजे. "प्रारब्धकर्मणा भोगादेव क्षयः" अशी श्रुति आहे.

यद्यपि योगशास्त्रानें पुरुष प्रारब्धाला जिंकून टाकतो असे सांगितलें आहे, तथापि प्रारब्ध कर्माचे दुःख जोपर्यंत येऊन पडलें नाही तोपर्यंतच त्याचा उपाय करावा असे सांगितलें आहे. "हेयं दुःखमनागतम्" इत्यादि सूत्र त्याविषयी प्रमाण आहे. पण आपणाला रोग होण्यापूर्वी जर ह्या कन्येची भेट झाली असती तर बरे झालें असते. पण आताही आपली जी आज्ञा असेल ती मजकडून होईल तितकी साह्यता करून पाळण्यास मी तयार आहे. पण दुसऱ्याचे मात्र ऐकणार नाही. आपण स्वतःच सांगितलें पाहिजे. पुण्यास तर माझा एका रांडेच्या हातून जोडे खाण्याचा विचार होता, पण मंडळीनी तीं गोष्ट घडूं दिली नाही. हे महाराज, येथवर मी आपलें रडत गाणे मला वाटलें तितके गाइलें. आता मुख्य गोष्ट ही की, जेवढे काही विश्वात आपणास चांगले आणि वाईट भासते, तेवढे आपल्या अज्ञानामुळे भासत असते. आत्मा आणि परमात्मा काही निराळा नाही. पण आपल्या डोळ्यावर अज्ञानाचा पडदा आला असल्यामुळे तो आपल्या हृदयात असूनच कोट्यावधि योजनें दूर भासतो. पण खरोखर तो प्रभु आपल्यापुढे उभाच आहे. आपणच मात्र त्याच्याकडे पहात नाही, त्याला त्यानें काय करावे? आपणच आपणास विसरलो हे न जाणून मनुष्य देवावर दोष देत असतो. पण त्यानें तरी आपणास विकत पिसे लावून घेवून तुम्हाला मिथ्या साह्य देण्याइतके पुण्य कोठून आणावे? आपणास जो भुलला आहे त्याला श्रुति स्पष्ट चोर म्हणते. श्रुतिः–

"योऽन्यथा संतमात्मानमन्यथा प्रतिपद्यते ।
किं तेन न कृतं पापं चौरेणात्मापहारिणा" ।।

तसेच श्रीमत्सद्गुरुतात ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात "शास्त्रसिद्ध ब्रह्मबुद्धि उपजविसी । तरी का आपआपणासि बुझसी ना रया"

निळोबाराय म्हणतातः–'घरी चूकलें ठेवणें सर्व काही । उगा धुंडतो भूवरी देश दाही" ।

आणि "जुनें ठेवणें मीपणे ते कळेना" असे समर्थ रामदासही म्हणतात. याप्रमाणे हा अल्पलेख पुष्पपंकोलिकान्यायानें द्विजराजचरणी समर्पण केला. श्रीज्ञानेंश्वर माउली समर्थेत्यनेंनालम् ।

**ता. कः–** हे पत्र ऐकून आपणास तातडी होईल, पण तसे पावसात मात्र करू नयें, ही माझी विनंति आहे, आणि त्याप्रमाणें कराल अशी आशाही आहे. मात्र प्रसादोत्तर जरूर पाठवावे.

आपला,

**गुलाब**

## रा. रा. हरिभाऊंस केवलेना पत्र ३ रे

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

सा. प्रणपात उपरी वि.

दो ओठी एकी गोठी । दो डोळा एकी दिठी ।
तेवि दोघी जिहीं सृष्टी । एकचि जेवी ॥अमृ०अ० १॥

प्रथम अलंकार आणि नंतर सोन्याची ओळख ही घातक आहे, हे तुम्हाला पूर्वी सांगितले होतेच. म्हणून प्रथम सोने कळले पाहिजे, आणि नंतर अलंकाराची मजा भोगली पाहिजे. "ज्ञानात् ध्यानं विशिष्यते" म्हणजे पूर्वांग ज्ञान पाहिजे. याहून बाकीच्या ओवीचा खुलासा मी सध्याच करू शकत नाही. हे शब्द जरी तुम्हांला व्यर्थ वाटलें तरी आम्हांला सार्थ आहेत. पण स्वार्थं सुटून परमार्थदृष्टीचा सामानार्थ कळला पाहिजे. याला अति आर्त झाल्यावाचून सोपा उपाय नाही. म्हणून सद्‌गुरुकृपाच त्रिविध तापाला निवारिते. कोणी प्रत्यक्ष सूर्यचंद्रलोकांवर जरी गेलें. तरी तुम्ही तशा नादी न लागून "अमृतानुभवाच्या एकाएका ओवीचा शंभरशंभर जन्मपर्यंत जन्मरहित असा अभ्यास कराल काय?" असे मी तुम्हास विचारतो. उत्तर यावे. कळावे.

आपला गुलाब.

ता. क.—आपण येऊन गेल्यानंतर "राधाविलास" नावाचे आख्यान करण्यास प्रारंभ झाला आहे, या व्याख्यानांतील झालेल्या सर्व कविता येथे देतां येत नाहीत. तथापि मासल्याकरिता १।२ देतों. येथे आपण आल्यावर सर्व आख्यान वाचण्यात येईलच कळावे.

आर्या.

विकसित-हरिमुखलज्जा-लज्जिततलगल-रतिरसरसितस्मिता ।
विस्मितेक्षणक्षपितधीं नमुनि विदलिहाचिमातितमशमिता ॥१॥

पद.

मदविव्हललोचना । अपदरकुचदरदरुनि मदनभर विनवि कुमदमोचना ॥धृ॥

अशा रीतीच्या ब‍ऱ्याच कविता राधाविलास आख्यानात झालेल्या आहेत, आपण येथे आल्यावर सर्व वाचण्यात येतीलच, असो.

इत्यनेन अलम्.

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# ७. रा. विठ्ठलराव केकरेंना पत्र

[वेदान्तरहस्य – अध्यारोप व अपवाद – सहा अनादि पदार्थ – जगताचे मूळ कारण – वेदान्त सिद्धान्त – आत्मक्रीड आत्मरति – परिणाम आणि विवर्त – भक्तिरसानंद – मोक्षाचे मार्ग – कर्ममार्ग – ज्ञानमार्ग – जीव एक की अनेक ? वाचस्पतीचे मत – नैयायिकांचे पदार्थ चतुष्क – पांच भेदकल्पना – जीवाचे स्वातंत्र्य – प्रारब्ध की प्रयत्न ? – आत्म्याची अविनाशता – तत्पदाची व्याख्या – त्वंपदाची व्याख्या – स्वरूपज्ञानाचे साधन – सत्, चित् व आनंद – जगदुत्पत्तिक्रम – ईशसृष्टि व जीवसृष्टी-स्थूल भूतांची उत्पत्ति–वेद अपौरुषेय कसे ? – विश्वाचा स्वरूपनिर्णय – श्रवण-मनन-निदिध्यास – केवळ शद्बच तारतात ! –त्रिविध अधिकारी – आत्मा कोणता ? –सच्चिदानंदरूप आत्मा – जगत् हे काय आहे ?–कर्ता कोण – जन्ममरण कोणाला ? – मरणोत्तर दोन मार्ग – ज्ञानोत्तर स्थिति – उपसंहार.]

।। श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ।।

**वंदे ज्ञानेश्वराख्यं गुरुमतिकरुणापूर्णकैवल्यमूर्तिम् ।**
**श्रींद्राण्यंभोऽभिषेकश्रियमधिगतवद्यत्पदानंदगंधैः ।।**
**दीनाः संसारदुःखैरभिहतहृदयास्साधनावाप्तिवंतोऽ ।**
**प्यालंद्यां यं दयालुं नततनुमनसः स्वर्चयंति स्म संतः ।।१।।**

ज्यांनी अतिकरुणेनें सच्चिदानंदतनु धारण केली, ज्यांच्या चरणसुखस्पर्शानें श्रीइंद्रायणीच्या जलाला तीर्थत्व प्राप्त झाले; संसारसुखाच्या निवृत्तिकरिता अनेक साधनें करूनहि दुःखनिवृत्ति न झाल्यामुळे ज्यांची हृदयें विदीर्ण झाली आहेत असे पुरुष दीन होत्साते तनुमनसमर्पणपूर्वक आळंदीत राहून ज्या दयाब्धीला भजतात, अशा त्या श्रीसद्‌गुरुज्ञानेश्वरमहाराजांना मी नमस्कार करतो.

**पीत्वा स्तन्यं यदीयं ह्यहमधिगतवान् सौष्ठवं तानवादेः ।**
**प्रेम्णाऽवघ्राय मौलिं प्रहरति मम या शांकरी बाल्यकष्टं ।।**
**मौढ्यात्त्रासानलं मे शमयति सुकरैरमृतानंदनम्रै ।**
**वंदे तद्‌भ्राजमानं सकरुणविमलं यामुनं पादपद्मम् ।।२।।**

जिचे स्तनपान करून मला हे सुंदर शरीर प्राप्त झाले आहे, जी देवी नेंहमी प्रेमानें माझे मस्तकावघ्राण करून (सुख देत होत्साती) माझे बाल्यातील अनेक कष्ट निवारण करिते, व जी ब्रह्मानंदरसाच्या योगानें नम्र झालेल्या आपल्या मृदुल करानें अज्ञानापासून होणाऱ्या माझ्या विविध दुःखरूपी अग्नीला शमविते, त्या यमुनाआईच्या करुणाविकसित शोभायमान चरणकमलाला मी नमस्कार करितो.

अध्यारोप व अपवाद

**अध्यारोपापवादोद्‌गतभवविभवौ बंधमुक्त्यर्थसंज्ञा- ।**
**वध्यारोपेण मायाकृतजगदखिलं चिद्विवर्तं विभाति ॥**
**श्रौताचार्यात्तबोधात्परमनिजसुखे यो न विश्वावभासः ।**
**सोऽयं बाधोऽपवादःश्रुणु जननि धिया विस्तरेण प्रवक्ष्ये ॥३॥**

अध्यारोप व अपवाद यांच्या योगाने भासणाऱ्या संसाराला व संसाराभावालाच अनुक्रमें बंध व मुक्ति अशा संज्ञा आहेत. अध्यारोपानें हे सर्व मायिक जगत् चैतन्यावर भासते. वेदान्तनिष्णात अशा आचार्यापासून प्राप्त झालेल्या बोधाने आत्मसुखाचे ठिकाणी तल्लीन झाले असता जो संसाराच्या अत्यंताभावाचा प्रत्यय त्याला अपवाद म्हणतात. आई! हे मी तुला विस्तार करून सांगतो ऐक.

**वस्तुन्येकस्वभावे विघटयति च यो भिन्नतां स ह्युपाधिः ।**
**सूर्योऽप्येकोऽद्वितीयो घटसलिलवशाद् दृश्यते तद्वदत्र ।।**
**माया सत्वादियुक्ता सदसदवचना ब्रह्मसत्तात्तसत्वाऽ ऽ- ।**
**च्छाद्यानंदस्वभावं जगदुदयभिदा भासयत्यन्यथैव ।।४।।**

एकस्वभावात्मक वस्तूचे ठिकाणी जो भिन्नपणा भासवितो त्याला उपाधि म्हणतात. सूर्य एक असूनहि घट व जल या उपाधीमुळे दोनपणाला प्राप्त होतो; त्याप्रमाणेंच येथे सत्वादिगुणांनी युक्त असणारी, सदसद्विलक्षण-ब्रह्मसत्तेनें सत्तावान् झालेली माया, ब्रह्माच्या आनंदस्वभावाचे आच्छादन करून खोटाच जगद्रूपी भिन्न आभास खोटाच भासविते.

**अस्मद्युष्मन्मतिज्ञौ विषयिविषयकौ भातमोवद्विरुद्धा-**
**वत्यंतानात्मकत्वान्न मिलितुमुचितौ तन्मयत्वं तथापि ॥**
**अन्यस्मिन्नन्यबुद्धिः कुणपनिजतया सर्वलोकप्रतीते-**
**रध्यासाख्यामविद्यां गुरुवचनपरा नष्टतामुन्नयंति ॥५॥**

अस्मत्प्रत्ययगोचर विषयी व युष्मत्प्रत्ययगोचर विषय हे प्रकाश व अंधाराप्रमाणे परस्परविरुद्ध आहेत. (अस्मत्प्रत्ययगोचर विषयी हा कधी युष्मत्प्रयगोचर विषय होत नाही व युष्मत्प्रत्ययगोचर विषय हा कधी अस्मत्प्रत्ययगोचर विषयी होत नाही.) म्हणून त्यांचा ऐक्याध्यास होणें शक्य नाही; तथापि सर्व लोक या जड देहालाच मी म्हणजे आत्मा असे समजत असल्यामुळे, या त्यांच्या प्रतीतीवरून (विषयविषयीचा) ऐक्याध्यास झालेला दिसतो. गुरुचरणावर ज्यांचा दृढ विश्वास आहे असे पुरुष मात्र या अध्यासस्वरूपी अविद्येचा नाश करून घेतात.

सहा अनादि पदार्थ

**ईशो जीवो विशुद्धा परमचिदु विभागोऽनयोर्जीवविष्ण्वो-**
**र्माया तच्चिन्नियोगो मुनिविनिगदितं षट्कमेतद्ध्यनादि ॥**
**तत्रैकं ब्रह्म पूर्णं सुखघनममृतं सार्वकालेऽप्यबाध्यं**
**तद्भिन्नाः पंच भावा निगमनिगदितज्ञानतोऽन्तं प्रयांति ॥६॥**

ईश्वर, जीव, शुद्धब्रह्म, जीवेश्वरांचा भेद, माया व चैतन्य यांचा योग, असे सहा पदार्थ मुनींनी अनादि मानलेले आहेत. या सहापैकी नित्य, पूर्ण व अतिसुखरूप असे ब्रह्म मात्र केव्हाहि नाश पावत नाही; बाकी पांच पदार्थ श्रौतज्ञानानें बाधित होतात.

**भ्रांत्यां भ्रांत्यैव बद्धस्तदपहननतो नैव तस्याः प्रलाभः ।**
**तद्वन्मायास्थितौ वा तदपहृतिदशायां न माया जनिज्ञा ॥**
**पृच्छाम्यादौ कदा ते स्मरणमभिहृतं ब्रह्मभावस्य मात– ।**
**र्न ज्ञानं तर्ह्यनादिप्रकृतिरभिमता किन्तु विद्याविनाश्या ॥७॥**

भ्रमकाली भ्रमानें बद्ध असतो म्हणून व भ्रम नाहीसा झाल्यावर भ्रमच राहत नाही म्हणून, ज्याप्रमाणें भ्रमाचा आदि कळत नाही, त्याप्रमाणें जीव मायेमध्ये असतो तोपर्यंत मायाबद्ध असतो म्हणून व माया निवृत्त झाल्यावर मायाच राहत नाही म्हणून, मायेचा (जीवाला माया केव्हापासून लागली याचा) आदि कळत नाही. आई ! मी तुलाच विचारतो, तुला आत्मविस्मृति केव्हापासून झाली सांग बरे ? –तू जर म्हणशील की मला याचे ज्ञान नाही. तर मग अज्ञान अनादि आहे हेंच सिध्द होते; तरी ते अज्ञान ज्ञाननाश्य आहेच.

जगताचे मूळ कारण

**जाड्याद्धेतुः प्रधानं न कपिलकुमतं नापि निस्साक्षिशून्यम् ।**
**ईशेनाधिष्ठिताश्चेदणव इति कथं स्थौल्यतोऽस्थौल्यतो वा ॥**
**आद्ये तद्धानमंत्ये पतति बलतया कंठ ईशांतवत्वं ।**
**तस्मादस्माकमज्ञोपहितमभिमतं वैदिकं चिन्निदानम् ॥८॥**

जगताचे कारण प्रधान आहे असे सांख्याचे मत आहे, ते योग्य नाही; कारण प्रधान जड आहे. (जड स्वतंत्र प्रवृत्त होत नाही व दुसऱ्याला प्रवृत्त करीत नाही.) (बौद्ध मानतात त्याप्रमाणे) निःसाक्षिक असे शून्यही जगताचे कारण होऊ शकत नाही; कारण अभावापासून भावोत्पत्ति होत नसते. नैयायिकांप्रमाणें ईश्वराधिष्ठित परमाणु जगताचे कारण मानल्यास ते परमाणु स्थूल आहेत किंवा सूक्ष्म आहेत? प्रथमपक्षी त्या परमाणूचे आणखी

भाग होऊ शकत असल्यामुळे, त्यांचे परमाणुत्व नाश पावते; दुसरे पक्षी तुला ईश्वराचा नाश होतो असे मानणें भाग पडते. (कारण परमाणु सूक्ष्म मानल्यास, एक ईश्वर सूक्ष्म व दुसरे परमाणु सूक्ष्म असे दोन सूक्ष्म पदार्थ मानावे लागतात. पण दोनपणा त्रिविधपरिच्छेदाशिवाय संभवत नाही, ईश्वर व परमाणु यांचे ठिकाणी परिच्छेद मानल्यास ते सावयव व नाशिवंत ठरतात.) (ही सर्व मते स्पष्ट आहेत.) म्हणून उपनिषदाने ठरविलेला अज्ञानोपहित परमात्माच जगताचे कारण होऊ शकतो.

वेदान्तसिद्धान्त

**द्वेधा तत्कारणं स्यात् प्रथममयि ह्युपादानमन्यन्निमित्तं ।**
**मृत्तंतुः कांचनं वा घटपटकटकादौ कुलालादिकं वै ॥**
**अस्मद्वेदांतसिद्धावुभयमपि भवेत्कारणं ब्रह्मतत्त्वं ।**
**तंतोर्जंतुर्यथैको ह्युभयविधतया स्वाप्नके वाऽथ चेतः ॥९॥**

हे कारणहि दोन प्रकारचे आहे. एक उपादान व दुसरे निमित्त. घटाचे ठिकाणी माती, पटाचे ठिकाणी तंतु व अलंकाराचे ठिकाणी सुवर्ण ही उपादान कारणाची उदाहरणें असून, कुलाल, कोष्टी व सुवर्णकार ही अनुक्रमे निमित्त कारणाची उदाहरणे आहेत; पण ज्याप्रमाणें ऊर्णनाभि आपल्यापासून निघणाऱ्या तंतूचे उपादान व निमित्त असे उभयविध कारण आहे, किंवा जसे स्वप्नांतील सर्व पदार्थांचे उभयविध कारण मन आहे, त्याप्रमाणें आमच्या वेदान्तसिद्धान्तात जगताचे उपादान व निमित्त असे उभयविध कारण ब्रह्म आहे.

जगाचे निमित्तकारण

**तत्र द्वेधा विवर्तं परिणतिगमुपादानमुत्पाद्यलब्धि- ।**
**रज्जुः सर्पस्य दुग्धं घृतदधिविषये भिद्यतेऽस्मान्निमित्तम् ॥**
**विश्वँस्मिश्चिद्विवर्तं परिणतिजननी संमताऽनादिमाया ।**
**सा यस्याज्ञामुपैत्येतदिह निगदितं चिच्छिवाख्यं निमित्तम् ॥१०॥**

हे उपादानकारणहि दोन प्रकारे दृष्टीस पडते. एक विवर्तोपादान व दुसरे परिणामी उपादान. रज्जुसर्पाचे ठिकाणी रज्जु विवर्तोपादान आहे व दधि, घृत यांचे ठिकाणी दूध हे परिणामी उपादान आहे. निमित्तकारण याहून भिन्न असते या जगताचे ठिकाणी चेतन विवर्तोपादान असून अनादिमाया ही परिणामी उपादान आहे. ही माया ज्याच्या आज्ञेने जगत निर्माण करिते, ते शिवाख्य चैतन्य या जगताचे निमित्त कारण होय.

आत्मक्रीड आत्मरति

**धन्या मान्याः स्वनन्या गुरुचरणयुगं सेवमानाः प्रशान्ता- ।**
**श्चैतन्यं चिंतयंतो मतिपतितजनांस्तारयंतो व्यटन्तः ।।**
**श्रीमद्विष्णौ शिवेऽस्मिन्नविषयविषये प्रेम संस्थापयंतः ।**
**संतः संपीतवंतः श्रुतिवचनसुधामंबिकांके लुठंतः ।।११।।**

स्वतः ब्रह्मस्वरूप होऊनही गुरुचरणांचे ठिकाणी ज्यांच्या चित्ताची सतत प्रेमधारा वाहात असते व विक्षेप शान्त झाल्यामुळे जे पराशान्तीला प्राप्त झाले आहेत, असे पुरुष धन्य होत. अशा पुरुषांची समाधि अखंड स्वरूपानुसंधानामळे कधी खंडित होत नाही, व ते अज्ञानी जनांचा उद्धार करण्याकरिता नेंहमी पृथ्वीवर फिरत असतात. म्हणून सर्व जगताला मान्य होतात. इंद्रियांना गोचर होणारे जे भौतिक विषय त्या भौतिक विषयामाणें विषयरूप नाहीत पण विषयरूप आहेत (म्हणजे ज्यांचे इदंत्वेकरून पृथगिव भान होते,) अशा श्रीविष्णूचें किंवा शिवाचें ठिकाणी ते प्रमवृत्ति स्थापन करीत असतात. म्हणून ('आत्मरति आत्मक्रीड' या श्रुतीत सांगितल्याप्रमाणें) आत्म्याचे ठिकाणी अगदी एकतान झालेले असतात व नेंहमी श्रुतिमाउलीचे बोधामृत प्राशन करीत अंबेच्या अंकावर खेळत राहतात.

परिणाम आणि विवर्त

**यत्कार्यं कारणें नो मिलति परिणतिः सेऽयमन्यो विवर्तः ।**
**योऽत्यक्त्वैव स्वरूपं भवति परमयेऽसौ द्विधैवात्र विद्यात् ।।**
**अध्यस्तो रज्जुसर्पः कनककटक** (मंबा–ताऽसा) **वनध्यस्तरूपो ।**
**ऽध्यस्तं विद्याद् हि विश्वं स यदुपतिरनध्यस्ततो नापनेयः ।।१२।।**

कार्यरूपाला आल्यानंतर जो कारणांत पुनः लय पावत नाही तो परिणाम समजावा; व आपले पूर्वीचे रूप न सोडताच जो स्वरूपांतरानें भासतो तो विवर्त समजावा. हा विवर्त दोन प्रकारचा आहे, एक अध्यस्त व दुसरा अनध्यस्त विवर्त. हे अंबे! रज्जुसर्प हा अध्यस्त विवर्त आहे व सुवर्णालंकार अनध्यस्त विवर्त होय. जगत् हे अध्यस्त विवर्त असून भगवान् श्रीकृष्ण अनध्यस्तविवर्त असल्यामुळे ज्ञानानें त्यांचा नाश होत नाही.

भक्तिरसानंद

**तस्माद्भक्तिः सुसिद्धा परचिदधिगमे श्रीगुरोरीश्वरस्य ।**
**ज्ञानें स्थैर्यं प्रयाते शिवभजनगुणोऽयं परानंदलाभः ।।**
**योगे प्रेम्णा पदांभोरुहयुगलमयि स्थापयित्वा स्वचित्ते ।**
**नेत्राश्रुक्षालितं तद्विरहयुतमतौ लालनेनानुभाव्यम् ।।१३।।**

(ज्ञानानंतर भगवच्छरीर नाश पावत नसल्यामुळे) अर्थातच श्रीगुरु व ईश्वर यांचे ठिकाणी ज्ञानोत्तर भक्ति सिद्ध आहे. आत्मज्ञान दृढ झाले असता शिवभजनरूप परमानंद प्राप्त होतो. प्रेमाने सगुणध्यान साधून चित्ताचे ठिकाणी परमेश्वरचरणकमल दृढ स्थापन करावेत, आणि विरहवृत्तीमध्ये निजनेत्राश्रूंनी त्या चरणांचे ठिकाणी अभिषेक करून लालनभावानें त्यांचा अनुभव घ्यावा.

**गोविंदानंदसिंधौ द्रुतसलिलमयी प्रीतिमंदाकिनी या ।**
**प्रोल्लासैः संप्रयाता मधुररसवशात्स्वच्छवात्सल्यतो वा ॥**
**सद्भावापूर्यमाणो हरिहरचरणांभोरुहस्थायिभावः ।**
**संसारासक्तिनाशे रसघनपरमानंदताव्यक्तिमेति ॥१४॥**

परमात्मसुख हाच कोणी समुद्र, त्याचे ठिकाणी माधुर्यरसावेशानें किंवा शुद्ध वात्सल्यरसावेशाने पुष्ट होऊन चित्ताची प्रेमधारा अखंड प्रेमाने पुष्ट होणारा हरिहरचरणकमलानुराग, स्थायी संसारासक्ति नाहीशी होताच अत्युत्कटभक्तिरसानंदाला प्राप्त होतो.

**जीवोऽणुश्चेत्कथं स्यात् सकलतनुमतिर्मध्यमश्चेद्विनाश ।**
**स्तर्ह्येष स्यान्महीयानिति कपिलमतं श्रौतमप्यस्ति तद्वत् ॥**
**एवं सांख्यं तथापि प्रकृतिकृतितया हेयमन्यान्ययुक्ते- ।**
**स्तस्मादास्माकमेव श्रुतिशिखरगिरा साधु मीमांसनीयम् ॥१५॥**

जीव अणु असेल तर सर्व शरीराच्या ठिकाणी संवेदना कां व्हावी? जीवाचे मध्यम परिमाण मानल्यास तो विनाशी ठरतो; म्हणून तो विभु आहे, असा कापिल आणि श्रौत सिद्धान्त आहे; पण सांख्यात प्रकृतीचे स्वतंत्र कर्तृत्व मानले आहे व ते अनेक युक्तींनी त्याज्य ठरते. म्हणून श्रुतिवाक्यांनी ज्याची मीमांसा केली जाते असे आमचेंच मत उत्तम आहे.

मोक्षाचे मार्ग

**केचित्कर्मैव काम्योज्झितमुदितपदप्राप्त्युपायं प्रतीता ।**
**स्तच्चोपास्त्या युतं कामरहितमिति वा केचिदुद्घोषयंति ॥**
**ज्ञानं कर्मेति केचिद्यजनसहितया विद्ययैवेत्थमन्ये ।**
**ज्ञानादेवेति वाक्याद्वयमिह सहसा नानुमन्यामहे तान् ॥१६॥**

'काम्यकर्मविरहित नित्यकर्मच मोक्षाला हेतु आहे' असे कित्येक म्हणतात, तर कित्येक 'काम्यकर्मविरहित उपासनायुक्त केलेले नित्यकर्म मोक्ष-हेतु आहे,' असे म्हणतात. कित्येक, 'ज्ञानकर्मसमुच्चयाला' मोक्षहेतु मानतात,

तर कित्येक 'यज्ञयागादि कर्मसहित विद्या' मोक्षाला हेतु मानतात; पण श्रुतीने 'ज्ञानानेच मोक्ष होतो' असे सांगितल्यामुळे, आम्ही वरील कोणताही पक्ष मानीत नाही.

कर्ममार्ग

**कर्मैतत्कर्तृबुद्धया भवति तनुमनोवर्णगर्वान्वितत्वाद् ।**
**ज्ञानं कर्तृत्वहानौ श्रुतिसुमतिमता जायते ब्रह्मणो वै ॥**
**एवं भेदे विमूढा द्वयमपि विवदंत्यात्मनः प्राप्तिहेतुम् ।**
**ते वह्निं शीतमंबूभयमहह तृडुच्छेदकामाः पिबंतु ॥१७॥**

देहादिकांचा व वर्णाचा ज्यांना अभिमान आहे त्यांना, अमक्या वर्णाचा मी असल्यामुळे त्या वर्णाला विहित कर्म मला केले पाहिजे, अशी साभिमान कर्तृत्वबुद्धि राहते व त्या कर्तृत्वबुद्धीमुळे त्यांच्याकडून कर्म घडते; व श्रुत्यैकशरण जे झाले आहेत त्यांना कर्तृत्वबुद्धि सुटल्यानंतर परब्रह्माचे ज्ञान होते. कर्म व ज्ञान यांचा (एकात कर्तृबुद्धि असली पाहिजे व एकात कर्तृत्वबुद्धि नसली पाहिजें) असा भेद असूनही जे मूर्ख लोक ज्ञान व कर्म यांचा समुच्चय मोक्षाला हेतु आहे असे म्हणतात, ते आपली तृषा भागविण्याकरिता एकाच वेळी अग्नि व पाणी पिवोत!

ज्ञानमार्ग

**जिज्ञास्यं तद्यतोऽस्य स्थितिजनिविलयाः सर्ववेत्तर्भवन्ति ।**
**सत्यं ज्ञानं ह्यनंतं सुखघनममृतं सर्वतोऽतर्बहिर्यत् ॥**
**तद्दूरे तत्समीपे निगमकृदनुभूत्यैव विज्ञेयमेकम् ।**
**वेदाः स्तुन्वन्ति तस्मिन् जडमननपरा मोहमायान्त्यसन्ताः ॥१८॥**

ज्या सर्वज्ञापासून या जगताची उत्पत्ती, स्थिति व लय होतात, जे नित्य व अत्यंत सुखरूप असून आंत व बाहेर व्यापून भरले आहे; तेच एक जाणण्यास योग्य आहे; तेच दूर आहे; तेच जवळ आहे; वेदवेत्त्यांच्या अनुभवानुसार तेच एक समजून घ्यावे; सर्व वेद त्याच पदाची महती गातात; पण ज्यांना दृश्याभासच सत्य वाटतो ते मूढ मात्र मोह पावतात.

**त्रैगुण्ये मुख्यशुक्लोपहितचितिरियं विश्वहेतौ निमित्तम् ।**
**तद्वत्कृष्णप्रधानोपहितचितिरुपादानमेतत्तदाख्यम् ॥**
**मिश्रे यत् बिंबितं चिद्भवति विषयभुक् त्वंपदेनोच्यमानम् ।**
**मायात्रैविध्यमेतद्यदि विलयमियाच्छिष्यते वाक्यलक्ष्यम् ॥१९॥**

त्रिगुणापकी शुद्धतत्त्वाला आश्रय असणारे जे चेतन ते या जगताचे

निमित्त कारण होते व तमःप्रधानोपहित चेतन जगताचे उपादान कारण होते. मिश्रसत्त्वांत पडलेले चेतनाचे प्रतिबिंब विषयभोग मागणारे असून त्यालाच त्वपंद (जीव) म्हणतात. हे मायात्रैविध्य नाहीसे झाल्यास बाकी लक्ष्य ब्रह्मच शेष राहते.

जीव एक की अनेक ?

**मन्यन्ते केचिदस्मिन् बहुविधमलिनांशादनेके हि जीवाः ।**
**केचित्त्वज्ञानमेकं भवति लघुतया तेन जीवो न नैकः ॥**
**एवं जीवे विवादस्तदपि हरिरिहैकोऽस्ति सर्वप्रसिद्धः ।**
**कर्ता भर्ताऽनुमंता सुजनहृदयगः सर्वशक्तिः परात्मा ॥२०॥**

हा मिश्रसत्वात्मक मलिनांश अनेकविध असल्यामुळे त्यात पडलेले प्रतिबिंबरूपी जीवही अनेक आहेत असे कित्येक म्हणतात. अज्ञान एकच असल्यामुळे तदुपाधिक जीवही एकच मानण्यात लाघव असल्यामुळे जीव एक आहे, अनेक नाहीत, असे कित्येक मानतात. अशा रीतीनें जीवाचे ठिकाणी विवाद असला, तरी जगत्कर्ता, जगद्भर्ता, अनुमंता, सज्जनांचे हृदयात वास करणारा, सर्वशक्ति, सर्वांतर्यामी असा परमेश्वर एकच. हे सर्वांना मान्य आहे.

वाचस्पतींचे मत

**वाचस्पत्यं मतं यत्प्रतिविषयभुजः सृष्टिभेदाद्धरेर्भित् ।**
**चेत्पृच्छामः किमेषो भवति तव मते व्यापकोऽव्यापको वा ॥**
**आद्ये‌ऽनैकत्वहानिर्भवति तदपरे‌ऽव्यापकत्वात्स मर्त्यः ।**
**चेदप्येवं हतोऽयं निगमगुणगुरुस्त्वं ततो ज्ञानशून्यः ॥२१॥**

वाचस्पतींच्या मतात, प्रत्येक जीवाची सृष्टि निरनिराळी असल्यामुळे, त्या प्रत्येक जीवसृष्टीचा नियंता परमेश्वरही निरनिराळा आहे असे मानले आहे; पण येथे आम्ही असे विचारतो की, हे सर्व परमेश्वर व्यापक आहेत? की अव्यापक आहेत? आद्यपक्षी अनेक व्यापक होऊ शकत नसल्यामुळे अनेकत्वाची हानि होते. दुसरे पक्षी सर्व ईश्वर अव्यापकतेमुळे नाशिवंत ठरतात; म्हणून हा वाचस्पती हत झाला व त्याचे मत स्वीकारणारा तूं मूर्ख आहेस.

नैयायिकाचे पदार्थ–चतुष्क

**आत्मा दिक्काल आकाशमिति विभुगणस्तार्किकेनोक्त एव ।**
**पृच्छामस्तं किमेषां भवति तव मते संकरोऽसंकरो वा ॥**
**आद्ये हेयं कुभाव्याद्भवति तदपरे वाग्वधोऽव्याप्यवृत्तेः ।**
**तस्मादास्माकमेकं परमचिदु विभु न्यूनतो मर्त्यमन्यत् ॥२२॥**

आत्मा, दिशा, काल व आकाश, हे चार पदार्थ न्यायात विभु मानले आहेत. आम्ही त्यांना असे विचारतो की या चार पदार्थांचा संकर होतो किंवा संकर होत नाही ? आद्यपक्षी (त्यांचा चारपणाच राहत नसल्यामुळे चार निरनिराळे विभु मानण्याची) ही कुकल्पनाच असल्यामुळे त्याज्य आहे. दुसरे पक्षी प्रत्येक पदार्थ अव्यापक ठरल्यामुळे व्याघात दोष येतो; म्हणून (आम्ही वेदान्ती मानतो त्याप्रमाणे) एक चैतन्यच विभु असून तद्व्यतिरिक्त सर्वच अव्यापक असल्यामुळे नाशिवंत आहे.

पांच भेदकल्पना

**जीवेशौ जीवजीवौ चिदचिदचिदचिच्चिज्जडे पंचधा भित् ।**
**चेदीशोऽव्यापकः स्यादिति वदसि तदा पूर्वदोषाः प्रयान्ति ॥**
**भिद्यस्मन्मतेऽपि व्यवहृतिविषये स्वप्नवत् किन्तु कल्प्या ।**
**संघाते त्वानवस्थ्यादवयवविधया दुर्विभाव्या मृषैव ॥२३॥**

जीव–ईश्वर, जीव–जीव, जड–जीव, जड–जड व जड–ईश्वर असा पांच प्रकारचा भेद (सत्य) आहे असे मानल्यास ईश्वर अव्यापक ठरतो व पूर्व दोष येतात. आम्हीही व्यवहारामध्ये भेद मानतो, पण तो स्वप्नवत् अविद्याकल्पित मिथ्या मानतो. या सर्वांचा (सत्य भेद मानून) संघात मानल्यास, सर्व सावयव ठरून अनवस्थादोष येत असल्यामुळे (म्हणजे प्रत्येक सावयव ठरून त्यांच्या अवयवांचा संघात मानावा लागून, संघातामुळे ते अवयवहि सावयव ठरून त्या अवयवांचा संघात, पुनः त्यांच्याही अवयवांचा संघात, अशाप्रमाणे संघातपरंपरा मानावी लागत असल्यामुळे) ही कुबुद्धि-कल्पित भेदकल्पना मिथ्या आहे.

जीवाचे स्वातंत्र्य व पारतंत्र्य

**जीवः स्वानिष्टभुक्तेरयि परमपराधीन एवेति केचित् ।**
**त्वन्ये पूर्णः स्वतंत्रो हरिरपि न कदा चिन्नियंतेत्थमाहुः ॥**
**अस्माकं स्यात्स्वतंत्रो नवकृतिविषये किन्तु देवोऽनुमंता ।**
**कामैर्बद्धोऽविचारी नियतकृतिफलं पारतंत्र्येण भुंक्ते ॥२४॥**

जीव हा दुःख भोगतो म्हणून तो अत्यंत परतंत्र आहे, असे कित्येक म्हणतात, जीव हा पूर्ण स्वतंत्र आहे, (कारण तो चेतन असल्यामुळे) परमेश्वरही चेतनाचा नियंता होऊ शकत नाही; पण आम्ही असे मानतो की, कर्तृकाळी जीव स्वतंत्र असून, ईश्वर (त्या कृतीचे ठिकाणी) अनुमंता आहे, व वासनावश होऊन अविचारानें जीव जे बरे वाईट कर्म करितो त्याचे फळ मात्र तो ईश्वराच्या परतंत्र होऊन भोगतो.

प्रारब्ध कीं प्रयत्न ?

**नित्यं प्रारब्धमत्र प्रबलमिति तदा भुंक्ष्व हालाहलं त्वं ।**
**यत्नश्चेत्तर्हि किं ते श्रमसमकरणे नाऽपि सर्वत्र लाभः ॥**
**यस्मात्पौर्वं प्रयत्नात्प्रबलमतिमता शक्यते जेतुमस्मिन् ।**
**दैवाद्भोगोऽस्तु मुक्त्यै गुरुपदयुगलं सेवमानो यतेत ॥२५॥**

नेहमी प्रारब्धच प्रबल आहे असे म्हणत असशील तर हे वादी, तू हालाहल पी ! नित्य यत्नच समर्थ आहे असे म्हणत असशील तर मग सारखे श्रम करूनही सर्वदा तुझा यत्न सफल कां होत नाही ? ज्या अर्थी अतितर प्रबल प्रयत्नानें बुद्धिमान् पूर्वकर्म जिंकू शकतो, त्या अर्थी भोग दैवावर टाकून श्रीगुरूच्या पदाचे सेवन करीत मुक्तीकरिता यत्न करावा.

**जीवोऽयं पूर्वभोगे हरिनियतिवशो यत्नयोग्यः कथं चेत् ।**
**यत्नापेक्षी शिवोपीति न भवतु तदा निर्दयोऽसौ कुबुद्धिः ॥**
**पापात्स्वर्गं सुपुण्यान्नयतु नरकमप्येवमात्मेच्छयैव ।**
**स्याद्व्यर्थ्यात्तदुक्तश्रुतिशिखरगिरां सर्वथा मानहानिः ॥२६॥**

पूर्व कर्माचे फळ भोगण्यात जीव हा परमेश्वरनियतीच्या आधीन असल्यामुळे, त्याच्याकडून यत्न होणें कसे शक्य आहे? असें म्हणशील, तर परमेंश्वर जीवाला त्याच्या प्रयत्नानुसार फळ देणारा होणार नाही, तर तो निर्दय व कुबुद्धि ठरेल. मग तो एखादे वेळी आपल्या इच्छेने पापाने स्वर्ग व पुण्याने नरकही जीवाला भोगावयाला लावील, व असे होऊ लागल्यास श्रुति व्यर्थ ठरून वेदाचे महत्त्वच अस्ताला जाईल.

आत्म्याची अविनाशता

**आत्माऽभावस्य मातः कथमधिगमनं ज्ञानतोऽज्ञानतो वा ।**
**आद्ये त्वात्माश्रयादिर्भवति तदपरे व्याहतिर्नाम दोषः ॥**
**तद्वद्दोषौ प्रसक्तौ कृतहननमथो योऽकृताभ्यागमोऽपि ।**
**सत्त्वेऽप्येवन्न किं स्यादिति निगद न तद् दृष्टतस्सिद्धतश्च ॥२७॥**

आई आत्म्याचा नाश होतो हे कसे जाणावयाचे ? ज्ञानाने किंवा अज्ञानाने ? ज्ञानाने आत्मनाश कळतो म्हटल्यास (आत्म्यालाच आत्म्याचा नाश कळतो असा) आत्माश्रय दोष येतो. दुसरे पक्षी (अज्ञानाने आत्मनाश कळणें शक्य नसल्यामुळे) व्याघात दोष येतो. त्याचप्रमाणे (आत्मनाश मानल्यास) अकृताभ्यागम व कृतप्रणाश हेही दोष येतात. आत्मभाव मानूनही हे दोष कां येऊ नयेत असे म्हणू नको, कारण हे युक्तीने व दृष्टानुभवाने सिद्ध आहे.

आत्म्याची नित्यता

**आत्माऽनित्योऽथ नित्यः प्रथम उपगते पूर्वदोषाः प्रयान्ति ।**
**अंत्ये मांसास्थिमज्जामलरुधिरमयाचेतनाच्चेतनोऽन्यः ।**
**मानं सुप्तिः परस्मिन्स्मरणमिति कथं तुल्यदृक् चेत्स सन्प्राङ ।**
**नद्रासाजात्यवृद्धेर्मरणमथ चितो नैव नाशः प्रकल्प्यः ॥२८॥**

आत्मा अनित्य आहे किंवा नित्य आहे ? प्रथमपक्ष मानल्यास पूर्वीचे सर्व दोष येतात. दुसरा पक्ष मानल्यास मांसास्थिमज्जामलरुधिरमय अशा अचेतन शरीराहून तो निराळाच सिद्ध होतो. (आत्मा सिद्ध आहे) याविषयी सुषुप्ति प्रमाण आहे. (कारण) दुसरे दिवशी (आपल्याला पूर्व दिवशीच्या किंवा सुषुप्तिकालाच्या अनुभवाचे) स्मरण असते. आता (हा पूर्व दिवशीचा किंवा सुषुप्तीचा अनुभव सांगतो) असे कसे म्हणता ? तो जे सांगतो (तो सुषुप्तीचा अनुभव किंवा पूर्व दिवशीचे स्मरण नव्हे, तर) तो (दोन अवस्थांची) तुलना करितो (असे म्हणाल,) तरी (पूर्व अवस्थेतही तो असलाच पाहिजे ( तेव्हाच त्याला तुलना करता येईल. ) ( म्हणून सुषुप्तीत जसा आत्म्याचा नाश कल्पिता येत नाही, त्याप्रमाणेच) मरण हीही निद्रासजातीय दीर्घकालीक अवस्था असल्यामुळे, मरणानंतर आत्मा नाश पावतो असे कल्पिता येत नाही.

तत्पदाची व्याख्या

**बुध्यन्ते तत्त्वमस्यादिभिरिह सुधियो जीवदेवैक्यभावम् ।**
**तत्र द्वेधा स्वरूपं तटगमिति भवेल्लक्षणं तत्पदस्य ॥**
**यस्माद्भूम्यादिकानां स्थितिजनिविलयास्तत्तटस्थं च विद्यात् ।**
**सत्यं ज्ञानं ह्यनंतं सुखमयममृतं ब्रह्मलक्ष्मस्वरूपम् ॥२९॥**

सुज्ञलोक तत्त्वमस्यादि वाक्यांनी जीवपरमात्मैक्य जाणतात. त्यात तत्पदवाच्य जो परमात्मा त्याचे दोन प्रकारचे लक्षण आहे; एक स्वरूपलक्षण. ज्याच्यापासून भूम्यादि सर्व सृष्टीचे जन्मस्थितिलय होतात हे त्याचे तटस्थलक्षण जाणावे. आणि सत्यज्ञानानंत पूर्णसुखरूप हे स्वरूपलक्षण आहे.

त्वंपदाची व्याख्या

**श्रोतुर्देहेंद्रियाद्यैर्विरहितसुचितिस्त्वंपदेनोपदिष्टा ।**
**भोक्त्री साक्षिण्यतः सा भवति च द्विविधा मानसोपाधिराद्या ॥**
**अंत्या मायाविमुक्ता चलनविरहिता स्वापरोक्ष्यकगम्या ।**
**त्यक्ते चोपाधियुग्मे भवति च सहजा लक्ष्ययोगेन मुक्तिः ॥३०॥**

तत्त्वमसीत्यादि वाक्य श्रवण करणाऱ्याच्या देहेंद्रियादिकांहून निराळे असणारे चेतन त्याला त्वंपद म्हणतात. हे त्वंपद चेतन दोन प्रकारचे आहे; भोक्ता व साक्षी. मानसोपाधीने भोक्ता व उपाधिनिर्मुक्त झाले असता तेच साक्षी होते. हा साक्षी गमनागमनरहित असा कूटस्थ व स्वतःच स्वतःला अपरोक्ष होणारा आहे. भोक्तृत्व व साक्षित्व या दोन्ही उपाधीचा त्याग केला असता लक्षणेनें सहजच जीवब्रह्मैक्य होऊन मुक्ति होते.

स्वरूपज्ञानाचे साधन

**प्रत्यक्षं न प्रमाणं परचितिविषये स्पर्शशद्बाद्यभावात् ।**
**सामान्यान्नानुमानं श्रय परमपरोक्षान्वितं वैदिकं वै ॥**
**वाक्यार्थाद् ब्रह्मबोधः पदपरिणयनाद्वाक्यबोधो विधेयो ।**
**तत्राद्यन्ततत्पदस्य द्विविधमयि भवेल्लक्षणं सत्समुक्तम् ॥३१॥**

आत्मस्वरूप जाणण्याकरिता प्रत्यक्षप्रमाण उपयोगाचे नाही, कारण आत्म्याचे ठिकाणी शद्बस्पर्शादि गुण नाहीत. अनुमानही उपयोगाचें नाही, कारण त्याच्या योगानें सामान्य ज्ञान होते. म्हणून आत्म्याला अपरोक्ष करणाऱ्या अशा श्रेष्ठ प्रमाणाचा म्हणजे श्रुतिप्रमाणाचा आश्रय कर, तत्त्वमसीत्यादि वाक्याच्या वैदिक अर्थानें ब्रह्मबोध करून घ्यावा, व पदांचा विचार करून वाक्यार्थ समजून घ्यावा. त्यात आद्य जे तत्पद त्याचे दोन प्रकारचे लक्षण मागे सांगितले आहे. (श्लोक २९)

सत्, चित् व आनंद

**सत्यं किं यस्य कालत्रय इह न भवेद्बाधनं तच्च ब्रह्म ।**
**किं ज्ञानं जाग्रदादौ यदुजननि भवेत्सर्वदा स्वप्रकाशम् ॥**
**आनंदः कोऽयमात्मा प्रियतमपरमोऽन्यद्यदर्थं प्रियं स्यात् ।**
**तस्माद् ब्रह्मत्वमात्मा निगमनिचयतो युक्तितः स्वप्रतीतेः ॥३२॥**

सत् कोणते असे म्हणशील,तर ज्याचा तिन्ही काळी बाध होत नाही ते सत् होय. ते ब्रह्म आहे. ज्ञान कोणते असे म्हणशील, तर आई, जाग्रदादि अवस्थेत जे सर्वदा स्वप्रकाशमान असते ते ज्ञान होय, व आनंद कोणता असे म्हणशील, तर ज्याच्याकरिता सर्व प्रिय असते असा परमप्रेमास्पद आत्मा तोच आनंद आहे; म्हणून तूच आत्मा आहेस. 'तो आत्मा ब्रह्म आहे' असे श्रुतिवरून, युक्तीनें व अनुभवानें आई, तू जाणून घे.

जगदुत्पत्तिक्रम

**माया त्रैगुण्यरूपा तदुपहितचितेरीक्षणाद् बुद्धिसंज्ञा ।**
**संकल्पोऽहं बहुस्यामहमभिमननात्सांख्यवेदान्तयोगः ॥**
**तस्मात्तन्मात्रमाद्यं गगनमयि ततो वायुरग्निस्ततश्चाऽऽ ।**
**पोऽग्नेरद्भ्यो महीति त्रिगुणमयमिदं पंचकं प्राकृत च ॥३३॥**

त्रिगुणात्मक मायोपहित जे चेतन, त्या चेतनानें ईक्षण केल्यामुळे त्या ईक्षणालाच सांख्यात बुद्धिसंज्ञा आहे, व 'अहं बहुस्याम्' हा संकल्प अभिमानपूर्वक असल्यामुळे, सांख्यांत यालाच अहंकार म्हटले आहे. म्हणून सांख्य व वेदान्त यांचे ऐक्य आहे. पुढे त्या अहंकारापासून प्रथम तन्मात्ररूपी आकाश, आकाशापासून वायु, वायुपासून अग्नि, अग्नीपासून जल व जलापासून पृथ्वी असे प्रकृतिविकृतिरूप पंचक उत्पन्न झाले.

**व्यस्तैः सत्वांशकैर्ज्ञानकरणगणना चित्तमेतत्समस्तै-।**
**र्द्वैतद्वृत्ती विमर्षात्मकमिदमु मनो निश्चयात्कार्यबुद्धिः ॥**
**तद्वद्व्यस्तैः रजोंशैः कृतिकरणगणः प्राणवायुः समस्तै-।**
**र्व्यानोदानादिसंज्ञां स च भजति तथोपाधिभेदात् क्रियावान् ॥३४॥**

त्या प्रत्येक भूतांच्या निरनिराळ्या सत्त्वांशापासून निरनिराळे ज्ञानेंद्रिय झाले असून, सर्वांचा सत्त्वांश मिळून एक चित्त झाले. हे चित्त दोन प्रकारचे आहे; विचार करणारे ते मन व निश्चय करणारी ती बुद्धि. त्याचप्रमाणे प्रत्येक भूताच्या रजोंशापासून एकएक कर्मेंद्रिय झाले असून सर्वांचा रजोंश मिळून क्रियाशक्तियुक्त असा प्राण झाला आहे व तो उपाधिभेदाने व्यानोदानादि संज्ञेस प्राप्त होतो.

ईशसृष्टि व जीवसृष्टि

**मायायाः शुद्धसत्त्वे प्रतिफलितचितिर्देवसंज्ञामुपेयात् ।**
**सत्वे मिश्रे तथैव प्रतिफलितचितिर्जीवतां याति मातः ॥**
**तत्रेक्षादिप्रवेशांतकमिह जगदुद्भावितं शंकरेण ।**
**कर्ता भोक्ताऽहमित्यादिपरमधिगमान्तं भवेज्जीवक्लृप्तम् ॥३५॥**

मायेच्या शुद्ध सत्त्वांत प्रतिबिंबित झालेल्या चैतन्याला ईश्वर ही संज्ञा आहे व तिच्या मिश्र सत्त्वांत प्रतिबिंबित चेतनाला जीव म्हणतात. ईक्षणापासून प्रवेशापर्यंत ईश्वरकृत सृष्टि असून, कर्तृत्वभोक्तृत्वादिकांचा अभिमान धारण करण्यापासून तर मोक्षापर्यंत सृष्टि जीवभावनाजन्य आहे.

**मायायां बिंबितं यद् भवति जननि चिज्जीवसंज्ञं तदुत्थम् ।**
**बिंबत्वारोपयुक्तं चिदयि विमलभं वासुदेवं वदामः ॥**
**तस्मिन्सर्वज्ञताद्याः निजकृतिफलनायैव जीवेन क्लृप्ताः ।**
**निष्कामं प्रेम किंतु भ्रमरहितविवर्ते भवेद्वस्तुतंत्रम् ॥३६॥**

(एकजीववादाच्या दृष्टीनें) मायेमध्ये प्रतिबिंबित झालेले चेतन (हाच) जीव असून त्याच्या अपेक्षेने बिंबत्वारोपाने युक्त असलेले शुद्ध चेतनच आमचा वासुदेव आहे. त्या वासुदेवाच्या ठिकाणी आपल्या कर्माचे फळ मिळविण्याकरिता जीवानेच सर्वज्ञत्वादिक धर्मांची कल्पना केली आहे; तरी पण या भ्रमरहित विवर्ताच्या ठिकाणी केलेले निष्काम प्रेम वस्तुतंत्रच आहे.

**भूतैर्युक्तो व्रजेद्वाऽन्यतनुपरिणये नैव तूत्तूर्णलब्धेः ।**
**पंचम्यां वा नरः स्यादिति वचननयाभ्यां व्रजेत्तैः सहैव ॥**
**पापी नित्यं कुमार्गे पततु सुकृतिनोऽप्येवमेवं प्रवृत्ताः ।**
**क्षीणे पुण्ये द्युलोकाच्छिवशिव जननि द्वेऽपि हेये विरक्तैः ॥३७॥**

हा जीव मरणानंतर दुसरे शरीर घेण्याकरिता जातो तेव्हा पूर्व शरीरातील भूतांनी युक्त असूनच जातो किंवा त्या भूतांना सोडून जातो ? पंचभूते कोठेही समान व केव्हाही उपलब्ध होणारी असल्यामुळे जीव त्यांना सोडून जातो असे पूर्वपक्षी म्हणतो. पण सिद्धान्त मत असे आहे की, पांचव्या आहुतीत पुरुष होतो, या वचनावरून व युक्तीवरून जीव हा पंचभूतयुक्तच गमन करितो. पापी न्त्यि संसारमार्गात पडो; पण पुण्यवानही स्वर्गात नित्य राहतात असे नाही. तेही पुण्यक्षयानंतर फिरून संसारात पडतात, म्हणून शिव शिव ! आई, या दोन्ही मार्गांचा विरक्तांनी त्यागच करावा.

स्थूल भूतांची उत्पत्ति

**शेषैरेषां तमोंशैर्विरचितमखिलं पंचकं स्थूलसंज्ञम् ।**
**द्वेधैकैकं विभज्यार्धकमपि पुनरेतच्चतुर्धा विभज्य ॥**
**एकैकस्यार्धकेऽन्यैर्जननि सुमिलितैरष्टमांशैस्तु पंच ।**
**भूतान्याकाशवायुज्वलनजलभुवो भूतसर्गस्ततः स्यात् ॥३८॥**

सूक्ष्म भूतांच्या शेष राहिलेल्या तमोंशापासून स्थूल भूतपंचक उत्पन्न होते. त्याची प्रक्रिया अशी आहे– प्रत्येक भूताचे दोन भाग करावयाचे. त्यात पुनः त्या प्रत्येक भूताचा एक एक अर्धा भाग घेऊन त्याचे चार भाग करावयाचे. नंतर शेष राहिलेला प्रत्येक भूताचा अविभाज्य अर्धा भाग घेऊन त्यात तद्व्यतिरिक्त दुसऱ्या भूतांचा अष्टमांश मिळवावा. अशा प्रमाणे आकाशादि स्थूल भूते उत्पन्न होतात.

**दैवः सर्गोऽष्टधाजादिरयि सुजनिदे पंचधा तिर्यगस्ति ।**
**मानुष्यं त्वेकमेव द्विजनृपतिवणिक्पादजैः कल्पितं च ।।**
**कर्ता भोक्ताऽत्र जीवः कृतिफलविषये वासुदेवोऽनुमंता ।**
**वेदान्तांतःप्रवेशो निजविलमतेः सात्विकात्तारतम्यात् ।।३९।।**

ब्रह्मदेव ज्यात आदि आहे असा दैवसर्ग आठ प्रकारचा आहे आणि हे आई, तिर्यक् सर्ग पांच प्रकारचा आहे. मानुष सर्ग एक प्रकारचा असून तो पुनः ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या भेदांनी चार प्रकारचा आहे. कर्मकर्ता व फलभोक्ता जीव हा असून परमात्मा अनुमंता आहे. आपल्या बुद्धीची ज्या मानाने सत्वशुद्धि असेल त्यामानाने या वेदान्तज्ञानात बुद्धीचा प्रवेश होतो.

वेद अपौरुषेय कसे?

**वेदा शैवा न जीवाद् गतनृपकथनात् प्रार्थनात् क्लृप्तवृत्ते ।**
**मैवं सद्वर्तमानान्नमनमपि कृपायोगतश्चोदनातः ।।**
**विद्याधिक्यात् प्रणेतुः श्वसनवचनतः सर्ववित्त्वं प्रसिद्धम् ।**
**बालानां मातृवद्योः परमहितवचःप्रेरकत्वाद्दयालुः ।।४०।।**

येथे कित्येक असा पूर्वपक्ष करितात की, वेदामध्ये सृष्टीनंतर उत्पन्न झालेल्या राजांचे वर्णन असल्यामुळे, ईश्वराची प्रार्थना असल्यामुळे व लक्षणा-वृत्तीची कल्पना केली असल्यामुळे, वेद हे ईश्वरप्रणीत नसून जीव-प्रणीत आहेत, पण हा त्यांचा पूर्वपक्ष बरोबर नाही. कारण ईश्वरज्ञानात जीवाच्या ज्ञानाप्रमाणें तीन काल नाहीत, तर ईश्वराला सर्वच वर्तमान असते; म्हणून, ईश्वरप्रणीत वेदात होऊन गेलेल्या राजांचे वर्णन आल्यास बाध नाही. परमेश्वराची प्रार्थना कशी करावी हे जीवाला माहीत नसल्यामुळे बाप जसा लहान मुलाला वडिलांशी कसे वागावे, त्यांना नमस्कार वगैरे कसा करावा हे सांगतो, त्याप्रमाणें परमेश्वराची प्रार्थना कशी करावी हे आपण केलेल्या वेदामध्ये जीवाला कृपेने दाखवून देणें परमेश्वराला विरुद्ध नाही. तत्त्वमसि वाक्याचे ठिकाणी लक्षणावृत्ति स्वीकारली पाहिजे हे परमेश्वरचोदनेवाचून-जीवाला स्वतंत्र रीतीने कळणें शक्य नाही, म्हणून परमेश्वरकृत वेदात लक्षणा. वृत्तिनिर्देश विरुद्ध नाही. म्हणून वेद जीवप्रणीत नसून ईश्वरप्रणीतच आहेत- (कृतिपेक्षी कर्त्याचे ठिकाणी अधिकतर विज्ञानवत्ता असते, या अनुमाना-वरून) वेदापेक्षा वेदकर्ता अधिकतर विज्ञानवान् असला पाहिजे; (तो ईश्व रच होऊ शकतो, जीव होऊ शकत नाही. कारण जीव म्हणजेच अल्पज्ञ.)

मुलाला ज्याप्रमाणें आई नेंहमी त्याचे कल्याणाचे सांगत असते, त्याप्रमाणें ईश्वरही जीवाला नेहमी कल्याणाचा मार्ग सांगत असल्यामुळे (व तोही निरपेक्ष रीतीने सांगत असल्यामुळे) तो परम दयालु आहे,

विश्वाचा स्वरूपनिर्णय

**भ्रांतं विश्वं न सत्यं क्षरणपरतया नाप्यसत्यं प्रतीतेः ।**
**विज्ञानैकस्वरूपं क्षणिकमपि न हि प्रत्यभिज्ञास्मृतिभ्याम् ।।**
**अन्यत्प्रत्यक्षलोपाद् गुणगुणिपरता नान्यथोक्तिः सुयोग्या ।**
**नाख्यानं यौगपद्यादयि भवति ततो नस्त्वनिर्वाच्यमेव ।।४१।।**

हे भ्रांतिजन्य विश्व नेहमी नाश पावत असल्यामुळे सत्य नाही, प्रतीति येत असल्यामुळे असत् नाही, पदार्थांची प्रत्यभिज्ञा व स्मृति होत असल्यामुळें क्षणिक विज्ञानस्वरूप नाही, नाशपावणारे आहे असे प्रत्यक्ष दिसत असल्यामुळे, ते आत्म्याचा गुण असून विश्व व आत्मा यांचा गुणगुणी संबंध आहे, ही अन्यथाख्यातिवाद्यांची उक्तिही योग्य नाही. आत्म्यावर ते युगपत् भासत असल्यामुळे आख्यातिवाद्यांचें मतही योग्य नाही; म्हणून आम्ही त्याला अनिर्वचनीय भावरूप मानतो.

श्रवण–मनन–निदिध्यास

**अद्वैताचार्यवक्त्राच्छ्रवणमु विहितं वेदतात्पर्यरूपम् ।**
**स्वीयैः सम्यक् प्रतर्कैर्मननमयि चितेर्दाढर्चदं भेदहारि ।।**
**ताभ्यां निष्पादितं खल्वविफलमनसा सन्निदिध्यासितव्यम् ।**
**साक्षात्कारस्तदैव प्रभवति परमानंददो दुःखशून्यः।।४२।।**

अद्वैतसिद्धांत ज्याला पटला आहे अशा आचार्यांच्या मुखाने समन्वयरूप वेदान्त श्रवण करून, आपल्या सत्कर्मांच्या साह्याने भेदबुद्धिनिवर्तक श्रवण केलेल्या अर्थाचे दृढीकरण करणारे असे मनन करावे. याप्रमाणें श्रवण व मनन यांच्या योगानें दृढ झालेल्या अर्थाचे एकाग्र चित्तानें अनुसंधान करीत राहिल्यानें त्रिविध दुःखांचे उन्मूलन करणारा व परमानंदप्राप्ति करून देणारा असा आत्मसाक्षात्कार होतो.

केवळ शद्वच तारतात !

**भ्रांत्युद्भूतो न बंधो विरमति सहसा वेदनादन्ययोगैः ।**
**रज्जूद्भूतोऽहिरस्तं व्रजति किमु नमस्कारमंत्रौषधाद्यैः ।।**
**दृष्ट्वा छायां जलेऽहं पतित इति मतेस्तारकः किं करोति ।**
**तद्वन्मिथ्या निमग्ने हरिरपि न दयां शद्वभिन्नां तनोति ।।४३।।**

संसारबंध भ्रमजन्य असल्यामुळें, ज्ञानावाचून इतर कोणत्याही उपायांनी त्याची निवृत्ति होणें शक्य नाही. रज्जूवर भ्रमानें भासलेल्या सर्पाची निवृत्ति मंत्रतंत्रादि उपायांनी होऊ शकेल काय ? पाण्यांतील आपली छाया पाहून, 'मी बुडालो बुडालो' म्हणून भ्रमानें ओरडणाऱ्या मनुष्याला, 'तू बुडाला नाहीस' असे शद्बानें सांगण्यापलीकडे तारणारानें काय करावें ? त्याप्रमाणें ह्या मिथ्या संसारामध्ये मी बुडालो म्हणून दुःख भोगणाऱ्या जीवावर (तुम्ही बुडाला नाही अशा उपदेशपर) शद्बापलिकडे कोणत्याही प्रकारची दया ईश्वर करू शकत नाहि.

त्रिविध अधिकारी

**श्रुत्वैवाचार्यवाक्यं भवति चितिमयोऽसौ वरिष्ठाधिकारी ।**
**मत्वा ध्यात्वा यदीया मतिगतिरजके मध्यमः सोऽधिकारी ॥**
**मोक्षेच्छुर्नित्यशंकी यदपि स जनिदे तीव्रबुद्धिस्तथापि ।**
**श्रौते कालेन गंत्र्यमु भवति ततोऽत्राधमश्चाधिकारी ॥४४॥**

आचार्यमुखातून जीवात्मैक्यपर उपदेश ऐकल्याबरोबर, जो ब्रह्मस्वरूप होऊन राहतो तो उत्तमाधिकारी समजावा. आचार्यमुखानें श्रवण करून व तर्कादि उपयांनी श्रुतार्थाचे मननिदिध्यासन करून ज्याची चित्तवृत्ति ब्रह्माकार होते तो मध्यमाधिकारी समजावा. आई ! मुमुक्षु आहे पण ज्याला जीवात्मैक्यबोध लवकर होत नाही व नेहमी ज्याचे चित्त शंकायुक्त असते, असा पुरुष बुद्धिमान असला तरी त्याला काळानें मुक्ति मिळत असल्यामूळे परमार्थांत तो अधमाधिकारी समजला जातो.

आत्मा कोणता ?

**अन्नाज्जातोऽन्नवृद्धो जननि भवति नो देहरूपोऽयमात्मा ।**
**यस्मात्प्रागप्रतीतो पुनरपि मरणे शून्यतां यात्यसत्यः ॥**
**श्रोत्रादींश्चालयन्यो जननि तनुबलं वायुरेको ददाति ।**
**प्राणाख्योऽसौ जडत्वान्न भवति परमात्मा क्षुदादौ प्रवृत्तेः ॥४५॥**

जननि, अन्नापासून झालेला व अन्नापासूनच वाढलेला हा देह आत्मा होऊ शकत नाही; कारण पूर्वी तो नसतो व मेल्यावरही पुन्हा नाश पावतो. श्रोत्रादि इंद्रियांचा चालक व शरीराला बल देणारा प्राणवायूही आत्मा होऊ शकत नाही; कारण तो जड असून क्षुधादि धर्मांनी युक्त आहे.

**कामक्रोधप्रलोभैः प्रतिफलमुदितं मानसं भ्रांतिजालम् ।**
**मातः कर्मेंद्रियैस्तन्मिलितमपि भवेन्नो चितिश्चंचलत्वात् ॥**
**बुद्धिर्ज्ञानाक्षयुक्ता न भवति परमात्मोद्भवत्वादिस्वभावात् ।**
**कादाचित्कत्वतो नोऽयि भवति परमात्मेयमानंदवृत्तिः ॥४६॥**

कामक्रोधादिवृत्तिरूप व पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणें क्षणात उत्पन्न होणारा व क्षणात नाश पावणारा, व कर्मेंद्रियांनी युक्त असणारा मनोमय कोशही आत्मा होऊ शकत नाही, कारण तो चंचल आहे. बुद्धि व ज्ञानेंद्रिय मिळून होणारा विज्ञानकोशही परमात्मा नव्हे कारण तोही उत्पत्तिमान आहे. त्याचप्रमाणें आनंदवृत्तिरूप आनंदमय कोशही आत्मा नव्हे कारण ती आनंदवृत्ति सर्वदा राहत नाही.

सच्चिदानंदरूप आत्मा

**यच्छायानंदवृत्तौ जननि तदिह सच्चित्प्रकाशस्वरूपम् ।**
**ब्रह्माखंडस्वभावं नहि न निगदयेत् शून्यकस्यापि साक्षी ॥**
**तज्ज्ञानात्संचितस्य प्रदहनम् तथाऽ गामिनोऽश्लेषणं च ।**
**किंतु प्रारब्धमेकं न हि जननि कदा क्षीयतेऽभुक्तमात्रम् ॥४७॥**

आई, या आनंदवृत्तीत ज्या आनंदाचे प्रतिबिंब पडते, तो सच्चित्प्रकाशरूप आनंद ब्रह्म होय. ते व्यापक आहे. ते नाही असे म्हणता येत नाही; कारण ते शून्यवृत्तीचेही साक्षी आहे. जननि, या ब्रह्मस्वरूपाचे ज्ञान झाले असता संचित कर्माचा नाश होऊन, क्रियमाण कर्माचा लेप लागत नाही; पण प्रारब्ध कर्म मात्र भोगल्यावाचून नाश पावत नाही.

जगत् हे काय आहे ?

**कार्यं न द्रव्यजातं न गुणमयमये कर्तृबुद्धिस्थमेव ।**
**द्रव्याधारेण भूयाद्घटपटकनकादिस्वरूपेण दृश्यम् ॥**
**ईशाधारेण तद्वत्सकलमिदमये जीवसंकल्पजालम् ।**
**स्वाप्नं तीव्रस्वभावाद्घनतमम् जगद् ब्रह्मविद्याविनाश्यम् ॥४८॥**

ज्याप्रयाणें कार्य म्हणजे द्रव्यरूप नव्हे, किंवा ते गुणरूपही नाही, पण ते द्रव्याच्या आधारे पटादिरूपानें दृश्य होणारा कर्त्याच्या बुद्धीचा परिणाम आहे; त्याप्रमाणें जगत् हे अन्य कांही एक नसून परमेश्वराच्या आधारानें भासणारे, जीवांच्या नाना संकल्पाचे जाळे आहे. हें स्वप्नाप्रमाणें जरी असले तरी तीव्र भावनेंने ते स्थूल भावाला प्राप्त झाले असून, ब्रह्मज्ञानानें त्याचा नाश होतो.

कर्ता कोण ?

**निर्माता ह्यंडन्मा जगत इति वचो नादरार्हं भवेद्वै ।**
**यस्माद् दृष्टं पुराणे व्रजयुवतिपतेर्नाभितस्तस्य जन्म ॥**
**दैन्याज्ञानादियोगं गमयति च यतो ब्रह्मणो ब्रह्मवाणी ।**
**तस्मादेकं स्वमायोपहितमयि परब्रह्म सिद्धं निदानम् ॥४९॥**

ज्याअर्थी पुराणामध्ये श्रीकृष्णापासून ब्रह्मदेवाची उत्पत्ती सांगितली असून दैन्यभाव व ज्ञानप्राप्तिइत्यादि जीवधर्माचाही संबंध ब्रह्मदेवाचे ठिकाणी वेदादिकात दाखविला आहे, त्या अर्थी ब्रह्मदेवाला सृष्टीचा कर्ता म्हणणे योग्य होत नाही. मायोपहित परमात्माच जगताचे जन्मस्थान घेऊ शकतो.

जन्ममरण कोणाला ?

**शुद्धं ब्रह्मव तस्मिन्नहि जननि कदा संसृतेः संभवोऽस्ति ।**
**नैवं जीवे सुषुप्तौ व्यवहृतिविषयः स्यात्प्रतीतेः प्रलाभात् ॥**
**न स्थूले पार्थिवेऽपि प्रपतति च यतस्तज्जडं मातरुर्व्याम् ।**
**तस्माल्लिंगेन साकं व्रजति नवजनिं मूढजीवोंऽधदृष्टिः ॥५०॥**

परब्रह्मवस्तु शुद्ध निर्लेप व सर्वधर्मविहीन असल्यामुळे, तिच्या ठिकाणी जन्ममरणादि गमनागमनरूप संसाराचा संबंध नाही; त्याचप्रमाणें नुसत्या जीवाला व स्थूल देहालाही जन्ममरणादि धर्माचा संपर्क नाही; कारण जीवालाच जन्ममरणादि संसाराचे भान झाले असते तर ते त्याला सुषुप्तीतही झाले असते. स्थूल देह तर येथेच जमिनीवर पडलेला असतो. तो जड आहे. त्याला गमनागमनादि धर्म राहू शकत नाही. आई हा अज्ञानी जीव अविचारानें लिंगशरीराचा अभिमान धरून, त्याच्याबरोबर जन्ममरणादि भावांचा अनुभव घेतो.

मरणोत्तर दोन मार्ग

**कर्मी स्वर्गाभिलाषी निजतनुपतने धूममार्गेण याति ।**
**देवोपास्त्याभिभूतोऽहह कृपणमतिर्दीप्तिमार्गेण याति ॥**
**नास्य प्राणाः प्रयान्तीति निगमवचसा ज्ञानिनो गत्यभावः ।**
**सर्वत्र व्यापकत्वाद्भगवति परमात्मायमानंदमूर्तिः ॥५१॥**

स्वर्गप्राप्ति व्हावी म्हणून स्वधर्माचरण करणारे कर्मठ पुरुष धूममार्गानें जातात व उपासनामार्गी पुरुष अर्चिरादि मार्गानें जातात. त्याचप्रमाणें 'प्राण उत्क्रमण पावत नाहीत,' असे श्रुति म्हणते म्हणून, ज्ञानी पुरुषाला गमनागमन होत नाही हे सिद्ध आहे. आनंदस्वरूप परमात्मा सर्वत्र व्यापक असल्यामुळे व तोच ज्ञान्यांचा विषय असल्यामुळे, ज्ञान्यांचे गमनागमन कोठे होणार ?

ज्ञानोत्तर स्थिति

**रस्माद्यावच्छरीरं हरिपदकमले तावदासक्तचित्ता ।**
**राधागोविंदनाथेति वचनरचनैर्वाचमाभूषयस्व ॥**
**तत्संगेनैव कालं क्षपय भगवति ज्ञानगर्वं विहाय ।**
**जिज्ञासून्बोधयित्वा जगदिदमखिलं पुत्रवल्लालयस्व ॥५२॥**

म्हणून जोपर्यंत देह आहे तोपर्यंत परमात्म्याच्या चरणकमलाचे ठिकाणी चित्त ठेवून, राधागोविंद इत्यादि नामस्मरणाने वाणीला अलंकृत कर, आणि ज्ञानगर्व सोडून, सत्संगामध्ये काल घालवून व मुमुक्षुजनांना उपदेश करून, सर्व जगताचे ठिकाणी आई, पुत्रभावना स्थापन कर.

**अंबारूपेण यो मां क्षुधितरतनुं स्तन्यपानेन पाति ।**
**तद्वत्तातस्वरूपः प्रहरति सकलं वासनाकष्टजालम् ॥**
**योऽनध्यस्तो विवर्तः सकरुणहृदयोऽलंदिपीठाधिवासः ।**
**सोऽयं श्रीसद्गुरुर्मे प्रभवतु भवतां भूतये ज्ञानदेवः ॥५३॥**

अंबारूपानें स्तन्यामृत पाजून, क्षुधेनें व्याकुळ झालेल्या माझ्या शरीराचे जो पालन करतो, त्याचप्रमाणें पिता होऊन जो माझे सर्व वासनादुःख निवारण करतो, व जो कृपाळू परमात्मा अनध्यस्तस्वरूप धारण करून, आळंदीत वास्तव्य करितो, तो माझा ज्ञानदेव सद्गुरुनाथ तुमच्या कल्याणार्थ गट होवो.*

॥ श्रीमत् सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

*टीप–या पत्रातील श्लोकांचे अर्थ श्रीगुलाबरावमहाराजांचे स्वतःचे नाहीत. –संपादक

□ □ □ □

## ८. रा. रा. बाळकृष्णपंत केकरे

[जगताचे कारण––उत्क्रांतिवाद–जगदुत्पत्तीचा मनोसंवेगसिद्धान्त––साधनांचा क्रम –चित्तत्रयाचे मार्ग.]

॥ श्री ज्ञानेश्वरमाऊली समर्थ ॥

श्रीमज्ज्ञानेश्वरं वंदेऽलंद्यामानंदविग्रहम् ।
कारूण्यकारणं कांतं कैवल्यकमलालयम् ॥१॥

**ज्यांचे शरीर पांचभौतिक नसून केवल आनंदस्वरूप आहे, व जे करुणेला कारण असल्यामुळे साकारत्वाला प्राप्त झाले आहेत व अत्यंत कारुण्यास्तव भीतीचा त्यांपासून लेशहीं होण्याचा संभव नसल्यामुळे अत्यंत सुंदर व जे केवळ मोक्षश्रियेचे घर आहेत, अशा श्रीक्षेत्र आलंदिवासी श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराज यांना वंदन करितो.**

**ब्रह्मज्ञानं समाश्रित्य भजनाच्छिवकृष्णयोः ।**
**चिरंजीव सुजात त्वं परमानंदतामृतात् ॥२॥**

हे तात! ब्रह्मज्ञानाचा आश्रय करून शिव आणि कृष्ण यांच्या भजनापासून उत्पन्न होणारें परमानंदरूप अमृत पिऊन चिरंजीवी हो.

अन्नपूर्णा-यमूकाकू शांता-दुर्गा-शकुंतला: ।
नत्वैता जननी: सर्वा लेखये त्वां निबोधनम् ॥३॥

सौ. अन्नपूर्णा आई, गं. भा. काकू, सौ. दुर्गा आई, सौ. शांताआई, चि. शकुंतला आई, या सर्वांना नमस्कार करून आपल्याकरितां कांही उपदेश लिहितो.

आस्तिकानां समर्थं चिन्नास्तिकानामचेतनम् ।
तथापि नाममात्रोऽयं विवादो दृश्यते मया ॥४॥

आस्तिक लोक सर्व समर्थ असे चेतन जगाचे कारण मानतात व नास्तिक जगाचे कारण जड मानतात तथापि तेही जड सर्वसमर्थ मानतातच; म्हणून नास्तिकांचा व आस्तिकांचा वाद नुस्ता नाममात्रच आहे.

जडवादे शक्तिनाशो गृहणीयो न चेत्तदा ।
अशक्यो यः कल्पयितुं चिद्विनाश: कथं भवेत् ॥५॥

जडवाद (मटेरियालिझम्) कसाही जरीं मानला तरी शक्तिनाश मानताच येत नाही, तर मग कल्पना करण्यासही अशक्य असा चेतनाचा नाश कसा मानता येईल ?

जगत्प्रश्नसमाधान उपपत्तिचतुष्टयम् ।
शून्याद्वेश्वरशून्याभ्यामुत्क्रांतेश्च पुनर्भवात् ॥६॥

जगांच्या कारणाविषयी आपल्याला चार प्रकारचे मत दिसते. १, कोणी शून्यापासून जगताची उत्पत्ति मानतात. २. कोणी शून्यापासून ईश्वरानें जगत् उत्पन्न केले असे म्हणतात. ३. कोणी उत्क्रांति ( Evolution ) मानतात; व ४. कित्येक पुनर्जन्म मानतात.

सर्वत्र सुलभोऽभाव एको नान्योऽनधिकृतेः ।
ततश्चेत् दृश्यते किन्नो सर्वस्मिन्सर्वसंभवः ॥७॥

जे शून्यासून म्हणजे अभावापासून जगदुत्पत्ति मानतात, त्यांना अत्यंताभावच घेतला पाहिजे. कारण प्रागभाव, प्रध्वंसाभाव, अन्योन्याभाव या सर्वांना अधिकरण पाहिजे. उदा०–प्रागभावाला कपाल अधिकरण असते प्रध्वंसाभावाला कपालच अधिकरण असते व अन्योन्याभावांत घटाभावाला पट व पटाभावाला घट अधिकरण आहे म्हणून शून्य म्हणजे अत्यंताभावच घेतला पाहिजे. आतां हा अत्यंताभाव सर्वत्र सुलभ असल्यामुळे

कोठे काहीही उत्पन्न झाले पाहिजे होते. परंतु तसे होत नाही.

ईश्वरेण कृतं सर्वमुपादानं विना यदि ।
स्वस्माद्भिन्नं स्वरूपं वा विकल्पद्वयसंस्थितिः ॥८॥

ईश्वराने जगत् शून्यापासून म्हणजे उपादान कारणावाचून उत्पन्न केले असेल, तर ते जगत् त्याने आपल्याहून भिन्न उत्पन्न केले ? अथवा ते तत्-स्वरूपच आहे ? याप्रमाणे दोन कल्पना येतात.

पूर्वदोषो भवेच्चाद्येऽभावोपादनतस्तथा ।
सर्वसर्वज्ञताऽन्त्ये स्यात् किमर्थं दृश्यतेऽल्पता ॥९॥

प्रथम पक्ष मानला तर अत्यंताभाव मानतांना जो दोष आला होता तोच येथेही येता. म्हणजे ईश्वराने अभावापासून जगत् उत्पन्न केले असे होईल; व असे मानले म्हणजे ईश्वराने कोठेही काही उत्पन्न करावे. आई-बापावांचून, सोन्यापासूनच मनुष्य करण्याला काय हरकत होती? दुसरे पक्षी, जगत् त्याचे स्वरूप असलें तर प्रत्येक पदार्थ सर्वज्ञ असला पाहिजे; मग आपल्याला अल्पज्ञता कां दिसावी ? कारण ईश्वर सर्वज्ञ आहे.

भ्रमः सादिरनादिर्वाऽऽद्ये पौर्वो दोषसंश्रयः ।
अंत्ये निवर्तते कस्माज्ज्ञानाच्चेदिष्टमेव हि ॥१०॥

ही अल्पज्ञता भ्रमानें वाटते असे म्हटल्यास हा भ्रम उत्पन्न झाला आहे किंवा अनादि आहे? उत्पन्न झाला असे मानल्यास कशापासून उत्पन्न झाला? अभावापासून झाला असे म्हणाल तर पुनः मागील दोष येतात. अनादि मानला तर नाहीसा कशाने होतो ? ज्ञानाने नाहीसा होत असेल तर इष्टापत्तिच आहे.

असमर्थं समर्थं वाऽचेतनं विश्वकारणम् ।
आद्ये नियम्यरूपं स्यात् द्वितीये चिद्व्यवस्थितिः ॥११॥

जगताचे कारण जे तुम्ही जड मानता ते असमर्थ मानता किंवा समर्थ मानता ? पहिल्या पक्षी, असमर्थ मानले तर ते नियम्यरूप होऊन नियंत्याची आवश्यकता लागते. दुसऱ्या पक्षी त्याला जगाच्या व्यवस्थेचे ज्ञानही असले पाहिजे. कारण अज्ञानाने व्यवस्था होत नाही. आणि तसे मानले म्हणजे मग ते आमचे चेतनच झाले.

अनंतमथ वा सान्तं जगतः कारणं जडम् ।
उभयत्रापि नोत्क्रांतिः पूर्णत्वाच्छक्त्यसंभवात् ॥१२॥

आता जगताचे कारण जे जड ते अनंत म्हणजे पूर्ण आहे, किंवा सान्त म्हणजे अपूर्ण आहे ? कोणतेही जरी मानले तरी जगताची उत्क्रांति संभवत नाही. कारण पूर्ण आहे तर पुढे उत्क्रांतीने पूर्ण होण्याची गरज नाही, व जर अपूर्ण आहे तर मग पूर्ण कसे होणार ? कारण अपूर्णामध्ये पूर्ण होण्याची शक्तिच नाही.

उत्क्रांति-वाद

नीतिः स्वभावात्तिर्यक्षु याऽस्ति सा मानवेषु च ।
प्रयत्नेन समुत्पाद्या कथमुत्क्रांतिशंसनम् ॥१३॥

पशूपासून उत्क्रांति होत होत मनुष्यप्राणी झाला आहे, असे जर मानले तर पशूंचे ठिकाणी जी एक प्रकारची नीति दृष्टीस पडते, उ०–अहिंस्र प्राण्यांची हिंसा करण्याकडे मुळीच प्रवृत्ति होत नाही; त्यांचा कामविकार नियमित काळीच उत्पन्न होऊन त्यांना सजातीयच स्त्री पाहिजे असते. अशा प्रकारची नीति प्राप्त करण्याकरितां मनुष्याला पुष्कळ प्रयत्न करावे लागतात. असे असताना पशूपासून मनुष्याची उत्क्रांति कशी सांगता येईल ?

भविष्यत्येव मे मुक्तिर्यथाकालमुपेक्षया ।
वर्धनं विषयासक्तेरुत्क्रांतिस्थितिभाषणम् ॥१४॥

'मुक्ति व्हावयाची असेल तेव्हाच होईल. आमची तितकी अझून उत्क्रांति झाली नाही' अशी मुक्तीची उपेक्षा करून उत्क्रांतिवादी आपली विषयासक्तिच वाढवीत असतात. तथा चोक्तः—

"आहार-निद्रा-भय-मैथुनं च सामान्यमेतत् पशुभिर्नराणाम् ।
धर्मो हि तेषामधिको विशेषो धर्मेण हीनाः पशुभिः समानाः" ॥१५॥

असेच म्हटलेही आहे की, आहार, निद्रा, भय, मैथुन हे पशूंना व मनुष्यांना सारखेच आहेत; त्यात मनुष्यात पशूपेक्षा धर्मच विशेष आहे, व तो धर्म, केला तरच होण्यासारखा आहे; उत्क्रांतिसाध्य तो काही दिसत नाही. हा धर्म नसला तर मनुष्याची स्थिति पशूसारखीच आहे. उलट, श्रृंगादिकांमुळे पश्वादिकांच्या ठिकाणी असलेले बल आपल्या ठिकाणी फारच कमी आहे.

तस्मात्स्वकर्मणा जंतोरुच्चनीचत्वसंस्थितिः ।
प्रेत्यभावे सुखं दुःखमयं पक्षः सुसंगतः ॥१६॥

म्हणून बऱ्या वाईट कर्मानेच प्राण्यांना उच्चनीच ( त्व ) जन्म प्राप्त होतो; व याप्रमाणें कर्माच्या योगानें पुनर्जन्म होऊन त्या कर्माचे फळ सुख किंवा दुःख भोगावे लागते, असे मानणेच सयुक्तिक आहे.

याप्रमाणे परमताचे खंडण करून सिद्ध केलेले स्वमत पुढे विस्ताराने सांगतो.

मनोसंवेगानें जगदुत्पत्ती

वेदान्तवेद्ये शुद्धे भा मनसोऽनाद्यविद्यया ।
तस्यामहंकृतिर्जीवस्तत्कुध्यानाज्जगत्स्थितिः ॥१७॥

वेदान्ताच्या योगानें जाणल्या जाणारे जे शुद्ध ब्रह्म त्याचे ठिकाणी अनादि अविद्येच्या योगानें चित्त भासते. त्या मनाच्या भानांतील मी मी म्हणणारी वृत्ति जीव होय व त्या जीवाचे आपल्या खऱ्या स्वरूपास विसरून वासनेच्या मागे मी मी व माझे माझे करीत फिरणे याला 'कुध्यान' म्हणतात. या कुध्यानानें जगदुत्पत्तिच होते.

मनसो मृदुसंवेगो वासना शब्दभाग्भवेत् ।
मध्यमः स्वप्नभानं स्याज्जगद्भानं तु तीव्रता ॥१८॥

मनाचा मृदु संवेग याला वासना म्हणतात, व मध्य संवेगानें त्या वासनेनुरूप स्वप्नांत प्रत्यक्ष गोष्टी दिसतात, व तीव्र संवेगानें जागृतींत दिसतात. याप्रमाणें हे जगत् आपल्या मनाच्या तीव्र संवेगानें उत्पन्न झाले आहे.

पूर्वजन्मस्मृतेर्नास्ति मैवमाशंक्यतां कदा ।
बाल्यस्यापि स्मृत्यभावात्स्वाभावस्तत्र किन्नहि ॥१९॥

स्मृति नाही म्हणून पुनर्जन्म नाही, असे म्हणता येत नाही; कारण आपल्याला बाल्यावस्थेची तरी काय स्मृति आहे ? व ती स्मृति नाहीं म्हणून बाळपणी आपला अभाव होता काय ? नाहीं.

वासना कर्म चाज्ञानात्तद्ध्यानाच्च जनिर्मृतिः ।
ध्यायतीवेति वेदोक्तेर्वासना बंधनं महत् ॥२०॥

मागे सांगितलेल्या अनादि अविद्येच्या योगानें आपल्या स्वरूपाची विस्मृति व त्यामुळे वासना व कर्म होत असून, त्या वासनेच्या तीव्र ध्यानानें जगत् भासते व सुखदुःखे होतात. "ध्यायतीवेति" या श्रुतिवरून, वास्तविक हे काहीच होत नसून वासनेच्या ध्यानानेंच सर्व घडून येते, असे सिद्ध आहे. याप्रमाणें वासनारूपी हे एक मोठे बंधन आहे.

साधनक्रम

विवेकपूर्वकाज्ज्ञानात् भवध्यानविपर्ययात् ।
अत्यंतदुःखसंबाधः परमानंदसंस्थितिः ॥२१॥

विचाराने व युक्तीनें नीट समजून घेऊन व हे जे बंधनकारक ध्यान याच्या उलट ध्यानानें तिन्ही दुःखांची अत्यंत निवृत्ति व परमानंदाची प्राप्ति होते.

विवेकः सांख्यनिर्धाराद् ध्यानं योगाद्विशेषतः ।
ज्ञानं वेदांततः किंतु देशिकोक्तिव्यवस्थया ॥२२॥

सांख्य-शास्त्रानुसार 'पुरुष असंग आहे,' अशा तऱ्हेचा विचार करून, योगाने तसेच ध्यान करावे. ज्ञान वेदांतशास्त्राध्ययनानेच होते. गुरु सर्वत्रच पाहिजे. कारण गुरुवाक्यावाचून परस्पर शास्त्रामध्ये काय रहस्य आहे, हे कळत नाही.

दुःखं स्वभावतो द्वेष्यं तन्नाशेच्छा प्रजायते ।
देहादिभ्योऽप्यात्मरत्याधिक्यादानंदतात्मनि ॥२३॥

दुःख हे साधारणतःच कोणाला आवडत नाहीं, व म्हणुनच त्याच्या नाशाची इच्छा असते, व सर्वापेक्षा आपणच आपल्याला जास्त प्रिय आहोत. आपल्या सुखाच्या आड येणाऱ्या सर्व वस्तु आपल्याला नकोशा होतात. देह देखील रोगा वगैरेनी ग्रस्त झाला असता नकोसा होतो. परंतु आपण आपल्याला कधीच नकोसे होत नाही. यावरून आपलेच ठिकाणी परमानंद आहे.

चित्तजयाचे दोन मार्ग

द्वै क्रमौ चित्तनाशाय वसिष्ठाचार्यसंमतौ ।
योगस्तद्वृत्तिरोधो हि ज्ञानं सम्यगवेक्षणम् ॥२४॥

चित्ताचा नाश करण्याचे वसिष्ठाचार्यांनी दोन उपाय सांगितलें आहेत; एक योगानें सर्व मनोवृत्तींचा रोध करणें; व दुसरा, साक्षिरूपानें आपण आपल्यास पाहणें. हे जरी कठीण आहे तरी मी पुढे स्पष्ट करीत जाईन.

योगाभ्यासविरक्तिभ्यां वृत्तिरोधः प्रजायते ।
वैराग्य जायते नित्यं संसारे दोषदर्शनात् ॥२५॥

योगाभ्यास व वैराग्य यांनी वृत्तींचा रोध होतो व वैराग्य संसारांत नित्य दोष पाहिल्यानें उत्पन्न होते.

अभ्यासो जायते सम्यगीश्वरप्रणिधानतः ।
प्रणिधानं द्विधा प्रोक्तं सगुणं निर्गुणात्मकम् ॥२६॥

अभ्यासयोग ईश्वरप्रणिधानानेंच होतो. हे प्रणिधान दोन प्रकारचे आहे; १–सगुण–साकार व २–निर्गुण–निराकार.

विषयाभ्याससंस्कारं साकारोपासनाज्जहि ।
ध्यातृध्येयैक्यतावाप्तौ निरालंबे मतिस्थितिः ॥२७॥

सर्व विषयांपेक्षा अत्यंत सुंदर अशा सगुणरूप मूर्तीची उपासना करून अनेक जन्मांतील विषयांच्या अभ्यासानें झालेल्या संस्काराचा नाश होतो, व नंतर ध्याता व ध्येय एक होऊन त्यातील सगुणपणा जाऊन निर्गुणाचे ठिकाणी मति स्थिर होते.

तथापि पुनरुत्थानें भाति विश्वस्य सत्यता ।
कर्तव्यं तन्निरासार्थं वेदांतश्रवणादिकम् ॥२८॥

तथापि पुनः व्युत्थान झाले असता जग खरे वाटते. त्याकरिता श्रवण-मनननिदिध्यासनेंकरून वेदांताभ्यासच केला पाहिजे म्हणजे रज्जूवर सर्पाभास झाला असता तेथून पळून गेल्यास तो दिसणार नाही, परंतु तेथे सर्प दिसला होता अशी बुद्धि राहते; आणि रज्जूच्या ज्ञानाने त्याचा बाध झाला असता तशी बुद्धि राहत नाही. करिता ज्ञानच आवश्यक आहे

श्रोतव्यं गुरुशास्त्राभ्यां मंतव्यं चोपपत्तिभिः ।
ध्येयं सततया वृत्त्या ज्ञातव्यं स्वानुभूतितः ॥२९॥

श्रीगुरु व शास्त्र यांपासून श्रवण करावे, युक्तींनी मनन करावे व मननानें ठसलेल्या सिद्धांताचे सतत चिंतन करणे याला निदिध्यासन म्हणतात. ब्रह्माचा जो साक्षात्कार होतो अनुभवाशिवाय कोणत्याच रीतीनें गम्य नाही.

इति बोधात्पुराऽप्येवं मम चेत्तन्न विस्मर ।
पत्रं विचार्यतां नित्यं व्यवस्थाया विशेषतः ॥३०॥

हे मला पूर्वीच माहीत होते, असे जर वाटत असेल, तर तेच विसरू नको व पत्रांत 'व्यवस्थाविशेष' असल्यामुळे याचा आपण नित्य विचार करीत जावा.

'उपदेशक्रमो राम व्यवस्थामात्रपालनम् ।
ज्ञप्तेस्तु कारणं शुद्धा शिष्यप्रज्ञेति' हि स्मृतिः ॥३१॥

श्रीवसिष्ठमुनि सांगतातः—रामा ! बरोबर व्यवस्था लावून देणे हेच गुरूचे काम आहे. जाणणें केवळ शिष्याच्या बुद्धीवर अवलंबून असते.

लिखितं बाळकृष्णैतद्यथाज्ञानं यथामति ।
सर्वं समर्पितं प्रेम्णा श्रीज्ञानेशपदांबुजे ॥३२॥

अहो बाळकृष्णराव ! यथामति. हे जे काही लिहिले, ते सर्व श्रीज्ञानेश्वर महाराजांचे चरणकमली समर्पण करून पत्र संपवितो.

श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु

# १. श्रीमंत तुकोजीराव महाराज पवार, संस्थान देवास यांना पत्र १ ले

यांना उमरावतीहून पाठविलेले पत्र १ ले
तारीख १३-८-१९१३.

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

अभंग

१ कल्याणनिधान मंगळ मंगळ । स्वानंद सोज्वळ सत्यरूप ॥१॥
निर्गुण सगुण जया म्हणे वेद । नामी रूपी भेद न सापडे ॥२॥
जीवाचा सोयरा सुखाचा सांगाती । श्रुतिपदे गाती ध्याती मुनी ॥३॥
मायबाप गुरु स्वामी ज्ञानराज । कृपे भवत्काज त्यांचे नामे ॥४॥

मी दीन, आपण भाग्यवंत

२ इंदिरेने मज दिधलें टाकुनी । श्रीकांत म्हणूनी मायबाप ॥१॥
जन्माचा दरिद्री अखंड करंटा । वरी दृढ ताठा अल्प ज्ञाने ॥२॥
तुम्ही महाराज पूर्वी तपःशीळ । तेणे हे सोज्वळ राज्य प्राप्त ॥३॥
मेळ कैसा होय दीना भाग्यवंता । आळंदीच्या कांता गाता सौख्य ॥४॥

३ तान्हेपणापासूनिया मी आंधळा । नाहीच लाभला मायबाप ॥१॥
नाही सद्गुरूची झाली आगे सेवा । न पूजिलें देवा स्नेहभावे ॥२॥
देहासक्तीस्तव प्रमादहीं होती । उंच वर्णाहाती घेत सेवा ॥३॥
ऐसे लाजिरवाणे परमार्थी जिणे । हित माझे जाणे ज्ञानराजा ॥४॥

४ यानसंधिविग्रहात जे कुशळे । तयांसी भूपाळे मान द्यावा ॥१॥
साम दाम भेद दंडा अनुकूळे । तयांसी भूपाळे मान द्यावा ॥२॥
आम्हां गरिबांचे तेथे नाही काज । तुम्ही महाराज भाग्यवंत ॥३॥
आळंदीवल्लभ चिंतावा आवडी । प्रेमाच्या कावडी वाहोनिया ॥४॥

५ माझी तव स्थिति उनाड जन्माची । नेणे समर्थाची मैत्री करू ॥१॥
न कळे श्रीमंता कैसा द्यावा मान । रामराम कोणे परी करू ॥२॥
उभे व्हावे कोठे कैसी कीजे स्तुति । न कळे निश्चिती मज काही ॥३॥
कृपें तुम्ही पाठविले आज्ञापत्र । परी त्या उत्तर काय देऊं ॥४॥
अत्यंत दरिद्री नेणे धनसुख । मागतसे भीक व्रतासाठी ॥५॥
व्रतासाठी देवे [1] बोलाविले मातें । परी म्यां दोघाते भाक दिली ॥६॥
म्हणोनिया माझा हरला उपाय । ज्ञानेश्वरमाय न क्षोभावी ॥७॥

---

१ राजानें. जुन्या संस्कृत ग्रंथांत राजाला देव म्हटले आहे.

नाही चमत्कार, नाही पांडित्य

६ प्राण गेलियाही असत्य भाषण । न कीजे भूषण सज्जना हें ॥१॥
नाही माझी शक्ति थोर चमत्कारी । तुम्हा कोणे परी रिझवू मी ॥२॥
कौमुदीसारिखे नेणे मी संस्कृत । तेथे तो पंडित असतील ॥३॥
त्यांचा मज धाक वाटे बहू मनी । तेथे मी येऊनी काय करू ॥४॥
माझी विद्या थोर आहे हे सांगूनी । तुम्हा नेंणो कोणी फसविले ॥५॥
ज्ञानेश्वरीवीण मज न ये काही । ज्ञानराज आई जाणताहे ॥६॥

७ स्वप्न-परमाणु-आरंभ-वादाते । पुसता मी तेथे काय बोलू ॥१॥
पंचद्रव्यवाद दीधितिकारांचा । पुसता मी साचा काय बोलू ॥२॥
स्फोटवाद किंवा पदशक्तिवाद । बोलता आनंद कोण तेथे ॥३॥
वादात रंजन होय पंडितांचे । विनोदे आमुचे हास्य मात्र ॥४॥
आळंदीवल्लभ दीनांचा सांगाती । तयांचे संगती मात्र इच्छा ॥५॥

शीलनाथमहाराज

८ शीलनाथस्वामीमहाराजभेटी । घ्यावी ऐसे पोटी होते फार ॥१॥
शीलनाथस्वामी सोयरा सज्जन । तयांचे चरण आठवावे ॥२॥
करावा जतन आपुला विश्वास । कदा आणिकांस स्मरू नये ॥३॥
आळंदीश तेणें होय कृपावंत । करिताती संत सर्व दया ॥४॥

९ माझिया शरीरा लागलाहे रोग । सुदैवाचा भाग ईश्वरेच्छा ॥१॥
तयामुळे जाता कोणाच्या घरास । होतो फार त्रास आणिकांसी ॥२॥
म्हणोनिया देवे ठेविले ज्या स्थिती । राहे तैशा रीती जेथे तेथे ॥३॥
आळंदीवल्लभ ज्ञाननाथ स्वामी । विश्वांतर्यामी सर्व जाणे ॥४॥

१० न होती हे माझे बोल गौरवाचे । अंतरीचे साचे सांगितले ॥१॥
मजहुनि माझे स्नेही विद्यावंत । मजपुढे ग्रंथ वाचिती जे ॥२॥
गुरु श्रीनिवास मुळे भालेराव । नाना हरिभाऊ खाप्रे बापू ॥३॥
पंडितादि त्यात बोलावुनी कोणी । फेडावी पारणी लोचनांची ॥४॥

११ तुमचिये गृही होता माझा मान । तेणे माझे मन फोफावेल ॥१॥
विसरेल मग झणी ज्ञाननाथा । भय वाटे चित्ता फार ऐसे ॥२॥
वंदू नये माथा पायीची पादुका । मी तो प्रजा, निका राव तुम्ही ॥३॥
एवढा समर्थे द्यावा आशीर्वाद । उपजावा बोध ज्ञानदेवी ॥४॥

१२ व्रत संपलिया क्वचिद्दैवापाठी । शीलनाथभेटी येईन मी ॥१॥
तेव्हा मी घेईन देवदरुषण । आणो नारायण घडवोनी ॥२॥
बोबडिये बोल ऐकुनी मराठी । न मानावा पोटी खंती देवा ॥३॥
ज्ञाननाथे मज सांभाळावे आता । पुरे झाली चिंता संसाराची ॥४॥

शेवटचे मागणे

१३ बोलतो तेवढा नाही मी विरक्त । कवित्व करीत मानासाठी ॥१॥
परी मज एक विश्वास बरवा । तुम्हीही धरावा तोचि चित्ती ॥२॥
नीतीने संसार करावा बाहेरी । अखंड अंतरी कृष्ण ध्यावा ॥३॥
हेचि केलियाने माझे समाधान । व्रतही संपूर्ण केले जाणा ॥४॥
सद्गुरुमुखाने जाणावे निर्गुण । भजावे सगुण आवडीने ॥५॥
ज्ञानानें तोडावा उपाधीचा भास । ज्ञानगर्वनाश भक्तिबळे ॥६॥
वैराग्याने कीजे दोहींचे रक्षण । नीतीने शिक्षण प्रजालोक ॥७॥
पराविया नारी माऊलीसमान । संतापुढे मान वाकवावी ॥८॥
देवासस्वामीया आणिक यावीण । तेथेही येऊन काय सांगू ॥९॥

श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु

□ □ □ □

## १० श्रीमंत तुकोजीराव महाराज पवारांना पत्र २ रे,

[पूर्वकर्म–श्रद्धा व विवेक–चार पुरुषार्थ–भेटीस येतो]

॥ श्रीज्ञानेश्वर माऊली समर्थ ॥

१ ज्ञानराजस्वामी सदा यशवंत । नित्य श्रुति संत गाती जया ॥१॥
कोटी विघ्ने ज्याच्या नामे हरताती । सर्व-भूतपती तोचि एक ॥२॥
वैष्णवांचा विष्णु शैवांचा शंकर । सच्छिष्या दातार गुरुराजा ॥३॥
आळंदीवल्लभ-पायी नमस्कार । करुनिया पत्र पाठविते ॥४॥

पूर्वकर्म

२ इहलोक काय जीवितावधीचा । परलोक साचा श्रुतिसिद्ध ॥१॥
स्वर्ग मोक्ष दोन्ही तयाचेचि भाग । मिळती अव्यंग सज्जनाते ॥२॥
एका सुख एका दुःख हे दिसती । म्हणोनी प्रतीति पूर्वकर्मा ॥३॥
एकचि ईश्वर भिन्न भिन्न करी । कर्मावीण, तरी विषम तो ॥४॥
प्रकृतिस्वभावे नियंता मुकुंद । भक्तावरी शुद्ध दया त्याची ॥५॥

कर्मफळ देणे राजस स्वभाव । सात्विक स्वभाव दासकृपा ।।६।।
उपाधिविरोध उपहिती नाही । दया न्याय दोही चालविता ।।७।।
आळंदीवल्लभ सुखाचा सांगाती । सर्व धरू चित्ती आवडीनें ।।८।।

श्रद्धा व विवेक

३ अत्यंत विश्वास अत्यंतची युक्ति । दोन्ही व्यर्थ होती प्रसंगाने ।।१।।
युक्तीने सामान्य ओळखावे आधी । विशेषाची सिद्धी विश्वासाने ।।२।।
जन्मला जो तया पाहिजे जनक । सामान्य सम्यक युक्तिसिद्ध ।।३।।
पितयाचे नाव विश्वासेचि कळे । म्हणोनी सोवळे चित्त कीजे ।।४।।
सुखदुःख फळे कर्मअनुमाने । धर्माधर्म मने आकळावे ।।५।।
बळियांसी संधी साधिता उत्तम । सुरक्षावा धर्म आपुलाचि ।।६।।
जया रोगी त्याची औषधीचे काम । उंचनीच-नियम त्यात नाही ।।७।।
तैसा उंच नीच नाही धर्म कोणी । सर्व नारायणीं आवडते ।।८।।
परी ज्याचा त्याने उचित करावा । स्वामी ज्ञानदेवा आवडे ते ।।९।।

भेटीस येतो

४ आरंभ नाहीच कोण्याही वस्तूसी । अवस्था विशेषीं मात्र भासे ।।१।।
म्हणोनिया जन्ममृत्यु सर्वासवे । मोक्ष विश्वी जीवे मिथ्यादृष्टि ।।२।।
ऐसे दृढ ज्ञान वृत्तिसंधि ध्यान । मोक्ष तरी पूर्ण हाता चढे ।।३।।
वृत्तिव्युत्थानी तो धर्म काम अर्थ । तीन पुरुषार्थ सेवावेचि ।।४।।
धर्माच्याचि पाठी लागू नये ऐसे । जेणे अर्थ नासे समूळचि ।।५।।
अर्थीही तेवढे घालू नये मन । जेणे प्रजाजन कंटाळती ।।६।।
काम तो सेवावा शरीरापुरता । कामा हाती चित्ता देऊ नये ।।७।।
देशकालवशे धर्म तो अधर्म । अधर्म तो धर्म होऊं लागे ।।८।।
तथापि तयात एक मुख्य बीज । शरण्य सहज ज्ञानराजा ।।९।।
५ समर्था भेटणे मज नाही ठावे । म्हणोनी न यावे होते मनी ।।१।।
परी चारपांच आली पाचारणे । भेटीचा म्हणोनी विनिश्चय ।।२।।
आहे ऐसी देवे ठेविता प्रकृती । येईन निश्चितीं आठ दिनीं ।।३।।
उशीर झाल्याची असू द्यावी क्षमा । तुम्ही गुणोत्तमा महाराजा ।।४।।
सुहृद पहाया पाठविलें पुढें । तयासी रोकडे क्षेम कीजे ।।५।।
ज्ञानेश्वर माझा विश्वाचाचि रावो । आश्वासन देवो तुम्हा आम्हा ।।६।।

।। श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु।।

हर्दा,, तारीख २।९।१९१३. आपला, गुलाब.

## ११. श्रीमंत जगदेवराव भाऊसाहेबमहाराज पोवार, संस्थान देवास मोठी पाती, यांना पत्र.

[इंग्रजीपेक्षा संस्कृत शिक्षणाची आवश्यकता–प्रेम समाधि–चमत्कार–बाह्य समाधि व आंतर समाधि–व्यवहार दशा–नास्तिक वादावर प्रश्न–माझा उणेपणा ]

श्रीमंत भाऊमहाराज यांचे चरणी चिरंजीव गुलाब याचे सा. न. वि. वि.

१) आपले पत्र मी येथे नसल्यामुळे फिरत फिरत मला पोहचले; त्यामुळे जबाब देण्यास उशीर लागला, याबद्दल क्षमा असावी. मागची पाठविलेली पत्रे आपल्याला उशीरा मिळाली, पण हे तरी पत्र आपणास लौकर पोहचेल अशी आशा करितो. मला वाटते, आपल्या लोकास जितकी इंग्लिश शिक्षणाची आवश्यकता आहे, तितकीच, किंबहुना जास्त संस्कृत शिक्षणाची आवश्यकता आहे. मी आपणास काही वेदान्तिक पत्रे पाठवीत जाईन असे कबूल केले होते. त्याप्रमाणे हे मी पहिले पत्र पाठवीत आहे. त्यांतील विचार आपणांस पटल्यास किंवा शंका आल्यास लौकर कळविण्याची कृपा व्हावी.

प्रेमसमाधि

२) माझे पहिले मत असे आहे की, परमेश्वराकडे एक वेळ प्रेम लागल्यास इतर क्षुल्लक बाबतीकडे हळुहळु लक्ष कमी होत जाते. तथापि खाण्यापिण्याच्या बाबतीत सावधपणा असून इतर बाबतीत जेव्हा विदेहीपणा दिसतो, तेव्हा ते खरे प्रेम नसते हे खास आहे. परमात्म्याचे ध्यान आपल्या हृदयात करावे लागते. तेव्हा आपण आतमध्ये कोठे असावे, कोठे उभे रहावे, इत्यादि अनेक गोष्टी मी योगी म्हणविणाऱ्या साधूंस विचारल्या आहेत. पण मी गरीब असल्यामुळे ते उलटे रागावले. "युगपत्ज्ञानानुत्पत्तिर्मनसो लिंगं" एकदम दोन ज्ञाने एका वेळी न होणे हे मनाचे लक्षण आहे, असे न्यायसूत्रात म्हटले आहे. तेव्हा खाण्यापिण्याच्या बाबतीत सावधपणा व बाकीच्या बाबतीत विदेहीपणा हे भगवद्भक्तांचे लक्षणच होऊ शकत नाही. यावर असा आक्षेप येण्याचा संभव आहे की, मग भगवद्भक्त खातपीतच नाहीत काय ? तर खातात पितात असे मी कबूल करितो. परंतु जेव्हा ते प्रेमसमाधीत असतात, तेव्हा ते खातपीतसुद्धा नाहीत. "जेव्हा ते व्युत्थानात

येतात तेव्हा ते खाण्यापिण्याच्या बाबतीतच काय पण सर्वच बाबतीत सावध असतात". जितकी प्रेमसमाधि अधिक वाढेल तितका त्यांचा व्यवहार क्षीण होतो.

३) चमत्कार करणे सुद्धा भगवद्भक्तांस मोठे कठिण वाटते. कारण आपल्या प्रियकराला उगीच श्रम द्यावे अशी त्यांची इच्छा नसते. परमेश्वर सर्वशक्तिमान् आहे, त्याला श्रम कशाचे ? हा आक्षेप घटकाभर खरा धरता येईल, परंतु हा ज्ञानाचा स्वभाव आहे, प्रेमाचा स्वभाव नाही. ज्ञान्याचे म्हणणे असे असते की, देवाने आपल्यास प्रत्येक ठिकाणी साह्य केले पाहिजे. भक्तांचे म्हणणे याच्या उलट असे असते की, परमेश्वराच्या कामाकरिता आपण देह, प्राण व मनाने झिजले पाहिजे. परमेश्वराचे आपणास काही नको, प्रेमात आपलेपणाच विरून गेल्यावर परमेश्वरास प्रत्येक ठिकाणी साहाय्य करण्यास कोणी बोलवावे ? प्रेमसमाधीला उद्देशून व व्युत्थानाला उद्देशून काढलेले तुकाराममहाराजांचे उद्‌गार याविषयी प्रमाण देतो:–

* सदा माझे डोळा जडो तुझी मूर्ति । रुक्माईच्या पती सोयरीया ॥१॥
गोड तुझे रूप गोड तुझे नाम । देई मज प्रेम सर्वकाळ ॥२॥
विठू माउलीये हाचि वर देईं । येउनियां राहीं हृदयीं माझ्या ॥३॥
तुका म्हणे तुज न मागों आणिक । तुझ्या पायीं सुख सर्व आहे ॥४॥

* आणिक दुसरे मज नाहीं आता । नेंमिलिया चित्तापासोनियां ॥१॥
पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं । जागृतीं स्वप्नीं पांडुरंग ॥२॥
वळलीं वळण इंद्रियां सकळा । भाव तो निराळा नाही दुजा ॥३॥
तुका म्हणे नेत्रीं केली ओळखण । तटस्थ हे ध्यान विटेवरीं ॥४॥

४) यांत बाह्य प्रेमसमाधि व आंतर प्रेमसमाधि या दोन्हीही महाराजांनी वर्णन केल्या आहेत. या स्थितीस उद्देशूनच सत्पुरुषाने शांत असावे गंभीर असावे, इत्यादि शास्त्रवचनें आहेत. अभंगात 'जागृतीं' 'स्वप्नीं' असे जे म्हटले आहे, त्याचा अर्थ 'जागृत्प्रेमसमाधि व स्वप्नप्रेमसमाधि' असा आहे. भगवंताचा जेव्हा भक्तांना संयोग असतो, तेव्हा जागृत्प्रेमसमाधि होतो, व वियोग असतो तेव्हा स्वप्नप्रेमसमाधी होतो. स्वप्नप्रेमसमाधीविषयी गीतगोविंदकारांचेही असेच म्हणणे आहे:–

ध्यानलवेन पुरः परिकल्प्य भवंतमतीवदुरापम् ।
विलपति हसति विषीदति रोदति चंचति मुंचति तापम् ॥

### व्यवहारदशा

५) याप्रमाणे प्रेमसमाधिविषयींचे निरूपण झाले. आता प्रेमसमाधिहून इतर वेळी भक्तांच्या चित्ताची कशी स्थिति असते हेही तुकाराममहाराज वर्णन करितात–

मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास । कठिण वज्रास भेदूं ऐसे ॥१॥
अमृत ते काय गोड आम्हांपुढे । विष ते बापुडे कडू किती ॥२॥
मायबापाहूनि होऊं कृपावंत । करूं घातपात शत्रूहूनी ॥३॥
भले तरी देऊं गांडीची लंगोटी । नाठाळाचे काठी देऊं माथा ॥४॥
तुका म्हणे आम्ही अवघेचि गोड । जया पुरे कोड त्याचे परी ॥५॥
ऊठ भडवीच्या जाय तूं येथोनी । माझिया कीर्तनी बैसूं नको ॥

इत्यादि तुकारामांच्या अभंगास पुष्कळ लोक नावे ठेवितात, परंतु प्रेमसमाधीहून इतर वेळीं लोकव्यवस्थेविषयी ते उद्‌गार आहेत.

"मऊ मेणाहूनि" या वर दिलेल्या अभंगात प्रेमसमाधीहून इतर वेळी भगवद्भक्तात प्रसंगी सावधपणा कसा असतो हे दाखविले आहे. भवभूतीनीही असेच उद्‌गार काढले आहेत–

वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि ।
लोकोत्तराणां चेतांसि को नु विज्ञातुमर्हति ॥

### नास्तिकवादावर एक प्रश्न

६) अभंगाचाच अर्थ या श्लोकात आहे. दुसरे माझे मत असे आहे की, परमेश्वर निराकार असला तरी प्रथम साकारावर चित्त स्थिर करून नंतर निराकारात त्याचा प्रवेश केला पाहिजे. ईश्वर नाही असे जे म्हणतात त्यांना सोपे व शास्त्रीय उत्तर असे आहे की, रसायनशास्त्राच्या नियमाप्रमाणें पाणी उत्पन्न होवो, परंतु गणित हे बुद्धितच राहत असते, इतर जडपदार्थात रहात नाही. तेव्हा सृष्टीतील इतके पाणी जे तयार झाले आहे, त्याच्या रासायनिक मिश्रणाला ज्या बुद्धीतून गणिताचा उपयोग झाला आहे, ती Universal Intellect परमेश्वरावाचून क्षुल्लक जीवाची असणे संभवनीय नाही. जड पदार्थात बुद्धि आहे असे मानल्यास जड व चेतनाचा भेद नाममात्र होऊन परब्रह्म सर्वव्यापक आहे या वेदान्ततत्त्वाचाच अनुवाद झाल्यासारखा आहे. तेव्हा जडशास्त्रदृष्टीने किंवा धर्मदृष्टीनें परमेश्वर आहे हे ठरलेलेच आहे.

७) ही दोनच मते सध्या मी या पत्रात लिहून पाठवीत आहे. माझा 'सुरतरु' ग्रंथ तयार होत आला आहे. तो मी आपणाकडे पाहण्याकरिता पाठवीन. त्यावरून माझी अंतस्थ मते काय आहेत व तीं उदात्त आहेत किंवा नाहीत या सर्व गोष्टींचा आपणास सहजच उलगडा होईल.

८) याप्रमाणे मी आपली स्थिति लिहिली आहे, तसा मी आपला उणेपणाही थोडासा लिहितो. कारण 'आपला उणेपणा न दाखवून केवळ भपकेपणा दार्खविणे म्हणजे फसविणे होय' असे माझे मत आहे. प्राचीन ऋषींनी आपला उणेपणा देखील दाखविला आहे. मी जरी निस्पृह आहे तरी व्रताकरिता व ग्रंथादिकांकरिता माझ्या मनात केव्हा केव्हा पैशाच्या आशेचा अंकुर उत्पन्न होतो. तो कलंक आहे हे मला ठाऊक आहे व तो मी कमी करण्याची खटपटही जोराने करीत आहे. हा लेख पसंत पडेल तर मोठ्या महाराजांनाही वाचून दाखवावा, अशी मी विनंती करितो.

आपला,

हर्दा, ता. १२।२।१९१४, गुलाबराव गुंडोजी मोहोड

□ □ □ □

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

## १२. रा. रा. भय्यासाहेब तांबे यांना पत्र. 'लेखी वाद कर'

[लेखी वाद कर–उमाजी नायकाचे चरित्र]

तीर्थस्वरूप भय्यासाहेब यांचे चरणी चि. गुलाबचे कृतानेक शिरसा. प्रणिपात. वि. वि.

१) लिहिण्यास कारण की, येथे एक पंडित आला होता त्याच्याशी बापूचा न्यायांत वाद झाला. परंतु बापूच्या प्रश्नाचे त्याने उत्तर न देऊन, तुमच्या महाराजांची मला विद्वत्ता पहावयाची आहे, असे तो म्हणाला. परंतु व्रतामुळे मला विशेष वेळ नसल्याने व मजविषयीच्या मत्सरी मंडळींकडून तो आला असल्याने "माझ्या मंडळीशी तूं वाद कर किंवा लेखी वाद तू माझ्याशी कर. बोलून इथे कोणी मंडळी समजणारी नसल्यामळे नुसत्या बोलण्याबोलण्यात मी विरोध एव्हा वाढवीत नाही" असे म्हटल्यावर तो निघून गेला. त्याला काही येत नव्हते असे माझी मंडळींसुद्धा सभेत सिद्ध करून

देण्यास तयार आहे. वरून वैदिक व आतून तांत्रिक असलेल्या मंडळीकडूनच हा पंडित आला असल्यामुळे मी याच्याशी लेखी वादाचे बोलणे घातले. असो ही किटकिट ! याच्याशी आपल्याला काय करावयाचे आहे ?

उमाजी नायकाचे चरित्र

२) मी सध्या एक पुस्तक वाचीत आहे. हे पुस्तक म्हणजे काही तत्वशास्त्र नव्हे किंवा परलोकाची वाट दाखविणारे एखादे धर्मशास्त्रही नव्हे. हे एका गरीब व शूर माणसाचे चरित्र आहे. पैसा व स्त्रिया प्रसंगी कशा घातक होतात, ब्रह्मज्ञान, भगवद्भक्ति आणि वैराग्य या तीन गोष्टी बाजूला ठेवून बाकीचा व्यवहार पाहिल्यास सद्‌गुण व दुर्गुण कशास म्हणावे हे निश्चितपणे कळणे कठीण आहे. कारण दैवाने यश आल्यास दुर्गुणी पुरुष व्यवहारात सद्‌गुणी बनतो व दैव प्रतिकूळ झाल्यास अपयशी पुरुष दुर्गुणी बनतो. मातीत टाकून दिलेले सुवर्ण जसे मळत नाही, त्याप्रमाणे दैवाने अपयशाखाली झाकलेल्या पुरुषाचे सद्‌गुणही लोकांना मोहून टाकीत असतात.

सूतो वा सूतपुत्रो वा यो वा को वा भवाम्यहम् ।
दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम् ।।

३) हे कर्णाचे एका नाटकात दिलेले म्हणणे अक्षरशः खरे आहे, इत्यादि उत्तम गोष्टी ह्या पुस्तकात मला वाचण्याला मिळाल्या. हे पुस्तक उमाजी नायकाचे चरित्र होय. रमाबाई रानड्यांचे पुस्तक वाचण्याविषयी बाबूरावाने जशी मला प्रेमाने सूचना केली होती, तसे हेही पुस्तक वाचण्याविषयी मी आपल्याला प्रेमाने सुचना करितो. "बायकांतील कजागपणा व पुरुषांतील परोत्कर्षासहिष्णुत्व" हे दोन दोष ज्या दिवशी निघून जातील त्या दिवशी नियम्यनियामकाची आवश्यकता मुळीच लागणार नाही. असो

हर्दा, तारीख १२–१२

आपला नूतन चिरंजीव
गुलाब

□ □ □ □

॥ श्री ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

## १३. रा. रा. तांबे तहसीलदारांना पत्र

उन्मादविषयक माहिती.

[भूते आहेत की नाहीत?–भूतोन्माद–भूत लागण्याचे कारण–भूतांची वेळ–भत कसे लागते?–भूत लागल्याची खूण–]

भूते आहेत की नाहीत ?

**१) उन्माद सात प्रकारचे आहेत; वातपित्तकफोन्माद, सन्निपातोन्माद, विषोन्माद, मानसोन्माद. व भूतोन्माद यातील वातपित्तकफोन्माद व सन्निपातोन्माद याचा अर्थ आपल्यास समजलाच असेल विषोन्माद म्हणजे मद्यादिकांपासून झालेला. मानसोन्माद म्हणजे काम क्रोध लोभ द्वेष किंवा मनास बसलेला झटका यापासून एकदम झालेला.**

भूतोन्माद

**२) आता भूतोन्मादाचे निरूपण करितो. देवाच्या गणाला भूत म्हणतात. पाप नव्हे असे पुण्य कर्म आग्रहाने विपरीत केले असता या योनीत जन्म होत असावा. ते देवादिकांचे गणच आंगामध्ये शिरतात ; देवादिक शिरत नाहीत. जे प्रत्यक्ष देवादिक आंगामध्ये शिरतात असे म्हणतात त्यांना भूतविद्या येत नाही असे सुश्रुताचार्यांचे म्हणणे आहे. ते गणभूत १८ आहेत· १–देवगणभूत, २–असुरगणभूत, ३–गंधर्वगणभूत, ४–उरग (नाग) गणभूत, ५–यक्षभूत ६–ब्रह्मराक्षसभूत, ७–राक्षसभूत, ८–पिशाच्च, ९–प्रेत, १०–कुष्मांडकभूत, ११–कालार्द, १२–औकीर, १३–वेताल, १४–पितर, १५–गुरु, १६–ऋषी, १७–वृद्ध आणि १८–सिद्ध. या प्रत्येक गणांचा पुन्हा कोटिकोटि परिवार आहे. याप्रमाणे अनंत असा हा भूतलोक आहे. ही सर्व भूते रात्री व्यवहार करणारी, भयंकर, रक्तमांस इत्यादि भक्षण करणारी आहेत. परंतु देवाचे किंवा ऋषीचे ज्याचे ज्याचे ते गण आहेत, त्या देवादिकांच्या नांवानेच त्यांची ख्याति आहे; पालकाच्या नांवाने चाकरांची ख्याति होते त्याप्रमाणे.**

भूत लागण्याचे कारण

**३) ह्या भूतातून कोणतेही भूत आंगात शिरण्याचे कारण वृद्धवाग्भटांनी सांगितले आहे तेच येथे उतरून घेतो.** "तेषां पुनरनुप्रवेशकारणं सद्य:पूर्वकृतो वा प्रज्ञापराधो विशेषत:" **यातील कोणत्याही भूताचे आंगात शिरण्याचे कारण**

हठाने केलेला प्रज्ञापराधच आहे. सामर्थ्य असताही सभेत द्रौपदीला नग्न करताना पाहिल्यामुळेच भीष्मादिक महात्म्यांच्या शरीरातही राक्षसभूतांनी संचार केला, अशी कथा प्रमाणशिरोमणि महाभारताच्या वनपर्वांत आहे. वेदावर निष्ठा ठेवणाऱ्या हिंदूस व्यासांपेक्षा अधिक कोणते प्रमाण असणार? ज्याला देहाच्या पलिकडे काहीच दिसत नाही, अशा नास्तिकाचीं गोष्ट निराळी; परंतु श्रुतियुक्तिअनुभवाने ज्याचा परलोकाविषयी निश्चय आहे, त्याला भूतादिकांपेक्षा व्यासांचेच प्रमाण अधिक वाटले पाहिजे, आणि वाटतेही. ते महाभारतातले श्लोक येथे देतो:–

भीष्मद्रोणकृपादींश्च प्रवेक्ष्यंत्यपरे सुराः ।
यैराविष्टाः घृणां त्यक्त्वा योत्स्यंते तव वैरिभिः ॥११॥
(वनपर्व, अध्याय २५१)

अर्थः––दैत्य म्हणाले, "दुर्योधना ! तू काळजी करू नकोस. कारण भीष्माचार्य, द्रोणाचार्य कृपाचार्य, यांच्या शरीरांमध्ये दुसरे राक्षस शिरतील, व त्यांच्या योगाने मंद बुद्धि झालेले ते भीष्मादिक करुणासागर असले तरी दयेचा परित्याग करून, भूतवश झालेले ते पांडवाबरोबर निकराने लढतील.

तात्पर्य, यांना शरीरात शिरू देण्याला प्रज्ञेने केलेला मख्य अपराधच कारण आहे.

भूताची वेळ
भूत कसे लागते ?

४) एकाद्या रोगाने पीडलेल्याच्याही आंगामध्ये हे भूतपिशाच शिरत असतात. ही भूते पाप भोगण्याच्याकाळी आंगात शिरतात असे नाही. क्रियमाण पापकर्माच्या आरंभीदेखील यांचा अंमल बसतो. यांना शिरण्याची संधी सांपडण्याची ठिकाणे वृद्धवाग्भटातील उत्तरस्थानाच्या सातव्या अध्यायात दिली आहेत. ती येणेप्रमाणे:—एकटे असताना, ओसाड घरात असताना, किंवा चौरस्त्यावर जाण्याचा प्रसंग आला असताना अथवा संध्याकाळी, शुचिर्भूत नसले तर, अथवा पौर्णिमेस, किंवा अमावास्येच्या दिवशी इत्यादि. आणखी पुष्कळ शिरण्याची ठिकाणे आहेत. आता हे देव ज्याच्या आंगात शिरावयाचे त्याच्यावर कसा परिणाम करितात ते सांगतो:––

५) देव व असुर ग्रह हे नुसते त्याच्याकडे पाहूनच अथवा त्याच्या मनांत विकार उत्पन्न करून त्याच्या आंगात शिरतात; गंधर्वभूते स्पर्श करून

आंगात शिरतात. नागभूत लागावयाचा असल्यास त्याला लहरी आल्यासारख्या होतात. यक्षभूत आपला वास त्याला देतात म्हणजे मनुष्याला काही कारण नसता एक प्रकारचा उत्तम वास येतो, व वासाच्या द्वारे यक्षभूत त्याच्या आंगात शिरतात. राक्षसभूत खांद्यावर बसून त्याचे आंग जड झाल्यासारखे वाटते. ते त्याला आपले वाहन करतात व नंतर आंगात शिरतात. पिशाचादिक भूत आलिंगन दिल्यासारखे करतात. नंतर त्याला विस्मृति पडते, व मग ते आंगात शिरतात. पितर, गुरु, ऋषि, वृद्ध व सिद्ध हे भूत तर नुसते शाप देऊनच त्याच्या आंगात शिरतात. याप्रमाणे भूतप्रवेशाची रीति लिहिली.

भूत लागण्याची खूण

६) आता प्रत्येक भूत आंगात शिरल्याची लक्षणे थोडकी लिहितो. देवभूत लागलेला मनुष्य चांगले आचरण करू लागतो, व थोडेसे संस्कृत बोलतो. बहुश: शुक्ल १ चे दिवशी ते त्याच्या आंगात येते. बहुशः म्हणण्याचे कारण, इतर वेळेलाही येते. असुर ग्रह क्रोधी असतात. ते द्वादशीच्या दिवशी किंवा शुक्ल १४ च्या दिवशी बहुश: येतात. 'ग्रह' शद्वाचा अर्थ सर्वत्र भूत समजावा. या लेखात आलेल्या देव वगैरे शद्वाचा अर्थ त्या त्या जातीचे भूत समजावा; मुख्य देव किंवा असुर समजू नये. गानवाद्य आवडणारे, परस्त्रीची इच्छा करणारे. चोष्याचारयुक्त गंधर्वभूत समजावे. हे चतुर्थी, अष्टमी, द्वादशी किंवा चतुर्दशी या दिवशी येते. परंतु बहुश: असेच सर्वत्र समजावे की मागेपुढे सांगितलेली सर्वच भूते कोणत्याही वेळेला येतात. झोप घेणारे, विनाकारण रागावणारे, चपळ व बहुशः ब्राह्मणाच्याच आंगात असणारे नागभूत समजावे. हे नागभूत पंचमीच्या दिवशी किंवा माध्यान्ही येते. चांगलेपणा, सुंदररूप, कोणाला काय देऊ अशी वर देण्याची इच्छा आंगात आल्यावर दिसून आल्यास ते यक्षभूत समजावे. त्याची बहुश: तिथि शुक्ल ७ किंवा एकादशी असते. विद्वान् पण आचारहीन अशी चिन्हे दिसल्यास ब्रह्मराक्षस समजावे. याची येण्याची वेळ शुक्ल ५, ८, पौर्णिमेची चंद्रदर्शनाची वेळ किंवा संध्याकाळ. द्वितीया, तृतीया, अष्टमी या तिथींना राक्षसपिशाच येत असतात. पाप करण्याची आवडी, दुसऱ्याचा द्वेश, कोणाला टाकून बोलणे, पुष्कळ खाणे, कृष्णपक्षातील नवमी आणि द्वादशीच्या दिवशीं रोग जास्त वाढणे इत्यादि लक्षणे झाल्यास राक्षसभूत आंगात आहे असे समजावे. स्वतःच्या विषयी अभिमान बाळगणारे, बहुधा खोटे बोलणारे, नानाप्रकारच्या चेष्टा करणारे पिशाचभूत समजावे.

इतर भूतांची लक्षणे मी सध्या लिहीत नाही.

आपला गुलाब.

□ □ □ □

## १४. रा. महादेव वामन भट वकील यांस पाठविलेले पत्र १ ले

**रा. भटसाहेब वकील यांचे चरणी सा. दंडवत. वि. वि.**

**१) आपले कृपापत्र[अ] ता. १ चे आजच मिळाले, मजकूर समजला. आपण माझी भेट घेतलीच पाहिजे होती अशा प्रकारचा मी अधिकारी असेल असे मला वाटत नाही. शिवाय मी शूद्र आहे. त्यामुळे माझ्या वाणीमध्ये अधिकार येणेही शक्य नाही. तथापि आपण जे प्रश्न लिहिले आहेत त्यांची उत्तरे यथामति लिहून पाठवितो; आपणास पसंत पडतील तर पहावे.**

कर्माचा नियम

पहिल्या प्रश्नाचे* उत्तर--**कर्माचा नियम प्रत्यक्षाने किंवा अनुमानाने निघतो असे हिंदुशास्त्राचे मत नाही; कारण प्रत्यक्षप्रमाण अत्यंत**

---

अ. ते पत्र येणेंप्रमाणें:-

रा. रा. सत्पुरुष गुलाबराव गोंडूजी मोहोड माधानकर यांचे सेवेशीं नम्र शिष्याचे अनेक रामराम. वि. वि. आपण मुंबईस दोन वेळ येऊन गेला. मागे डॉ. देशमुख यांचे घरी आपला मुक्काम होता, व अलिकडे आला होता त्या वेळी सरदारगृहात होता असे वाटते. आपली समक्ष भेट घेण्याचीं दोन्ही प्रसंगीं फार इच्छा होती. पण माझ्या आळसामुळे क्षुल्लक कारणाकरता तो योग जमवून आणण्याचे माझ्या हातून घडले नाही, याबद्दल आता वाईट वाटते. या पत्रासोबत काही प्रश्न पाठविले आहेत. आपल्यासारखे विद्वान् थोर सत्पुरुष फारच दुर्मिळ आहेत. आपल्या पायाजवळ विनंती इतकीच आहे की, त्यांची उत्तरे आपण आपल्या अधिकारयुक्त वाणीनें दिल्यास मजवर महदुपकार होतील. पण तशी उत्तरे देण्यास सवड न झाल्यास निदान कोणत्या ग्रंथात त्याची उत्तरे सापडतील ते कृपा करून आपण कळविल्यासहीं महदुपकार होतील. कळावे लोभ असावा अशी गरीब दासाची नम्र विनंती आहे. हे रामराम.

प्रश्न १. कर्माने चित्तशुद्धि होते असे ठरलेले आहे. तर ती कर्मे करताना मनावर त्यांचा संस्कार किंवा व्यापार कसा घडून चित्तशुद्धि होते ? चित्तशुद्धि म्हणजे संकल्पविकल्प नाहीसे होऊन चित्त स्थिर होणें, असा मी समजतो. आपल्या समाजात जुन्या पद्धतीने त्रिकालसंध्या, पंचमहायज्ञ वगैरे रोजची नित्य व नैमित्तिम कर्मे करणारे व ती नैमित्तिक कर्मेही श्रुतिस्मृतिप्रणीतमार्गाने करणारे भिक्षुक, शास्त्रीं, वेदांती व गृहस्थ बरेच आहेत, व ते ६०-६० वर्षेपर्यंत अशी कर्मे करीत राहिलेले दिसतात. पण त्यांच्या मनाचे संकल्प विकल्प जाऊन त्यांचे चित्त शुद्ध झाल्यासारखे त्यांच्या बाह्य वर्तनावरून तरी दिसत नाही. तकेच नाही, तर रागलोभादि मनोविकारही तादृश कमीं झाल्याचे दिसत नाही, याचे कारण काय?

अल्प आहे. म्हणजे प्रत्यक्ष प्रमाणानें समजणारी गोष्ट तिन्ही काली असू शकेल असा निश्चय सांगता येत नाही. अनुमान प्रत्यक्षापेक्षा व्यापक आहे खरे, पण तेही सामान्य गोष्टीचा बोध करीत असते. विशेष गोष्टीचा बोध करीत नाही. जसे, फोनोग्राफ पाहिला म्हणजे कोण्या तरी माणसाने हा केला आहे येवढे ज्ञान अनुमान करून देते, पण एडिसन साहेबांनीच तो केला आहे असे ज्ञान अनुमानाने होत नाही, तर ते केवळ शाब्दप्रमाणानेच होऊ शकते. कितीही अनुमानावर अवलंबून राहिले तरीही काही गोष्टी शाब्दप्रमाणाने घ्याव्याच लागतात, जसे--आपला पिता कोण, या विषयी आपल्याजवळ तादृश प्रत्यक्षप्रमाण काही नसते. बरे अनुमान प्रमाणाचा देखील येथे काही उपयोग होतो असे म्हणावे, तर तसेही होत नाही. कारण सर्वांना बाप आहे म्हणून मलाही बाप असला पाहिजे, इतकेच काय ते अनुमान होऊ शकते. तेव्हा आपले पितृज्ञान आपल्याला अत्यंत शाब्दजन्य आहे, असे म्हणणे भाग पडते जे जे अत्यंत शाब्दजन्य असते ते ते अत्यंत अदृश्य असते.

कर्माचेही असे दोन परिणाम होतात; एक दृष्ट व दुसरा अदृष्ट. अदृष्ट परिणामाचे फळ दुसऱ्या जन्मात होते. दृष्ट परिणामाचे फळ याच जन्मात होते. कर्मापासूनच आपण प्रश्न केला असल्यामुळे चार्वाकवाद आपल्याला पसंत नाही, असे मी गृहीत धरतो. कारण वरच्या पायरीपासून आरंभ करणाराने खालची पायरी उल्लंघिलीच असली पाहिजे असे अनुमान करणे साहजिक आहे. 'कर्मानें चित्तशुद्धि होते असे ठरलेले आहे,' असे आपल्या प्रश्नात वाक्य आहे. तेव्हा अर्थातच चार्वाकाची पायरी आपण घेतलेली नाही. म्हणूनच मी दिलेल्या उत्तरावर चार्वाकाचे आक्षेप आपल्याला करता येणार नाहीत. वादामध्ये पहिली पायरी चार्वाकाची आहे. पण ती आपण सोडली असल्यामुळे तेच संशय पुनः काढून पूर्वीच्या प्रश्नाच्या खालचे प्रश्न न करण्याविषयी मी विनंति करितो.

पूर्वजन्मातील कर्म जर न मानले तर विनाकारण एकाला सुख व एकाला दुःख देणाऱ्या परमेश्वराकडे विषमता येते, म्हणून अदृष्ट मानणे भाग आहे. आता या अदृष्टाचा व जन्माचा अन्योन्याश्रय अनादि आहे, असे आमच्या हिंदुशास्त्राचे मत आहे. मला वाटते हे अनादि सांगणे काही अलौकिक नाही, विचार केला तर कोणत्याच पदार्थाला आरंभ आहे असे दिसत नाही. कोणताही पदार्थ आपल्या पूर्वीच्या अवस्थेचे अवस्थांतर असतो, हे जडशास्त्रानेहि ठरल्यासारखेच आहे. हाच नियम कर्मासही लागू आहे.

चित्तशुद्धिकारक कर्म

परंतु हे कर्म दोन प्रकारचे आहे १–यमरूप आणि २–नियमरूप. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह या पांचांस यम म्हणतात. स्नान-संध्या, देवतार्चन, जप इत्यादिकांस नियम म्हणतात. यम व नियम दोन्ही बरोबर केले असता चित्तशुद्धि अवश्य होते. पण जे केवळ नियम करतात व यम करीत नाहीत, त्यांना त्यापासून काही फायदा होत नाही. साठ साठ वर्षेपर्यंत कर्म करणाराचे आपण उदाहरण दिले ते याच कोटीतील लोक असावेत असे माझे मत आहे. मनुमध्ये असे स्पष्ट म्हटले आहे. तो श्लोक येणेप्रमाणे:—

यमान् सेवेत सततं न नित्यं नियमान्बुधः ।
यमान्पतत्यकुर्वाणो नियमान्केवलान्भजन् ।।
(–मनस्मृति, अध्याय २०४)

भावार्थ:—यमाचे नित्य सेवन करावे. नियमांचे ज्या वेळी सांगितले असेल त्या वेळीच सेवन करावे. म्हणजे संध्या प्राप्त:काळी व संध्याकाळीच करावी. परंतु अहिंसा व सत्य इत्यादिकांचे सेवन सतत करावे. जो यमांचे सेवन करीत नाही व केवळ नियमांचे पालन करितो, तो पतन पावतो, असे म्हटले आहे. तेंव्हा साठ वर्षे काय, हजार वर्षे जरी यमांवाचून नियमांचे सेवन केले, तरीही चित्त अशुद्धच राहणे साहजिक आहे. आपण संकल्प-विकल्प नाहीसे होणे ही चित्तशुद्धिची व्याख्या केली आहे; पण ती थोडीशी व्यापक झाली आहे. हिंदुशास्त्रात संकल्पविकल्प नाहीसे होणे हे उपासनेचे फळ सांगितले आहे कर्म, उपासना व ज्ञान या तिघांची तीन कार्ये वेदान्तडिंडिमकारांनी दाखविली आहेत. ती येणेप्रमाणे–

६) कर्माणि चित्तशुद्धयर्थमैकाग्र्यार्थमुपासना ।
मोक्षार्थं ब्रह्मविज्ञानमिति वेदांतडिंडिमः ।।

भावार्थ:—कर्माने चित्तशुद्धि होते, उपासनेने चित्त एकाग्र होते, आणि ब्रह्मज्ञानाने मोक्ष होतो, असा वेदान्ताचा डिंडिम आहे. आपण केलेल्या चित्तशुद्धीच्या लक्षणाचा एकाग्रतेत अंतर्भाव होतो.म्हणून असद्वासना मात्र निवृत्त होणे, याचेच नाव चित्तशुद्धि आहे. चित्तशुद्धि झाली तरी चांगल्या वासना हजारो मनात येत राहतात. त्याला विक्षेप म्हणतात. त्याच्या निवृत्तीकरिता उपासनेची जरूर आहे. चित्तशुद्धि झाल्यावरही चांगल्या कामाकरिता काम क्रोध असले तर मला हरकत वाटत नाही. मुक्तेश्वराने स्पष्ट म्हटले आहे:–

"काम असावा ईश्वर भजनीं। क्रोध असावा इंद्रियदमनीं। तीर्थप्रसादादि ग्रहणीं। लोभ अत्यंत असावा।।" **नियमाचा संस्कार अदृष्टरूपानें होत असून यमाचा दृष्टरूपाने मनावर संस्कार होतो. म्हणजे यमाची मनास सवय लागते व नियमापासून देवता या मार्गांतील विघ्ने दूर करतात. म्हणून या दोहोंचाही अभ्यास समुच्चयाने केल्यासच कर्मापासून चित्तशुद्धि होते. हेच आपल्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर मला सुचले तसे दिले.**

न शरीरकृतं कृतम्

दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर:—**माझ्या मतानें असे आहे की, मनात दोन वस्तु एकाकाली धरताच येत नाहीत.** "युगपज्ज्ञानानुत्पत्तिर्मनसो लिंगम्" **असे गौतमाचार्यांचे न्यायदर्शनात सूत्र आहे. दोन ज्ञानें एकाकाली न होणे हे मनाचे लक्षण आहे, असा त्याचा अर्थ आहे. पाश्चात्य सायकॉलजीतही अटेन्शनसंबंधाने असेच म्हटले आहे. तेव्हां तोंडाने जे केवळ रुद्राचा जप करितात व मन दुसरीकडे लावतात, त्यांचा तो जप सुटतच असला पाहिजे. मन जर कर्मात गुंतलेले असेल तर शब्दोच्चार पुरा होणे शक्यच नाही आणि इतकेही करून जर कोणी करीत असेल तर फोनोग्राफप्रमाणें चित्तावांचून नुसत्या शब्दोच्चाराने कर्मापासून काहीच फायदा होत नाही असे माझे स्पष्ट मत आहे. कारण तसे करणे म्हणजे यम सोडून नियम करणेच होय. म्हणून या प्रश्नाचे उत्तर देखील प्रथम प्रश्नाच्या उत्तराचा शेषच आहे.**

ध्यान कसे धरावयाचें ?

तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर:—**ध्यान ही योगातील सातवी पायरी आहे. त्यामळें ध्यान करणाऱ्याला हा प्रश्नच येत नाही. कारण तेथपर्यंत गेलेला पुरुष प्रथमच प्रत्याहार व धारणा यांच्या योगाने सूक्ष्म देहावर आपला तेज-**

---

प्रश्न २. "मनसैव कृतं कर्म न शरीरकृतं कृतम्" (योग वा०) या न्यायानें रोजची नित्य कर्मे करतांना म्हणजे पूजाअर्चा, रुद्राभिषेक, जपादि कर्मे करताना मन पूज्य देवतेकडे एकाग्र करून त्या कृत्यात गुंतल्याखेरीज नुसता शब्दोच्चार करून कर्माचा संस्कार मनावर अल्प तरी घटणें शक्य आहे कीं काय ?

प्रश्न ३. ध्यान करताना "हृदि विन्यस्य" म्हणजे देवतेचें ध्यान हृदयामध्यें करावें असें सांगितलें आहे. मग हृदयांत देवाचे ध्यान केल्यावर आपली बैठक म्हणजे ध्यान करणाऱ्या जीवाची बैठक कोणती ? "देवो भूत्वा देवं यजेत्" ते तत्त्व ध्यानांत ठेवून ध्यान कसे करावयाचे ?

साभिमान स्थापन करीत असतो, व विश्वाभिमानाचे त्यात प्रविलापन करितो. त्यामुळे हृदयाकाशात ध्यान करणे त्याला सहज होते. स्थूलदेहाला जशी बैठकीची अपेक्षा आहे तशी सूक्ष्मदेहाला नाही, कारण तो अपंचीकृत आहे. आता प्राणायामामध्येही ध्यान सांगितले आहे हे खरे, परंतु ते वितर्कसमाधि पूर्ण झाल्यानंतर सांगितले, नवशिक्याला सांगितले नाही. नवशिक्याला ध्यानाचा उपदेश शरीराच्या बाहेर सांगितला आहे, व या नवशिक्याच्या ध्यानाला मानसपूजा म्हणतात. तुकाराममहाराजांनीही आपल्या मानसपूजेंत –

रत्नसिंहासन वर प्रभावळ । त्यावरी सोज्वळ वस्त्र मृदु ॥१॥
लोड उशा मागें टेकाया बाजूला । त्यावरी बैसला स्वामी माझा ॥२॥

असे म्हटले आहे. यांत हृदयकमळाचे नांव नाही. 'देवो भूत्वा देवं यजेत्' हे वाक्य ब्रह्मज्ञान झाल्यानंतर भक्ति करणाराविषयी आहे, नवशिक्याविषयी नाही. शिवाय या प्रश्नाचे उत्तर देण्याला सद्‌गुरुच समर्थ असतात, माझ्यासारख्या गरीबाने काय उत्तर द्यावे ?

मंत्राचे न्यास करणें.

चवथ्या प्रश्नाचे उत्तर:–मंत्राचे न्यास करणे म्हणजे त्या त्या देवतांना हाका मारून आपल्या अवयवावर बसवून ठेवून पिशाच्चादिकांना आपल्या शरीरात शिरू न देणे, असा न्यासाचा अर्थ आहे. या न्यासाचे फळ अदृष्ट आहे, कारण हा न्यास नियमात येतो; म्हणून याचे उत्तर पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात आलेच आहे. मंत्ररूप देवता आहे म्हणजे तो मंत्र त्या देवतेचे नांव आहे. एकाद्यानें हाक मारली असता जसा 'ओ' देतो, त्याप्रमाणे मंत्र माझे नांव आहे, असे ती देवता समजत असते. पत्रात या गोष्टीचा इतकाच खुलासा मी करू शकतो.

मन हे अपंचीकृत आहे, म्हणून मनाने ध्यान केलेल्या देवतेस, अपंचीकृत ज्या पृथिव्यादि पंचतन्मात्रा, त्यांचे उपचार करणें योग्य आहे. कारण त्या भूतांचा ईश्वरामध्ये लय व्हावा व आपल्या मागचे संसार–झेंगट सुटावे असा त्या क्रियेचा अर्थ आहे. कारण पंचतन्मात्रा व मन हे जीवास चिकट-

---

प्रश्न ४. मंत्रांचे न्यास शरीराच्या अवयवांचे ठिकाणी करावयाचे, म्हणजे त्या क्रियेचा अर्थ काय? मंत्ररूप देवता आहे म्हणजे काय? पृथ्वी वगैरे तत्त्वांचे गंध, फूल वगैरे उपचार ध्यानस्थ देवतेस करितात हें काय ? ध्यानकर्ता, ध्यानविषय, ध्यानक्रिया या तिहींची संगति ध्यान करतांना कशी जमवावयाची हे मला कळत नाही, त्याची फोड कृपा करून करावी.

त्यानेच संसार लागलेला आहे. त्याचा ईश्वरात लय झाला म्हणजे संसार नष्ट होतो, असे हिंदुयोगशास्त्राचे मत आहे. लय होणे म्हणजे अर्पण केलेल्या पदार्थाचे विस्मरण पडणे इतकाच अर्थ योगशास्त्रात घेतला आहे. या गोष्टीची फोड माझ्याने झाली तितकी केली आहे. विशेष महात्म्यांना ठाऊक असेल.

ध्याता, ध्यान व ध्येय या तिहींची संगति कशी जमवावयाची हा प्रश्न योगशास्त्रानुसार ध्यान करणारास येतच नाही. नवशिक्याने असे करावे की, ध्येय आपल्यापुढे सिंहासनावर धरावे. ध्यानकर्ता शरीरी असतोच. ध्येयाला एकसारखे मनापुढे आणणे याचेच नांव ध्यानक्रिया. तेव्हा तिची विशेष संगति कशी या प्रश्नाची जरूर नाही. इतकेच मला याविषयी येथे लिहिता येते. याप्रमाणे चवथ्या प्रश्नाचे उत्तर मला सुचलें तसे दिले.

केशवादि नांवांचा अर्थ

पांचव्या प्रश्नाचे[५] उत्तरः—या प्रश्नाचे उत्तर वर आल्यासारखेच आहे. फक्त केशवादि नावांचा अर्थ अवतारपर न घेता नित्यमूर्तिपर घ्यावा. सर्व कर्मात भावनेची अपेक्षा आहे. हे मीमांसाशास्त्रात शाब्दीभावना व आर्थीभावना इत्यादि सांगून स्पष्ट केलेच आहे.

सहाव्या प्रश्नाचे[६] उत्तरः—माझे मत असे आहे की, वाचकाकडे व वाच्याकडे पृथक् लक्ष्य ठेवण्याची गरज नाही. वाचकाचा स्वभावच असा

---

प्रश्न ५. रोजचे कर्म कसे करावें ? म्हणजे करतांना मनाची बैठक व भावना कशी ठेवावी ? उदाहरणार्थ, संध्या करण्यास सुरुवात केली, तर केशवादि नामोच्चार केल्याबरोबर परमेश्वरानें हे अवतार घेऊन भक्तांचे रक्षण पूर्वीच्या काळीं केलेले आहे ही भावना जागरूक असली पाहिजे की नाहीं ? मार्जन करतांना अंत:शुद्धि व बहि:शुद्धि पाणी मंत्रून तद्द्वारा करीत आहो अशी कर्त्याचीं भावना पाहिजे कीं नको ? याचप्रमाणें अर्घ्य, उपस्थान व ब्रह्मयज्ञ वगैरे करताना तशी भावना नसेल तर चित्तशुद्धि होण्यास कर्मांचा उपयोग होईल कीं काय ?

प्रश्न ६. नामस्मरण करतांना (यांत मी वेदाध्ययन, जप यांचाही समावेश करतो.) नामाचा जो उच्चार आपण करतो, तिकडे आपले लक्ष ठेवावें असें रा. बाबा गर्दे यांनीं ब्रह्मसिद्धान्त म्हणून केलेल्या ग्रंथांत म्हटलेलें आहे. नामाचा उच्चार करतांना नामी याचे स्मरण ठेवलें पाहिजे; तर नामाच्या उच्चाराकडे लक्ष गुंतून राहिल्यास ध्यानाचा विषय जो नामी म्हणजे देव तिकडे लक्ष कसें ठेवावें ?

आहे की, त्याच्याकडे लक्ष्य लागले की, वाच्याकडे लागतेच. वाच्य-वाचकांच्या संबंधाचे मात्र ज्ञान करून घेतले पाहिजे. पण वेदाध्ययन मात्र यात येत नाही. कारण अध्ययन हे उपासनेत येत नसून नियमांचे अंग आहे, आणि नामस्मरण हे उपासनेचे अंग आहे. म्हणून वेदाध्ययनाचे फळ निराळे आहे मला सहावा प्रश्न जितक्या रीतीने समजला, तितक्या रीतीनें मी उत्तर लिहिले.

प्रारब्धाचा नाश

१४) सातव्या प्रश्नाचे[७] उत्तर:—माझे मत असे आहे की, जीव कर्म करतांना स्वतंत्र आहे, व फळ भोगतांना परतंत्र आहे. "कृतप्रयत्नापेक्षस्तु विहितप्रतिषिद्धवैय्यर्थ्यादिभ्य:" असे ब्रह्मसूत्र असून, ज्याचा जसा प्रयत्न असेल तसेंच ईश्वर त्याच्याकडून करवितो. असा त्याचा अर्थ आहे. या सूत्राच्या भाष्यांत आचार्य म्हणतात–ईश्वर हा पाण्याप्रमाणे साधारण कारण आहे, आणि ज्याचा त्याचा यत्न बीजाप्रमाणें साधारण कारण आहे. आंब्याच्या झाडालाही पाणी पाहिजे व लिंबाच्या झाडालाही पाणी पाहिजे; म्हणून पाणी हे साधारण कारण होय. पण आंब्याने गोड होणे व लिंबाने कडू होणे हे त्याच्या त्याच्या बीजावर अवलंबून आहें. म्हणून बीजे ही असाधारण कारणे होत. अनेक कार्यांचे जे कारण त्याला साधारण म्हणतात, आणि एकाच कार्यांचे जे कारण त्याला असाधारण म्हणतात. आता प्रारब्धाची निवृत्ति यत्नाने होते असे माझे मत आहे, पण प्रारब्ध बलवान् असले तर यत्न लंगडा पडतो. तेव्हा प्रारब्ध कोणत्या प्रकारचे आहे हे पाहिले पाहिज. प्रारब्ध केवळ साधारण असेल तर औषधीसारख्या यत्नानेंच त्याचा जय होतो. प्रारब्ध जर दैविक असेल, तर औषधीसारखा भौतिक प्रयत्न लंगडा पडतो त्याला मंत्राची किंवा योगाची अपेक्षा लागते. योगानें अनेक शरीरे निर्माण करून आपले कर्म एकदम भोगून टाकता येते.

१५) शिवाय प्रारब्ध म्हणजे भोग होण्याची सुरुवात होते तेव्हांच म्हणतात, बाकीचे कर्म संचितांत असतें. समजा की, तीन वर्षांनी तुम्हांला कांही व्हावयाचे आहे, तर आता ते कर्म, प्रारब्ध झालेलें नाही; सध्यां तें

---

प्र ७. संचित, प्रारब्ध व क्रियमाण अशी कर्मे आहेत. या जन्मांत भोग घेऊन संपवून टाकण्याकरिता संचितांतून काढून ठेवलेलें जे कर्म त्या कर्माच्याभोगांत क्रियमाण कर्मानें फरक होईल किंवा नाहीं ? होत नसेल तर मंत्र, वैद्यक व ज्योतिष वगैरे शास्त्रांनी भोगपरिहारार्थ जे औषधी, मंत्र इत्यादि उपाय सांगितले आहेत, त्यांचें वैय्यर्थ्य सिद्ध होतें. फरक होत असेल तर कोणत्या ठरीव गोष्टी बदलतात व कोणत्या बदलत नाहीत ?

संचितांतच आहें असें माझें मत आहे. प्रत्यक्ष भोग सुरू झाल्यास मग मात्र प्रारब्धकर्म तो भोग दिल्याचून निवृत्त होत नाही. म्हणूनच भुक्त दुःखाविषयी निवृत्तीचा उपाय शास्त्रांत सांगितलेला नाही, आणि वर्तमान दुःख देखील भोगल्यावाचून निवृत्त होत नाही. आता ज्वरावर औषध घेतले तर आताच ज्वर निवृत होत नाही, तर पुढच्या क्षणी येणारा ज्वर निवृत्त होतो. मलेरियाची आलेली पाळी क्विनिन दाबीत नाहीं, तर येणाऱ्या पाळीचा निरोध करते. "हेयं दुःखमनागतम्" असें पंतजलीचें योगशास्त्रांत सूत्र आहे, आणि पुढें येणाऱ्याच दुःखांचा नाश होतो असा त्याचा अर्थ आहे. आतां एखाद्याला एवढ्या प्रयत्नाचें ज्ञान नसेंल तर कसे करावे, असे कोणी म्हणेल; त्यावर तो त्याचाच अपराध आहे असें मी म्हणतो. त्यांत दैवाचें कांही नाहीं. ते ज्ञान त्यानें मिळवून घ्यावें. समजा कीं, तसें ज्ञान होण्यासारखी परिस्थिति नसली तर ज्या परिस्थितींत तो असेल त्या परिस्थित्यनुसार शास्त्रानें जो त्याला धर्म सांगितला असेल तो पाळावा; म्हणजे हळुहळू दुसऱ्या जन्मांत तरी फायदा होईल. मुंबईला पत्रानें बातमी येण्याला येथून एक दिवस लागतो; परंतु तारेनें बातमी एक मिनिटांत येते. त्याप्रमाणें जो तीव्र प्रयत्न करतो तो एकाच जन्मात संचिताचा नाश करूं शकतो. साधारण मनुष्याला अनेक जन्म लागतात. पण कोणाच्याही शुभ यत्नाचा नाश होत नाही.

"न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति।" असे भगवंताचे वाक्यही आहे. आता जसें पापाचा शुभकर्म नाश करिते, तसे पापही शुभकर्माचा नाश करण्यास समर्थ आहे, अशी शंका योग्य होणार नाहीं. कारण पापाचा नाश करण्याकरिता प्रायश्चित्त म्हणून निराळ कर्म सांगितले आहे. आता शास्त्रावर जर विश्वास नसेल तर पापपुण्यावरही विश्वास असणे शक्य नाही, कारण पापपुण्याची सिद्धि प्रत्यक्षाने किंवा अनुमानाने होतच नाही. हिंदु, बौद्ध व जैन या तीन धर्मात कर्मवाद विशेष मानला आहे. पण तो आप्तवचनांवरच अवलंबून आहे. हेच आपल्या सातव्या प्रश्नाचे उत्तर मला सुचले तसे दिले. तथापि याविषयी पुष्कळ ऊहापोहाची जरूरीं आहे.

आठव्या प्रश्नाचे[८] उत्तरः—हा प्रश्न थिऑसफीला अनुसरून आहे; पण थिऑसफीला अनुसरून मला उत्तर देता यावयाचे नाही. कारण तिकडे माझा विशेष व्यासंग नाही. या प्रश्नाचे माझ्या मताने उत्तर असे आहे की, वारंवार जपाने जपाची देवता प्रसन्न होऊन रोग करण्याचा आपला बेत

---

प्रश्न ८. मंत्राच्या जपाचा व्यापार प्रारब्ध बदलण्याचे कामी कसा घडतो ? म्हणजे मंत्राचा जप केला म्हणजे जपाची अक्षरे, बीजे वगैरेचा पुनरुच्चार वारंवार केला तर यामुळें आकाशात त्या ध्वनीचा कोणता परिणाम घडून मागील ठरीव गोष्टी बदलतात ?

**रहित करिते. हे मंत्रशास्त्रानुसारे उत्तर झाले. योगशास्त्रानुसार याचे उत्तर असे आहे की, मंत्राचा वारंवार उच्चार केल्याने व भावना त्या मंत्रावर एकाग्र केल्याने, मनाची तीव्र शक्ति वाढते, आणि शरीर हे मनाच्या अत्यंत ताब्यात असल्यानें रोगाचा प्रतिबंध होतो. योगशास्त्राचे मत असे आहे की, मन तीव्र झाल्यास कोणत्याही वस्तूचे आकर्षण करिता येते. ध्वनीचा परिणाम मनात होतो असे व्याकरणशास्त्र व पातंजलशास्त्रांचें मत आहे. आपल्याला थिऑसफीप्रमाणे उत्तर पाहिजे असल्यास माझा नाइलाज आहे.**

आपले वैद्यकशास्त्र.

**१८) नवव्या प्रश्नाचे[१] उत्तरः– जुन्या वैद्यकाविषयी मी स्वतः खटपट करीतच आहे. त्याबद्दल "वैद्यवृंदावन" नावाचा ग्रंथ मी लिहीत आहे. परंतु**

---

उदाहरणार्थ–एखाद्या जीवास प्रारब्धभोग म्हणून ४० व्या वर्षीं प्लेगसारखा मोठा रोग होण्याचे नियतीने ठरलेले आहे. टाळता येणारे प्रारब्ध व न टळणारे प्रारब्ध असे दोन भाग मानतात. त्या समजुतीप्रमाणे हे प्रारब्ध त्या जीवाचे टळणाऱ्या प्रारब्धापैकी आहे अशी आपण कल्पना करू, व ते टाळण्याकरिता त्या जीवाने शास्त्रात सांगितल्याप्रमाणे मृत्युंजयाचा जप केला किंवा करविला. तर जप करण्यामुळे मंत्राच्या बीजांचा व इतर अक्षरांचा पुनरुच्चार झाल्यामुळे सष्टीत असा कोणता व्यापार घडतो की, त्यामुळे अशी काही अदृष्ट शक्ति निर्माण होते की, त्यामुळे ह्या जीवाची प्लेगच्या रोगाची सर्व कारणे नाहीशी करून त्यास तो व्यापार रोगमुक्त करतो ? थिऑसफीच्या काही ग्रंथात असा उल्लेख आहे की, अंतरिक्षात जीवाच्या कर्माचा रेकार्ड असतो, म्हणजे त्याचे प्रारब्ध लिहिलेले असते. तर ते कसें पुसलें जाते ? ध्वनिशास्त्राप्रमाणे Sound creates, sound preserves and sound desroys असे ठरलेले आहे, तर ध्वनीच्या योगाने वस्तु उत्पन्न कशा होतात व नष्ट कोणत्या व्यापाराने होतात ?

प्रश्न ९. हल्ली जुन्या वैद्यकास उतरती कळा लागून ते नष्टप्राय झाल्यासारखेच आहे. कोटयवधी रुपयाची विलायती औषधे येथे खपत आहेत, व जुन्या मात्रा, रसायनें, भस्म, काढे वगैरे सर्व औषधांचे प्रकार निरूपयोगी ठरल्यासारखे आहेत. वैद्यसंमेलने, सभा वगैरे मधून मधून भरतात, व डॉक्टरांचे आणि वैद्यांचे वादविवाद होतात. त्या वादांचे विषय पुष्कळ आहेत, पण महत्त्वाचा विषय म्हणजे आर्यवैद्यकाची वातपित्तकफ या त्रिधा प्रकृतीच्या पायावर रचलेली रोगनिदानाची पद्धत हा होय. वेदान्तशास्त्रात पांचभौतिक शरीर असून अमुक भाग पार्थिव, अमुक तैजस असे ठरलेले आहे. आपल्या सर्व शास्त्रांच्या सिद्धान्तांची एकवाक्यता असल्यामुळे, वातपित्तकफाची मीमांसा आपल्यासारख्या अधिकारी पुरुषांनी लोकांपुढे मांडल्यास पुष्कळ डॉक्टरांचे दुराग्रह नाहीसे होऊन जुन्या पद्धतीचे पर्यालोचन करण्याची त्यांस बुद्धि होऊन, आर्यवैद्यक सजीव होऊन महत्कार्य होईल. तरी या वातपित्तकफाच्या पद्धतीचे विवरण आपण करावे अशी विनंती आहे.

मी गरीब आहे. मजजवळ पैसा नाही. मी व्रतापुरत्या पैशाची मात्र भिक्षा मागत असतो. बाकी कोणास पैसा मागावयाचा नाही, असा माझा निश्चय आहे. कारण पैसा देणाऱ्याने, इतक्या लौकर कार्य कां झाले नाही असे विचारले, तर मजजवळ देण्याला पुरावा नाही, व तो गोळा करण्याकरिता खटपटही करण्याची माझी इच्छा नाही. शिवाय "मी ब्राह्मणांच्या पक्षाचा असल्यामुळे माझी जाति जोराने माझ्याविरुद्ध आहे, व मी शूद्र आहे एवढ्यावरच काहीं ब्राह्मणही माझ्याविरुद्ध आहेत." या दोन पेचात मी सापडल्यामुळे माझ्या हातून एखादे कार्य सुरळीत होईल असे मला वाटत नाही. "बोद्धारो मत्सरग्रस्ताः प्रभवः स्मयदूषिताः" हे भवभूतीचे उद्‌गार सर्वत्रच खरे होत आहेत. त्याला टक्कर देण्याची माझी छाती नाही.

सद्‌गुरूची भेट.

१० दहाव्या प्रश्नाचे[१०] उत्तर:–ज्या श्रुतिस्मृतीत वर्णाश्रमकर्म सांगितली आहेत, त्याच श्रुतिस्मृतीत तीर्थाटण व सत्संगही सांगितला आहे. तेव्हा गांवोगांवी सत्संगाकरिता फिरणे, हे ज्या मुमुक्षूला अभिमान नाही, त्याला योग्य वाटणे साहजिक आहे. सद्‌गुरु सच्छिष्य शोधीत असतात असे माझे मत नाही. कारण सर्व वेदान्तशास्त्रात साधनचतुष्टयसंपन्नालाच गुरूकडे जाण्याचा अधिकार सांगितला आहे. गुरूनें शिष्याकडे जावे असे कोठेही सांगितले नाही. एखाद्याच्या दैवाने कदाचित् घरीच सत्पुरुष भेटत असतील, पण तेवढ्याने सत्संगाकरिता फिरणे सोडणे, म्हणजे एकाला द्रव्याचा हांडा सापडला म्हणून दुसऱ्याने शेतात जाणे सोडून देण्यासारखे आहे. आता ज्याला आपल्याला साधू फसवितील असे वाटत असेल, त्याने पाहिजे असल्यास जाऊ नये; पण जो मुमुक्षु आहे त्याला फसविण्याला कोणीहि समर्थ नाही, असे माझे मत आहे. याविषयी पुष्कळ ग्रंथात मी लिहिलेही आहे. स्वतः गुरु शोधण्याविषयी तुकाराममहाराजांचे उद्‌गार काय आहेत ते येथे लिहितो:–

---

प्रश्न १०– एकदा मुमुक्षु पुरुष 'वर्णव्यवस्थेनुरूप श्रुतिस्मृतिप्रणीत धर्मकर्मे करीत आहे, तर त्याच कर्मानुष्ठानानें त्याच्या चित्ताचे संकल्पविकल्प नाहीसे होऊन चित्तशुद्ध होऊन सद्‌गुरु त्यास भेटतील किंवा त्याने गुरूच्या शोधार्थ गावोगावी हिंडून गुरु शोधून काढले पाहिजेत? सद्‌गुरुही सच्छिष्य शोधीतच असतात व तसा शोधून काढून त्यास कृतार्थ करितात. वाळलेल्या गवतास काडी ओढून ते पेटविण्यासारखाच सद्‌गुरूपदेशाचा प्रकार आहे असे वाचल्याचे स्मरते. म्हणजे शिष्याच्या मनाची पूर्ण तयारी झाल्यावर सद्‌गुरु लांब नाहीत. ते तात्काळ भेटतातच, व त्याची तयारी होणें म्हणजे ओले गवत वाळून जळण्यास तयार होण्यासारखेच आहे, व गुरूच्या एका शब्दानें शिष्याचे कार्य होते असे म्हणतात. तर यापैकी खरे कोणते?

अभंग

अग्नि हा पाचारी कोणासी साक्षेपें । हिंवे तोचि तापे जाऊनियां ॥१॥
उदक म्हणे काय याहो मज प्यावें । तृषित तो धांवे सेवावया ॥२॥
काय वस्त्र म्हणे याहो मज नेसा । आपुले स्वइच्छा जग वोढी ॥३॥
तुक्यास्वामी म्हणे काय मज स्मरा । आपुल्या उद्धारा लागुनीया ॥४॥

**श्रुतिही असेच म्हणते–**"तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेन् समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम्" **झाले. आपल्या प्रश्नांची उत्तरे माझ्या मतीला सुचली तशी दिली. ती रुचल्यास गोड करून घ्यावी. आता हे कोण्या ग्रथात आहे असे मला ठाऊक नसल्यामुळे, मी एकदमच लिहून पाठविले. प्रेमाची वृद्धि असावी. कळावे, ही विनंती.**

हर्दा, ता. २।१२।१९१३.

आपला अपरिचित
गुलाबराव.

□□□□

## १५. श्री. भट वकील यांस पत्र २ रे.

॥ श्री ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

( श्रीमहाराजांकडून पहिल्या पत्राचे उत्तर गेल्यानंतर पुन्हा तारीख १०–१२–१३ तारखेस रा० भट यांचेकडून दुसरे पत्र आले. त्यात त्यांनी श्रीमहाराजांच्या काही उत्तरावर शंका विचारल्या आहेत, त्याचे समाधान या पत्रात आहे.)

[ जाति जन्मसिद्ध–प्राणायाम–ध्यान–धारण–जप–शब्दब्रह्म–स्फोट–मंत्राचे सामर्थ्य–वैद्यकग्रंथ–अजपाजप ]

**१) रा. रा. भटसाहेब वकील यांचे चरणी सा. दंडवत वि. वि. आपले कृपापत्र पावले. मजकूर समजला. जाति जन्मसिद्ध आहे अशा आशयाचेच मी मुमुक्षूमध्ये लेख लिहिले आहेत. शिवाय मी आपल्याला उघडपणें शूद्र म्हणवीत आहे. ज्याचा जो धर्म आहे तोच त्याला तारक आहे अशी माझी समजूत आहे. ब्राह्मणाला वेदद्वारा व शूद्राला पुराणद्वारा मोक्षप्राप्ति परमेश्वरानें सांगून ठेवली आहे. ती आज्ञा उलंघन करणे म्हणजे परमेश्वरावरून विश्वास काढून टाकण्यासारखेच आहे. आपण पहिल्या प्रश्नाचे उत्तर गोड करून घेतले असे आपल्या पत्रावरून समजत आहे. चार्वाक मताचा जो मी उल्लेख केला, तो मी आपल्याला अनुसरून केला नव्हता, पण युक्तीच्या साखळीमध्ये करणें जरूर पडल्यामुळे केला होता.**

एकाग्रता कशी साधणार ?

२) दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरावर जी आपली शंका आहे तिचे उत्तर मला इतकेच सुचते की, चित्त वारंवार जरी दुसरीकडे धाव घेते, तथापि त्याला वारंवार वळवीत जावे. एखाद्या वृक्षाची शाखा लववू लागले म्हणजे प्रथम तिच्यामध्ये स्थितिस्थापकता असल्यामुळे, काही बांधून किंवा हाताने धरून ठेवावे लागते, व नंतर ती कायमची लवली म्हणजे मग तिचे वर जाणे आपोआपच कमी होते. त्याप्रमाणे जप करताना कोर्टातील खटल्याकडे लक्ष गेले तर ते जबरदस्तीनें ओढून आणणे व काही काल पर्यंत हठाने तेथेच थांबवून ठेवणे यावाचून दुसरा उपाय मला तरी माहीत नाही. पण असे काही दिवस करावे लागेल खरे.

३) चित्ताच्या निरोधाकरिता केवळ अभ्यासच हितावह होत नाही, तर त्याला वैराग्यही अपेक्षित आहे. कारण ज्याच्यात आसक्ति अधिक तिकडे चित्त अधिक गुंतत असते. अभ्यासाने चित्ताचा चंचलपणा जरी दूर होत असला तरी आसक्ति दूर होत नाही. यामुळेच उच्च अशा चित्त–एकाग्रतेच्या तत्त्वावर उभारलेल्या मेसमेरिझम्पासून झालेल्या दुष्परिणामामुळे अमेरिकेत कायदा करण्यापर्यंत पाळी आली आहे.

४) "चले वाते चलं चित्तम्" हा कांही योगशास्त्राचा सिद्धान्त नव्हे. ही एक प्रकारची बाळयुक्ति आहे. कारण "प्रच्छर्दनविधारणाभ्यां वा प्राणस्य" असे पतंजलीचे सूत्र असून प्राणाचा रेचक, पूरक व कुंभक करणे हाही एक मन स्थिर करण्याचा उपाय आहे, असा त्याचा अर्थ आहे. सूत्रात जो "वा" शब्द आहे, तो विकल्पदर्शक असल्यामुळे पूर्वीच्या मनोनिरोधादि उपायापेक्षा प्राणायामाचे गौणत्व तो सुचवीत आहे. शिवाय प्राणायामाने मनाची चंचलताच नाहीशी होते, आसक्ति नाहीशी होत नाही. कारण पाण्यामध्ये बुडी मारून श्वास रोकून तासतासभर राहणारे लोक मी पाहिले आहेत. परंतु ज्याकरिता ते बुडी मारतात ते त्या श्वासरोधामध्येही ते आपले कर्म करीत असतात. म्हणून प्राणायामाबरोबर क्षणोक्षणी विषयातील दोष मनात आणण्याची आवश्यकता आहे.

५) शिवाय प्राणायाम आपण किती वेळपर्यंत करता, हे मला माहीत नाही. प्राणायामाचे पुरे कार्य केवलकुंभक झाल्यावाचून होत नाही. आता आपल्या मनात अशा प्रकारचो आसक्ति आहे असे मात्र माझे म्हणणे नाही.

परंतु मला मनोनिरोधाचा उपाय वाटला, तो मी सांगितला. केवळ प्राणानेच मन चलित होते असे नाही; तर मन चलित झाल्यानेही प्राण चलित होतो. शोक व क्रोध या मनोवृत्तिमुळे जोराचा श्वास चाललेला आपण पाहतो. म्हणून प्राणनिरोधावर भरंवसा टाकून मनोनिरोध होईल असे मानण्यात काही अर्थ नाही. तर प्राणाचा व मनाचा निरोध करण्यास एकदमच आरंभ केला पाहिजे. अमनस्कखंडात मनाच्या योगाने प्राण चंचल होतो, व प्राणाच्या योगानें मन चंचल होते असे म्हटले आहे. गीतेत सहाव्या अध्यायात--

"यतो यतो निश्चलति मनश्चंचलमस्थिरम्
ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ॥"

असे स्पष्टच म्हटले आहे. प्राणायामात ध्यान करताना मात्रा मोजण्यात चूक होण्याचा संभव आहे. तथापि उत्तम प्राणायामाची सवय होईपर्यंत ध्यानाकडे मृदु लक्ष ठेवावे व मात्रा मोजण्याकडे तीव्र लक्ष ठेवावे; आणि पुढे ध्यानाकडे तीव्र लक्ष ठेवून मात्रा मोजण्याकडे मृदु लक्ष ठेवावे; म्हणजे पहिल्या कक्षेत मधून मधून ध्यान सुटल्यास हरकत नाही, व दुसऱ्या कक्षेत मधून मधून मात्रा चुकल्यास हरकत नाही. असेच सर्व योगी करीत आले आहेत, हे मला ठाऊक आहे. दोन्ही ठिकाणी एका वेळी तीव्र मन राहणें शक्य नाही; व तसा उपाय मला ठाऊकही नाही.

६) मध्ये मध्ये विजातीय वृत्ति येणे याचे नाव धारणा आहे, व विजातीय वृत्ति मुळीच न येणे याचे नाव ध्यान आहे. पण अशा प्रकारची धारणा व ध्याने हीं योगाची सहावी व सातवी पायरी आहे. ह्या दोन्ही पायऱ्या साधण्याकरिता प्रत्याहार ही पाचवी पायरी चांगली साधली पाहिजे. प्राणायाम ही योगाची चवथी पायरी असून सातव्या पायरीच्या दृष्टीनें त्यातील ध्यान अर्थातच चुकीचे असावयाचे. डोळे जरी सूर्याला पाहतात तरी त्यावर उडून कोणाला जाता येत नाही, त्याप्रमाणे इच्छा जरी मोठ्या फळाची करिता येते, तरी ते मिळवून घेण्याला हळुहळू अभ्यासाचीच जरूर आहे.

'शिवो भूत्वा शिवं यजेत्'

७) तिसऱ्या प्रश्नाच्या उत्तरावर जी आपली शंका आहे तिचे उत्तर यथामति देतो "देवो भूत्वा देवं यजेत्" या वाक्याचा जपाचे वेळी कोणी उपयोग करीत असले तरी ते भावना रूपानेच करीत असले पाहिजेत. त्याचा वास्तविक उपयोग तर ज्ञानानंतरच आहे. न्यासाचा उपयोग आपण आपला

देह देवतेचे रूप करावे असा नव्हे तर देवतेच्या आश्रयाने मंत्रजपाला पुण्यमय अधिकारी शरीर व्हावे असा आहे. देवतेचे स्वरूप आपण झाल्यावर अहंग्रह ध्यान करणेच उरते. पृथक् ध्यान उरते असे कोणतेही शास्त्र म्हणत नाही. आता हे ध्यान अहंग्रहरूपच करावयाचे असेल, तर जीवाची बैठक विचारण्याचे कारण नाही. कारण हृदयातच ध्याता व ध्येय यांची संस्थिति असते. पृथक् ध्यान करावयाचे असेल व ते हृदयातच करावयाचे असेल तर हृदयकमळाच्या कर्णिकेत मूर्ति स्थापन करून उजवीकडच्या पंकोळीवर आपली बैठक स्थापावी, व रेचक प्राणायामाने हृदयकमळ ऊर्ध्व करावे, असे तांत्रिक म्हणतात. पण मला असे वाटते की, हृदयात ध्यान करताना मी ध्यान करतो इतके स्मरण असणेच पुरे. आपली बैठक कोठे स्थापावी या विचाराची आवश्यकता नाही. कारण एवढी स्मृतिच तीव्र झाली म्हणजे ध्यात्याचा विसर पडतो. ध्याता व ध्यान विसरून जाऊन ध्येयाकाराचीच स्फूर्ति राहणे यालाच समाधि म्हणतात, व हा समाधिच ध्यानाची परम सीमा आहे. बैठक स्थापण्याकरिता स्थूल शरीराच्या आकाराचे जे आपल्याला सूक्ष्म व्हावे लागते, ती अडचण नुसत्या ध्यानस्मृतीत येत नाही. समाधि होण्याला जितके उपाधि कमी असतील तितके बरे.

८) 'ब्रह्मसिद्धान्तमाला' ग्रंथ मी पाहिला आहे. त्यातील आपण दाखविलेला उपाय बरोबर असलाच पाहिजे, त्या संबंधात माझे काही म्हणणें नाही. ज्याला जो उपाय साधेल त्यानें तोच करावा. रोजच्या कर्मात ज्या आप ल्याला अडचणी येतात, त्या आपण मला विचारतो म्हणता, तथापि ब्राह्मणापासूनच ब्राह्मणाला आलेली विद्या वीर्यवती होत असते असे श्रुतिस्मृतीचे म्हणणे आहे. तथापि मला जसे ठाऊक होते तसे उत्तर दिले. एक क्रिया मृदु व एक क्रिया तीव्र हेच या सर्व अडचणीतील मर्म आहे, असे सर्व करीत आलेले साधु सांगतात.

९) पुढे ठेवलेल्या मूर्तीचे ध्यान करिताना जप चुकतो. व जप करताना ध्यान चुकते, तर त्यात काही मोठेसे आश्चर्य नाही; परंतु जपावर अधिक आसक्ति असल्यास ध्यानाकडे लक्ष मधूनमधून नेत जावे, व ध्यानाकडे अधिक आसक्ति असल्यास जप मधूनमधून चुकण्याची पर्वा करू नये. जपातील चुकी ध्यानाचे पुण्य दहन करिते, असे गुरुडपुराणातही म्हटलें आहे. ह्या गोष्टी निष्काम कर्मासच लागू आहेत. सकाम कर्मामध्ये तर जप प्रधान आहे.

शिवाय जप करण्याचे वेळी तीव्र ध्यान करण्याचा विधि सांगता येणें शक्यच नाही. कारण अतिशय ध्यान झाले म्हणजे श्वास सुद्धा क्षीण होतो, आणि जपात तर अक्षरे उच्चारावी लागतात. म्हणून मृदुध्यानाचाच तेथे विधि आहे, आणि तेवढे ध्यान व तेवढा जप होणें शक्य आहे. कारण संध्या करताना कोर्टाच्या खटल्याकडे मन जाते, या आपल्या लिहिण्यावरून दोन मृदु कार्ये मन एकाकाळी करूं शकते असे होते. दोन कार्यांचा तीव्र संवेग मात्र मन एका काळी धारण करू शकत नाही, असा माझ्या मागील पत्रातील लिहिण्याचा अर्थ आहे. इतरत्र जर मन जात असेल तर तेथून त्याला हठाने ओढून आणावे. असे ओढून आणण्याला काही काळ लागेल खरा, परंतु हा काल वाईट वासनानिरोधाचे कामीच खर्च होत असल्यामुळे, वाईट वाटू देण्याचे कारण नाही. मला इतकेच या प्रश्नाचे उत्तर माहीत आहे.

चवथा, पाचवा व सहावा या तीन प्रश्नांचा बिलकूल उल्लेख नसल्यामुळे, त्यांचीं उत्तरे आपण गोड करून घेतली असावीत.

१०) सातव्या प्रश्नाचे उत्तरही आपण गोड करून घेतले असे आपल्या पत्रावरून दिसते. आपला पापपुण्यावर व शास्त्रावर विश्वास आहे, हा माझा पहिल्या पत्राचे वेळीच निश्चय झाला होता. फलज्योतिषाला अनुसरून आपण मंत्रजप करीत आहा हे फार चांगले आहे. परंतु मंत्र सिद्ध, साध्य, सुसिद्ध अथवा रिपु आहे, याचा आपण कोणा तरी मोठचा मांत्रिकाकडून शोध करून घेतल्यास ठीक होईल.

सिद्धः फलति कालेन साध्यः फलति वा न वा ।
सुसिद्धः स्मरणादेव रिपुः साधकमारकः ।।

असे मंत्रशास्त्रवचन आहे, माझे तर मत असे आहे की, ब्राह्मणानी भगवतीं गायत्रीजननीवाचून दुसऱ्यां मंत्राकडे धाव घेणे कल्पतरू सोडून एरंडाजवळ भिक्षा मागण्यासारखे आहे. वेदोक्त मंत्राची योग्य पुरश्चरणे कलीत चतुर्गुण सांगितली आहेत. तींच ब्राह्मणाला हितावह आहेत.

शब्दब्रह्म व स्फोट

११) आठव्या प्रश्नाच्या उत्तराविषयी जो उल्लेख केला आहे, त्याविषयी माझे म्हणणे इतकेच की, 'शब्दब्रह्म' व 'स्फोट' हे आर्यशास्त्रातील शब्द केवळ वादाचे वाचक नाहींत. शब्दब्रह्म म्हणण्याचा अर्थ असा आहे की,

ब्रह्माचे साधन शब्द आहे, म्हणनच त्या शब्दाचे ठिकाणी ब्रह्मदृष्टि करावी ही एक प्रकारची भावना आहे. अनुभूतिप्रकाशात स्वामी विद्यारण्य असेच म्हणतात:—

"यदोंकारस्य सार्वात्म्यं ध्यानार्थं तन्न वस्तुतः ।
यद्ब्रह्मणस्तु सार्वात्म्यं वस्तुतोऽप्येतदीक्ष्यताम् ॥

भावार्थः—ॐकाराचे जे सर्वात्मकत्व सांगितले आहे ते केवळ ध्यानासाठी आहे, खरे नव्हे, आणि ब्रह्माचे जे सर्वात्मकत्व सांगितले आहे ते ध्यानासाठीही आहे व खरेही आहे. असाच दंश शांकरभाष्यातही आहे. स्फोटवाद वैय्याकरणाचा असून व्याकरणमहाभाष्यात व शब्दकौस्तुभादि ग्रंथात त्याचे लक्षण असे सांगितले आहे आहे की, वर्ण क्षणोक्षणी नाश पावतात, म्हणून ते अर्थबोध करून देण्याला समर्थ होत नाहीत. तर बुद्धीमध्ये अर्थाशी संबंध जुळविणारा एक स्फोट नावाचा अदृश्य संबंध राहतो. गणितांतील बिंदूप्रमाणें हा गृहीत होय. हा स्फोट प्रत्येक शब्दांतील एकएक वर्ण स्पष्ट करीत असतो. आणि शब्दाच्या शेवटच्या वर्णाचे वेळी तो बुद्धींत अगदीं स्पष्ट होतो, व मग बुद्धीत अर्थाचा प्रकाश होऊ लागतो. या स्फोटाचा व अलिकडील ध्वनिशास्त्राचा काही संबंध नाही.

१२) शिवाय काही बीजांचा अर्थ न कळला तरी त्याचा परिणमा होतोच, असे मंत्रशास्त्राचे म्हणणे आहे; आणि स्फोटवाद तर अर्थ समजण्याकरिताच आहे. आर्यशास्त्रात जडकारणवादाचा स्वीकार नाही, म्हणून मंत्राभिमानिनी देवताच जापकाचे मनोरथ पुरविते, असे सर्व आर्यशास्त्रे म्हणतात. बौद्धशास्त्रात चेतनकारणवाद नाही, म्हणून ध्वनीचेच विशिष्ट आकार बनून मंत्र होतात असे त्या शास्त्रात म्हटले आहे. याविषयी बौद्धाच्या समाधिराज सूत्रावरील भाष्ये पहावीत. थिऑसफीचा माझा कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. तिचा थोडासा उपयोग आपल्याला होत असला तरी आर्यांनी सर्वथा तिच्या मागे लागणें योग्य नव्हे, इतकेच काय ते माझे मत आहे व ते मी आपल्या सूक्तिरत्नावलींत लिहिलेहीं आहे.

वैद्यकग्रंथ-प्रकाशन.

१३) नवव्या व दहाव्या प्रश्नाचे उत्तर आपण गोड करून घेतलेच आहे. डॉक्टर देशमुखासारखे विद्वान् मला साह्य करतील कदाचित्, परंतु पैसा हाती आल्यावर माझे मन आहे तितके शुद्ध राहील की नाही ही शंका आहे. म्हणून मी त्या कामात पडू इच्छित नाही. शिवाय मी आंधळा आहे. माझ्या पशाची कोणी कशी वाटाघाट करावी, यासंबंधातही मी बराच असमर्थ

आहे. डॉक्टर देशमुखानी मागे मला पादुका मिळवून देण्यात बरीच मदत केली आहे. पुस्तके व व्रते यावाचून दुसऱ्या कोणत्याही कामात दुसऱ्यांना त्रास द्यावयाचा नाही असा माझा निश्चय आहे. व्रताची साधारण सोय झाली आहे. पुस्तकांचीहि परमात्मा करीत आहे. इतकेही करून पुढे नारायणाची इच्छा असेल तसे.

अजपाजप

१४) अजपाजपासंबंधात जी आपली शंका आहे तिचे उत्तर यथामति देतो. २१६०० जपात त्याला कमी जास्त करिता येतो असे माझे मत आहे. ज्याला मंत्रयोग करावयाचा असेल त्याने मात्र २१६०० जप बरोबरच ठेविला पाहिजे. पण हठयोगी, लययोगी किंवा राजयोगी यांना त्याची जरूर नाही. श्वास कमीजास्त झाल्याने आयुर्मर्यादाही कमीजास्त होते. जप कमी झाल्यास देवतांचा क्षोभ होतो व जप जास्त झाल्यास प्राणाचा क्षोभ होतो. म्हणून प्राणायाम करून वेळ वाढवून जप कमी करावा आणि देवतांचा अपूर्ण जप मानसिक प्रणवोच्चाराने किंवा अनाहतनादाने भरून काढावा.

याप्रमाणे आपल्या प्रश्नाची उत्तरे मला यथामति सुचली तशी दिली. ती रुचल्यास आपण गोड करून घ्यावी. कळावे, ही विनंती.

हर्दा, ता. १४–१२–१९१३

आपला अपरिचित
गुलाबराव गोंडूजी मोहोड.

□□□□

## १६. रा. रा. बडबडे. संस्थान फलटण, यांना पत्र.

।।श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ।।

[मंत्रांचे प्रकार-नैगम व साबर-त्यांची माहिती महानुभावांचे वैदिकत्व-दोन कृष्णाची उपपत्ती]

१) सा. दंडवत, वि. वि. आपले ता. ७।१२।१९१३ इ. चे पत्र आताच हातात पडले.* वाचून आनंद झाला. सर्वज्ञ परमेश्वर आहे. तथापि आपल्या

* रा. रा. बडबडे यांचेकडून आलेले पत्र––

" श्री. साधुवर्य गुलाबराव महाराज चरणाचे सेवेशी. इंग्रजी भाषा वैकृत आहे म्हणून मंत्रमय नाही, वगैरे मजकूर मुमुक्षु ता. २७।११।१९१३ वरून कळला. आम्ही आस्तिकपक्षी असून मंत्रशास्त्रावर पूर्ण भरंवसा आहे. आरबी, फारशी, इजिप्शियन, खाल्दिया, अखाडियन, चिनी वगैरे भाषात मंत्रशास्त्र आहे, व त्याबद्दल ग्रंथ आहेत तर हे कसे? "अब्राक ३ ब्रा" "काडला" वगैरे ज्यूइश लोकात मंत्रयंत्रशास्त्राचे प्रकार आहेत, तर हे कसे ? सदरहु वेदबाह्य मतात देखील मंत्रशास्त्र आहे, मग त्या भाषा वैकृत आहेत तर मंत्रमय कशा आहेत ? दुसरे, महानुभाव भाषा व त्याचे मंत्रशास्त्र व लिपि कशी आहे ? याची माहिती कळविण्यात यावी. (पुढे––

शंकेचे समाधान यथामति लिहितो. मीं शूद्र असून बालांध असल्यामुळे माझे ज्ञान बरोबरच असेल असे मला वाटत नाही. माझ्या आंधळ्या डोळ्यामुळेच, शूद्रधर्म जी सेवा, तीही चांगली घडून येत नाही. उलटे, दुसऱ्यालाच मला अन्न पाणी द्यावे लागते. त्यात माझे शरीर रोगी असल्यामुळे दुसऱ्यांना माझ्यापासून फारच त्रास होतो. अशा स्थितीत माझे ज्ञान कितीसे असणार. याचे अनुमान शहाण्यांना करिता येण्यासारखे आहे. तथापि मोठ्यांच्या मागणीचा अनादर होऊ नये म्हणून मी काही तरी लिहितो.

नैगम व साबर मंत्र.

२) मंत्र दोन प्रकारचे आहेत. नैगम आणि साबर. द्रव्यदेवताप्रकाशक ते नैगम मंत्र होत असे निरुक्तात म्हटले आहे, आणि केवळ ध्वनीच्या योगाने कार्य करणारे ते साबर मंत्र होत. नैगम मंत्र हे लिंगसामर्थ्यामुळे देवताव्हानप्रधान आहेत, आणि साबर मंत्र ध्वनिप्रधान असल्यामुळे क्षुद्रसिद्धिदायक आहेत. साबर मंत्र तत्त्वज्ञानाला मदत करणारे होतात, असा कोठेही विधि नाहीं, व असा कोणाचा अनुभवही नाही. साबर मंत्र हे ध्वनिप्रधान असल्यामुळे त्याची भाषा नियत नाही. बहुतेक साबरमंत्र विकृत भाषेत आपल्याकडील तंत्रातही आहेत. उदाहरणार्थ भूतडामरतंत्र पहा–

"कालाबिच्छु पदं प्रोक्तं कातर्याला पदं पुनः ।
क्या कालेति पदं प्रोक्तं क्या कौलेष पदं पुनः ॥

अर्थात् "कालाबिच्छु कातर्याला क्या काला क्या कौलेष" अशा प्रकारचा मंत्र भूतडामरात विंचू उतरण्याविषयीचा आहे भूतडामराचे नाव नागार्जुनादिकांच्या ग्रंथात आहे. तेव्हा हे तंत्र त्यांच्या ग्रंथाच्या पूर्वीचे आहे यात संशय नाही. अशा वेळेसही अर्धहिंद्रु विकृत शद्व त्यात मिसळलेले दिसतात. यासंबंधात प्रसिद्ध महात्मा तुलसीदास असे म्हणत आहेतः–

चौपाई–कलि बिलोकी जगहित हर गिरिजा । साबरमंत्रजाल जिन सिरजा ॥
अनमोल आखर अरथ न जापू । प्रकटप्रभाव महेसप्रतापू ॥

३) अक्षरांचा नियम, अर्थाचा संबंध व जपाचा नियम नसताही साबरमंत्राचे फल दृष्टीस पडते, हा ईश्वराचा प्रताप होय, असे या चौपाईचे

---

नंदपुत्र कृष्ण व वसुदेव पुत्र कृष्ण एकच आहेत काय ? यामल तंत्रावरून भिन्न असल्याचा मोहमय वाद निघाला आहे. मोहनिवारणार्थ विनंती केली आहे. आमचा मोह सदरहूबद्दल दूर व्हावा. कृपा करून जिज्ञासूच्या शंकेचे समाधान होईल अशी फार आशा आहे.

तात्पर्य आहे. अरबी वगैरे भाषेत असे मंत्र आहेत. ते साबरच आहेत. तत्त्वज्ञानाविषयी अदृष्टोत्पादक नाहीत, तर दृष्ट क्षुद्र फल देणारे ते आहेत. मंत्रशास्त्र मनुष्याच्या भाषेत आहे एवढेच नाही तर पक्ष्यांच्या आवाजात देखील आहे. अरबी व इंग्रजी भाषेत जे मंत्र आहेत ते मला थोडे माहीत आहेत. परंतु द्रव्यदेवताप्रकाशक असा मंत्र त्यात कोणताही नाही. शिवाय साबरमंत्र तरी हिंदुस्थानातूनच अनेक देशात गेले आहेत, असे मेरुतंत्रावरून समजते.

कारण:––शूद्रादियवनान्तानां वाममार्गो परः स्मृतः ।

४) चांडाल व द्वीपांतरवासी लोकांनी साबरमंत्राचा अभ्यास करावा, ब्राह्मणांनी करू नये असे त्यात म्हटले आहे. पारशिकतंत्र शिवप्रोक्त आहे, असेही त्यात वचन आहे. इतर भाषेत मंत्रशास्त्र अशाच तऱ्हेने गेले आहे, असे माझे मत आहे. आणि ते सर्व साबर आहेत. मेरुतंत्राचे नागार्जुनाच्या तंत्रात उदाहरण आहे. उपलब्ध झालेल्या वैद्यक ग्रंथांवरून नागार्जुनाचा काल बऱ्याच वर्षांपूर्वीचा आहे, असे ठरत आहे. कारण पादलिप्ताचार्य-बौद्धाकडे यांनी काही दिवस साबरविद्येचा अभ्यास केला, असा इतिहास सापडतो. बौद्धांच्या महायानपंथात जी माध्यमिक शाखा आहे, तिजवर नागार्जुनाचा मोठा संस्कृत ग्रंथ आहे स्पंदप्रदीपिकेत प्रत्यभिज्ञाचार्य उत्पलदेव यांनीदेखील त्यांची वचने उद्धृत केली आहेत. तेव्हा मेरुतंत्र बरेच प्राचीन आहे यात संशय नाही. आता क्षेपकवादच मानावयाचा असल्यास ज्याला जे आवडणार नाही, त्याला तो क्षेपक म्हणेल; म्हणून याबद्दल ऊहापोह करण्याला मी असमर्थ आहे. याप्रमाणे साबरमंत्राविषयी गोष्ट आहे.

नैगम–मंत्र

५) नैगममंत्र हे द्रव्यदेवताप्रकाशक आहेत. ते ज्या तऱ्हेने म्हणावयाचे त्याच तऱ्हेने म्हटले पाहिजेत; कारण देवता परोक्षप्रिय आहेत असे वेदान्त-वचन आहे. आपले नाव आपाजी आहे. त्याबद्दल कोणी जाणून आप्या म्हटले तर आपणास जे वाटेल तेच मंत्राच्या विकृतीवरून देवतांस वाटते. एकाद्या लहान मुलाने आप्या म्हटले तर आपणास हासे येईल हे खरे आहे; परंतु मोठ्या मनुष्याने आपाजी म्हणून आपल्यापासून जे काम करून घ्याव-याचे ते त्याला मिळावयाचे नाही. आता ईश्वराचे नाव कोणत्याही भाषेत घेण्यास हरकत नाही, हे खरे आहे, परंतु मंत्र म्हणजे नुसते नावरूपच नसते, तर त्यात द्रव्याचा प्रकाश केलेला असतो; व विनियोगाशी त्याचा संबंध असतो. म्हणूनच तुकाराम महाराजाच्या अभंगाने लग्न लावणाऱ्यांचे मला

मोठे आश्चर्य वाटते. वास्तविक असे करण्यात वेदावरही विश्वास ठेवावा लागतो. व तुकाराम महाराजांच्या अभंगांवरही विश्वास ठेवावा लागतो. पण असे करणे म्हणजे आमच्या विश्वासामुळे तुमच्या विश्वासात काही तथ्य नाही असे म्हणून एकाद्याला धिक्कारणेच आहे, दुसरे त्यात काही नाही; कारण विश्वासपक्षी दोघेही सारखेच आहेत.

६) आता ज्याला कर्मवाद मान्य नसेल, त्याला विनियोगही मान्य नसावयाचा हे साहजिकच आहे. त्याच्याशी स्वतंत्रपणे पूर्वपक्ष उत्तरपक्ष करता येतील; परंतु मी आस्तिक आहे असे आपण पत्रात लिहिले आहे, त्या-अर्थी आपल्याला कर्मवाद मान्य असलाच पाहिजे. कारण जीव, ईश्वर, कर्म, पुनर्जन्म, सृष्टि, उत्पत्ति, स्थिति, लय, मुक्ति आणि वेदाचे प्रामाण्य इतक्या गोष्टी ज्याला कबूल आहेत त्यालाच हिंदू आस्तिक म्हणतात. मग त्याच्या प्रकारात कितीही वाद असो, त्याच्या खंडणमंडणाचे हे स्थल नव्हे. कारण तसे केले तर पत्राच्या ऐवजी ग्रंथच होईल. काही लोक शास्त्राचे व पुराणाचे प्रामाण्य मानतात, वेदांकडे फारसे लक्ष देत नाहीत; तथापि पुराणेच वेदाची प्रशंसा करीत असल्यामुळे त्यांचे ते मत परंपरेने वेदप्रामाण्यमूलकच आहे, असे म्हणावे लागते.

मानभाव पंथ

७) मानभावांचे मत जरी वेदपुराणाला सोडून आहे असे तादृश दिसते, तरी उपनिषदांतील काही श्रुतीत व काही पुराणांत त्या मताचे मूळ सापडते. बौद्धादिकाची गोष्ट तशी नाही. कृष्ण ही पौराणिक देवता मानभाव मानतात, व उपदेश करण्याच्या पहिल्याच मंत्रात तिचा उल्लेख आहे, म्हणून मानभावांचे मत परंपरेने वेदमूलकच होय. मानभावांची तीन स्थळे व त्या-वरील बंध मला येत आहेत हे खरे आहे. तथापि लोकांना उपदेश घेतल्या-वाचून कळवू नये असा त्याचा निर्बंध असल्यामुळे लोकांपुढे त्या गोष्टी जाहीर करून एका समाजाला आपले शत्रुत्व पत्करावयास लावण्यास मी तयार नाही. म्हणून त्यांची लिपि व शास्त्र मला माहीत आहे तरी उघडपणे सांगणार नाही. पण एवढे मी खास सांगतो की, मानभावधर्म कोणाला कितीही संशययुक्त वाटत असला तरी, तो थिऑसफीपेक्षा लाखपट चांगला आहे. असे मी म्हणतो. मानभावांच्या लिपी १४ आहेत. त्या सर्व मला हाताने लिहून कशा सांगता येतील? म्हणून याबद्दल माफी असावी.

कृष्ण एक की दोन ?

८) आता दोन कृष्णांबद्दल जो यामलयंत्रात उल्लेख आहे, तसा तो स्कंदपुराणात व पद्मपुराणातही आहे; आणि चैतन्यसंप्रदायातील लघुभागवतामृतांतही आहे. कृष्ण जरी दोन आहेत, तरी त्याची मूळ मूर्ति एकच आहे. शिवाय प्रत्येक गोपीला जर एकएक रासात मिळाला होता, तर या दोन कृष्णांतच काय आश्चर्य आहे ? जितके उपासक तितकी रूपे धरणे हे परमेश्वरशीलच होय. दोन कृष्ण असले तरी ते दोन ईश्वराची रूपे आहेत असे काही नाही. तेव्हा एका ईश्वराने कोटि कृष्णरूपे धरिली तरी उपासकाना मोह पडण्याचे कारण नाही. अशा रिकाम्या म हाने लाभ काहीच होत नसून साधारण उपासनेच्या अंतःकरणाला मात्र प्रतिबंध होतो.

माझ्याच्याने झाली तशी आपल्या प्रश्नांची उत्तरे पाठविली आहेत. गोड करून घेणे व स्नेह वृद्धिगत करणे हे मोठ्यांचे शील असते, तेव्हा त्याविषयी काही लिहिणे नको. कळावे.

आपला,
गुलाबराव गोंडूजी मोहोड.

हरदा, ता. २३–२–१९१४

□□□□

## १७. रा. रा. बाबा गर्दे यांस पाठविलेले पत्र

।। श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ।।

(श्लोक–शिखरिणी)

नमस्ते आचार्य स्वपदपदवीप्रेमवरद। नमस्ते सर्वात्मन् मुरहर सुरस्वर्गपुरद ।। नमस्ते यो रातिश्रियमभिनतायाप्यघवते । नमस्तेऽलंदीश स्वजनसुखकर्त्रे भगवते ।। १ ।।

नमो बाबाजीच्या शुभ विभवदा पादकमला। परब्रह्मी श्रौती तनुमतिरती यत्सुविमला ।। विनंति की माते प्रभुलिखित ते आज मिळले । पहाता देवाचे अति मजवरी प्रेम कळले ।।२।।

स्वबाळाते वाणी जननि, जन तैं उत्तम म्हणे । अभिप्राये याची स्तुतिपद असे मी गणि मने ।। उगा यावाचोनी मज पदभवा[१] गौरव कसा । पदीच्या जूतिचा[२] पदिच दिसतो उत्तम ठसा ।।३।।

स्तुती आत्म्याची ही तरि सहज सौख्यी उभयता । स्तुती देहाची तैं मजसि उमटे फार भयता ।। तनू आधीची हे जडमलिन निंद्याऽसदहिता । वरी शूद्राचीया कुळि उपजली वेदरहिता ।।४।।

---

१ शूद्रास. २ जूती हा शब्द वैदिक संस्कृतात आहे, म्हणून घातला आहे.

स्वधर्मे विप्राची मज चरणसेवा न घडली । परंतू दुर्दैवे विपरित कृती मात्र जडली ।। अशा नीचा मातें निज समजुनी लाड करितां । न हें आश्चर्याचें सरळ सुजनी प्रेम पुरता ।।५।।

अभावे नेत्राच्या बहुतकरुनी अन्नसलिला । द्विजा देणे लागे हृदयीं अति हे जाचत मला ।। वृथा वेदान्ताचे मिष करुनि मी वैभव धरी । अशा माझी कैसी करील करुणा कोण उदरी ।।६।।

असो, या शोकाते वदुनि पुढती काय करणे । भवत्पादांभोजा नमुनि बरवें मौन धरणे ।। व्रजेशप्रेमाचा मधुरतर बाहो हृदिं झरा । अशा आशीर्वादा वदुनि मजला पावन करा ।।७।।

परब्रह्मज्ञाने जग निखिल हे बाधित गमे । तथापि प्रारब्धे पुढति बिषयी अंतर रमे ।। तयाते जिंकाया विषय अरपावे हरिपदीं । अहंता ही आटे भजन करितां बोलति सुधी ।।८।।

दिव्यापासोनिया सम जरि दिवा अन्य उजळे । तरी आधील्याचे प्रथमपण हे कैंच न गळे ।। कृपे तेवी ज्याच्या चितिमति वळे त्या न भजुनी । कृतघ्न ज्ञानी तो भववश सदा चित् समजुनि ।।९।।

अहो स्वप्नी मिथ्या जननि आपुलीही जरि दिसे । तदाहो सत्पुत्रीं परमपूज्यत्वार्ति उमसे ।। तसा मिथ्या विश्वीं मधुरमय भेटे गुरुहरी । उपेक्षा तै त्याची पशुविण दुजा कोणि न करी ।।१०।।

कळे संधी तेव्हां सुजनहृदयी खेळत चिती । उठे वृत्ती तेव्हां विषय अबघे चाल करिती ।। निराकारी संधी सगुणचरणी वृत्ति जडतां । भवाब्धी आटे हा श्रम बहु निरोधी न पडता ।।११।।

जशी स्वप्नीं मिथ्या युवति तरि कामार्त डुलवी । तसा ज्ञानी रागी तरी मग तया भ्रांति भुलवी ।। यशोदाबाळाच्या चरणकमळावांचुनि कदा । अनंतोपायांनी तुटति न महागर्वविपदा ।।१२।।

हिरण्या जाणे त्या नग बघुनियां तोष उपजे । हिरण्या नेणे तो बघुनि भुलतो पित्तलहि जें ।। तसा ब्रह्मज्ञानी सगुण भजने सौख्य मिळवी । विना ज्ञानें ध्याता जयविजयासा चित्त चळवी ।।१३।।

पिता तूं माता तूं बहिणसुत तूं या शतपदी । बळे अध्यासाच्या सकळ-जन होती नत पदी ।। तया आचार्याचे वचन निवटी त्वं म्हणवुनी । परब्रह्माहंता तदपि मनुजाची नच उणी ।।१४।।

गुरूक्ति-त्वंबोधे परमसुख शिष्याप्रति मिळे । तदा त्वं-पूज्यत्वे उलट जयि त्याचि मति वळे । ऋणाते वाचेच्या तर्हि मुकुनि घे भक्तिपदवी । स्वयें वाचे साधू हरि वदुनि आनास* वदवी ॥१५॥

गुणाच्या दृष्टीतें जरि निरखितां सांख्यविषयें । तदा मायाबिंबी यदुपति मिळे सत्त्वनिचयें ॥ स्थिति ज्ञाना सत्त्वाविण नच असे तात वदले । तदा कैसी भक्ति त्यजतिल समोपाधिमधले ॥१६॥

समोपाधी झाले तरि वरपणा ये हरिपदा । शुचि सत्वादी तो म्हणुनि यजिती सज्जन सदा ॥ अदंभादी साधूगुण सहज ज्या रीति उरती । तशी ब्रह्मज्ञाच्या मनि उमटतें माधवरती ॥१७॥

श्रमे लाहे बोधा न भजुनि मनी जो हरहरी । विरागाद्यभ्यासी षडरिचय त्याची मति हरी ॥ अहंकर्तृत्वे धी श्रमुनि सुखसंधी न कळवीं । हरिप्रेमाकृष्ट प्रतिपद परानंद मिळवी ॥ १८ ॥

परज्ञाने ज्यांचे चिदचिदखिलग्रंथि सुटले। मुनी तेही प्रेमें व्रजवर-चरित्रीं विनटले ॥ कुठें थारेना तो गुरु शुक नृपा भक्ति वदला । उपेक्षूनी देवा किमपि न फिटे वेद वदला ॥ १९ ॥

विदेही साधू तो हरिगुणसुधा अंतरिं भरीं । अनादी साधूंच्या कृति न कधिही दूषित करी ॥ जना वाटे वेडा परि अधिकृताचा भव हरी । गुरुत्वाच्या इच्छेविण गुरुपणा ज्याप्रति वरी ॥ २० ॥

विदेही होवोनी बहुत तनु सोंगास करिती । दुराचारांलागीं बळकटपणें चित्ति धरिती ॥ श्रुतीतें नेणोनी विषयफळ जे भोगिति कुडे । यमाजीच्या दंडें मरुनि मग त्यां दुर्गति घडे ॥ २१ ॥

अरागद्वेषत्वें शिशुसम जरी पंडित वसे । यथेच्छा विण्मूत्रादिकरण परी त्याप्रति नसे ॥ असे सूत्री भाष्यीं म्हणति मुनि आचार्यहि सवे । वृथा चाळें तस्मात् शठ करिति ते उत्तम नव्हे ॥ २२ ॥

पिशाचादी वृत्ती न दिसति कुठें वेदगदिता। परी ढोंगीं मूर्खा बहुत गमते त्यांत मुदिता ॥ विना ज्ञानाभ्यासें सकल करणी संसृति फळे । न दंभें कोणाचें करुनि तपही चित्त उजळे ॥ २३ ॥

---

* अन्यास.

**चमत्कारेच्छूच्या निजमनीं उगा काम उमळे । चमत्कारेच्छूची यवनमुखलाळे तनु मळे ॥ चमत्कारेच्छू तो निगमरहिता धर्म समजे । म्हणोनी माते हो रुचति तुमच्या वृत्तिसम जे ॥ २४ ॥**

**स्वधर्माचाराने हृदयशुचिता जें प्रगटते । उपास्तीनें तेव्हां सहजचि अचांचल्य घटतें ॥ परब्रह्मज्ञानें निखिलहि अविद्यामळ झडे । मुकुंदाच्या प्रेमें अभिभवहि दैवाप्रति घडे ॥ २५ ॥**

**समाधीवांचोनी सहज सुख बुद्धाहि न मिळे । हरिप्रेमासक्ता सुखमयचि उत्थानहि फळे ॥ समाधिव्युत्थानें जरि विदितवेद्यास नसती । तरी जीवन्मुक्ती-पद निरखितां अंगि दिसती ॥ २६ ॥**

**यदप्यावृत्त्यंशा वचनगत सद्बोध हरितो । चिदाभासत्वाने तदपि मति-विक्षेप उरतो ॥ अहंब्रह्मज्ञानी चरम पद तें चित्ति धरुनी । चिदाभासाहंता हरिति हरिसेवाचि करुनी ॥ २७ ॥**

---

रा. रा. बाबा गर्दे यांजकडून आलेले पत्र. पद (चाल–भला जन्म हा तुला लाधला)

गुलाबराया तुला बघाया इच्छा होती मनी । होय ती पूर्ण तुझ्या दर्शनी ॥ धृ ॥ कीर्ति ऐकुनी मूर्ति देखिली हृदयी तव म्या जशी । हुबेहुब दिसली नयना तशी ॥ धन्य माय ती अशी, विभूती जन्मे जीच्या कुशी । विरळा भूवरि रत्ने अशी ॥ चाल ॥ मम बहुतजन्मकृत पुण्योदय जाहला । त्यामुळेचि दर्शन हे तव झाले मला ॥ टीप ॥ ज्ञानेश्वर मम तात असा जो दर्शविशी भाषणी । वाटे सत्यचि मज तो ध्वनि ॥ गुलाबराया० ॥ १ ॥

तात म्हणसि तूं अलंदिनाथा तेवीं जो श्रीपती । मानिसी त्यातें माझा पती ॥ हेहि वावगें दिसे न मजला पाहतां गोपीमती । जडल्या भगवंतीं ज्या अती ॥ चाल ॥ पडे विसर कदाचित स्वामीचा सेवका । अंकुरही होइल सख्यभक्तिचा सुका ॥ टीप ॥ परि क्षणहि पतिविरह न साहे पतिव्रता कामिनी । नच ही प्रीति व्यभिचारिणी ॥ गुलाबराया० ॥२॥

ग्रंथविमर्शन सज्जनदर्शन छंद हाचि लागला । बहुतां दिवसांपासुनि मला ॥ अक्कलकोट स्वामी प्रभृती जो जो यति ऐकिला । तो तो साक्षेपे देखिला ॥ चाल ॥ कुणि बसे मुक्यापरि खुळ्यावाणि बडबडे । कुणि शैशवलीला दावी लोकांपुढे ॥ टीप ॥ अशा विभूती वंद्य होति जरि लोकपापवारणी । न मिळे मोक्ष तयांपासुनी ॥ गुलाबराया० ॥३॥

अंध म्हणति मतिमंद तुला जे अंध तेचि तत्वतां । नसती ज्ञानचक्षु ज्यां स्वतां ॥ मुनि जागतो तींत असे जी निशाचि सर्वां भुतां । असें हरि सांगे कुंतीसुता ॥ चाल ॥ निष्णात असे जो शाब्दि परीं तो गुरु । उद्धवासि ऐसे वदे भक्तसुरतरु ॥ टीप ॥ अशा लक्षणें युक्त दिसे जो त्याच्या पदवंदनीं । व्हावे तत्पर साधकजनीं ॥ गुलाबराया० ॥ ४ ॥


सर्व शास्त्रि तव विचित्र पाहुनि शिक्षणरहिता गती । गमसीं केवळ शंकर यती ॥ प्राकृत कविता तुझी स्मरवि मज खचित अळंदीपती । बापा तव गुण वानूं किती ॥ चाल ॥

पितामाताबंधू पतिसुतसुमित्रादि भलते । रमानाथीं नातें जुळवुनि मिळे भक्तिबळ तें ।। कृतज्ञ ज्ञात्यांची हरिस भजणें पूर्विल प्रथा । जनातें ताराया स्फुरति म्हणुनि मापतिकथा ।। २८ ।।

रसा यावच्छक्ती रचुनि भरिलीं हीं शिखरिणी । तुम्हां प्रीती पावो मधुर रुचि जेवीं शिखरिणीं ।। तुझ्या चित्ती बाळे, अतितर वसो ईश्वररती । अशा आशीर्वादे मज मिळवुनी द्या व्रजपती ।। २९ ।।

पदी पोल्हारांचा रुणझुण असा नाद उठतो । करींच्या चक्रानें हृदयरिपुचा बध तुटतो ।। जना ताराया जो अवतरुनि आलंदित वसे । तया स्वामीपाया नमुनि लिखिता अर्पित असे ।। ३० ।।

श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरार्पणमस्तु



---

वा कृपा असावी तव ह्या दीनावरी । मज करी नुपेक्षा भक्त अडाणी जरी ।। टीप ।। द्यावी मज शेवटची जागा भक्तिसुधाभोजनी । प्रार्थी कृष्णसूनु वंदुनी ।। गुलाबराया० ।। ५ ।।

**चरणरज, बाबा गर्दे**

रा. हरिभाऊ केवले यांस विनंती–देखोनी मजला गुलाबचरणा जे प्रेम वाटे मनीं ते या गीतमुखें करी प्रकट मी तें दाखवा वाचुनि ।। त्या ऐकोनि निघे समर्थवदनांतूनीं प्रसादोत्तर । जें जें तें हरिभाऊ सर्व कळवा खालील पत्त्यावर ।।

पत्ता–बाबा गर्दे यांस C/o त्रिंबक खंडो गर्दे, होमिओपॅथिक प्रॅक्टिशनर,
आग्रारोड. धेंटिया खानदेश जिल्हा.

I hope to reach Dhentia about the 21st Thursday,
14--1--1915 : Buldana.

## रा. रा. काशिनाथ धर्माधिकारी*

[ नामस्मरण – कर्माग्रह नको व कर्मत्यागही नको – विषयदोष – यतमानवैराग्य – व्यतिरेकवैराग्य – एकेंद्रिय, वशिकार व परवैराग्य – अपरा व परा विरक्ती ]

वसंततिलका वृत्त

श्रीज्ञानराज गुरुच्या पदपंकजातें । मी वंदितें स्मरति हो सदपंक ज्यातें ॥
पावावयास यदुवल्लभपादचर्या । साष्टांग वंदन तुम्हांसहि विप्रवर्या ॥ १ ॥
आलें सुपत्र तुमचें परि नाठवीलें । यालागि आजवरि नोत्तर पाठवीलें ॥
माझ्या व्रतास्तव चुकी घडली समाजीं । मी याचितें द्विजवरां करणें क्षमा जी ॥२॥
ही काव्यशक्ति तुमची रुचिरा नवाजी । पाहोनि कोण न म्हणे शिखि हा नवा जी ॥
जी सूक्तिमाजि भरिते यमका समान । ती आवडे गिरिवरा चमकासमान ॥३॥
जो साधुदेवविषयीं नरमाधिकारी । तो काय होईल पदा परमाधिकारी ॥
यालागिं सांडुनि भवा रघुराज गावे । नोहे असें तरि उगें मग कां जगावें ॥४॥
गोविंद माधव अशीं सुपदें वदावीं । येणेचि मोक्षपद सत्कृप देव दावी ॥
नामाविणें न कलिकर्तन आन कांहीं । आसक्ति साधनचयीं चढवूं नका ही ॥५॥
जो हंस देहिं फिरतो सकला जनांच्या । त्यालाचि देउनि करी अपुल्या मनाच्या ॥
नामास ठेवुनि तदा द्वयसन्निधानें । सोहंस्वरूप करूनी मिळवा निधानें ॥६॥
हेही नव्हे परि हरी नयनांत जावा । तैं आधिं इंद्रियचयीं नयन त्यजावा ॥
तो श्यामसुंदरतनू भजका कृपाळ । भेटे सुदीन-सुजना करुणानृपाळ ॥ ७ ॥
कर्मे करोनि अति आग्रह तो नसावा । कर्मे त्यजोनि न घडो विषयीं विसावा ॥
कर्मे समर्पण म्हणोनिच माधवातें । केल्या झडे मळ जसा घनबाध वातें ॥ ८ ॥
श्रृंगार जो तनुवरी करि चारुगात्री । तो आरशांत दिसतो प्रतिबिंबगात्रीं ॥
बिंबेश्वराप्रति तसा नव मान हो तो । देतांचि जीव यदुनाथसमान होतो ॥९॥
वैराग्य हें न उपजे जरि इंद्रियांतें । सोडी न तो षडरिमुद्गर तंद्रि यांतें ॥
यासाठिं दोष विषयीं बरवे पहावे । ठेवोनि चित्त चरणीं हरिच्या रहावें ॥१०॥
वैकल्य तें प्रहरणें यतमानसाचें । वैराग्य तैं उपजतें यतमान साचें ॥
अग्रीं दिसे विषय तो हरिच्या पदातें । अर्पोनि संहरि मुनी महदापदातें ॥११॥
हे ईतुके हरिस भोग समर्पिले हो । हे ईतुके न हृदयांतुनि सर्पले हो ॥
ऐसाचि मानसिं जया सुविवेक होतो । त्याला विराग नव हा व्यतिरेक होतो ।१२।
चित्तांत राग परि इंद्रिय नानुकूल । दोघांमधें सगुण मूर्तिच हो दुकूल ॥
एकेंद्रिय श्रुति तया म्हणती विरक्ति । एवं मिळे त्रिकर्माप्रति पादरक्ति ॥१३।

**अस्तित्व होय विषयां परि भाव नाहीं । मिथ्या म्हणोनि हृदयीं लव हाव नाहीं ।**
**त्यातें विराग वशिकार असें म्हणावें। ज्ञानात्त-कृष्णरति-सत्फळ हें गणावें।१४।**
**योगेंहि जाय जरि चित्त असें लयाला । प्रारब्ध कर्म फिरवी पुढती तयाला ।।**
**श्रीकृष्णभक्तिच बळें त्रिगुणास वारी। वैराग्यही पर मिळे मग या प्रकारीं।१५।**
**मागेंचि जे विवरली अपरा विरक्ति । ती तोडिते विषयिची रसभावशक्ति ।।**
**आणीक बोलिलि पुन्हांहि परा विरक्ति। ती ज्ञान देउनि पुनः उरवीत भक्ति।१६।**
**एवंच भक्तितरु भक्तिच बीज याचें। प्रेमोत्थ पक्व फळ भक्तिच योग्य साचें।।**
**आळंदिपीठपतिनामसुधारसाला । जे सेविती नच तयां विपदा विशाला ।१७।**
**श्रीज्ञानदेव करुणार्णव नित्य गावा । जावों नये किमपि हो कृतिमिथ्यगावा।।**
**एवं वसंततिलका करुनी रसाच्या । पूजार्थ अर्पु गुरुपाउलसारसाच्या ।।१८।।**

---

* रा. रा. काशिनाथ धर्माधिकारी यांचे पत्र.

नंदस्यनंदनमनंतमनादिमध्यम् । निर्द्वंद्वमद्‌भुतमलंकृतगोपवृंदम् ।।
मंदाकिनीसुजलधूतपदारविंदं । वंदे मुकुंदमनघं सुरवृंदवंद्यम् ।। १ ।।

आर्या–सन्मानस-कमलवना भवनाशक जो हरी विकासविता ।
त्रासविता दुष्टातें पावो गोपीमुखांस हासविता ।। २ ।।

विश्व चराचर सुंदर विविध चमत्कारयुक्त तें ज्यानें ।
निर्मुनि इच्छामात्रें भासविलें सच्चिदात्मतेजानें ।। ३ ।।

त्या प्रभुला नमन असो श्रीकरुणामृतपयोधिला भावें ।
विधिहर सुरवर वांछिति कीं यत्पदरज सदैव लाभावें ।। ४ ।।

श्रीअलकाव्रतिपतिपद भावें भज नित्य परमसुखद मना ।
हेंचि खरें बा भेषज दुर्धरसंसारविषय-विषदमना ।। ५ ।।

सद्‌गुरु गुलाबराया जाया भवभय लया तुम्हां नमन ।
युष्मत्पद पूजावें वाटे वाहोनि सुमसमान मन ।। ६ ।।

सत्संगतिगंगेचें अवगाहन गमतसे महापर्व ।
तनूवाक्कायमनाचे निववी तापत्रय क्षणीं सर्व ।। ७ ।।

मत्पूर्वपुण्ययोगें तुमचें पदकमल लागतां सदना ।
सहजचि मजला लाधे मंगलमय पर्व तें कुमतिकदना ।। ८ ।।

बहु गौरवास्पद गमे मज तुमचें चर्मचक्षुहीनत्व ।
स्पष्टचि सिद्ध करी हो या योगानें पुनर्जनन-तत्त्व ।। ९ ।।

धन्यचि तुमची व्रजपति पदकमली प्रेमलक्षणा भक्ती ।
यदमृतमय रसपानें व्रजवनिता तुच्छ मानिती मुक्ती ।। १० ।।

श्रीज्ञानेश-वरद-कर सत्यचि तुमच्या शिरी सदा विलसे ।
चरित अलौकिक ऐसें याविण कोणी गमे न दाविलसें ।। ११ ।।

अनुभवयुक्तिश्रुतियुत वाणी तुमची अमोघ सन्महित ।
श्रवणीं सादर ऐकुनि साधति निज कितिक सुजन जन्महित ।। १२ ।।

नश्वर भवजन्य सुखा भुलले जन जे मना न आवरुनी ।
युष्मत्सदुक्ति सहजचि फिरविल त्यातें असत्पथावरुनी ।।१३।।

निर्मळ निज वचनामृत पाजा मज पत्ररूप पात्रानें ।
याविण काय करावी इच्छा मजसारख्या अपात्रानें ।।१४।।

मजसम मूढां बहु दे संसृतिचें प्रखर आतप त्रास ।
शमवा सत्वर नाथा ठेवुनि शिरिं निजकरातपत्रास ।।१५।।

हितकर उपदेशामृतपान सदा मजकडोनि करवा हो ।
दीनदयाळा तुमचा स्वशिरीं हा दीनअभयकर वाहो ।।१६।।

जें कांहीं अधिकोत्तर पत्रीं झालें असे कृपाला हो ।
ठेवा क्षमा तयाची हा जन तुमची सदा कृपा लाहो ।।१७।।

विस्तर असो; दयाब्धे, निज मलमति शुद्धतर करायातें ।
हा काशिनाथ विनवी कीं प्रेमें आप्तजन करा यातें ।।१८।।

आपला – काशिनाथ

## १९. रा. रा. बाबा गर्दे पत्र २ *

[प्रांजळपणा – नामस्मरणाचे कारण – संधिसमाधि – समता कोठे व विषमता कोठे योजावी ? – भक्ताने धर्म सोडू नये व कर्मठाने भक्ताला हासू नये – शूद्र व ब्राह्मण यांचे धर्म – प्रारब्धाने धर्म सुटला तरी त्याचे दु:खफल सत्पुरुष आनंदाने स्वीकारतात – उपासना व भक्तीथील भेद – निर्गुण होऊन सगुण भक्ती करावी. ]

श्लोक–पृथिवीवृत्त.

**प्रणम्य जगदीश्वरं हृदयशुद्धिकौधीवरं [1] । अलंदिमणिमद्वयं भवभयाब्धि-नौधीवरं ॥ यदीयचरणाश्रितस्सकलकिल्बिषैर्मुच्यते । तदीयकरुणालवा-लिखितमेतदत्रोच्यते ॥१॥**

**पदास मिळवावया बिसकुमार बाबाजिच्या । पदाम्बुजनना नमो सुसु-कुमार बाबाजिच्या ॥ सुपत्र तुमचे प्रभो मजसि आज हो पावले । कवित्व सुरपादपां धरणिवृत्त जे फावलें ॥२॥**

**तुझ्या हृदयिं गोपिवत् प्रभुरती भवद् बोलणें । जरि स्तव तथापि हा वर म्हणोनि म्यां डोलणें ॥ परंतु विधिच्या वरें दनुज-लेंकुरें मातलीं । तसा न मज गर्व हो अट हि पाहिजे घातली ॥३॥**

**विनिंदि मजलाचि जो सहज तुष्ट तो काळ जी । परि स्तवित जो मला बहु तदीय हो काळजी ॥ विनिंदक जना ममावगुण सांपडे नेटुनी । परि स्तवितया भल्या सुगुण दावुं मी कोठुनी ॥४॥**

**सुमाय रिझते सुताप्रतिच घालुनी भूषणें । भवत्कृत सुतस्तवें गुरु तसे तुम्ही तोषणें ॥ गुणीं रसिं विहीन मी ललित मात्र कोंडा वरी । उनाड निज लेंकुरा स्तवुं नयेचि तोंडावरी ॥५॥**

**असो घडु भवद्वरें हृदय चित्खतारावली । वृथा श्रुतिपथाविणा नयन-वित्खतारावली ॥ न घालि हरिच्या गळां करुनि नाम हारावली । उगे श्रम तदीय ते पढुनी नामहारावली ॥६॥**

**रमापपद आसुवें भिजवि ब्रह्मसारागिरी । अशास मग पाहिजे मनिं कशास कारागिरी ॥ जपें न न तपेंहि जो अणुहि गविता फावतो । न योग करितां कळे भजकपाठिं तो धांवतो ॥७॥**

---

१ निखिललोकहृद्धीवरं असे पाठांतर आहे.

जसा पवनमंत्र हा उलट हंस सोहं ध्वनी । तसा सम न जीव हा शिवचि होय सोहंध्वनी ।। अहंपण परंतु तें उभय ठायिंचें ना जिरे । म्हणोनि यदुवल्लभस्मरण सर्वदा साजिरें ।।८।।

हरिग्रहण योग्य तें जंव निजात्मसंबोधनीं । मग श्रम उगेचि कां करितसा अहंरोधनीं ।। खरें तदपि जागणें अधिक नीजणें सांडुनी । न संधित अहं पहा मतिविशेषता मांडुनी ।।९।।

परंतु चपळा मना किमपि भाव हा ना कळे । तरंग उठतां कसा जलधिथांव साना फळे ।। मन स्थित म्हणोनियां करिति योगि ज्या कारणें । सवृत्तिकहि तारितो मधुर नाम हाकारणें ।।१०।।

न वृत्ति उठती कशा सलिलबुद्‌बुदाचे परी । अशाच वदल्या बहु अवधुतादि-सद्वैखरी ।। खरें परि जलालयीं लहरि दो निमित्तीं घटे । शुभा शशिज आदिमा पवनजा दुजी संघटे ।।११।।

समुद्र पवनें चढे प्रबल जै तुफानावरी । महाकुशल तेधवां तरणिया नफा नावरी ।। शशांकजनिता शुभा लहरि सागरीं ऊठती । तदा भय विवर्जितें सहज तारुही सूटती ।।१२।।

अशा हृदयवृत्तिही द्विविध सत्त्वजा कामजा । शुभा प्रथम दूसऱ्या अशुभ घेति ना सामजा ।। स्वभावजचि आदिमा म्हणुनी भक्तीयोगीं सुखें । सहाय करिती हरिस्मरण चालतांना मुखें ।।१३।।

तरंग पवनोत्थ ते पवनरोधनें नासती । तशा विषयवासना पवनरोधनें नासती[१] ।। हरिस्मरण मात्र हें उभय कार्य सारें करी । हिरण्य परि घेति हे सुजन आर्य झारेकरी ।।१४।।

सकाम करितां श्रम प्रणवमंत्रपारायणीं । तदा न उदये दया हृदयसिद्ध नारायणीं ।। सुरालय सुरालयीं स्वसुख शेवटीं अल्प ना । म्हणोनि हरि चिंतिजे त्यजुनि पोटिं संकल्पना ।।१५।।

विराग न नरा बरा जगींत राग[२] जेणें घडे । उपासन न मान्य तें चरण[३] सारसें ऊघडें । रुचे न चितिचातुरी विषयवासना तर्पणें । म्हणोनि तनुमानसा दनुज-नाशना अर्पणें ।।१६।।

---

१ न+असती = रहात नाहीत. २ क्रोध. ३ वैदिकाचार.ब्रह्म. अ. ३ पा. ३.

न वागृणविमोचना स्वगुरुरूपशर्वापदा । नमी शठ तया कशा चुकति बोधगर्वापदा ।। न रंग हृदया जया चढत कृष्णसंकीर्तनीं । दिनेशकुमरा गृहीं पडत तो महाकर्तनीं ।। १७ ।।

कुणी यदुप-भक्तितें म्हणति योग्य कां, आयका । परद्विपमधीं हिनें विवश होति हो बायका ।। मिळेल मग देशही रिपु पडोनियां खालते । अशाऽशुचिकुलोद्भवा समयिं मांसही चालतें ।। १८ ।।

बहु वज्रप-भक्तही म्हणवितात आम्हांमध्यें । स्वमान मिळवावया त्यजिति सिद्ध सामा मदें ।। त्यजूनि बहु शास्त्र ते महिवरादि आवेशिती । परंतु शतमूर्ख हे बत उगे द्विजां द्वेषिती ।। १९ ।।

पराशरज बोलिले भजनयोग ज्या लाभला । द्विषड्गुणधरामराहुनि कुजाति तोही भला ।। न विप्रसम देवता पुढति वाक्य हें फावलें । म्हणूनि उभयान्वयें भजनसाम्य हो पावलें ।। २० ।।

समत्व भजनीं असो; विषमता असो भोजनीं । समत्व हरिकूजनीं विषमता ऋतूपूजनीं ।। अपक्व सम-दानही विषम कांचनाद्यर्पणीं । समत्व चितिदर्पणीं, विषमता बरी तर्पणीं ।। २१ ।।

स्वभक्त्यभिमतिस्तव द्विजविधान नासूं नये । द्विजेंहि परि कर्मठें हरिजनांस हांसूं नये ।। दरिद्रचि भलें कुणा कधिंहि तोंड वासूं नये । अधर्म करुनी गळां रविज-रज्जु फांसूं नये ।। २२ ।।

न शूद्र निगमें तरे प्रणवकोटि संकल्पुनी । न विप्रहि तरे वृथा यदुप नाम हें जल्पुनी ।। पुराण हरिभक्ति दे श्रवण योग्य शूद्रां जनां । स्वभक्तिरसिं मीनता हरिच देत मुद्रा जनां ।। २३ ।।

बळें द्विजचि होउनी निगम जो वृथा सांवडी । विरक्ति न तया परी यमचि भक्षितो आवडी ।। स्वकीय अणु सोडुनी परधनार्थ जो धांवतो । वदान्य असला तरी सहज चोरता पावतो ।। २४ ।।

गुरुद्विजपदाम्बुजीं मम अखंड वाढो रती । स्वधर्मपरिपालनीं निज मना जडो आरती ।। न स्वप्नगत भोग्य ही जननि जींव पुत्रादिकां । अधर्म न बरा तसा पठितवेदसूत्रादिकां ।। २५ ।।

स्वदैववश सन्मुनी बहुत धर्म हो सांडिती । परंतु फळ भोगितां मग न दीनता मांडिती ।। व्रजेश परबायका हरी म्हणोनि तद्वायका । बळें हरिति भिल्ल हें चरित भारतीं आयका ।। २६ ।।

पढोनि निगमांतही उगिच धर्म जो वारिता । न पाप चिति मी असें म्हणुनि त्यास संहारिता ।। श्रुति स्फुट कळे असा असल आततायी तरी । तयास वधितां म्हणे स्मृति न दोष ये अंतरीं ।। २७ ।।

स्वजीव जरि ईश्वरा रचित दृष्टिसृष्टयन्वयें । तथापि न तदिच्छया भलतिशीच सृष्टयन्वयें ।। स्वयें अबुध होउनी हरिस देत सर्वज्ञता । स्वपाद हृणि त्या अशा कवण दे अपूर्वज्ञता ।। २८ ।।

कदापि न शके रचूं उलट ईश्वरा जीव हा । वृथाचि मग गर्व कां वचनमात्र निर्भेव हा ।। वडील यदुवल्लभा समजुनी मनीं जो भजे । तयाप्रतिच शोभतें निगमवित्त निस्तोभ जें ।। २९ ।।

उपास्तिसम भक्ति ते म्हणति तुच्छता वासना । उपास्ति परि अज्ञ घे रुचत भक्ति निर्वासना ।। उपास्ति निजयत्नजा कृतिसमुच्चिता भावना । गुणश्रवण ज्या घडे सहज भक्तिनिर्भावना ।। ३० ।।

म्हणे तनु न हे विभू सगुण माधवाची अणू । तयास कळली नसे चिति पढोनि वेदां अणू ।। पुरीततित भासते जग-नभादि सारें जरी । खसाम्य-विभुता सदा हरिविषीं नव्हे साजिरी ।। ३१ ।।

न मध्य न महत्यणू सकलशब्द-लक्ष्या चिती । तथापि सुगमा गमे पदविबोध-पक्षा चिती ।। विरुद्ध न तदा कदा सगुण माधवाची तनू । दिसे कनक-भूषणीं वपुगुणीं तसा चेतनू ।। ३२ ।।

सुवृत्ति असतां तळीं अगुण जो भला आठवी । स्ववृत्ति उठतांक्षणीं सगुण अंतरीं साठवी ।। स्वयें अगुण होउनी सगुण चिंतितो सादरें । तदीय चरणांबुजीं भ्रमर चित्त हो आदरें ।। ३३ ।।

---

* बाबा गर्दे यांजकडून पत्रोत्तर.

श्रीहरिगुरुभक्तिपरायण गुलाबराव महाराज यांचे चरण सेवेसी.

(श्लोक–पृथिवीवृत्त.)

प्रसाद तुम्हि धाडिला सदय होऊनी जो मला । धुळयांत असतांचि तो सुसमयीं मला पावला ।। गिरा मधुर तूमची मधुर त्यांतही छंद तो । जया शिखरिणी कवी म्हणति फारची शोभतो ।।१।।

प्रसन्न तुमची गिरा सुरनदीप्रवाहापरी । कवित्वरचना किती सरल जी मनाला हरी ।। प्रगल्भ उपदेश गर्भित सुनम्र वाणी असी । करि श्रवण जो, रुजे त्वरित भक्ति तन्मानसीं ।।२।।

तुम्हां विनवितें प्रभो चरण मस्तकीं घेउनी । यथावचनरूप हे पृथिवि दान हो देउनी ।। प्रसन्न करुं इच्छितें वर गुरो मला पाठवा । अखंड अवतार हा मम मनीं वसो आठवा ।। ३४ ।।

अलंदिपति-सद्गुरुस्मरणदीप जैं पाजळे । तदा चितिविशेषता कळुनि भास हा पां जळे ।। विशेष चितिसौरसें निखिल हारपे दर्प तो । नमोनि शतदा तया लिखित पाउलीं अर्पतो ।। ३५ ।।

श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु.

---

द्विजावरि बहू दिसे सहज भक्ति जी त्वन्मनीं । दिसे न तसि भूवरी क्वचितही इदानींतनी ।। तसा द्विजहि आढळे जगिं न योग्य जो भक्तिला । म्हणोनि न गमे अहो नवल त्यांत कांही मला ।।३।।

जिथे सुदृढ बोध ठाव न तिथें असे भक्तिला । असाचि बहुधा जगीं नियम दीसतो दृष्टिला ।। परंतु तुमच्या प्रभो हृदयिं भक्ति जैसी दिसे । तसा सुदृढ बोधही; नवल जाहलें हें कसें ।।४।।

विराग तव देखुनी मम मनीं तुका आठवे । स्वबोध दिधला तुला मज गमे अळंदीधवें । तुझ्या बघुनि भक्तिला झुरति मत्सरें गोपिका । शिरीं धरिन मी अशा पदभवाचिया पादुका ।।५।।

□□□□

## २०. रा. रा. विठ्ठल रामचंद्र सी. यांस पत्र

[ मनाचा निरोध कसा करावा ? राजयोगातही स्वप्रयत्न–योगाचा अधिकार–एका स्त्रीची गोष्ट–मस्तकावर हात ठेवणे व स्वप्रयत्न–शास्त्रप्रत्यय, गुरुप्रत्यय व आत्मप्रत्यययांचा मेळ]

# राजयोग

।। श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ।।

१) रा. रा. विठ्ठल रामचंद्र सी. २७, पन्नालाल टेरेसेस्, ग्रांट रोड, मुबई, यांस सा. दंडवत वि. वि., आपले कृपापत्र पावले. वाचून आनंद झाला. आपण जसा प्रश्न विचारला, अशा प्रकारचे प्रश्न मला अनेक लोकांनी विचारले आहेत. कांही लोक योगाचा अभ्यास करण्याकरिता मजजवळ येऊन, झाला नाही म्हणून निघूनही गेले आहेत, आपलाही प्रश्न त्याच कोटींतला असल्यामुळे यथामति उत्तर लिहितो. रुचेल तर ग्रहण करावे.

२) मन स्थिर होत नाही, एवढ्या सबबीवर राजयोगाचा अभ्यास करावा असे वाटणे साहजिक आहे. परंतु राजयोगांत तरी मन स्थिर स्वतःच करावे लागते; आपोआप होत नाही. आपल्यासारख्यांचा प्रश्न विचारण्याचा उद्देश असा असतो की, जसे काही मन कोणी हाताने दाबून स्थिर करून द्यावे; १ पण तसे होत नसते. आपल्यालाच ते हळुहळू करावे लागते–माझ्या आतेच्या मुलाला चिलमेचे व्यसन होते. म्हणून कोणी सांगितले की, "तूं तंबाखू खात जा, म्हणजे तुझी चिलीम सुटून जाईल." तेव्हां त्याने तंबाखू खाणे सुरू केले. परंतु चिलीम सोडण्याचा कांही यत्न केला नाही. त्यामुळे एका व्यसनाच्या ऐवजी त्याला दोन व्यसने जडली ! तशीच गोष्ट क्रियेची आहे. मनाचा आपल्या हाताने हळुहळू निरोध केल्यावांचून, एखादी शारीरिक क्रिया केल्याने मनाचा निरोध होतो असे नाही. माझा एक स्नेही निबदेव आहे. त्याने षट्क्रिया केल्या. जीभ टाळूला लाविली. परंतु तो म्हणाला, "मला अमृताच्या ऐवजी टाळूंतून शेंबूडच माझ्या जिभेवर येतो !" मनाने सत्रावीचें घ्यान केल्यावांचून अमृतस्राव होत नसतो. कितीही कसरत केली, तरी मनाची एकाग्रता स्नायूंवर केल्याशिवाय फायदा होत नाही, असे सँडो स्वतः म्हणतो. तेव्हां आपल्या हाताने मनाचा मुळीच निरोध न करिता कोणता तरी उपाय शोधणे हे योगशास्त्रसंमत नाही.

३) बरे, ज्याला आपल्यासारखाच प्रश्न करावयाचा आहे, तो ब्रह्मदेवासारखा गुरु असला तरी त्याला अडवूं शकेल. गुरूने प्रथम सांगितले की, 'बाळा, सत्य बोल' म्हणजे तो म्हणेल, "माझे सत्यावर मनच बसत नाही. सत्याच्या ठिकाणी मन स्थिर करण्याकरिताच मला एखादा योग सांगा." तेव्हां गुरूंनी काय करावे बरे ? सत्य तर योगाच्या पहिल्या पायरीत, यमांतच आहे. तेव्हा गुरूने यमाच्या खाली आणखी कोणता योग आणावा बरे ? एका बाईने मला विचारले होते कीं, "माझे पतीच्या सेवेत मन बसत नाही, तर काही उपाय सांगा." तेव्हां "दृढ श्रद्धा ठेव." इतकेच मला लाचार होऊन सांगावे लागले. एवढ्याने तिने ऐकले म्हणून बरे झाले. समजा, तिने म्हटले असते की, "माझी श्रद्धा बसत नाही, तर यालाच काही उपाय सांगा;" तर मी काय केले असते बरे ? श्रद्धा कांही तुळशीची माळ नव्हे, की हाताने घेऊन भसकन् तिच्या गळ्यात टाकली असती !* स्वतः होऊन जो मनाचा निरोध करण्यास तयार नाही, केवळ उपायांवरच ज्याची भिस्त आहे, त्याला योगापासून तरी काय उपयोग होणार ?

---

* असते गाठोडे दिले असते हातीं । परि हरिस्थिती तैशी नाही ॥

४) म्हणूनच अभ्यास आणि वैराग्य या दोघांच्याही योगाने मनाचे ग्रहण[१] करावे, असे भगवंताने गीतेत म्हटले आहे. जेथे जेथे मन जाते तेथून तेथून त्याला बलाने ओढून आणून आत्म्यावर स्थापन करावे, असेही भगवंतांनी सहाव्या अध्यायात "यतो यतो निश्चरति" या श्लोकात म्हटले आहे.

५) तात्पर्य, राजयोगातदेखील मनोनिरोधाकरितां स्वतःचा प्रयत्न पाहिजेच. ज्याच्याख्याने प्रयत्न होत नाही, जे केवळ परतंत्र आहे, असे क्षिप्त आणि मूढ चित्त योगास अधिकारी नाही; तर ज्याला थोडा तरी स्थिरतेचा अनुभव आहे, असे प्रयत्नवान् विक्षिप्त चित्तच योगास अधिकारी आहे." हा योगशास्त्राचा सिद्धान्त होय. माझा उपदेश ऐकण्याकरितां बैस, असे म्हटल्यावर "मला बसवतच तर नाही तुम्ही मला बसविले पाहिजे !" असे कोणी म्हणेल तर त्याला उपदेश तरी कसा करावा ? अशा सर्वशास्त्रविरुद्धांना शिकविण्यास भगवान् सूर्यनंदनच समर्थ आहेत.

६) याविषयी एक गोष्ट लिहितो. एका पुरुषाची स्त्री त्याच्याशी कांही बोलत नव्हती. तेव्हा तो खिन्न होऊन घरांतील बायांजवळ त्याने तिचे गाऱ्हाणे सांगितले. तेव्हा तिची मोठी जाऊ तिला म्हणाली– 'कां ग ? तूं आपल्या पतीशी भाषण कां करीत नाहीस ?' ती म्हणाली– 'काय करूं ? मला त्यांच्याजवळ जाण्याचीच भीति वाटते.' जाऊ म्हणाली– 'तर मग तूं दुरून बोलत जा.' ती म्हणाली– 'मला बोलण्याचीच तर लाज वाटते.' तेव्हा जाऊ म्हणाली– 'दुसऱ्याच्या हातून सांगून पाठवीत जा.' ती म्हणाली– 'दुसऱ्याला बाई असे सांगणे मला कसेसेच वाटते.' जाऊ म्हणाली– 'तर मग तूंच खुणेने त्यांना कळवीत जा ? तेव्हा ती स्त्री म्हणाली– 'तेच तर कठीण आहे !' मोठी जाऊ म्हणाली– 'तर मग मरूं दे त्यांना खुशाल ? तेव्हा ती म्हणाली– 'देवाची मर्जी !' अशा प्रकारे बिलकूलच प्रयत्नाने खुणाखाणाही न करणाऱ्या मनुष्याच्या मनाचा, राजयोग काय हाताने निरोध करील होय ? मनोनिरोधाचा प्रयत्नाने अभ्यास करणे, याचेच नांव राजयोग आहे. 'प्राणसंयमन, संधिसाधन, पटलनिरास, त्रिपुटीपरिहार आणि समाधिसंजीवन इत्यादि गोष्टींकरिताच फक्त योगात गुरूची अपेक्षा आहे; प्रयत्नाकरितां नाही.' कितीही वेळपर्यंत प्राणाचा निरोध झाला तरी मनाचा

१. निरोध करावा.

प्रत्याहार शेवटी प्रयत्नानेच करावा लागतो. नुसत्या प्राणायामाने मन थोडा वेळ मूर्च्छित होते, पण इष्ट स्थळीं एकाग्र होत नाही; असा योगशास्त्राचा सिद्धान्त आहे.

७) आतां मस्तकावर हात ठेवून जर कोणाच्या मनाचा कोणी निरोध करीत असेल तर ती कला मी जाणत नाही.– "नाहीं देवापाशीं मोक्षाचें गाठोळें। आणोनी निराळें द्यावें हातीं ॥" असे समर्थ श्रीतुकाराम महाराजांनी म्हटले असून गुरूपाशी ज्ञानाचा गोळा नाही की, जो सगळा आणून देईल. तर गु सांगतील तो पंथ शिष्याने जबरीने सर केला पाहिजे "कित्येक बुद्धीच्या विश्वासावर गरूला मानीत नाहीत, त्यांचा देहाभिमान व नामरूप, केवढाही विवेक केला तरी सुटत नाही", असा अनुभव आहे. जे केवळ गुरूवरच भरंवसा ठेवितात व प्रयत्न करीत नाहीत, ते महंमदाच्या वकिलीने पापाचे बक्षीस मागणाऱ्या मुसलमानाप्रमाणे होत. त्यांचा आळस कधीच जात नाही. म्हणून 'गुरु-प्रतीति, शास्त्रप्रतीति व आत्मानुभव' या तिहींच्या साह्यानेंच मनुष्याने चालावे. १–शास्त्रप्रत्यय म्हणजे शास्त्रांत सांगितलेला सामान्य मार्ग. २–गुरुप्रत्यय म्हणजे आपल्या अधिकारानुसार शास्त्रांतून गुरूने आंखून दिलेला मार्ग. ३–आत्मप्रत्यय म्हणजे प्रयत्नानुसार आलेला निरोधाचा अनुभव, व ४–त्याचा पुन्हां गुरुशास्त्रांशी पडलेला मेळ. अशाच अर्थाची एक स्मृतिही आहे.

स्वयं प्रतीतिः स्वगुरुप्रतीतिः शास्त्रप्रतीतिर्मनसश्च रोधः।
दिने दिने यस्य भवेत्स योगी सर्वेषु कालेषु सुसंमतोऽभूत् ॥

मागे लिहिल्याप्रमाणेच या श्लोकाचा अर्थ आहे.

मला सुचले तसे आपल्या पत्राचे उत्तर लिहिले. भाषेच्या न्यूनाधिक्याची क्षमा होईल, अशी आशा आहे. पत्र वाचून प्रेमोत्तर लौकर पाठवितील. कळावे.

अमरावती.
ता. १५।५।१९१४

आपला,
गुलाबराव गुंडोजी मोहोड.
मोकद्दम माधान,
हल्ली मुक्काम उमरावती

□□□□

## २१. वेद. सं. रा. श्रीनिवासशास्त्री हरिदास

[ मला धुळीतून बाहेर काढले–लोककल्याण करणाऱ्या आधुनिक धार्मिकांची धर्मावर कुऱ्हाड–कान्हेरे शास्त्रींचे खंडन–माझ्यातील विशेष : प्रक्रियाप्रावीण्य–देशहितपटूंच्या चुका – विवेकानंदाचे खंडन–वर्णसंशयवादाचा अभिप्राय–माझे वर्णसंशय उद्गार परलोपयोगी – स्वामी रामतीर्थांचे खंडन – दोन प्रकारचे आपत्काल – दयानंद केशवचंद्र सेन–विवेकानंद–सुधारकांचे स्वरूप–ब्राह्मण व शूद्र दोघेही माझे विरुद्ध–चमत्कार–वारकरीही विरुद्ध–शंकराचार्यही विरुद्ध–धर्माचे कार्य–महाराजांना साह्य करण्याचे दहा प्रकार–वेदान्त मजजवळूनच शिकावा. ]

# धर्मसुधारकांचा समाचार

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली ॥

**१) तीर्थस्व. अण्णासाहेब यांचे चरणीं सा. न. वि. वि. वेद० नरहरशास्त्री धर्माधिकारी येथे येऊन आपला मुख्य मुक्काम सांगितल्यामुळे मी हे पत्र पाठवीत आहे. श्रीमहाराजांच्या म्हणण्याप्रमाणे आता आपण काय करावे, असे नरहरीचे व मंडळीचे झालेले बोलणे त्याने मला सांगितले. मला प्राय: आपलाच भरंवसा आहे. मधून मधून आपल्या जरी थोड्याशा बोलाचाली झाल्या असल्या, तरी प्रसंगी एकमेकांपासून कधीही तुटून राहणार नाही असे माझे तरी निदान धोरण आहे. आपल्या मनुष्यापुढे प्रसंगी हार खाण्यात देखील मला काही वाटत नाही,** "क्वचिद्दिव्यं शौर्यं क्वचिदपि रणे कापुरुषता" **या गोष्टी पुरुषाच्या अंगवळणी असल्यामुळे त्या अर्धांगीच्या आंगी सहजच असणार. "मला धुळीतून बाहेर काढण्याचे काम आपण व मुळेप्रभृति मंडळीने केले हे मी कधीं विसरणार नाही." आता माझे गाऱ्हाणें कसे आहे हे थोडेसे लिहितो; म्हणजे आपणास कामाची दिशा निवडून घेता येईल. प्रथम लोककल्याण करावयाचे म्हटलें तरी आपल्या स्वार्थाचा अंश त्यांत असलाच पाहिजे असे माझे मत आहे. तो स्वार्थं म्हणजे स्वत:ची सद्गति, मोक्ष इत्यादिक होय. आपल्यास ज्या सिद्धांताची जरूर आहे तोच सिद्धांत आपण लोकांजवळ कळकळीने सांगू शकतो. केवळ लोकांकडे लक्ष देऊन आपला पारलौकिक स्वार्थ आपण धरला नाही, तर स्वत:च ऐहिक चार्वाकासारखे बनून धार्मिकाच्या नांवाखाली धर्मावर कुऱ्हाड घालणारे आपणच होत असतो. याविषयींचे हल्लीचे एक उदाहरण लिहितो :—**

आधुनिक धार्मिकांची धर्मावर कुऱ्हाड

२) सध्यां वेद० कान्हेरेशास्त्री उमरावतीला आले होते. त्यांचेकडे नरहरीने जाऊन कांही शंका विचारल्या. तेव्हा ते म्हणाले, "तुम्ही शास्त्री असाल तर या शास्त्रांची किट्किट् करीत बसा. मुमुक्षु असाल तर तुम्हांला योग्य वाटेल तो मार्ग धरून बसा. माझे तर ठरून गेले आहे की, श्रीकृष्णाची भक्ति करावयाची; व मला श्री. सयाजीरावांनी बोलाविले आहे, तेव्हां विलायतेस जावयाचे आहे. हिंदुस्थानचे लोक इंग्लिशांच्या तोंडून जेव्हां कांही निघते तेव्हांच त्याला मान देतात, म्हणून मला तसे करणे भाग आहे. श्रीकृष्णाची भक्ति कां करावयाची ? तर तिकडे वाईट बायका फार आहेत. तिकडे त्यांना तीच पटते म्हणून."

३) अहाहा ! काय हा भागवतधर्म ! स्वतः ज्याला श्रीकृष्णभक्तीचा बाण लागला आहे; त्याला अशा प्रकारे श्रीकृष्णभक्ति विकण्याची बुद्धि होणे शक्य आहे काय ? शिवाय उपदेश करणे म्हणजे आपल्याजवळ असले नसले तेवढे सांगून आपण कोरडे ठणठणीत बनणें असा अर्थ नव्हे; तर आपण जितक्या ज्ञानाने तृप्त झालो असूं त्याच्या लेशमात्रज्ञानाने दुसऱ्याने तितकेच तृप्त होणे असे करणे होय. अभ्यास नसतां नुस्त्या वाचिक ज्ञानाची पहिल्या उपदेशकाप्रमाणेच गति होते. "मी शब्दसामर्थ्यांत नसलो तरी अर्थज प्रक्रिया रचण्यांत आपल्या कृपेने प्रबल आहे. आणि हाच माझ्यामधील विशेष आहे. नाथतुकारामादिकांतही शब्दसामर्थ्यापेक्षा हाच विशेष होता. म्हणूनच मला पृथ्वीतील कोणत्याही पंडिताची आपल्या कृपेनें भीति वाटत नाही. 'अमरा निर्जरा देवा" इत्यादि श्लोक मला पाठ नाहीत. हवे तर ते करून देता येतील असो.

देशहितपटूंच्या चुका

४) नरहरीने पुढे विचारले, "गुलाबरावांची व तुमची भेट झाली होती काय ?" ते म्हणाले "छे बा ! ते आले तर मी घरांत बसून राहीन. वादविवादाच्या किटकिटीत कोण पडे? आमची धोरणे ठरलेली आहेत. शिवाय वाटेल त्याचे खाणेपिणें देशाच्या हिताकरितां आम्हांला चालते. मराठापक्षखंडणावर व जातिपक्षमंडणावर त्यांचा (गुलाबरावांचा) एवढा कटाक्ष कां असावा," असेही ते एकाजवळ बोलले. तेव्हां हा एक पक्ष माझ्या-विरुद्ध कसा आहे ते यावरून सहजच कळेल.

५) आता या विलायतेत जाणाऱ्या देशहितपटूंच्या हातून स्वार्थदृष्टीनें काय चुका होत असतात ते मी निश्चित सांगतो. पहिली चूक यांचा

विषयरोध मुळीच होत नसतो, आणि मोठ्या लोकांच्या बरोबरीत जाऊन चैनीच अधिक वाढत असतात. बरे; इकडे आल्याबरोबर मग त्या चैनी सुटत नाहीत. पण ही चूक प्रारब्धानुसार क्षम्य मानली, तरी दुसरी एक चूक होत असते. ती ही की, वाटेल तसे वागण्याचा प्रसंग आल्यामुळे वेदाच्या एका भागावर विश्वास व एक' भागावर अविश्वास असा मुद्दाम ठेवावा लागतो उपनिषदांतील "तत्त्वमसि" वाक्यावर विश्वास तर "शुचिर्भूत्वा श्रुणुयात्" इत्यादि वाक्यांवर अविश्वास ठेवावा लागतो. त्यामुळे 'वेद पूर्वी ज्ञानमय होता; व पुढे कर्माचे बंड त्यांत शिरले;' किंवा, 'रानटी लोकांनी पूर्वी कर्ममय वेद काढून, ऋषींनीं ज्ञानकांड घालून त्याची सुधारणा केली.' अशा प्रकारच्या खुळ्या समजुती परदेशात जाऊन ज्ञान सांगणाऱ्या सर्व लोकात रुजून बसतात, च त्यामुळे वेद पौरुषेय आहेत हाच सिद्धांत दृढ होत असतो. विलायतेत जाऊन आलेल्यांच्या पुस्तकांमध्ये असे काही ना काहीं खूळ सांपडावयाचेच.

स्वामी विवेकानंद

६) याविषयी एक दोन उदाहरणेंही देतो. स्वामी विवेकानंद आपल्या 'ईश्वर विषयक कल्पनेचा विकास आणि माया" इत्यादि व्याख्यानांत म्हणतात– "पूर्वी रानटी लोक अमुक प्रकारचा ईश्वर आहे असे मानीत होते, परंतु पुढे उपनिषदांत एकेश्वरवादाची उत्क्रांति होऊन सर्व ब्रह्म एकच आहे, अशी त्यांत सुधारणा झाली. 'इंद्रो मायाभि: पुरुरूपमीयत' इत्यादि श्रुतीवरून पूर्वी लोक एखाद्या लहानशा भ्रमालाच माया समजत असत. परंतु अखेर शंकराचार्यांच्या वेळेला मायेला व्यवस्थित स्वरूप लोक देऊं लागले, व जशी जगाची आंतली बाजू ब्रह्म आहे तशी बाहेरची बाजू माया आहे असे निश्चित दिसू लागले." या विवेकानंदाच्या म्हणण्यांत आमच्या वेदाला किती रानटी स्वरूप येत आहे हे सहजच कळेल. स्वामी आपल्या "Reform of the Caste" या व्याख्यानांत म्हणतात :–"जातिभेदाच्या मुळाशी ब्राह्मण आहेत. शंकराचार्यांनी आपल्या भट्टींतून हा जातिभेद नवीन उपस्थित केला आहे." असे परक्या लोकांना सांगणें म्हणजे हिंदुस्थानांतल्या ब्राह्मणांविषयी गैरसमज करून देणेच होय असे माझे मत आहे.

वर्णसंशयवादाचा अभिप्राय

७) यद्यपि वर्णसंशयाविषयीं माझे उद्गार आहेत, तथापि जातिभेद हे थोतांड आहे, असा बिलकूलच ऐहिक वाद घेण्याला मी तयार नाहीं. माझ्या वर्णसंशयवादाचा असा अभिप्राय आहे की, परजातीमध्ये तुकाराम-महाराजांसारखा एखादा महात्मा निघाला म्हणजे त्याला नुसत्या जन्मावरूनच

तुच्छ करणे योग्य नव्हे. मंद गुणकर्मांचा जन्मांतरीय जात्यंतर-परिणाम, आणि तीव्र गुणकर्मांचा इहजन्मनि जात्यंतरपरिणाम योगशास्त्रप्रसिद्ध आहे; म्हणून यथेष्टाचरण करण्याकरितां जाति गुणकर्मवादाने आहेत, असे म्हणणारा पक्ष लबाड आहे, असे मी स्पष्ट म्हणतो. कारण, तेवढे म्हणणाऱ्यांच्या आंगात तीव्र गुणकर्मे आहेत असे मला दिसत नाही. त्याचप्रमाणे खराच तीव्र गुण-कर्मवान् महात्मा एखाद्या जातीत असला, म्हणून तेवढ्यावरूनच त्याला तुच्छ समजणे, हे मी उत्तम समजत नाही. कारण लिंगशरीराला जाति नसल्यामुळे व बुद्धि लिंगशरीरांतर्गत असल्यामुळे तिच्या साह्याने मनुष्य आपली सुधारणा एका जन्मांत किंवा अनेक जन्मांत करून घेऊ शकतो, असे माझे मत आहे. म्हणजे मंद गुणकर्मरूपाने जन्मजातिवादाचा व तीव्र गुण-कर्मरूपाने गुणकर्मवादाचा पारलौकिक उपयोग आहे. अशा प्रकारचा अनेकविध निर्णय सुरतरूमध्ये (मी) केलाही आहे.

वर्ण संशयाचे उद्‌गार लोकोपयोगी

८) राहिली खाण्यापिण्याची गोष्ट. पण ती अत्यंत व्यर्थ आहे असे माझे मत आहे. कारण, ब्रह्मवेत्त्याचे उष्टे खाल्यानेच ब्रह्म मिळते, असे कांहीं स्पष्ट कोठे म्हटलेले नाही. शिवाय ब्रह्मवेत्ता, माझे उष्टे खाल्ले पाहिजे असे जर शिष्याला म्हणेल, तर त्याचे ठिकाणी राग दिसून येत असल्यामुळे, तो ब्रह्मज्ञानी आहे असेच मी म्हणणार नाही. संन्यासी सर्वगुणसंपन्न आणि ब्रह्मवेत्ता असला तरी त्याचे हातचे खाण्याची मनाई आहे. तेव्हा सबगोलंकार करणे हा एक प्रकारचा जिभेचा चवना आहे, दुसरे काय ? "माझे वर्ण-संशयाचे उद्‌गार तरी परलोकोपयोगी आहेत" असे मी आपणास सांगून ठेवतो. शंकराचार्यांनी जातिभेद नवीन उत्पन्न केला असे म्हणणारा नीच मनुष्य तर शंकराचार्यांला लुच्चा ठरवू पहात आहे; आणि त्यांच्या वेदान्त-ज्ञानावर अभयानंदादिकांचे मुके घेणे त्याला बरे वाटते ! हा आरोप मी प्रमाणपुरःसर करीत आहे.

स्वामी रामतीर्थ

९) स्वामी रामतीर्थ म्हणतात– "पूर्वी ऋषींनी स्मृति म्हणून ठेवल्या असतील पण आतां तुम्हाला काय वाटते ? सर्वदा ऋषीवरच अवलंबून राहिल्याने होईल काय?" म्हणजे स्वामीरामतीर्थांच्या म्हणण्याप्रमाणे आमचे ऋषि दूरदर्शी नव्हते असेच म्हणावे लागते; परंतु हे निकालस चुकीचे आहे.

एखाद्या कार्याकरिता आपद्धर्माने कोणाचे हातचे खाणेंपिणे जरी झाले, तरी प्रायश्चित्त घेऊन पुनः संपद्धर्मांत येता येते, असे आमच्या ऋषींनी पहिलेच म्हणून ठेविले आहे. दुष्काळात एका सईसाच्या हातची भाकर एका ब्राह्मणाने घेतली, पण त्याचे पाणीं घेतले नाही, अशी कथा उपनिषदात आहे. म्हणून प्रसंगी योग्य तसे वागून पुनः आपल्या मार्गावर कायम राहणें असा आमचा आर्षधर्म आहे.

आपद्धर्म व संपद्धर्म

१०) प्रसंगही दोन प्रकारचे आहेत. आगंतुक प्रसंग आणि दैवज प्रसंग. कृत, त्रेत, द्वापार, कलि ही युगे 'दैवज प्रसंग' होत. आणि दुष्काळ, म्लेंच्छोद्भव, धरणीकंपादिक 'आगंतुक प्रसंग' होत. १– आगंतुक प्रसंगाने भ्रष्ट झालेला मनुष्य पूर्व धर्मांत प्रायश्चित्ताने येतो. २–दैवज प्रसंगात सांपडलेल्या मनुष्याकरिता मात्र परमेश्वर संतांकडून समयनिर्बंध करीत असतो. हेंच माझ्या वागण्याचे व कामाचे धोरण लक्षात ठेवावे. आगंतुक प्रसंगाप्रमाणें ऋषीला धाब्यावर बसवून नुस्ता नवीन धर्मच जर प्रसिद्ध केला व सबगोलंकार इत्यादि रूढी त्याच्या कायमच केल्या, तर प्रायश्चित्त घेऊन देखील पुनः आपल्या संपद्धर्मांत आले पाहिजे अशी कोणालाच इच्छा होणार नाही. दैवाने स्वातंत्र्य मिळाल्यावर देखील विषय अधिक सुलभ झाल्यामुळे वैदिक प्रायश्चित्ताच्या भानगडीत कोणी न पडून म्लेंच्छधर्मानेच सर्वांना रहावेसे वाटेल Protestant धर्मांत गेलेल्या लोकांचा जाच बंद झाल्यावरही पुनः ध्यानाला सुलभ अशा मूर्तिपूजक धर्मांत (त्यांचा) आगम कोठे झाला आहे? २– मससमानांच्या त्रासास्तव वेदधर्माला तुच्छ करून सबगोलंकार करणारा जो नानकधर्म त्यामध्ये तरी जाच बंद झाल्यावर शीखलोक आम्हीं हिंदु आहोत असे म्हणण्याला कोठे तयार आहेत?

११) तात्पर्य, आपद्धर्माला प्रसंगानुसार मुख्य समजून त्यालाच शेवटपर्यंत संपद्धर्म समजल्याने एकदम एक पंथच निराळा उत्पन्न होऊन तो कायमचा वैदिक धर्माहून निराळा पडतो. दयानंदाचा आर्यसमाज, केशवचंद्राचा प्रार्थनासमाज, विवेकानंदाचा उदारधर्म यांची अशीच स्थिति होत गली आहे. आपणाला अशा प्रसंगापासून म्हणजे कलीपासूनही वैदिक धर्माचें रक्षण करावयाचे आहे; आणि तेवढ्याकरिता आपली मला मदत अपेक्षित आहे हे म्हणणें आपणाला "सुरतरु" वाचून पाहीपर्यंत चमत्कारिक वाटेल हे मी जाणून आहे. म्हणूनच एक वेळ सुरतरु झाला तितकाच माझ्या प्रियमंडळींनी

ऐकावा, व पुढे पुरा झाल्यावर पुनः ऐकावा, व प्रियमंडळीच्या मतांचाहीं त्यात सत्कार व्हावा अशी माझी इच्छा आहे.

सुधारकांचे स्वरूप

१२) याप्रमाणे सुधारकपक्ष माझा कसा विरोधी आहे हे मी स्पष्ट सांगितले. देशाचे काम व धर्माचा चिवडा हे सध्या सुधारक म्हणविणारांचे काम ठरलेलें आहे. पारलौकिक स्वार्थ साधावयाची इच्छा त्यांच्या मनांत नसल्यामुळेच हा घोटाळा होत आहे. जवळजवळ त्यांचा परलोकावर विश्वासच नसतो, व धर्माचा नुसता आव असतो, असे मी म्हणावयास चुकत नाही. परलोकावर ज्याचा विश्वास आहे. असा मनुष्य एकाद्यादेखील शास्त्रवाक्याला झुगारून देण्याविषयी कचरत असतो.

१३) आता दुसरे असे की, मी स्वतः ब्राह्मणपक्षाचा व वैदिक मताचा असल्यामुळे माझी मराठा जाति माझ्याविरुद्ध आहे हे प्रसिद्धच आहे. तिसरे जुना ब्राह्मणवर्ग मी नुस्ता शूद्र आहे म्हणूनच विरुद्ध आहे. याविषयी येथले एक उदाहरण देतो :–लाखपुरींतल्या स्टेशनमास्तरच्या बापाने व सांबशास्त्री डाऊ याने 'महाराजांच्या मंडळीतली ब्राह्मणमंडळी महाराजांचे उष्टे खातात' अशीच एक गप्प उठविली आहे. दर्यापूरचे दाजीशास्त्री पर्वते यांचेकडे मी गेलोही होतो. नीळकंठ धर्माधिकारीही गेला होता. तेव्हा ते म्हणाले :––यांची विद्या उपस्थित असल्यामळे, दुसऱ्याला हे लवकर गड्डयात पाडतात. शेगांवकर महाराजासारखे न बोलणारें साधु बरे होत.' यावर 'वसिष्ठ–नामदेवादिक जीवन्मुक्त कसे ?' असे नीळकंठाने विचारले असता, "ते जीवन्मुक्तही नव्हते व साधूही नव्हते" असे ते स्पष्ट म्हणाले. "महाराजांना अमरकोशांतला श्लोक आला नाही" असेही एका ब्राह्मणाचे मत पडले. सुंदरपंत नांवाचे दर्यापूरला वकील आहेत. ते म्हणाले :–"वासुदेवानंदांप्रमाणे यांचे चमत्कार व वैराग्य नाही," परंतु या चमत्कारांविषयी मला खरोखरच आश्चर्य वाटते.

चमत्कार

१४) चमत्काराविषयीं बोलणारे विलक्षण बोलतात. वासुदेवानंदांसारख्या वैदिक महात्म्याचे जे चमत्कार त्यांचे शिष्य सांगतात, तेच चमत्कार एखाद्या वेदबाह्य मुसलकंद्या फकिराच्या हातून झालेत असे त्यांचें पुढारी सांगतात. बरे, ते तरी सर्वांना सर्वत्र घडतात असे नाही. अल्पशा चमत्कारावरच जर विश्वास ठेवावयाचा असेल तर माझेही काही लोक चमत्कार

सांगतात. सर्वत्र सर्वदा त्यांचेही घडत नाहीत व सर्वत्र सर्वदा माझेही घडत नाहीत. आता चमत्कार तुच्छ आहेत असे माझे म्हणणे नाही, परंतु आमच्या गुरूतच चमत्कार आहेत, तुमच्या गुरूत काही नाही, असे नुसत्या चमत्काराच्या दृष्टीने म्हणण्याचा कोणाला अधिकार नाही असे माझे म्हणणे आहे. मुसलमानांना देखील रोगाकरिता हिंदूच्या देवांची मन्नत करावी लागत नाही, तुर्बतवरच त्यांचे भागते; पण आम्ही मात्र वाटेल त्या महाराजांच्या– खाटीक, वरठी इत्यादिकांच्या नादी लागतो ! आमच्या घरातला शालिग्राम मात्र काही चमत्कार दाखवीत नाही तर धन्य आहे की नाहीं आमचीं ? प्रसंगी चमत्कार मोठ्या साधूंचे घडत असतील तर प्रसंगी माझेही घडतात व प्रसंगी तुमचेही घडतात. स्वामी वासुदेवानंदांविषयी पत्रांतील माझे उद्गार पूज्यबुद्धीचे असून, स्वामींचे व त्यांचे शिष्यांचे मजविषयींचे असे कुत्सित उद्गार कां असावे हे मला समजत नाही. स्वामी वासुदेवानंदांचे शिष्य मला मान देत नाहीत ही मोठीशी गोष्ट नाही, पण शिर्डीकरांना मात्र मान देतात, आणि बकरा खाणाऱ्या ताजुद्दिनालाही मान देतात. असनारे आदि पटवर्धनांच्या शिष्यांचीही गोष्ट अशीच आहे. अंगामध्ये रागद्वेष असून वैदिक धर्माची कळकळ नसेल, तर नुसते दूध पिऊन राहणारा असला तरी **Dyspepsia** करितांच (तो दूध) पितो असे म्हटले पाहिजे. दुसरे काय ?

१५) तात्पर्य, जुना ब्राह्मणपक्ष अशा रीतीने माझा उत्कर्ष सहन होत नसल्यामुळे विरुद्ध आहे. पुनः एकत्र जेवणारा व वाटेल तसे आचरण करणारा वारकरी पक्षही माझ्या विरुद्धच आहे, व यामुळे इलिचपूरला माझ्या वर्गणीलाही अडथळा झाला. कित्येकांनी माझ्या ज्ञानेश्वरी सांगण्याला चांगले म्हटले असता, "गुलाबरावाला चांगले म्हणून आपल्या गुरूला व आपल्या पंथाला वाईट म्हणतोस की काय ? त्याची निंदाच करणे चांगले" असे म्हटले. मराठाप्रकरणात, बडरप्रकरणात, आणि अबीरप्रकरणात पैसे घेऊन भलताच न्याय दिल्याबद्दल शंकराचार्यांना मी उघडपणे दोष दिल्यामुळे, त्यांनीही देवासमध्यें व इंदोरमध्यें माझ्याविरुद्ध उद्गार काढले होते, हे बापूरावाच्या सांगण्यावरून समजते. "साधारणतः मूर्ख असलेला समाज तर माझे भाषणच समजू शकत नाही."

धर्माचे कार्य

१६) "इतकी प्रतिकूल परिस्थिति असूनही मी धैर्यानें धर्मकाम करीत आहे, हे कोणालाही नाकबूल करता येणार नाहीं. आता इतके जरी आपल्या

विरोधी आहेत, तरी या सर्वांना आतून धर्मविश्वासाचे बळ नाही हे मी निश्चयाने सांगून ठेवतो." वासुदेवानंदस्वामींना धर्माचे बळ आतून असेल, पण त्याचा आता काही उपयोग नाही. माझ्याच्याने होते त्या धर्मकामाकरिता आपल्या साह्याची याचना करीत आहे, आणि ते काम इतक्या प्रकारांनी होऊं शकेल–

महाराजांना साह्य कसे करावे ?

१–कोणाचे नांव न घेतां हिंदुधर्माला भलत्याच रीतीने वळण देणाऱ्यावर सप्रमाण टीका करणे.

२–माझे वर्तन जोपर्यंत ठीक आहे तोपर्यंत माझ्याविरुद्ध कोणी बोलल्यास त्याचा तेथेच प्रतिकार करणें.

३–माझी मते योग्य आहेत याचा चांगला निदिध्यास करून ती लोकांना सांगणे, आणि

४–त्याप्रमाणे आपल्याच्याने होईल तेवढचा पारलौकिक अभ्यासाचा नियम करणे.

५–आपद्धर्म सांभाळण्याविषयी माझी मते कोणती आहेत हे समजून घेऊन तसे सांभाळणे. पण या सर्वांत पारलौकिक धर्मावर विश्वास मात्र दृढ ठेवला पाहिजे, आणि मुख्य–

६–भगवद्भक्तीची स्थापना मधुराद्वैतानुसारे करणे, आणि

७–माझे प्रासंगिक धोरण न समजल्यास मला निर्भीडपणे पण एकांतात विचारून ठरल्यास करणे. धर्ममुख्यान्वयी अशी सर्व कामे होतात.

८–त्याचप्रमाणे ग्रंथ छापून काढून प्रसिद्ध करणे.

९–हाताचे न होईल तर तोंडाचे करणे.

१०–याप्रमाणे जे माझ्याहुन लहान आहेत त्यांनी मला मुख्य समजून म्हणा, व माझ्याहून जे वडील आहेत त्यांनीं आपल्या पुत्राच्या कृतीला अनुमोदन दिले पाहिजे असे समजून म्हणा, मला साह्य करावें अशी याचना करितो.

१७) नरहरीचे म्हणणे असे होते की, अन्यत्र अध्ययन करून आम्ही आपले काही तरी कार्य करावे अशी आमची इच्छा आहे. तर शाब्दिक अध्ययन कोठेही करावे; याविषयी माझे काही म्हणणे नाही. पण मला साह्य करणाऱ्यांनी आर्षसिद्धान्त मजजवळूनच समजून घ्यावा, अशी मी त्यांना

विनंती करतो; कारण ईश्वर व जीव दोन्ही प्राणांचे धारण करणारे असल्यामळे कोणता अंश ईश्वर व कोणता अंश जीव धारण करितो, इत्यादि आर्षसिद्धान्तांवर न्यायघटित भाषेने प्रकाश पडला नाही. आता हे सिद्धान्त माझ्यावांचून कोणाला कळतच नाहीत असे मात्र मी म्हणत नाही. ते कोठूनही घेतले तरी समानच समजून घेतल्या जात असल्यामुळे, त्याविषयी विवाद नाही. तात्पर्य अशा अनेकरीतीनें आपल्याला काम करावयाचे आहे; यश देणे तातांकडे आहे. म्हणून त्यांना नमस्कार करून हा लेख आपले चरणी सादर करितो. कळावे.

आपला, गुलाब

□□□□

## २२. रा. रा. विष्णु नारायण भातखंडे

[लक्ष्य संगीत–जयदेवांचा मणिप्रकाशिका ग्रंथ–ॲटोमिक थियरी, इलेक्ट्रानिक थियरी व ईथर–टिंडालचे मत–मारुत संहिता गाण्याने रोगनिवारण–मार्गी संगीत समयमहत्व–औमापत्य ग्रंथ]

# संगीत

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली समर्थ ॥

१) वि. वि. आपले पत्र पोचले. आपण लक्ष्यसंगीताविषयी माहिती देऊ शकत नाही असे जे म्हटले आहे, ते काय त्याचा आपल्यास शोध लागला नाही म्हणून ? किंवा त्याची आपणांस माहिती द्यावयाची नाही म्हणून ? पहिल्या पक्षी त्याचा कोठे पत्ता लागेल ते स्थान तरी सांगावे, म्हणजे मी आपला फार आभारी होईन. दुसऱ्या पक्षीं आपण इतिहासाचे चाहते असून आपण आपल्याच हाताने इतिहासाचा लोप केल्यासारखे होणार नाही काय? शिवाय लक्ष्यसंगीतावर माझे काही प्रश्न आहेत ते त्या पंडितालाच विचारावे असा माझा हेतु आहे. आपली पद्धति मी दोन तीन वेळ वाचली आहे व पुनः आता वाचीत आहे. पत्रात आपण अंधश्रद्धा सोडली पाहिजे असे म्हटले आहे ते मला मान्य आहे; पण जशी आपल्या इकडे श्रुति मोजण्याची अडचण आहे, तसेच तिकडे नादकल्लोळ (व्हायब्रेशन्स) मोजण्याचीही अडचण भासत चालली आहे.

२) जयदेवांनी आपल्या मणिप्रकाशिकेत “कदंबगोलकन्यायेन शब्दोत्पत्त्यंगीकारेऽपि नियतगुरुस्थानमपेक्षत एव। अन्यथा अनियतकंपनात् विषमनादोत्पत्तिः। नच संख्यानियत्यैव

तन्नैयत्यं षड्जादिस्थानभ्रंशसंभवात् इति चिंत्यम्" या शंकेचा खुलासा आपल्या इकडील ग्रंथात फारसा झालेला दिसत नाही. तसा तो पाश्चात्य ग्रंथातून तरी व्हावा म्हणून पुष्कळ पुस्तके वाचली. 'मणिप्रकाशिका' ग्रंथ आपण पाहिलाच असेल; कारण आपण पुष्कळशा पुस्तकांचा शोध केला आहे असे पद्धतीवरून दिसते. मणिप्रकाशिकेचे सध्या शद्बप्रकरणच मजजवळ आहे. त्याची आणखी प्रकरणे आपणास ठाऊक आहेत काय ?

ॲटोमिक थियरी

३) पाश्चात्य नादकल्लोळासंबंधी 'सायंटिफिक अमेरिकन' मध्यें आलेले टिंडालचे उद्गार मला स्मरतात. त्यांत तो म्हणतो, "फोटो वगैरेवरून जरी आपल्याला हे कल्लोळ मोजतां येतात असे आज वाटत असले, तरी ही बाब दिवसानुदिवस कठिण होत जात आहे. कारण अणूपपत्ति–(ॲटोमिक थियरी) मध्ये अणू केवढा असावा हा नियम ठरलेला नाही. रासायनिक मिश्रण Chemical Mixture करतांना पहिले भाग तीन असले तर त्याचा एकजीवहोऊन एका भागाची जागा सुटून दोन भागाचीच जागा व्यापतो, म्हणून परमाणूंचा आकार नियत पाहिजे, असे आपल्या बुद्धीस वाटते. १-पण केवढाही लहान आकार घेतला तरी त्याचे तुकडे झालेच पाहिजेत, हा जो मनांत संशय येतो त्याला उत्तर 'अणूपपत्ति' मध्ये सांपडत नाही. २-पुन: अणूचा आकार नियत मानला, तर घनत्वाचा Density प्रश्न येऊन पडतो; कारण परमाणु अधिक जवळ येणे एवढे जर घनत्वाचे लक्षण केले, तर जितके परमाणु एका पदार्थांत अधिक असतील, तितके त्याचे गुरुत्व अधिक असा सहजच नियम निघतो; पण तसे मानले तर हायड्रोजनच्या अपेक्षेने ऑक्सिजनच्या एका परमाणूचे वजन १६ पट कसे ? या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लागत नाही. ३-बरे, पदार्थाला स्वतंत्र वजन आहे मानले, तर मोठ्या पदार्थाने लहान पदार्थास ओढणे हा गुरुत्वाकर्षणाचा नियम बराच ढिला पडतो, व त्यामुळे मॅटर आणि फोर्स हे दोन पदार्थ गृहीत धरले म्हणजे पुढे आम्हांस श्रद्धा ठेवण्याचे काम पडतच नाही, असा बाणा बाळगणाऱ्या आम्हांला खाली मान घालणे भाग पडते. कारण या गुरुत्वनियमाच्या घोटाळ्यावरून कांही नियमांवर देखील आम्हांला श्रद्धाच ठेवावी लागते. ही अणूपपत्तीची गोष्ट झाली.

इलेक्ट्रॉनिक थिअरी व ईथर

४) आता वैद्युदुपपत्तीकडे पाहिले, तर त्याच्या योगाने प्रकाशाचा प्रश्न जरी सुटल्यासारखा वाटत आहे, तरी त्याची कठिणता तितकीच कायम

आहे; कारण इलेक्ट्रॉन्स हे सर्व पदार्थांत सजातीय आहेत. त्याचप्रमाणे कंपन होण्याला विरलपणा आवश्यक आहे, घनपणांत ते होत नाही. जितका घनपणा अधिक तितके कंपन कमी. पुन:, कंपन म्हणजे एका परमाणूचे दुसऱ्या परमाणूस धक्का देणे होय. शून्य जागेत काही कंपन होत नाही, म्हणूनच नुस्त्या आकाशातून (स्पेस) प्रकाश किंवा काही जाऊ शकत नाही, असे आपण म्हणतो; आणि याचमुळे प्रकाशासाठी आपण ईथरचे कंपन मानतो. पण एका परमाणूने दुसऱ्या परमाणूस धक्का देतांना मधल्या स्पेसमधून ते कंपन जाते असे म्हणता येत नाही काय ? तसे मानले तर ईथर 'ऑल परव्हेडिंग' कसे ? बरे, सर्व ईथरचे परमाणु एक होतात असे म्हटले तर त्यांत कंपन संभवणार कसे ? ईथरच्या विभागांचा जर नियत आकार मानला नाही तर नादाचे किंवा प्रकाशाचे अमुक इतकेच व्हायब्रेशन्स होतात, हा नियम कसा घालतां येईल ?

५) टिंडालच्या दोन चार वाक्यांचा भावार्थ मला विस्तृत करून सांगता आला तसा लिहिला आहे. आपल्या इकडे परमाणूला नियत आकार न मानल्यास सर्षपमेरूची तुल्यतापत्ति होते असे न्यायशास्त्रांत म्हटले आहे. आणि शेवटी पौर्वात्य नैयायिकांनी किंवा पाश्चात्य सायंटिस्ट लोकांनी कितीही विचार केला, तरी ही बाब अधिकाधिक श्रद्धेचीच होत गेली असे मला वाटते. बरे, वाद्यांच्या षड्जादिकांचे व्हायब्रेशन्स नियमित लिहून ठेवले आहेत खरे, पण तेवढ्याने वाद्यांतील ऋषभाला जर आपण षड्ज कल्पिला तर त्याचेहि तितकेच व्हायब्रेशन्स होतील की काय ? तसे झाल्यास ध्वनिभेद दृष्टीस कां पडतो ? आणि तसा ध्वनिभेद दिसण्यांत कांही नुकसान नाही असे मानले तर, ही आपत्ति प्रकाशावरही येणार नाही काय ? तेव्हा आपल्याकडच्या श्रुति मोजण्याची जी अडचण पडते, तशीच काहीं अंशी पाश्चात्य पद्धतीतही पडते असे मला वाटते. म्हणजे मणिप्रकाशिकेतील शंकेचा खुलासा तिकडेही चांगला होत नाही. रागानें पाळणा हालणे वगैरे कविकल्पना आहे असे आपण पद्धतीत म्हटले आहे ते मलाही मान्य आहे. परंतु थिऑसाफीकल मासिक पुस्तकात गाण्याने आग लागल्याची उदाहरणे दिली आहेत ती खरी मानावीं की नाही ?

मारुतसंहिता : गाण्याने रोगनिवारण

६) शिवाय गाण्याने व वाद्यध्वनि-श्रवणानें रोग दूर होतात, अशा प्रकारचा तिकडील डॉक्टरचा शोध आहे. व जर्मनीत क्षय न होण्याचे कारण

गायनवादनाचा विशेष प्रचार हे आहे, असे दिले आहे. याविषयी बालबोध नांवाच्या मासिक पुस्तकात नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. आपल्या मारुतसंहितेतही गाण्याने रोग दूर करण्याचा विधि सांगितला आहे. तो ग्रंथ आपण पाहिला असेलच. त्यांत व यांत काही साम्य आहे काय ? ते अन्यथा असेल काय ?

मार्गी संगीत—समयमहत्व

७) मार्गी संगीतात अदृष्टजनक समयमहत्व मानीत होते, पण ते देशी संगीतांतही मानले पाहिजे. त्याला फिजिआलाजिकल किंवा मानसशास्त्रीय (सायकालाजिकल) पुरावा मिळू शकतो, असे जे. बोस यांच्या काही प्रयोगांवरून ठरू शकत नाही काय ? आपणही पद्धतीत समयमहत्व मानले आहे.

८) आपल्या लेखांतील मनाचा मोकळेपणा पाहून, स्वराच्याच्या अडचणीसंबंधात खुलासा करण्याविषयी विनंती करीत आहे. पत्रात माझे उद्‌गार अंमळ कडक झाले असल्यास त्याची मी क्षमा मागतो. कारण पुष्कळ पंडितांना मी हे प्रश्न विचारले, व त्यांनी माझ्या प्रश्नांची उडवा-उडवीच केली. तसे आपण करणार नाही अशी आशा आहे. कारण आपणाला सुशिक्षितांची आवडी आहे. माझ्या आणखी पुष्कळ शंका आहेत. काही रागमिश्रणे कशी करावी याबद्दलही आहेत, व कांही रागाच्या रंजकत्वा-विषयी सायकालॉजिकली किंवा फिजिऑलाजिकली पुरावा कोणता ? व तो केवळ मटेरीअल आहे किंवा इम्मटेरीअल (सायकालॉजिकली) आहे ? याविषयी आहेत; परंतु घाईने पत्र लिहिल्यामुळे व मी आंधळा असून मजजवळ चांगला इंग्रजी लेखक कोणी नसल्यामुळे इंग्रजीचे मराठी भाषांतर लेखकाला सांगतांना त्रास बराच पडला, आणि पत्राचा विस्तार बराच झाल्यास आपला अमोल वेळही घेतला जाईल, असे वाटून पत्र एवढेच पुरे केले आहे. औमापत्य ग्रंथ कोठे मिळतो, आपणांस ठाऊक आहे काय ? कृपा करून उत्तर लवकर पाठविल्यास उपकार होतील. कळावे.

आपला,

गुलाबराव गुंडोजी मोहोड

मुकद्दम माधान, हल्ली मुक्काम अमरावती,

९) ता. क.——रत्नाकराच्या ग्राममूर्छनेविषयी बऱ्याच शंका आहेत त्यांचा अजून खुलासा झाला नाही. पद्धतीत आपणाला एका पंडिताने पुष्कळ द्रव्य मागितले होते असे लिहिले आहे, तर त्यांचे नांव कळवाल काय ? कारण वर्गणी करून तितकी रक्कम जमवून देऊन तो खुलासा करून घेण्याची माझी इच्छा आहे. कळावे.

## श्री भातखंडे यांचे पत्र

मलबार हिल, ता. ता. ६–१२–१९१४

रा. रा. गुलाबराव यांस,

सा. न. वि. वि. आपले रजिस्टर्ड पत्र पावले. लक्ष्य संगीताविषयी मला अधिक माहिती देता येत नाही, म्हणन दिलगिर आहे. त्यासंबंधी कारणे देण्याघेण्याची फारशी आवश्यकता आहे, असे वाटत नाही. कारण त्यापासून समाजाचे हिताहित होण्याचा संभव नाही. आपण वर्णिलेला (माणिप्रकाशिका) जयदेवाचा ग्रंथ मी पाहिलेला नाही नादशास्त्रावर देशी व पाश्चिमात्य ग्रंथ आपण बरेच वाचले आहेत व केमिस्ट्री व फिजिक्स. शास्त्रांच्या आधाराने आपण निरनिराळ्या पंडितांशी चर्चा करून समाधान न झाल्यामुळे निराश झाला आहां हे ऐकून फारसे नवल वाटले नाही. मी स्वत: त्या शास्त्रात निपुण नसल्यामुळे त्या दिशेने पद्धतीत चर्चा करण्याचे मी सोडून दिले आहे. त्या विषयावर एखादा सुबोध निबंध लिहून आपण मजकडे पाठविल्यास 'पद्धतीच्या' पुढच्या भागांत आपल्या नांवाने दाखल करण्यास मला हरकत दिसत नाही. एक Appandix रूपाने घालता येईल. पद्धतीत फक्त आज हिंदुस्थानी संगीत राग कसे आहेत ते माझ्या शिक्षणाप्रमाणे व अनुभवाप्रमाणे मी लिहिण्याचे योजिले आहे. जे संस्कृत ग्रंथ मला मिळविता आले त्यांचे 'रागावर उजेड पाडणारे भाग' मी देत आहे. तेणे करून ते ग्रंथ निराळे छापण्याची जरूर राहणार नाही, असे मला वाटून तसे केले आहे. जर पद्धतीचा उपयोग झाला तर करावा, परंतु आपले अध्ययन जर तिच्या फार पुढे असले तर तिकडे लक्ष देण्याची गरज नाही. हल्लीच्या उपलब्ध संस्कृत ग्रंथात आपल्या प्रत्यक्ष संगीताला उपयोगी असा कोणता ग्रंथ आपल्या वाचण्यात आला तेही मला कळविल्यास मी तो मिळविण्याचा प्रयत्न करीन. रत्नाकराचा अभ्यास आपण केला असल्यास त्यातील रागासंबंधी कांही माहिती मला आपण लिहून पाठविल्यास तीही मी आदराने स्वीकारीन. आपले प्राचीन ग्रंथ जितके समंजस सुबोध व प्रत्यक्ष उपयोगी होतील तितके ते करण्याकडे माझा सारा प्रयत्न राहील हे निराळे लिहित नाही. नुसत्या प्राचीन वैभवाचे गुणानुवादात आता आपल्या समाजाला कौतुक वाटणार नाही असे आपलेही मत असेलच. हा काल असा आहे की, ज्याला जे व जितके ज्ञान उपयोगी झाले असेल ते त्याने प्रामाणिकपणे लिहून ठेवावे. मला वाटते या संगीतासारख्या प्रत्यक्षोपयोगी विषयात एकमेकांशी शुष्क चर्चा करण्यात विशेषत: अर्थ दिसत नाही. टाइम, स्पेस, इथर, अॅटोमिक थियरी, फिजियॉलॉजी, सायकॉलॉजी, इलेक्ट्रिसिटी– यांच्या थियरीज् वाचून समजून त्यांचा प्रत्यक्ष उपयोग आपल्या संस्कृत ग्रंथांच्या वाक्यांनी उत्तम करून दाखविणारे समाजात मोठा मान पावतील. हे कोणीही म्हणेल. पण तसे लोक आपले येथे अजून उत्पन्न होऊ लागले नाहीत. असा माझा समज आहे.

आपण आपल्या २२ श्रुति कायम केल्या असल्यास त्या कोणत्या ग्रंथाच्या आधाराने करू शकला, व त्यांच्या योगाने कोणत्या प्राचीन ग्रंथात रागांची स्वरूपे समंजस झाली?

अशी माहिती मला पद्धतीत दाखल करण्यास उपयोगी होईल. पद्धतीत ज्या ग्रंथाचे उतारे मी केले आहेत त्याहून निराळे ग्रंथ जे आपण मिळवून वाचले असतील त्यांची नांवेही मला कळविल्यास मी आभार मानीन. पद्धतीत व्हायब्रेशन्स संबंधी कांही म्हटले आहे; याचे कारण इतकेच आहे की, आजकाल पाश्चिमात्य लोकांचे कांही सिद्धान्त आपल्या संस्कृत ग्रंथावर लादण्याचे प्रयत्न करण्यात आलेले मला दिसले. ते सिद्धान्त वाईट आहेत अथवा आजच्या आपल्या हिंदुस्थानी रागांना २२ श्रुति लावून दाखविणे अगदी गर्हणीय आहे, असे म्हणण्याचा पद्धतीचा हेतू नाही; तसे सिद्धान्त संस्कृत ग्रंथांवर उगीच लादू नये; व नवीन योजनेला नवीन म्हणण्यास हरकत नाही, इतकेच सुचविले आहे. रत्नाकराच्या २२ श्रुति आंदोलनासहित लोकांपुढे मांडावयाच्या व त्यांच्या मदतीने रागरूप तेथल्या लक्षणांनी एकही सोडविण्याचे पत्करावयाचे नाही हे स्तुत्य कसे म्हणता येईल ? इतकेच पद्धतीत सुचविले आहे. हे आपण पाहिलेच असेल.

माझी विनंती आपणास इतकीच आहे की, मोठाल्या गहन विषयात मला व्यर्थ प्रश्न वगैरे न विचारतां तसल्या बाबतींवर आपले स्वतःचे विचार आपण स्वतंत्र जाहीर केल्यास अथवा ते जाहीर करण्यास मला परवानगी दिल्यास आपण संगीताची योग्य सेवा केल्यासारखे होईल. सर्व शास्त्रे मला अवगत आहेत, असा दावा माझा मुळीच नाही, हे मी म्हटलेच आहे. "औमापत्य" या नांवाचा ग्रंथ मी पाहिलेला नाही रत्नाकराच्या ग्राममूर्छनावर मि. क्लेमेंट्स् आय. सी. एस. यानी इंग्रजीत ग्रंथ लिहिला आहे. तो आपण एकदा पाहून जावे. तेथे त्या विद्वान गृहस्थानी ग्राम–मूर्छना–जाति वगैरे रत्नाकरगत विषयांचा स्वमत्यनुसार विचार केला आहे. तत्संबंधी शंका उत्पन्न झाल्यास त्याचे कट्टे अनुयायी रा. ब. देवल (पुणे) यांच्याशी पत्रव्यवहार करावा. त्याचप्रमाणे इंदूरचे प्रसिद्ध डॉक्टर प्रभाकर रामकृष्ण भांडारकर एल. एम. एस. यांनी भरताचे संगीत सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्याशी मला विचारलेल्या शंकांवर चर्चा आपण केल्यास आपणास जरूर फायदा होईल. फिजिक्स व केमिस्ट्री हे त्यांचे खास विषय आहेत. माझा प्रयत्न निराळ्या दिशेने आहे हे दिसेलच. आपणास या विषयाची चांगली अभिरुची आहे, व सार्वजनिक हित करण्याची इच्छा असेलच. अधिकोत्तर नाही.

आपला
वि. ना. भातखंडे

**P. S.** उत्तर लिहिण्याचे चुकून राहिल्याबद्दल क्षमा असावी.

□□□□

२३. श्री. खापरे यांना पत्र

[चमत्कार खरे कसे मानणार कारण कृष्ण, गोपिका, राम, शंकराचार्य, व्यास, तुकाराम यांचे विषयीही शंका घेणारे आहेत तर माझे काय ?–दुसऱ्याच्या महत्वाकांक्षा मी मारत नाही–सर्व युक्ती जुन्याच हे दाखवून द्यावे. युक्ती जुन्या तर योजना नवीन–नव्या युक्ती नवा अवयव नियम–अनुभव जुना परिभाषा नवीन–दुसऱ्याच्या युक्तींवर मी कां चिडतो ? पूर्वोपलब्धपरिहार या दोषामळे–शिक्षणाची व्याख्या–मननाची व्याख्या–शब्दाचे अर्थ फिरविता येत नाही हा नवीन नियम : आगमनिर्णय–मी वादातून पळून कां जातो–वाद, जल्प, वितंडा व अतिवाद यांच्या व्याख्या–माझा प्रमाद].

# मजवरचे आक्षेप

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

रा. रा. खापरे यांस साष्टांग प्रणिपात विनंती वि०

१) मला येथे दिनकर गोखले भेटून त्याच्या व माझ्या ज्या एकंदर गोष्टी झाल्या, त्यांवरून तेथील मंडळीच्या मनांत माझ्याविषयीं ५ गोष्टी घोळत असाव्या असे मी अनुमान करून हे पत्र लिहीत आहे, हे माझे अनुमान चुकले असल्यास दोष माझा आहे, दिनकरचा नाही.

१–पहिला मुद्दा असा की, माझ्यामध्ये चमत्कार नाहीत. २–दुसरा मुद्दा–मंडळीच्या महत्वाकांक्षा, माझे थोडे ज्ञान बाहेर पडेल म्हणून, मी मारून टाकतो. ३–तिसरा मुद्दा–माझ्या सर्व युक्ति जुन्या पुस्तकांतीलच असतात. ४–चवथा मुद्दा–मला आपल्या युक्तींचा अभिमान असून दुसऱ्याच्या युक्ति वजनदार असल्यास मी चिरडतो. म्हणूनच मंडळीच्या आलेल्या पत्रांतील प्रयत्नवादावर मी ताशेरा झाडला. ५–पांचवा मुद्दा–वादीशी प्रसंग आला म्हणजे तोंड फिरवून मी पळून जातो ! या माझ्या विकारानें काढलेल्या अनुमानातील पांच गोष्टीसंबंधी मी काही लिहितो.

माझ्यात चमत्कार नाहीत.

२) पहिल्या मुद्यासंबंधात मला सांगावयाचे ते इतकेच की, चमत्कार ज्याचा त्याला स्वतंत्र वाटत असतो, आणि ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणे स्वतंत्र होतहि असतो. कोणाचा चमत्कार चव्हाटयावर आला असे कधीच झाले नाही. गोकुळांतले दावाग्निपान काळयवनाचे भीतीने पळणाऱ्याच्या ठिकाणी संभवनीयच नाही असे माझ्या इष्टदेवतेविषती देखील तर्क होऊ शकतात, तेव्हा माझी कथा काय ? जवळ नऊ लक्ष गोपाळ होते तेंव्हा

एकेक गोपाळाला एक एक कृष्णाचा वेश देऊन वाममार्गी शिवशक्तीप्रमाणे गाढवी गोंधळाचेच नांव रासक्रीडा, दुसरे काय ? या प्रश्नाला मी, माझा बाप, माझा आजा, प्रत्यक्ष व्यास असले तरी काय उत्तर देणार ? रावण मारणें शूराचे काम, तर वालीला पाठीमागून मारणें गांडूचे काम नव्हे काय ? वसिष्ठाने ब्रह्मज्ञान सांगतांना जर रामास खरे वैराग्य झालें होते तर बायकोचे नांव घेऊन वनात झाडे आलिंगण्याचे कारण काय ? ते ऋषि होते, त्यांना उद्धरायचेच होतें, तर मायेचे नांव घेऊन झाडे आलिंगायला काय झाले होते ? लोकांच्या ह्मणण्यावर बायको वनात पाठविल्यावर मग तिच्यासंबंधी रडून गोंधळ करण्याचे कारण काय ? बायकोच्या पातिव्रत्याचा मोठा निश्चयच होता, तर लोकांच्या म्हणण्यावरून वनात तरी पाठविण्याचे कारण काय ? नारदांनी एक बायको मागितली, तेव्हा त्याला बायको करून लागलाच प्रत्यय दाखविला, पण दुसऱ्याच्या हजारो बायका स्वतः व गड्यांसुद्धा मिळून भ्रष्ट केल्या तेव्हां प्रत्यय कसा दिसला नाही ? शंकराचार्य शंकराचाच अवतार होते, तर दुसऱ्याच्या शरीरात शिरूनच मैथनाचा अनुभव घेऊन कामशास्त्राची परीक्षा देण्याची काय जरूर होती ? पूर्व शंकरदेहातील उमासंयोगाचा अनुभव नव्हता वाटते ? शंकराने शरभ होऊन नृसिंहाला मारले, तेव्हां यांचा परस्पर प्रेम कसा ? व प्रसंगी मांगासारखे कठोर कसे झाले ? व्यासाच्या प्रारब्धाने जर व्यासाला गाढव व्हावे लागले अशी कथा काशीखंडात आहे, तर आमच्या सर्वांच्या नशीबाने त्यांच्या तोंडातून चुकीचे ज्ञान निघाले नसेल कशावरून ? आठ वर्षांच्या नंदाच्या पोराला काम उत्पन्न होणें असंभवनीय नाही, कारण दूध वाजीकरणामध्ये श्रेष्ठ असून बालाला व वृद्धाला देखील काम उत्पन्न करणे हे वाजीकरणाचे लक्षण चरकादिकांनी सांगितले आहे. दूध तर त्याची माय यशोदा विळांतून सात वेळ पाजीत होती. धर्म स्थापण्याकरिता व देवांच्या कार्याकरिताच जर अवतार होता, तर मुद्दाम इंद्राची पूजा कशाला मोडली ? मग काय म्हणे गोवर्धन उचलला ! पण पूर्वीच त्या पर्वताखाली स्प्रिंग लावून ठेविली नसेल कशावरून ? सर्वांमध्ये जर गोपिकाच प्रेमळ होत्या, तर मथुरेला निघून कां गेल्या नाहीत ? लग्नाच्या गोपी राहूं द्याच, पण कात्यायनी व्रत करणाऱ्या कुमारींनी तरी जावयाचे होते ! पुढे दुसऱ्या पतीसीं जर त्या व्यभिचारिणी कुमारींचे लग्न लागले असेल, तर परमार्थानंतर हा संसार कसा शोभला ? अन्न दिले नाही म्हणून यज्ञ करणारे ब्राह्मण वायां गेले,

आणि त्यांच्या बायका पूज्य झाल्या, अशा प्रकारच्या गोष्टी भोंदू साधूंना बायका शिष्यिणी मिळविण्यास मदत करीत असतात! ही जर सर्वच लीला, तर मग एखाद्या व्यभिचारी पुरुषाची लीला कां नाही? वेदान्ताने मंडन तर कुत्र्याच्या मैथुनाचेहि करतां येईल, मग रासक्रीडेत विशेष काय? अशा प्रकारचे कोट्यवधि तर्क असून त्यांत न्यायदृष्टीचा हेत्वाभास नाही. पण यांतील एकाहि तर्काचे उत्तर मजजवळ नाही. माझे उत्तर येवढेच आहे की, अझून मला स्वप्नात स्त्रीसंयोग होऊन धातुपात होत असतो. तेव्हा जेथे आमच्या इष्ट देवतेची अशी स्थिति, तेथे आम्हां अनुयायांची स्थिति काय पहावयाची आहे? बरे, गोपिका तरी किती भोळ्या? काय म्हणे डोळ्यात खडा गेला, आणि तो न काढताना कृष्णाने मुका घेतल्याबरोबरच डोळ्यांची आग नाहीशी झाली! आणि नीतीचा पुतळा तुकाराम बोवा त्याचे वर्णन करतो! साराच खुळ्यांचा बाजार! पण या बाजारांतीलच मीहि एक खुळा आहे. तेव्हा तसे काही चाळे माझ्यात असल्यास आश्चर्य नाही. कारण माझी माय व्यभिचारिणी असली, तरी ती सतीच होती असे मला घेऊन चालले पाहिजे; नाहीतर पुढे अनंताचे लग्नच होणे कठीण आहे. पण मी चमत्कार सांगून कोणाला पैसे मागितले नाहीत, मागत नाही, व मागणार नाही. हे पहिल्या मुद्याचे उत्तर झाले.

थोडच्या ज्ञानामुळे दुसऱ्याच्या महत्वाकांक्षा मी मारतो

३) दुसऱ्या मुद्याचे उत्तर लिहितो :– संस्कृताकरिता मी श्री. अण्णासाहेबांना गुरु केले हे सर्वांना माहितच आहे. आपल्या घरचे काम कोणी करतो म्हटल्यास, त्याला मी नको म्हटले असेल असे मला जन्मात आठवत नाही. प्राज्ञ, विशारद, शास्त्री इ. परीक्षेला बसण्याला मी कोणाला मनाई केली नाही. मंडळीच्या शिकून येण्यानेच जर माझे ज्ञान बाहेर पडत असेल, तर ते पाडण्याला आजच पुष्कळ जण तयार आहेत. कारण मंडळीपेक्षां अधिक ज्ञान पुष्कळांनाच असले पाहिजे असे ह्मणावे लागेल. ह्मणून मला भीति बाळगण्याचे काही कारण नाही. पण खरी गोष्ट अशी आहे की, माझे काम ह्मणून करण्याकरिता मला विचारल्यास मी माझ्या मनाच्या हजारो वेडेपणामुळे कांकूं करतो, व प्रवृत्तिनिवृत्ति काही करीत नाही. माझे काम नसेल तर कोठेहि जाण्याकरिता मला विचारण्याचो गरजच नाही. हे दुसऱ्या मुद्याचे उत्तर झाले.

जुनाच युक्तिवाद ?

४) तिसऱ्या मुद्याचे उत्तर :– या मुद्यासंबंधी एवढेच सांगावयाचे की, असे ह्मणणाऱ्याने ते दाखवून दिल्यास मजवर मोठे उपकार होतील. युक्ति-साम्य तर काँटचे व शंकराचार्यांचेहि मिळते. सॉक्रेटिसपासून तुकाराम महाराज शांति शिकले असतील, तर माझ्या सर्व युक्ति जुन्या पुस्तकांतील असतील ! नव्या युक्ति कोणत्या व जुन्या पुस्तकांतील माझ्या युक्ति कोणत्या, ह्याची निवड माझ्या ग्रंथांतून करणे मला शक्य आहे असे मला वाटते. पुन्हा जून्या युक्ति देखील जे तत्त्व सिद्ध करण्याकरिता मी लावल्या आहेत, त्याच युक्ति जुन्या ग्रंथकारांनी लावल्या आहेत काय ?

५) मी "रसाची अभिव्यक्ति वृत्तिसंधिस्थानीय" मानीत असल्यामुळे, अनध्यस्त विवर्त व ज्ञानोत्तर भक्ति मानणे मला सोपे जात आहे. वृत्तिस्थ रस मानणाऱ्या उज्वलनीलमणिकारादि भक्तांना व साहित्यदर्पणकारादि पंडितांना आणि स्वप्नेश्वरादि भाष्यकारांना माझे अनध्यस्तविवर्त-तत्त्वच मानता आले असते, हे मला कोणी सिद्ध करून दाखवितील तर बरे होईल. आता, रस मात्र मी जुन्या ग्रंथांतून घेतला आहे खरा; किंबहुना जुन्या ग्रंथांतीलच सिद्धान्त मला मान्य आहे. आगमनिर्णयांत शब्दाच्या अर्थाचे नवीन नियम काढून ठेवून काही जुनेहि घेतले आहेत. ते, नव्या युक्ति कोणत्या व जुन्या युक्ति कोणत्या हे दाखविण्याला स्पष्ट उदाहरणच आहे. "जुन्या युक्ति आहेत तेथे माझी योजना नवी आहे, व जेथे नव्या आहेत तेथे अवयवनिचय[१] नवा आहे. अनुभव जुना असून जेथे जुन्या ग्रंथात त्याला शब्द नाही तेथे परिभाषा नवी आहे,"

६) प्राचीन शास्त्रकारांनीही यापेक्षा काही नवीन केले असेल असे मला माहित नाही. शंकराचार्यांनी देखील ब्रह्मसूत्रांवरील भाष्य, सूतसंहितचे नुसते वृत्तबंधन तोडून प्रत्येक सूत्राचे ठिकाणी जशाच्या तशाच अक्षरांनी गद्य घेतले आहे, हे मी पुराणवाक्यांवरून व आपल्या परिशीलनावरून सिद्ध करून देण्यास तयार आहे. अत्यंत नवीन तत्त्वज्ञानाची संवय सेनेका वगैरे स्टोइक्स लोकांस आहे, आह्मा हिंदूस नाही.

"त एव पदविन्यासास्ता एवार्थविभूतय: ।
तथापि नव्यं भवति काव्यं ग्रथनकौशलात् ॥"

या श्लोकाप्रमाणेच माझी ही काही तरी माकडचेष्टा आहे झाले. कोणाला पसंत नसल्यास ग्रंथ विकत घेऊन वाचण्यात आपला वेळ दवडू नये.

---

१ सामुग्रीचा संग्रह.

दुसऱ्यांनी केलेल्या युक्तिवादानें मी चिडतो.

७) चवथा मुद्दा :–यासंबंधी काहीहि लिहिले तरी बाजू सांभाळली, अशा समजुतीतच त्याचे पर्यवसान होण्याचा संभव आहे. तथापि त्या पत्रांत हेत्वाभास होते असे मी उत्तरात लिहिले आहे. ज्या युक्ति पत्रात लिहिल्या होत्या, त्या युक्तींची चर्चा माझेजवळ स्वत: आपली होऊन गेली आहे. हे समजून मी थोडीशी भाषा उत्तरांत कडक वापरली होती. एखाद्या गोष्टीवर लिहितांना किंवा शंका काढतांना 'पूर्वोपलब्धपरिहार' नांवाचा दोष उत्पन्न होत असतो. तो होऊं नये एवढेच मला उत्तरांत दाखवावयाचे होते.

पूर्वोपलब्धपरिहार

८) पूर्वोवलब्धपरिहार म्हणजे पुन्हा पहिल्या ठिकाणी येणे. याचे स्पष्टीकरण असे की, कल्पना करा, एक लोकायत[१] आहे. त्याने प्रत्यक्षच प्रमाण आहे, इतर प्रमाणे नाहीत, असे म्हटले असता, त्याला अलोकायतानें असा प्रश्न केला की, " स्वप्रत्यक्ष प्रमाण आहे असे तूं ह्मणतोस, की सर्वांचे प्रत्यक्ष प्रमाण आहे असे तूं ह्मणतोस ? पहिल्या पक्षी तुझे बोलणेंच आह्मांस ऐकू येत नाही असे आह्मी ह्मणतो. प्रत्युत्तर देतां ह्मणून माझे बोलणें तुह्माला ऐकू येते असे ह्मणशील, तर हेतुसाध्यादि अवयवास्तव, हे अनुमान होईल, प्रत्यक्ष प्रमाण होणार नाही. दुसऱ्या पक्षी तर अनुमान स्पष्टच आहे." या अलोकायताच्या बोलण्यात लोकायत आस्तिक झाला, व कांही दिवस चांगले आचरण करू लागला. नंतर त्याने प्रयत्नवादावर शंका काढली की, 'सर्वच काही प्रयत्नाने मिळत नाही, ह्मणून मनुष्य परतंत्र आहे. अत्यंत परतंत्र ह्मणजे जडाचाच मनुष्य तयार होणे होय; मग आत्मा कशाचा ?' या युक्तीने पुन्हा तो लोकायत पहिल्याच ठिकाणी येतो. मग त्याला ह्मणावे लागते की, 'अरे, तूं प्रत्यक्षवादी जर आहेस, तर दुसऱ्याला तरी अनुमानाने कसा अडवितोस ?' या बोलण्याने पुन्हा तो आस्तिक होतो. मग एकदोन वर्षांनी तो कृष्णचरित्रावर शंका काढतो की, 'ईश्वरालाहि जर असे चाळे सुचतात. तर ऋण काढून सण करावा; मेल्यावर कोण कोणाचे ? या लोकांतच जे काही आहे ते आहे.' ईश्वर मानून देखील या शंकेने तो पुन्हा पहिल्याच ठिकाणी येतो. मग अकृताभ्यागम, कृतप्रणाश इत्यादि दोष दाखविणाऱ्या जुन्या युक्तीने तो पुन्हा आस्तिक होतो. मग दहा पांच वर्षांनीं रामाच्या वनवासावर शंका काढतो की, "ईश्वरालाहि कर्मभोग चुकला

१. एक नास्तिक मत

नाही; तेव्हां सर्व पारतंत्र्यच भरले आहे! जडात आणि चैतन्यात काही विशेषसा फरक नाही." या शंकेनें तो पुन्हा पहिल्याच ठिकाणी येतो, आणि शंका काढताना पूर्वीच्या युक्तीची आठवणहि ठेवीत नाहीं. 'विकाराच्या भरांत येऊन विचार करणाऱ्या सर्वांच्या भाषणात हा दोष उत्पन्न होत असतो.' ह्मणूनच योगशास्त्रांत चित्तनिरोधानंतर विवेकख्यातीचे महत्त्व वर्णिले आहे. आपण लोकायत नव्हता हे मला पक्के ठाऊक आहे. आपले माझ्याजवळचे पत्र हारवले आहे. तेव्हा आपल्याजवळ ते कायम असल्यास पुन्हा पाठवावे, म्हणजे त्यात 'पूर्वोपलब्धपरिहार' नांवाचा दोष कसा झाला आहे हे मी शब्दाशब्दावर लिहून पाठवीन. पत्रात माझ्या पूर्व युक्तीचे खंडणहि केले नव्हते. हा एक जुनाच दोष असून त्याला मी नवीन नांव दिले आहे. दुसऱ्याच्या ह्मणण्यातील हा एक दोष काढता न आला ह्मणजे खंडनमंडनाचे एकावर एक न्यायामृत, अद्वैतसिद्धि तरंगिणी, शतदूषणी, ब्रह्मानंदी, सहस्त्रदूषणी इत्यादि द्वेषजनक असे ग्रंथावर ग्रंथ होत जातात.

पारतंत्र्य, स्वातंत्र्य व शिक्षण

९) पारतंत्र्यांचे व स्वातंत्र्याचे मूळ तर असे आहे की, १–वृत्ति जेव्हा सत्ताविषयिणी असते, तेव्हां सामान्यचेतनस्थ अविद्येमुळे परतंत्र होते, व प्रारब्धादि पारतंत्र्यसामग्रीला उत्पन्न करिते. २–जेव्हा ती चितिविषयिणी असते, तेव्हां विशेष चैतन्यामुळे अविद्येच्या विक्षेपांशनाशानें स्वतंत्र होते; आणि प्रयत्नादि स्वातंत्र्यसामग्रीला उत्पन्न करिते. ३–जेव्हा ती आनंदविषयिणी असते, तेव्हां तिला दोहींचेहि खरे फळ मिळते.

१०) आता प्रवृत्तिमार्गांत सत्ताविषय बलवान झाल्यास, चितिविषयाची मदत कशी घ्यावी हे समजून घेण्याचेच नांव "शिक्षण" आहे. सच्चिदानंद वस्तुतः एक आहे, तरी वृत्तिभेदाने ते पृथक् भासतात, या पंचपादिकाकारांच्या म्हणण्यावरून मी ही दैवपौरुषाची नवी मीमांसा सांगितली आहे. स्थलसंकोचास्तव तिच्या विषयींच्या संपूर्ण युक्ति लिहिता येत नाहीत. अशाच रीतीने कोण्या पुस्तकांत ही सिद्ध केली असल्यास दाखविल्यानें उपकार होतील. समजा, हिच्यावर जर कोणास शंका काढावयाची असेल, तर प्रथम ब्रह्माचे सच्चिदानंदस्वरूप वृत्तीत भासत नाही असे कबूल केले पाहिजे. नंतर वेदान्त काही तरी सांगतो असे कबूल केले पाहिजे. परंतु असे मानणाराला आम्ही ही युक्तिच सांगत नाहीं, कारण तो पहिल्याच ठिकाणी

ह्मणजे पूर्वोपलब्धपरिहारात सापडतो. तेव्हा शंका करिताना इतक्या गोष्टी मान्य आहेत व इतक्या नाहीत हे, प्रतिज्ञेशी विरोध येऊ न देताना प्रतिज्ञापूर्वक, आरंभी सांगावे लागते; आणि अशीच सर्व प्राचीन पद्धति आहे. नाहीतर निर्णयाच्या ऐवजी

"जिव्हायाश्छेदनं नास्ति न तालुपतनाद्भयम् ।
निर्विशेषेण वक्तव्यं वाचाल: को न पंडित: ॥"

अशी स्थिति होते. अशापुढे "तयाची फजिती करूं आम्ही" व 'तोंवरीं तोंवरीं माळामुद्रांचें भूषण । जों तुकयाचें दर्शन झाले नाहीं ॥" असा ज्ञानाचा अभिमान बाळगणाऱ्या समर्थांनीही हात टेकले आहेत, मग आमची कथा काय ? तो अभंग येणेप्रमाणे :–

पाखंडयानें पाठी पुरविला घुमाळा । तेथे मी विठ्ठला काय बोलों ॥ १ ॥
कांद्याचा खाणार चोजवी कस्तुरी । आपण भिकारी अर्थ नेणें ॥ २ ॥
न कळे मज तें पुसती छळुनी । लागतां चरणीं न सोडिती ॥ ३ ॥
तुझ्या पायांविण दुजे नेणें कांहीं । तूंचि सर्वां ठायीं एक मज ॥ ४ ॥
तुका म्हणे खीळ पडो त्यांच्या तोंडा । किती बोलों भांडा वादकांशीं ॥ ५ ॥

११) शेवटी त्यांना देखील "तुका म्हणे तुम्ही करा घटापटा । नका जाऊं वाटा आमुचिया" असे म्हणणे भाग पडले. त्यांच्यापेक्षा मी अधिक शहाणा आहे असे मला वाटले नाही, वाटत नाही व वाटूंहि देणार नाही. अनध्यस्त-विवर्त आह्मी मान्य करूं, पण "ऐतिह्य प्रमाण मानणार नाही" असे म्हणणाऱ्यावर 'पूर्वोपलब्धपरिहार' दोष येतो. कारण कृष्णमूर्तीची आह्मी अनध्यस्तविवर्तता सिद्ध केली, तरी ऐतिह्यप्रमाण ज्याला मान्य नाही, त्याला कृष्णच मान्य नाही; तेव्हा त्याची सर्व अवतारांवरच शंका होणार, व त्यामुळे ईश्वरांच्या साकारतेवर शंका होणार व त्यामुळे मूर्तिपूजेवर शंका होणार. ह्मणून तुझ्यावर हा पूर्वोपलब्धपरिहार दोष येतो असेच मी त्याला ह्मणेन ! याशिवाय मी दुसरे काय उत्तर देणार ? कोणी ह्मणेल, 'आह्मी इतक्या शंका करतो, आणि इतक्या शंका येत असल्या तरी करीत नाही,' तर त्याला 'मी इतक्या प्रश्नांची उत्तरे देतो व इतक्या प्रश्नांची उत्तरे, खुषी आहे, नाही देत !' असे ह्मटले असता कोठे चुकते ? युक्तीचा मुद्दा मननात्मक असून तो बाधकयुक्ति-अभिमान्यांना[1] अपुरा आहे. प्रकाश्यश्रुतार्थसाधक

१. काही एक सिद्ध न करितां नुस्ता प्रश्न खोडून काढण्याकरितांच युक्ति लढविण्यांत ज्यांना अभिमान वाटतो.

**युक्तीच्या संग्रहाचेच नांव** मनन **आहे.** सर्व शब्द अनियतार्थ नाहीत, म्हणून वृत्तिलोप[२] काही करता येत नाही, व त्यामुळे मतभेद असला तरी कोणालाहि कोणत्या शब्दाचा अर्थ फिरविताच येत नाही, हा एक नवीन नियम मी आपल्या आगमनिर्णयात शब्दाच्या अर्थाविषयी घालून ठेविला आहे. **हा जुन्या पुस्तकांत दाखवून द्यावा किंवा खंडन तरी करावा, अशी माझी इच्छा आहे. याप्रमाणे चवथ्या मुद्याचे उत्तर दिले.**

वादीशी पाठ फिरविणें

**१२) आतां पांचव्या मुद्याचे उत्तर देतो :– मला संस्कृत भाषा ह्मणजे कौमुदी येत नाही, ह्मणजे पाठ नाही; यामुळे व पंडितांना धातु विचारण्याची संवय असल्यामुळे मी पळून जातो. जे मला येत नाही ते मी स्पष्ट कबूलहि करतो. तत्त्वनिर्णय करता येत नाही, या भीतीने पळून जात नाही. आता कोणी म्हणेल की, 'मग तुमच्या शब्दाचे अर्थ बरोबर असतात हे आह्मी कशावरून समजावे ?' तर त्याला माझे उत्तर असे आहे की, वाचस्पत्यादि कोश व शब्दकौस्तुभादि ग्रंथ समोर ठेवून जो शब्दाचा अर्थ वादीला मान्य होईल तोच अर्थ घेऊन मी स्वभाषेत बोलण्याला तयार असतो. ज्याप्रमाणे धातूंच्या फुकट काथ्याकुटाला मी भितो, त्याप्रमाणे शुष्क तर्कालाहि भितो, न्यायात प्रमाण व तर्क हे दोन निराळे सांगितले असून अनिष्टापादान हे तर्काचे लक्षण आहे, व त्याला भ्रमज्ञानांत घातले आहे.**

वाद, जल्प, वितंडा व आतिवाद यांचे स्वरूप

**१३) वाद, जल्प, वितंडा या तीन कथा शास्त्रामध्ये प्रसिद्ध असून, त्या तिहीतून कोणतीही उपपादनाच्या उपयोगी आहे, असे** "वादजल्पवितण्डानामन्यतमां कथामाश्रित्य उपपादनीयम्" **या अद्वैतसिद्धीतील वचनावरून सिद्ध होते. १–स्वपक्षाच्या व परपक्षाच्या निर्णयासाठी जे भाषण तो वाद. २–आपलाच पक्ष सिद्ध करण्यासाठी जे भाषण तो जल्प, आणि ३–परपक्षाच्या खंडणाकरितां जे भाषण ती वितण्डा या तीनही कथा प्रमाणाच्या आश्रित असून तर्काच्या साह्याने एकापेक्षां एक उत्तरोत्तर दुर्बल आहेत. तथापि या वितंडेत देखील मननांशाने साधक तर्काचाच समावेश होतो, बाधक तर्काचा होत नाही. ४–प्रमाणरहित तर्काला अतिवाद म्हणून नांव दिले आहे,** "छलजात्यादिभिर्जीयात् स महापातकी भवेत्" **असे सूतसंहितेचे वचन असून,**

---

२. शब्दाच्या शक्ति. गौणी इत्यादि ज्या वृत्ति आहेत त्यांना सोडणे.

अतिवादी नव्हे शुद्ध या बीजाचा । ओळखा जातीचा अधम तो ।। १ ।।
वेदश्रुती नाही ग्रंथ ज्या प्रमाण । श्रेष्ठांचे वचन न मानी जो ।। २ ।।
तुका म्हणे मद्यपानाचें मिष्टान्न । तैसा तो दुर्जन शिवों नये ।। ३ ।।

असे तुकाराम महाराजांचे वचन आहे. आता अतिवादक म्हणजे काय याचे थोडक्यात स्पष्टीकरण करतो. अधिक तर्क करण्याला अतिवाद म्हणतात. जी गोष्ट थोडक्या तर्कांनी सिद्ध करावयाची व सरळ सिद्ध करावयाची तिला वाचालयुक्तीचे स्वरूप देणे. जसे––मूर्तिपूजा कां करावी ? सिद्धांती– आमच्या बुद्धीला आलंबन पाहिजे म्हणून. अतिवादी–त्या मूर्तीच्या व्यक्तीत ईश्वर आहे, की जातीत ईश्वर आहे ? प्रथम पक्षी ईश्वर परिच्छिन्न झालाच पाहिजे, आणि द्वितीय पक्षी व्यक्तिभेद विच्छिन्न झाला पाहिजे. इत्यादि एक नाही कोटिशः अतिवाद आहेत. त्यांनाही मी भितो.

१४) मला जे कांही माझ्या संबंधाचे लिहावयाचे होते ते मी या पत्रात लिहिले आहे. माझ्या मनात जसा द्वेष आहे, तसा आपल्या व मंडळीच्या मनांत नसल्यास इष्टदेवताशंकात्मक हे पत्र लिहून मी प्रमाद केला आहे. ते पाप दूर करण्याचे सामर्थ्य आपण मला उत्तररामचरित शिकविले असल्यामुळे, माझ्या भावनेप्रमाणे, आपल्या ठिकाणी आहे, असे समजून मी नमस्कार करितो.

आपला,
ता. २९ । ५ । १९१३ गुलाबराव गुंडोजी मोहोड

□□□

## २४. श्री. भय्यासाहेब तांबे व बाबुराव तांबे

[वेदान्त शिकविणे–वैय्यक्तिक दोषदृष्टी–सामाजिक दोषदृष्टी–शास्त्रीय दोषदृष्टी–ढोंगी साधू–साधुपरिक्षेचे १२ प्रश्न]

# साधुपरीक्षा

।। श्रीज्ञानेश्वरमाऊली ।।

बाबूराव यांना यथासंबंध साष्टांग प्रणिपात व आशीर्वाद व लिहिलेल्या गोष्टी ध्यानात येण्याकरिता पुन्हा आशीर्वाद–

वेदान्त शिकविणे

१) पत्रद्वारे आपणांस वेदान्त शिकविण्याचे मी कबूल केल्यामुळे, आपणास पहिले पत्र पाठवून, आता हे दुसरे पत्र आपणास पाठवीत आहे वेदान्त शिकविणे म्हणजे पंडिताप्रमाणे एकाद्या शास्त्राचा पाठ शिकविणे.

किंवा तर्कशास्त्राप्रमाणे वादविवादात तयार करणे नव्हे. वादी व ज्ञानी हे दोघेहि निराळे असतात. बापाने एखाद्या मुलाला 'तुझे लग्न होईल' असे ह्मणण्याने जे सुख होते ते निराळे, व प्रत्यक्ष स्त्रीसंगाने होणारे सुख निराळे. तितकाच फरक वादी व ज्ञानी या दोघात असतो. आंधळ्याने लाल, पांढऱ्या व पिवळ्या रंगावर हजारो व्याख्याने दिली, तरी डोळसाच्या दृष्टीने ती किती हास्यास्पद होतील ? त्याप्रमाणें अनुभवावाचून वेदान्त बोलणे ही थट्टा होय.

२) आपल्याला अनुभव आणून देईल असा गुरु आवश्यक असतो; परंतु अनुभवाची लालूच दाखवून आपल्यामागे फिरविणाऱ्या पोटभरू साधूंच्या तडाक्यात सांपडल्यावर बिचारा मुमुक्षु त्याविषयी अगदी निराश होतो, व शेवटी आपली नीतिमत्ता जेवढी आहे तेवढीच पुरे, असे ह्मणून मागे फिरतो. आईबापावाचून निर्जन अरण्यात पडलेल्या पोरक्या पोराप्रमाणे त्याची स्थिति होते व पुढे त्याची दृष्टि मंद होऊन शेवटीं तो कोणत्याही ठिकाणी दोष पहावयास लागतो. माझ्या मताने हे दोष पाहणे चांगलेही आहे व वाईटही आहे. इतरांप्रमाणे पोटभरू साधूंच्या तडाक्यात आपण सापडू नये या दृष्टीनें दोष पाहणे उत्तम आहे, आणि कोणीच चांगला महात्मा जगात नाही अशा दृष्टीनें दोष पाहणे वाईट आहे, योग्य उपयोग केला नाही, तर अन्नही विष होते व योग्य उपयोग केल्यास विषही रोगहरण करिते, ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. दोष पाहताना आपणांला दोष पाहता येतात किंवा नाही याचाही चांगला विचार केला पाहिजे. तांदूळ निवडताना खडा समजून तांदूळ फेकून देणाराला कोण शहाणा ह्मणेल ? त्याप्रमाणे दोष पाहताना गुणही दोषवत् वाटून, ते फेकून दिले जाऊ नयेत, ह्मणून आपली दृष्टि निर्मल केली पाहिजे. दोषदृष्टि तीन प्रकारची आहे. वैयक्तिक, सामाजिक व शास्त्रीय.

### वैयक्तिक दोषदृष्टि

३) आपल्या मनाच्या जे जे विरुद्ध तो तो दोष असे समजणे ही वैयक्तिक दृष्टि आहे. ही दृष्टि भयंकर, गुणालाही दोष करून दाखविणारी आहे. घरात, देशात, व धर्मात कलह माजविणारी हीच दृष्टि आहे. एखाद्या सुखी मनुष्याला पैसा मिळत असला ह्मणजे दुःखी सद्गुणी मनुष्यालाही तो पापी समजतो. हे याच दृष्टीचे पाहणे आहे. वाटेल तशा ढोंगाने पैसा मिळवून हजारो लोकांना जेवू घालणारा साधु, शांत व एकान्ती असणाऱ्या

मुनीला दरिद्री ह्मणतो तो याच दृष्टीमुळे. बाप मुलांला व मुले बापाला ह्याच दृष्टीमुळे वाईट ह्मणत असतात. ह्मणून ही वैयक्तिक दोषदृष्टि सर्वस्वी नाश करणारी व भयंकर असल्यामुळे, हिच्यामागे शहाणे पुरुष जाता नहीत.

सामाजिक दोषदृष्टि

४) दुसरी दोष पाहण्याची दृष्टि ह्मणजे सामाजिक. ही थोड्या अंशी बरी आहे, व पुष्कळ अंशी वाईट आहे. समाजाच्या विरुद्ध असण्याला दोष ह्मणणे हेच या दृष्टीचे स्वरूप आहे. परंतु प्रत्येक समाजाची घटना निरनिराळी असल्यामुळे प्रत्येक समाज प्रत्येक समाजाच्या दृष्टीने सदोष आहे. पुन्हा प्रत्येक मनुष्यांत समाजाच्या दृष्टीने काहीतरी दोष असतातच. समाजशास्त्री लोकांनी समाजाला सारखे धन वाटण्याचा प्रयत्न करून पाहिला असतांना तो साधला नाही ही गोष्ट प्रसिद्ध आहे. समाजाला अति अनुकूल राहिल्यास कुटुंब दोष देते, व कुटुंबाला अनुकूल राहिल्यास समाज दोष देतो. ह्मणून सामाजिक दोषदृष्टि 'इकडे आड व तिकडे विहीर' अशा स्वरूपाची असून अंधुक आहे; तथापि हिच्या योगाने मनष्याला इहलोकात बरे ह्मणवून घेण्याचा आव घालता येतो.

शास्त्रीय दोषदृष्टि

५) तिसरी शास्त्रीय दोषदृष्टि होय. ही धन्यतमा असून गरीब मुमुक्षूंचे रक्षण करणारी माता आहे. 'शास्त्राच्या विरुद्ध ह्मणून जे जे असेल तो तो दोष असे समजणे' हे हिचे स्वरूप आहे. अशा प्रकारे दोष पाहण्याची शास्त्रीय सवय ज्याला लागली आहे, तो मनुष्य पोटभरू साधूंच्या तडाक्यातही फसत नाही, व शेवटी समाजाकडून पराभूत न होता आपले परलोकचे कल्याणही साधून घेतो; परंतु ही दृष्टिही गुरुजवळूनच शिकली पाहिजे; शास्त्रे वाचून किंवा वादविवादाचे तर्क करून, शास्त्रीय कोणते व शास्त्राच्या विरुद्ध कोणते हे समजत नाही. आपल्या मताने शास्त्रें वाचू लागल्यास आपल्या पहिल्या मताला अनुकूल असतील अशीच वचने आपण काढून घेतो. एकाद्या वेश्येने भागवत ऐकल्यावर गोपिकांच्या गोष्टीवरून जारकर्म करणे शास्त्रीय आहे, असे तिला वाटल्यास तिची सुधारणा काय होणार ? शास्त्राने आपल्या पहिल्या मतात बदल पाडला नाही तर त्यानें आपल्याला ज्ञान तरी काय शिकविले ? पाहुणे गेल्यावर शिळे अन्न त्यांना मिळाल्यास, त्यास पाहुणार केला असे कोण ह्मणेल ? ह्मणून शास्त्र ह्मणजे काय ? हे सद्‌गुरुपासूनच समजून घेतले पाहिजे.

ढोंगी साधू

६) परंतु पोटभरू साधूंच्या तडाख्यात सापडलेल्या मनुष्याला सद्‌गुरु कोणाला ह्मणावे हे समजणे अत्यंतच कठीण असते. खऱ्या महात्म्यांचेही प्रारब्ध निरनिराळे असल्यामुळे वरवर पाहताना खरे महात्मेही समजून येत नाही. व्याख्यानाने तत्काल मनावर परिणाम करणारे काही तोंडाचे पटाईत आतून पक्के गळेकापू असतात, असे कित्येक वेळा आढळून येते; व त्यामुळे वेदान्ताच्या ऐवजी आपण कोकशास्त्र शिकत आहो असे मुमुक्षूला वाटू लागून तो निराश होतो. ह्मणूनच खरा गुरु मिळणे हे ईश्वरानुग्रहावाचून होत नाही असे योगवासिष्ठादि ग्रंथांत ह्मटले आहे. आईबाप देखील प्रेमळ मिळण्याला पुत्राचे भाग्य पाहिजे. दारूकरिता मुले विकणाऱ्या आया हिंदुस्थानात सध्या नाहीत, हे थोडेसे भाग्य ह्मणता येईल. सद्‌गुरु ह्मणविणाऱ्यांनी योगाचे ज्ञान अनुभवाने करून दिले पाहिजे. परंतु अनुभवाचे प्रश्न करण्याचीही शिष्याला अक्कल पाहिजे.

ढोंगी साधूच्या परीक्षेचे १२ प्रश्न

७) योग दोन प्रकारचा आहे; गृहस्थयोग व संन्यासयोग. प्रपंच करून परमार्थ साधणे हा गृहस्थयोग व केवळ परमार्थाच्याच मागे लागणे हा संन्यासयोग. दुसऱ्या योगाची आपणाला काही जरूर नसल्यामुळे, पहिल्या योगाचीच प्रथम आपल्यास माहिती करून देतो. ढोंगी साधूंची फजिती करण्याकरिता व खऱ्या गुरूंची ओळख होण्याकरिता मी खाली प्रश्न लिहितो. त्यांची उत्तरे जरी आपल्याला सध्या ठाऊक नसली, तरी त्या प्रश्नांची उत्तरे आपल्याला पाहिजेत हे आपण आपल्याच मनांत समजून, पत्र वाचून प्रश्न पाठ करून ठेवावे. पुढे त्यांची उत्तरे कळतीलच. कोणी महात्मा आहे किंवा नाही हेंही या प्रश्नांवरून आपणाला निश्चित कळून येण्यासारखे आहे. हे प्रश्न तर्कदृष्टीचे किंवा कुत्सित दृष्टीचे नसून केवळ अनुभवाचे आहेत; व ह्यांच्या उत्तराची मुमुक्षूंना फार आवश्यकता आहे. साधारण साधू या प्रश्नांची उत्तरे कशी देतात, व ती अनुभवास किती पटतात, हेही आपण पाहिले पाहिजे, व त्यावरून ह्या प्रश्नांची मुख्य उत्तरें काही निराळी असतील हेही ओळखून घेतले पाहिजे. ह्मणून ते प्रश्न व साधारण माणसाकडून त्यांची येण्याजोगी उत्तरे, व त्या उत्तरांचे अनुभवाला न पटणें ह्या दृष्टीने मी ही पत्रे आपणाला लिहीत आहे. त्यातून ह्या पत्रात काही लिहितो. हे वाचून झाल्यावर आपणास जसे वाटेल तसे उत्तर पाठवावे.

प्रश्न विचारताना उत्तर देणारा भोंदू असो किंवा साधु असो, त्याच्याशी नम्र भाषण करावे, व पुढीलप्रमाणे प्रश्न विचारावे.

८) प्रश्न पहिला :– महाराज, गृहस्थाने 'जीवब्रह्म दोन्ही एकच आहेत' असे ध्यान सर्व कामे करून कसे करावे ? कारण कामे करताना अहंकार थोडासा तरी धरावा लागतो, व ब्रह्म तर अहंकाररहित आहे.' या प्रश्नावर अनुभव नसून केवळ शास्त्र शिकणाराचे साधारण उत्तर :–"गृहस्थांना ज्ञानच होणे शक्य नाही, त्याने कर्मेच करावी" यावर त्या साधूला असे म्हणावे की, 'जनकादिक गृहस्थांना ज्ञान नव्हते काय ?' यावर साधारण उत्तर :–– 'त्यांचे प्रारब्ध मोठे होते' असे कोणी दिल्यास, 'माझे प्रारब्ध तसे नाही याविषयी आपल्याजवळ काय पुरावा आहे ? मांस खाणाऱ्या धर्मव्याधाला देखील ज्ञान झाले अशी कथा महाभारतात आहे; त्यापेक्षा तर मी काही वाईट करीत नाही.' असे ह्मटले असता साधारण साधु उगाच राहील. परंतु हे प्रश्न विचारणाराचीही नीतिमत्ता उत्तम पाहिजे. जे दोष दुसऱ्यावर आपण ठेवतो ते दोष आपल्या अंगी नसावे हे पक्के ध्यानात ठेवले पाहिजे. व्यभिचारी मनुष्याला दोष लावणारा ब्रह्मचारी किंवा एकपत्नी तरी असला पाहिजे.

९) प्रश्न दुसरा :– तरुण गृहस्थाला महिन्याचे महिन्याला स्त्रीसंग करणे आवश्यक आहे; परंतु स्त्रीसंगकाली इतर ध्यान केले असता शुक्रसंपातच होत नाही. ह्मणून ब्रह्मध्यान करून योग्य रीतीने वंशवृद्धि कशी करता येईल ? यावर साधारण साधूचे उत्तर :–"हा प्रश्न विचारणे सभ्यपणाचे नाही." हे उत्तर आल्यास आपण असे म्हणावे की, "महाभारताच्या अनुशासनपर्वांत संभोगकाली पुरुषाला सुख अधिक होते किंवा स्त्रीला सुख अधिक होते, असे जे धर्मराजाने भीष्माला विचारले आहे, ते सभ्यपणाचे नाही काय ?" यावर ढोंगी चुप बसतो.

१०) प्रश्न तिसरा:–आपले ज्ञान आपल्या संततीत उतरण्याकरिता व आपली संतति आपल्याप्रमाणेच नीतिमान् होण्याकरिता स्त्रीसंभोगकाली गर्भस्थापक प्राणायाम करावा असे शास्त्र आहे; परंतु तशा प्राणायामाची संवय केल्यास संध्येतही प्राणायाम करताना काम उत्पन्न होऊन शुक्रपात होतो, आणि गर्भस्थापक प्राणायामाची संवय न केल्यास स्त्रीसंभोगकाली प्राणायाम करिता येत नाही; परंतु गृहस्थाला तर योग्य संतति उत्पन्न करण्याची जरूर आहे; नाही तर शिवाजीचा मुलगा संभाजी झाल्यास काय उपयोग? यावर

साधारण साधूचे उत्तर:–"तुकारामबोवांची संतति तुकारामासारखीच झाली काय ?" यावर आपण असे म्हणावे की, "ब्रह्मज्ञान व भक्ति ही ज्याची त्याची स्वतंत्र आहे; परंतु सद्‌गुण व शौर्य ते तर कुलात उतरलेच पाहिजेत, नाही तर अर्जुनाचा मुलगा अभिमन्यु अर्जुनासारखाच निघाला या इतिहासाची वाट काय ?"

११) प्रश्न चौथा:–गृहस्थाला शरीर चांगले ठेवणे जरूर आहे, व त्यामुळे भोजनकाळी निरनिराळ्या पदार्थांची रुचि घेणे आवश्यक आहे. ती रुचि घेत असताना ब्रह्मध्यान कसे करावे ? कारण रुचि घेणे मनाच्या चंचलपणाचा धर्म असून, ध्यान हा मनाच्या एकाग्रपणाचा धम आहे. यावर ढोंगी साधूने 'जेवायचे वेळी ध्यानच करू नये,' असे उत्तर दिल्यास जेवणे हे पोट भरणे नसून, हृदयस्थ परमात्म्याला आहुति देणे आहे असे जे वेदान्तात सांगितले आहे, त्याची वाट काय ?

१२) विशेष सूचना:–मूर्ख साधु दोन प्रकारचे आहेत. कांही केवळ लुच्चे व काही अर्ध्या हळकुंडाने पिवळे झालेले. हे चार प्रश्न पहिल्याकरिता असून पुढील प्रश्न पहिल्या व दुसऱ्या अशा दोघांहीकरता आहेत. पुरा अनुभव न येता थोड्याशा अनुभवाने शेफारून जाऊन गुरुपणाचा बुरखा घेणारे दुसऱ्या प्रकारचे साधु असतात. मी त्यांना 'हरिद्रार्धपीत' म्हणजे अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणारे असे नांव दिले आहे. हे पढलेले असून कढलेले नसतात. यांच्याविषयी तुकाराम महाराजांनी—

> शिकल्या बोलाचे सांगतील वान । न कळे प्रेमखुण विठोबाची ॥
> अभ्यासाचे अंगीं असती सर्व कळा । भक्तिचा जिव्हाळा वेगळाची ॥

असे स्पष्ट म्हटले आहे.

१३) प्रश्न पांचवा:– विरक्त पुरुष आपल्या आत्मज्ञानातच निमग्न असल्यामुळे, दुसऱ्याच्या भिक्षेने तो पोसला जातो; तेव्हा स्वार्थी विरक्त श्रेष्ठ किंवा परोपकारी गृहस्थ श्रेष्ठ ? विरक्त श्रेष्ठ मानल्यास परमेश्वराच्या घरी अन्याय होईल, आणि गृहस्थ श्रेष्ठ मानल्यास त्याला हळुहळु मुक्ति कां होते ?

१४) प्रश्न सहावा:—आत्म्याच्या आकाराची अंतःकरणाची वृत्ति करणे याला ब्रह्मज्ञान म्हणतात, आणि अंतःकरण अज्ञानापासून झाले आहे असे वेदान्त सांगतो. तेव्हा अंतःकरणाची वृत्ति आपल्या अज्ञानरूप कारणाचा

नाश कसा करील ? लांकडातून उत्पन्न होणारा अग्नि लांकडांच्या जातीचा नसतो, म्हणून तो त्याचा नाश करतो, परंतु अज्ञानातून उत्पन्न होणारे अंत:करण अज्ञानाच्याच जातीचे आहे. लांकडातून उत्पन्न होणारा अग्नि जेथे उत्पन्न होतो तेथे त्या लाकडाचा नाश करतो, परंतु अज्ञानातून उत्पन्न होणारे अंत:करण सर्वच ठिकाणी अज्ञानाचा नाश करते असे दिसत नाही; कारण तसे असते तर ज्यांना ज्यांना अंत:करण आहे, ते ते ज्ञानी झाले असते, परंतु आम्हाला अंत:करण असून आम्ही अजून अज्ञानीच आहोत.

१५) प्रश्न सातवा:– ईश्वराची भीति बाळगावी, किंवा त्यावर प्रेम करावा ? भीति देहाच्या आश्रयाने होत असते, म्हणून भय बाळगणाराला अहंकारच असतो. भीति सोडून प्रीति केल्यास प्रेमाने परमेश्वराचा अनादर होऊन अहंकारच वाढतो. दूध उतू गेले असता कृष्णास टाकून यशोदा दुधाकडे धावत गेली हे पुराणप्रसिद्ध आहे. तेव्हा भगवद्भक्तीने अहंकार-रहित होता येते, हे कसे ?

१६) प्रश्न आठवा :– वृत्ति साकार आहे व ब्रह्म निराकार आहे. ब्रह्माच्या आकाराची वृत्ति होईल तर ब्रह्मही साकार होईल, किंवा उपाधि-बद्ध तरी होईल. उपाधिबद्ध ब्रह्माचे ज्ञान होणे व जीवाचे ज्ञान होणे सारखेच आहे. कारण जीवही उपाधिबद्धच आहे; अशा उपाधिबद्ध ब्रह्माच्या ज्ञानाने जर मुक्ति होत असेल, तर आम्हाला जीवाचे ज्ञान आताही आहे, त्यानेही मुक्ति व्हावी !

पुनर्विशेषसूचना:– अर्ध्या हळकुंडाने पिवळे झालेले साधु दोन प्रकारचे आहेत; शास्त्र शिकलेले व थोडासा योग शिकलेले. पैकी ५, ६, ७, ८, हे प्रश्न केवळ शास्त्र शिकलेल्यांकरिताच आहेत. आता पूर्ण योग न शिकता थोड्याशा योगाने गुरु म्हणवून घेणारे जे आहेत त्यांच्याकरिता प्रश्न सांगतो.

१७) प्रश्न नववा:– गुरुमंत्र जपण्याकरिता कोणता मंत्र कोणाला सुसिद्ध आहे हे पाहावे लागते. परंतु गायत्री व भगवन्नाम हे तर सर्वांना सारखेच दिले जाते. त्याने गायत्री सुसिद्ध आहे किंवा नाही हे कसे पहावे ? यावर साधारण योगी असे उत्तर देतो की, गायत्री व भगवन्नाम यांना सिद्ध व सुसिद्ध हे पहावयाचे नाही. तेव्हां 'विद्यारण्यांनी चोवीस पुरश्चरणे करूनहि गायत्री प्रसन्न झाली नाही, व संन्यास घेतल्यावर प्रसन्न झाली; ती कां ?' असे त्याला विचारावे.

१८) प्रश्न दहावा:- **थोडासा योग जर पहिल्या जन्मात झाला असला तर दुसऱ्या जन्मात गुरूवाचून तो योग पूर्ण होतो असे म्हणतात. मग राम–कृष्णादिकांनी गुरु कशाला केले? यावर साधारण योगी असे उत्तर देतो की, 'रामकृष्णांनी लोकांनी तसे वागावे (म्हणून) हा मार्ग दाखवून दिला. त्यांना तसे करण्याची काही अपेक्षा नव्हती.' तेव्हा आपण असे म्हणावे की, 'रामकृष्णादि ईश्वरांचीं ही लीला होती हे ठीकच आहे, परंतु अर्जुन तर भक्त असून जीव होता. त्याला देवाचा समागम झाल्यामुळे त्याचा पूर्वी थोडासा योग झाला असला पाहिजे हे तर ठरलेलेच आहे. मग त्याला देवाला ज्ञान कां विचारावे लागले?' यावर साधारण योगी हरल्यासारखे करून, हे बरे आपल्या पथ्यावरच पडले असे समजून, थोडासा योग शिकलेल्यालाही दुसऱ्या जन्मी गुरूवाचून ज्ञान होत नाही हे कबूल करील; तेव्हा 'वामदेव जीव असून ईश्वराचा अवतार नसताहि त्याला गर्भातच गुरूवाचून ज्ञान झाले, अशी कथा ऋग्वेदाच्या ऐतरेयोपनिषदात आहे त्याचीं वाट काय?' असे विचारावे.**

१९) प्रश्न अकरावा:-**डोळ्यात दिसणारे पांढरे, पिवळे, लाल रंग परमेश्वराची व्यक्त रूपे आहेत, असे यजुर्वेदाच्या श्वेताश्वतर उपनिषदेत सांगितले असून तुकारामादि सत्पुरुषांनीहि तसेच म्हटले आहे. परंतु तसे रंग एकादी झुंबराची कांच घेतल्यास तीतही दिसतात; तेव्हा डोळ्यातील रूपे परमेश्वररूपे आहेत, व कांचेतील नाहीत, याविषयी अनुभव प्रमाण कसा होतो? यावर थोडासा शिकलेला योगी असे म्हणेल की, डोळ्यातील रंग शरीराच्या आतील असून शरीराचा व आत्म्याचा निकट संबंध आहे, म्हणून त्या दोन-दोन रंगांच्या संधीत आत्म्याचे ज्ञान स्पष्ट होऊ शकते.' असे उत्तर आल्यास आपण असे म्हणावे की 'आत्मा जसा शरीरात व्यापक आहे, तसा सर्व ब्रह्मांडात व्यापक आहे असे शास्त्र म्हणते, आणि योगशास्त्रात शरीराच्या आतील भागांचे ध्यान करण्यास सांगितले आहे, तसे आरसा वगैरे बाहेरील वस्तूंचेही ध्यान करण्यास सांगितले आहे. हजारो योग्यांनी मानिलेल्या शास्त्रांस सोडून तुमचे एकट्याचे खरे कसे मानावे? बरे, डोळ्यातील रंगात व कांचेतल्या रंगात फरक नाही असे म्हणाल, तर तुमच्याजवळ येऊन योगमुद्रा शिकण्याचे कारण काय? व नासाग्रदृष्टि ठेवण्याची व भुवयांमध्ये पाहण्याची गीतेत प्रशंसा कां केली?'**

२०) प्रश्न बारावा:– श्वासामध्ये जो हंस शब्द चालतो, तो सुषुम्ना नाडीने उलट केला असता सोहं होतो, परंतु सुषुम्ना नाडीतून श्वास बाहेर येण्याला द्वार नाही. तेव्हा तो एक प्रकारचा कुंभक प्राणायामच झाला; त्यात अजपाजप कसा होईल ? यावर साधारण योग शिकलेल्याचे उत्तर:– "सुषुम्ना एकादी नाडी नसून, दोन्ही श्वास बरोबर चालणे याला सुषुम्ना म्हणतात." असे पडेल. तेव्हा पुन्हा आपण म्हणावे की, 'मग सुषुम्ना नाडीच्या योगाने ब्रह्मरंध्रात सरळ प्राण नेता येतो हे योगशास्त्राचे म्हणणेच खोटे झाले !' यावर साधारण योगी पुन्हा असे उत्तर देईल– "प्राणायामाचा योग निराळा व अजपायोग निराळा. प्राणायामाने एकसारखा समाधि राहतो व अजपायोगात श्वासाच्या संधीत समाधि होतो." असे उत्तर दिल्यास त्याला जोराने म्हणावे की, "समाधि म्हणजे चित्तास निराकार ब्रह्मावाचून दूसरे काही न स्फुरणे. परंतु श्वासाच्या संधीत तर राममंत्र जपणे कपिलगीतेच्या तिसऱ्या अध्यायात सांगितले आहे, तेव्हा श्वासाच्या संधीत समाधि कसा होईल ?"

२१) या बाराही प्रश्नांची मुख्य उत्तरे निराळी आहेत. प्रश्नमालिकेची पत्रे झाल्यावर प्रश्न करण्यात आपण हुशार झाले, म्हणजे काही प्रश्नांची उत्तरे पत्रात देईन, व काहीची उत्तरे समक्ष सांगेन. पुढे असाच पत्राचा क्रम चालू ठेवीन; व हे गुप्त सांगून ठेवतो की, पुढे येणाऱ्या पत्रातील काही प्रश्नांची उत्तरे समक्ष देखील सांगणार नाही. तर थोडासा योग झाल्यावर मी स्वतः स्वप्नात सांगेन. याची आपण खूणगाठ बांधून ठेवावी. परंतु आपली तयारी मात्र कायम राहिली पाहिजे. पत्रे बहुतेक कोणाला दाखविण्याचा प्रसंग न येईल तितके बरे; व आल्यास 'स्वप्नात सांगेन' इत्यादि खुणा तरी दाखविण्याचा प्रसंग न यावा. पत्र वाचून उत्तर लवकर पाठवावे. शुक्लेंदुवत प्रेमवृद्धि असावी.

हरदा १०–१–१९१२ आपला, गुलाबराव

□ □ □

२५. आनंदकुमारस्वामीकृत

# "आर्यराष्ट्रीय विज्ञानवादाची" समीक्षा

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

१) पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा अवतार आर्यावर्तात होऊ लागल्यामुळे त्याच्या पहिल्या तत्त्वज्ञानाला एका कोपऱ्यातच बसावे लागत आहे, आर्यावर्ताचे तत्त्वविचार पावसाचे पाण्याने वाढलेल्या गवताचा परिणाम असल्यामुळे, सुवर्णपाकशाळेत तयार केलेल्या पावाची रुचि प्राथमिक रुचीला अधिष्ठान होण्यास अगदी अयोग्य आहे हे कोणालाहि मान्य नाही असे नाही; परंतु पावाची सामुग्री आर्यावर्ताजवळ नसल्यामुळे, तेथील तत्त्वज्ञानालाही पावासारखेच बळ आपल्या गवताने येईल तर पहावे, म्हणून यत्नारंभ करणे भाग पडले. शेवटी त्याने, "पालखीत बसणाऱ्याचे जीवित, वाहाणाऱ्याच्या खांद्यावर" या म्हणीला अनुसरून रामकृष्णपरमहंसादिकांच्या हृदयमंदिरात राहून पाश्चात्य तत्त्वज्ञानाकडून आपला उपजीवकपणा मिळविला. हे आपल्या घरच्या वेदान्तपुरुषाने कार्य केले असे पाहून, कलेनेहो तीव्रतेने आपल्या उपजीवकपणाकरिता यत्नारंभ करून आपल्या तेजस्वी सौंदर्यगर्भातून पाश्चात्य देशात हेवेलसारखे व सिंहलद्विपात कुमारस्वामीसारखे पुत्र उत्पन्न केले व शेवटी त्यांना कळू लागल्यावरहि ते आपल्या मातृदुग्धाला विसरले नाहीत. दहा माणसे लावून व यंत्राच्या सामग्रीने वीणकामाने तयार झालेले घर, आपल्या वैयक्तिक यत्नाने झाडाचे पिंज काढून बया जशी एकटीच तयार करू शकते तशी आमची आर्य कलामाता सामग्रीवाचून निढळाच्या घामाने जे मिळेल तेवढ्यावरच आपल्या पुत्रांचे समाधान करण्याला समर्थ आहे, असा जोराने आपला अनुभव सांगणारे पांच पांडव पुत्र अद्याप हयात आहेत.

२) आपल्याला जो एकंदर आनंद होतो तो खरोखरच चित्तैकाग्र्याचे फल असून बाह्यवस्तूशी त्याचे तादात्म्य करून तो विषयापासून झाला असें आपण म्हणतो; परंतु त्या विषयाविषयी मनाची रुचि उडाली की, आपल्यास त्यापासून उलटे दुःख होते. स्वपत्नीविषयी आलेली शंका हेच वरील विधानाचे चांगले उदाहरण होईल. वेदान्ताचे म्हणणे असे आहे की, 'हा आनंद आत्म्याचे प्रतिबिंब' असून, 'तो अगदी बाह्य सृष्टीचा

परिणाम आहे' असे व्यावहारिकांचे म्हणणे आहे. या दोघांचीही सत्यता आपल्याला कलामातेच्या वचनानुरोधाने पहावयाची आहे.

३) हा आपला नेहमीचा अनुभव आहे की, बाहेरून घेतलेल्या व रुचलेल्या विषयाची आठवण झाली म्हणजे तोच विषय पुन: मिळावा अशी इच्छा होते, व त्या आठवणीपासून आनंद न होता दु:खाचा अनुभव येतो; परंतु धर्म, प्रेम, निर्वेद, तृप्ति, अहिंसा, सत्य इत्यादि मानसिक गुणांच्या नुसत्या आठवणीनेच आनंद होऊ लागतो. नीतिशास्त्राला बहूपयोगितेचे तत्त्व आधार मानणारा पाश्चात्य तत्त्ववेत्ता मिल देखील ईश्वरासारख्या तत्त्वांना अंधविश्वासोपजीवी तत्त्वांना दूर झुगारूनही सत्यादि मानसिक गुणांपासून होणारे सुख जडापेक्षा पुष्कळपट उच्च आहे असे म्हणतो ! कला ही स्वपुत्राला आनंद–दुग्ध पाजणारी माता होय. तिची मूर्ति व्यवहाराचे प्रतिबिंब आहे की आत्म्याचे प्रतिबिंब आहे, असा घटकाभर विचार केला, तर पहिल्यापक्षी तिला आपल्याला पूतनेच्या कोटीत ढकलावे लागेल; कारण व्यावहारिक प्रतिबिंबाने घडलेल्या कलामूर्तीला वासनाविषावाचून दुसरे काही आपल्या पुत्रांना पाजता येणार नाही. एकाद्या सृष्टीतील स्वाभाविक वस्तूचे प्रकाशजन्य चित्र (फोटो) पाहण्याचे पर्यवसान, ती वस्तू जशीच्या तशी मिळावी, या वासनेतच होते; म्हणून वासनारूप सामग्रीचा परित्याग करून एकटचा एकटचातच समाधान मानणारी आमची आर्यकलामाता आत्म्याचे प्रतिबिंबाने घडलेली मूर्ति आहे. हे तिच्या 'आनंद' नावाच्या पुत्रानेच कबूल केले आहे. या 'आनंद' पुरुषाने पुस्तकरूपी पुत्र उत्पन्न करून, आपल्या आईचा वंश वाढविला आहे. या पुरुषाचे नांव आनंदकुमारस्वामी. यांचा मला शारीरिक परिचय नाही, तथापि यांच्या तिघा पुत्राशी माझी चांगली मैत्री आहे. पैकी नुकत्याच जन्मलेल्या पुत्ररत्नाच्या स्वभावाचे थोडेसे वर्णन करितो.

४) या पुत्ररत्नाचे नांव आर्यराष्ट्रीय विज्ञानवाद हे आहे. उत्क्रान्तितत्त्वाला अनुसरून या मुलाचे आंगी आपल्या बापाचा निर्भीडपणा जशाचा तसाच उतरला आहे. जन्मापासूनच याला लोकमताची भीति नाही. योगापासून तर कलेपर्यंत सर्व आर्यतत्त्वज्ञानाचे सुकुमार अंकुर या मुलाच्या हृदयक्षेत्रात चांगले वाढले आहेत. तो नेहमी म्हणतो, "अलिकडे आमच्या आर्यबहिणी पाश्चात्य ईशपुत्रांच्या शाळेत जाऊन स्वरनिवेशवाद्यावर (पियानोवर) गाणे शिकतात, व त्यामुळे स्वयंस्वरगीताला विसरतात. शेवटी

आपल्या मातेच्या स्तन्यरुचीची त्यांना आठवणहि सोडून जाते. मोहून टाकणारा स्वरनिवेश प्रियवित्तसौंदर्याच्या टंचाईमुळे जवळदेखील येत नाही. त्यामुळे त्यांच्या वासना अधिकच वाढत असतात, आणि प्रियाच्या साह्यावाचून त्या स्वयंस्वर काढण्याच्या बाबतीत अगदी परतंत्र राहातात; व आपल्या वडिल बहिणींनी मातृदुग्धाच्या जोरावर काढलेल्या स्वयंस्वरांना या नेहमी तुच्छ करीत असतात. यामुळे अर्धी टाकून सगळीवर धावण्यासारखी त्यांची स्थिति होते."

५) हे मूल आणखी असे म्हणते की, 'प्रतिध्वनिमंजूषा' (ग्रामोफोन) नांवाच्या वाद्याने तर आमचा सजीवपणा हिरावून घेण्याची मजल आणिली आहे, म्हणून तो आता आपला सजीवपणा योगांनीच राखला पाहिजे. असेच आम्ही वागलो तर आमचे पाश्चात्य बंधु देखील आमच्या स्वातंत्र्याची केव्हा ना केव्हा तरी इच्छा करतील. आमचे आत्मस्वातंत्र्यच आम्ही आपल्या मातेच्या उपदेशाप्रमाणे मिळवून घेतले नाही, तर द्वेषमूलक व शारीरिक अशा राष्ट्रीय स्वातंत्र्याचा कांहीच उपयोग नाही. म्हटलेहि आहे की, "मनामागे काया". या थोडयाशा वर्णनावरून प्रत्येकाला या मुलाचा स्वभाव कळून या मुलाची मैत्री करणे आपल्याला भूषण आहे असे वाटल्यावाचून राहणार नाही.

गुलाबराव.

□□□□

## २९. मुमुक्षु मासिकाला पत्र १.

[पूर्वपक्ष–देहाचीं पांचभौतिकता–रसाने तैजसप्रधान देह होतो–मंत्राने, कुंडलिनी सामर्थ्याने किंवा जात्यंतर परिणामाने दिव्यदेहत्व येते–उदा : नंदीश्वर, राजसेवक अर्जुन, धर्मराज–मायिक देह–विश्वासाचे जतन हाच हेतू]

# श्रीतुकाराममहाराजांचे प्रयाण

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली ॥

रा. रा. मुमुक्षुकर्ते यांस वि. वि. :—

१) ता. २०–३–१९१३ च्या मुमुक्षूतील– 'तुकाराममहाराजांचे प्रयाण' या लेखाचे उत्तर म्हणून एक लेख तारीख २२ माहे एप्रिल १९१३ च्या केसरीच्या अंकात आला आहे. तो वेदान्तप्रचुर असून त्यांतील वेदांताची मते बरोबर धरली, तरी त्यात ज्या युक्त्या दिल्या आहेत, त्यासंबंधी आलोचन करून त्याला वेदांतात अनुकूल आधार आहे काय हे मी पहात आहे.

अशा प्रकारचे माझे लेख मला मराठी भाषा बरोबर येत नसल्यामुळे, बरेच वर्तमानपत्रकार घेत नाहीत. तसे आपण करू नये अशी विनंति आहे.

२) केसरीतील लेखात, 'मलमूत्राने भरलेला हा ओल्या मातीचा देह वैकुंठात राहण्यायोग्य नाही, कारण तो दुर्गंधादिकांनी पूर्ण आहे; आणि देवांचे देह तेजोमय असतात, व सौगंधिक असतात; पूर्वदेहाचे रूपांतर देह पडल्यावाचून होत नाही,' ह्या युक्ति मुख्यतः असून, 'चूडाला राणीने आपला देह खोलीत कोंडून ठेवून दुसऱ्या देहाने शिखिध्वजाला ज्ञानोपदेश केला; श्रीशंकराचार्यांनी अमरुराजाच्या शरीरात प्रवेश केला,' असे काही ऐतिहासिक मुद्दे असून, 'देह टाकल्यावांचून त्याचे रूपांतर होत नाहीं' असा त्यांचा सारांश काढला आहे, व तदनुसार काही वचनांचा अर्थही केला आहे. यासंबंधीं मला लिहावेसे वाटते ते असे:-

३) लेखकाच्या म्हणण्याप्रमाणे, तुकाराम वैकुंठास गेले या गोष्टीवर विश्वास ठेवणारे घटकाभर भोळे किंवा हट्टी धरून चालले, तरी त्यांच्या हातून परमार्थाला प्रतिबंधक असा अपराध कोणता घडतो हे समजत नाहीं. शिवाय मानवी देह वैकुंठी राहण्यास योग्य नाही असे म्हटले, तर कोणता देह योग्य नाही ? भौतिक की मायिक ? असा प्रश्न उत्पन्न होतो. प्रथम पक्षी देवांचे दिव्य देह तेजोमय आहेत, असे म्हटले आहे. त्याविषयीही प्रश्न उत्पन्न होतो. देवांचे देह तेजोमय आहेत म्हणजे काय ? त्यांच्यामध्ये पृथ्वी व आप ही दोन तत्त्वे नाहीत किंवा ते केवल तेजाचेच बनले आहेत असे समजावयाचे ? किंवा चार भूते गौण असून तेजोभूत प्रधान आहे असे समजावयाचे ?

४) पैकी प्रथम कल्पना योग्य होत नाही. कारण मंत्रसामर्थ्यानें प्रसन्न होऊन इंद्रादि देवांनीं आपले वीर्य कुंतीचे ठिकाणी स्थापित केले असे महाभारतात सांगितले आहे. "पृथिव्या औषधयः ओषधीभ्योऽन्नम् अन्नाद्रेतः रेतसः पुरुषः" अशी तैत्तिरीय श्रुति आहे, व पृथ्वीपासून औषधी, औषधीपासून अन्न, अन्नापासून रेत व रेतापासून पुरुष उत्पन्न होतो. असा तिचा अर्थ आहे. पृथ्वी व आप हीं दोन भूतेच जर देवांच्या शरीरात नसती, तर कुंतीच्या ठिकाणी त्यांना वीर्य स्थापित करता आले नसते. त्यांनी आपले तेजोमय शुक्र कुंतीचे ठिकाणी स्थापित केले हेही म्हणणे योग्य होत नाही; कारण तसे मानले तर पांडवांना मलमूत्र होत नव्हते असे मानावे लागेल. दुसरे, भौतिक शरीर धरून कुंतीचे ठिकाणी शुक्र स्थापन केले असे धरून चालले, तरी चंद्रापासून

गुरुपत्नीचे ठिकाणी राहिलेल्या गर्भाची पौराणिक कथा, देवांचे शरीरात पृथ्वी व आप ही भूते (असल्याचे) सिद्ध करण्याला पुरेशी आहे.

५) दुसरा पक्षही योग्य नाही. कारण देवादिकांचे देहात पंचीकरण आहे, याविषयी "तदंतरप्रतिपत्तौ रंहति संपरिष्वक्तः प्रश्ननिरूपणाभ्यां" इत्यादि ब्रह्मसूत्राच्या तृतीय अध्यायाच्या प्रथम पादांतील न्याय प्रसिद्ध आहेत. स्वामी विद्यारण्यकृत पंचदशीच्या 'तत्त्वविवेक' नांवाच्या पहिल्या प्रकरणातही प्रथम पंचीकरण सांगून नंतर देवादिकांची सृष्टि सांगितली आहे. त्यांतही तिसरा पक्ष धरून चाललो, तर पार्थिवप्रधान देह तैजसप्रधान करता येतात, आणि त्याला मंत्रौषधियोग इत्यादिकांचे प्रमाणही आहे. पुनः असे करताना पूर्वदेह टाकावाही लागत नाही. १– सर्वदर्शनसंग्रहात एक 'रसेश्वरदर्शन' म्हणून विद्यारण्यस्वामींनी लिहिले आहे. त्यात रसाच्या योगाने षाट्कौषिक देह पतन न पावता तो हरगौरिसृष्टीतील होऊ शकतो असे दाखविले आहे. ते हवे असल्यास कोणी वाचून पहावे. तेथेच काही रससिद्धांची उदाहरणे दिली आहेत; त्यांचा पूर्वदेह पडल्याचे व त्यांचा संस्कार झाल्याचे उदाहरण कोणत्याही ग्रंथात नाही. २–मंत्रशास्त्रात पूर्वदेह न पडता अपर–देह घेता येण्याविषयीं अनेक उदाहरणे आहेत, व ती इंद्रजाल प्रकरणातच आहेत असेही नाही, तर अन्य प्रकरणांतही आहेत. ३–भावार्थ-दीपिकेच्या ६ व्या अध्यायात तातांनी कुंडलिनीच्या सामर्थ्याने पूर्वदेह न पडता नवा देह घेता येतो असे स्पष्ट सांगितले आहे, आणि तो देह आकाशातून देखील चालण्यास समर्थ असतो असे म्हटले आहे. ४–"जात्यंतर-परिणामः प्रकृत्यापूरात्" या पातंजलयोगशास्त्राच्या कैवल्यपादाच्या तिसऱ्या सूत्रात व त्यावरील श्रीव्यासभाष्यात प्रकृतीच्या पुरवठ्याने याच देहात देहांतरपरिणाम करून घेता येतो, असे नंदीश्वराचे उदाहरण देऊन स्पष्ट केले आहे. नंदीश्वराची कथा स्कंदपुराणातील काशीखंडात आहे, पण त्याच्याविषयी पूर्वदेह पडल्याची कथा कोणत्याही ग्रंथात प्रसिद्ध नाही. ५–एका राजाचा सेवक शंकराने कैलासात नेला असता त्या राजाने सर्व सैन्य घेऊन कैलासात लढाईला जाऊन आपला सेवक परत आणिला, अशी कथा त्याच ग्रंथात आहे. ६–पुनः अर्जुन अस्त्रविद्या संपादन करण्याकरिता याच देहाने स्वर्गात गेला होता अशी कथा महाभारतात प्रसिद्ध आहे. ७–धर्मही देहासुद्धा विमानात बसून स्वर्गास गेले होते अशी महाभारतातच कथा आहे. तेव्हा भौतिक देह देवलोकी राहण्यास अयोग्य आहे या म्हणण्यात काय तथ्य असेल ते मला समजले नाही.

६) आता मायिक देह परमेश्वराचा असतो. सर्व अवतारांचा देह मायाकार्य आहे असे श्रीमच्छंकराचार्यांनी आपल्या गीताभाष्यात स्पष्ट म्हटले आहे. तेव्हा ते वेदान्ती लोकांनाही मान्य असलेच पाहिजे. आता अवतार न मानणारे काही वेदान्ती असल्यास त्यांच्याकरता माझे हे लिहिणे नाही, परंतु केसरीतील लेखक तसे असतील असे वाटत नाही. रामकृष्णादिकांचे देह मायामय होते हे कोणीही प्राचीन शांकरवेदान्ती अमान्य करीत नाही. तेव्हा रामकृष्णास मलमूत्र नव्हते की काय अशी साहजिक शंका येते. **पण** तुझी विष्ठा पंढरीराया । सारभूत माझी काया । **असे तुकाराम महाराजांनीच म्हटले असून** मुते उंबरां आमुच्या आणि हागे । पडे ऊठतां पाय वो त्याचिमाजी । करी हास्य तेव्हां मुलांच्या समाजीं **असे वामनाने म्हटले आहे.** ऋषभदेवही देवाचा अवतार असून त्यांच्या विष्ठेचा सुगंध अनेक योजने जात होता, असे श्रीमद्भागवतात म्हटले आहे. पुनः रामकृष्णादिकांना मळमूत्र होत नसते तर त्यांच्या आईबापांना मोह पडला नसता, त्यांना ते परमेश्वर वाटले असते.

७) आम्ही वैकुंठनिवासी । आलों याचि कारणासी ।
बोलिले जे ऋषी । साच भावें वर्ताया ।।

या अभंगात स्वतःचे अवतारत्व तुकाराममहाराजांनीच कबूल केले आहे. अवतारदेह मायाकार्य असतो म्हणून म्हणा किंवा सात्विकभूतकार्य असतो म्हणून म्हणा, त्याला वैकुंठात राहण्यास हरकत नाही. रामकृष्णांची उदाहरणे जी लेखकाने दिली आहेत, त्याचे उत्तर भगवंताची नानाविध लीला हेच आहे. आता तशा प्रकारचा अनुभव कोणा एखाद्यास नसल्यामुळे आमचे ज्ञान जेवढे आहे तेवढेच संतांचे व ऋषींचेही आहे असे घेऊन चालून 'तुकारामबोवा वैकुंठात गेले नाहीत' इत्यादि प्रतिपादन करणे म्हणजे 'न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम्' या भगवदाज्ञेस झुगारून देणे आहे. स्वामींचे वंशज खुद्द गोपाळबोवा यांचे उदाहरण लेखकाने दिले आहे परंतु त्यांनाही कुणबी जातीच्या माणसाने स्वामींविषयी अनुकल लेख लिहिल्यामुळे बरेच वाटेल असे मला वाटते !

८) हा लेख मीं केसरीतील लेखकाशी वाद करावा या बुद्धीने लिहिला नसून तशी मला उमेदहि नाही; परंतु माझा भोळा विश्वास श्रीतुकाराममहाराजांवरून उडू नये, कारण त्याला संरक्षण जरूर आहे, अशा बुद्धिने लिहिला आहे, व माझ्यासारखे विश्वासाचे जे असतील त्यांनी हे वाचून आपला विश्वासतंतु धरून ठेवावा अशी माझी इच्छा आहे. जीव

कितीही झाला तरी अल्पज्ञ आहे, तेव्हा बृहद्योगवासिष्ठ वाचताना केसरीतील लेखकाची नजरचूक झाली असावी असेही मला वाटते. तथापि लेखकांनी वेदांत वाचूनही श्रीतुकाराममहाराजांचे ठिकाणी जे प्रेम व्यक्त केले आहे त्याबद्दल ते प्रशंसेस पात्रच होतात. थोड्याशा गोष्टीबद्दल मतभेद असल्याने काही मित्रत्वाची हानि होत नाही. मला आणखी यावर पुष्कळ लिहावयाचे आहे, परंतु पुढील केसरी आजच हाती पडल्यामुळे ते पुढील खेपेवर ढकलणे प्राप्त आहे.

आपला,

गुलाबराव गुंडोजी मोहोड, माधानकर.

□□□□

## २७. मुमुक्षु मासिकाला पत्र २

[ श्रीतुकारामांनी आत्महत्त्या केली नाही–अर्थवाद–१ गुणवाद–२ अनुवाद–३ भूतार्थवाद–ज्ञान्याला मृत्यूची इच्छा ?–ज्ञानी व ययेष्टाचरण–योगवासिष्ठातील तीव्र संवेग–मनुष्य व देवतांची भेट–विश्वरूप पाहण्याला व्यापक सत्वदृष्टीची अपेक्षा–शंकराचार्यांचे भाष्य-प्रामाण्य–लेखकाचे दोष ]

# श्रीतुकाराममहाराजांचे प्रयाण–२

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली ॥

श्रीसच्चिदानंदरूपाय शान्ताय परमात्मने ।
दासमानसहंसाय ज्ञानेशाय नमो नमः ॥१॥

रा. रा. मुमुक्षुकर्ते यांसः––

९) वि. वि. मागील लेख छापून निघण्यापूर्वीच ता. २९ एप्रिल सन १९१३ च्या केसरीच्या अंकात पुनः 'तुकाराममहाराजांचे प्रयाण' यावर दुसरा लेख आला आहे. त्याचेही श्रीतुकाराममहाराजांचे चरणावर माझा विश्वास दृढ होण्याकरिता मी समीक्षण करितो. लेखक म्हणतात, "तुकाराम महाराज वैकुंठास गेले याविषयी हूल पिकविण्याचे कारण त्यांनी जलसमाधि घेऊन मत्स्यादिकांच्या तोंडी आपला देह दिल्यामुळे तो वर आला नाही हे आहे. असे करण्याला तुकाराममहाराजांना काही कारण नव्हते. त्यांना तसे वाटले म्हणून त्यांनी तसे केले." पण हे लेखकाचे म्हणणे तुकाराम-महाराजांच्याच म्हणण्याविरुद्ध आहे.

१०) बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाऊले ॥
तुका म्हणे दंड साहील यमाचे । न करी जो वाचे बोले तैसें ॥

इत्यादि श्रीस्वामीमहाराजांचीच वचने असून, जीव देण्याच्या विरुद्ध त्यांची वचने आहेत. जसे:–

अतित्याई देतां जीव । नये कींव देवासी ॥१॥
थोड्यासाठीं राग आला । जीव दिला गंगेंत ॥२॥
त्यासी परलोकीं नाहीं मुक्ति । अधोगति चुकेना ॥३॥
तुका म्हणे कृष्ण राम । स्मरतां श्रम वारिती ॥४॥

**पुनः** नलगे द्यावा जीव सहजचि जाणार । आहे तो विचार जाणा कांहीं ॥१॥
मरण जो मागे गाढवाचा बाळ । बोलिजे चांडाळ शुद्ध त्यासी ॥२॥
तुका म्हणे कांही होईल स्वहित । निधान जो थित टाकूं पाहे ॥३॥

**याप्रमाणे तुकाराममहाराजांचे स्वतः मत असता ते उगीचच्या उगीच आपला प्राण देतील असे वाटत नाही.** न मातृवधेन न पितृवधेन न स्तेयेन न भ्रूणहत्यया नास्य पापं नच चक्षुषो मुखान्नीलं वा (कौषीतकी श्रुति) **ही श्रुति प्रमाण घेऊन ज्ञान्यांच्याकडून भयंकर कृत्ये घडली तरी ज्ञानी पापी होत नाही' असे लेखकाने म्हटले आहे. पण,**

अर्थवाद म्हणजे काय ?

**११) 'तुकाराममहाराज वैकुंठास गेले' इत्यादि वाक्यांस लेखकांनी अर्थवाद म्हटले आहे, पण अशाने आपल्याला न आवडलेले वाक्य अर्थवादात घालावे असे होऊ लागेल ! वास्तविक पाहता लेखकाने 'स्तुतिपर वाक्य' असे जे अर्थवादाचे लक्षण केले आहे, तेच मुळी अपुरे आहे.** विधिप्राशस्त्यबोधक वाक्य तो अर्थवाद **असे लक्षण पाहिजे होते. भलत्या वाक्याला अर्थवाद मानल्यास शब्दाला अनियतार्थता येईल. ती तर प्राचीन ऋषीपैकी किंवा अर्वाचीन आचार्यांपैकी कोणीच अंगीकार करीत नाही. म्हणूनच अर्थवादाचे तीन प्रकार सांगितले आहेत :–गुणवाद, अनुवाद व भूतार्थवाद, (१) प्रमाणांतर विरुद्धार्थबोधक वाक्याला गुणवाद म्हणतात; जसे,** आदित्यो यूप: । यजमान: प्रस्तर: **इत्यादि. (२) प्रमाणांतरप्राप्तार्थबोधक वाक्याला अनुवाद म्हणतात; जसे** अग्निर्हिमस्य मेषजम् **इत्यादि. (३) उभयविलक्षणार्थबोधक वाक्याला भूतार्थवाद म्हणतात; जसे** इंद्राय वज्रमुदयच्छत् **इत्यादि. पैकी गुणवाद व अनुवाद स्तुति आणि अधिक प्रवृत्तीचे प्रयोजकच असतात, पण भूतार्थ-वादाचे स्वार्थीही प्रामाण्य असते; म्हणजे तो स्तुतिरूपही असतो आणि खराही असतो. याविषयी देवताधिकरणावरील सर्व भाष्यकारांचे व टीकाकारांचे ऐकमत्य आहे. श्रीतुकाराममहाराज वैकुंठास गेले या वाक्यांना जरी घटकाभर अर्थवाद म्हटले, तरी त्यांचा गुणवादात व अनुवादात समावेश कसा होतो हे लेखकांनी सिद्ध केले नाही, व मला तर समजत नाहीच.**

राहिलेल्या भूतार्थवादांत त्यांचा समावेश केल्यास त्या वाक्यांना स्वार्थी प्रामाण्य येऊन, बळेकरून तुकाराममहाराजांचे देहासहित वैकुंठास जाणे सिद्ध होत आहे. वास्तविक पाहता लेखकांनी जी श्रुति प्रमाण दिली आहे; तीच अर्थवादात्मक आहे असे वासिष्ठात प्राचीन आचार्यांनी म्हटले आहे. ज्ञान हे वस्तुतंत्र असल्यामुळे, ते प्राप्त झाल्यावर त्याचा कोणत्याच कृत्याने बाध होत नाही, म्हणून ते कर्मरूप नाही, असा त्या श्रुतीचा अर्थ असून ज्ञानी पुरुषाची स्तुति त्या श्रुतीने केली आहे. पुनः ही श्रुति भूतार्थवादात येत नसल्यामुळे, ज्ञान्याचे स्तुतिपर लावण्यास काही अडचण येत नाही, (पण) तसे ऐतिह्य वाक्यांचे नसते. यद्यपि श्रीमच्छंकराचार्यांनी उपनिषदातील आख्यायिकांविषयी 'आख्यायिका विद्यास्तुत्यर्थं असतात' असे पुष्कळ ठिकाणी म्हटले आहे, तथापि ते भूतार्थवादाच्या दृष्टीने म्हटले असून त्या आख्यायिकांविषयीचे स्वार्थी प्रामाण्य आचार्यांनी निराकरण केलेले नाही.

१२) शिवाय ज्ञानी पुरुषाला मरण्याची इच्छा उत्पन्न होते हे लेखकाचे म्हणणे विचित्र प्रारब्ध घेऊनही जुळत नाही. कारण, प्रारब्ध भोग देणारे असून ते भोगानुकूलच वृत्ति उत्पन्न करिते; व्यर्थ वृत्ति उत्पन्न करीत नाही. सुख देणाऱ्या सात्विक वृत्ति व दुःख देणाऱ्या राजस वृत्तिच ज्ञान्याच्या प्रारब्धाने उत्पन्न होतात, व्यर्थ तामस वृत्ति उत्पन्न होणार नाहीत, असे स्वामी विद्यारण्यांनी आपल्या जीवन्मुक्तिविवेकात स्पष्ट म्हटले आहे. मरण हा भोग आहे असे कोणीही म्हटले नाही. कारण ज्ञान्याच्या मरणकाळी सर्व वासना क्षय पावत असतात, असा सर्वश्रुतिसिद्धान्त आहे.

१३) शिवाय तस्मात् ब्राह्मण: पांडित्यं निर्विद्य बाल्येन तिष्ठासेत् या श्रुतीचा विचार करताना अनाविष्कुर्वन्नन्वयात् या सूत्रात व त्यावरील भाष्यात ज्ञान्याच्या यथेष्टाचरणाचा निषेध केला आहे. सुरेश्वराचार्य आपल्या नैष्कर्म्यसिद्धीत व विद्यारण्यस्वामी आपल्या पंचदशीत 'ज्ञानी जर यथेष्टाचरण करील, तर कुत्र्यात व त्याच्यात भेद नाही' असे स्पष्ट म्हणतात. वसिष्ठ तर रामगीतातत्त्वसारायणात असे म्हणतात की,

अभिमानविहीनानां समाध्यासक्तचेतसां ।
स्वेच्छाचारो न पंढस्य वेश्यालौल्यमिवोद्भवेत् ॥ (अ० ९, श्लोक १२)

१४) भावार्थ :- ज्यांचा अहंकार नष्ट झाला आहे, व जे नेहमी समाधीत निमग्न आहेत, त्यांच्या हातून, नपुंसकाला जशी वेश्येची इच्छा होत नाही, तसा यथेच्छाचार होत नाही. सारांश, वर दिलेली श्रुति अनेक आचार्यांच्या

व्याख्यानांवरून अर्थवादरूपच मानली पाहिजे. १–पराशरांच्या मत्स्यगंधागमनाविषयीच्या कथा भूतार्थवादात येत असल्यामुळे, त्यांच्या योगाने या श्रुतीचे उपबृंहण होऊन ज्ञान्याचे प्रारब्ध तामसही असते असे जरी घेऊन चाललो, तरी प्रारब्ध अनियत असल्यामुळे, एखाद्या ज्ञान्याचे देहासहित वैकुंठास गमन करण्याचे प्रारब्ध नसते, हे म्हणण्याला श्रुतिप्रमाणही नाही व युक्तिप्रमाणही नाही. २–लेखक एके ठिकाणी ज्ञान्याच्या क्रिया निर्हेतुक असतात, असे म्हणतात आणि त्याच लेखात दुसरे ठिकाणी साधूंचा परोपकार सहेतुक असतो, असाही आशय दाखवितात ! तेव्हा आमच्यासारख्या गरीबाने कोणते सत्य घ्यावे ? ३– पुनः लेखक म्हणतात, 'सत्पुरुष भक्तिभावाने जे लिहितात ते सर्व खरेच असते काय ? त्यात कवित्व, प्रेमातिशय, अर्थवाद वगैरे काहीच नसतात काय ? समर्थप्रताप–ग्रंथात समर्थ कोठील कोण, असा जो रामाचा संवाद गिरिधराने वर्णिला आहे तो खरा मानण्याइतके भोळसर कोणी तरी विसाव्या शतकात असतील काय ?' हे लेखकाचे म्हणणे फारच चमत्कारिक वाटते. सत्पुरुषांच्या बोलण्यातील काव्य देखील तीव्र संवेगाने सत्य होते, हे योगवासिष्ठ वाचल्यामुळे लेखकाला ठाऊक असलेच पाहिजे; तेव्हा त्याविषयी काही सांगणे नको. ४– सनकादिक व पांडरंगाची मूर्त्यादिक तुकाराममहाराजांना प्रत्यक्ष दिसले नाहीत, असेही विधान लेखकांनी केले आहे ! यावरून देवतांची व मनुष्यांची भेट होत नसते असाही लेखकाचा समज असावा असे अनुमान होते; परंतु श्रीमच्छंकराचार्यांनी आपल्या भाष्यात देवतांचा व पूर्वलोकांचा संबंध होत होता असे आम्ही ऐकितो, जो नाही म्हणतो तो जगाच्या विचित्रतेचाच प्रतिषेध करितो' असे स्पष्ट म्हटले आहे; तेव्हा श्रीमच्छंकराचार्य हे विसाव्या शतकातील लोकांपेक्षा शहाणे नसावे, असेही लेखकाच्या वाक्यावरून सिद्ध होऊ पाहते ! ५– श्रीकृष्णांनी दिव्यदृष्टीनेच अर्जुनाला आपले मुख्य रूप दाखविले हे खरे, परंतु ते विश्वरूप असल्यामुळे तेवढे रूप पाहण्याकरिता अर्जुनाला व्यापक सत्त्वदृष्टीची अपेक्षा होती, तशी कृष्णमूर्ति पाहण्यास नव्हती, हे लेखक लिहिण्याला विसरले. ६– साधु चमत्कार करीत नाहीत हे लेखकांचे म्हणणे खरे धरले, तरी साधुपुरुषांना योगशक्ति नसतात हे त्यावरून सिद्ध होत नाही. सर्व योग ईश्वरप्रणिधानानेच सिद्ध होत असतात, असे

ईश्वरप्रसादाज्जितोत्तरभूमिकस्य नाधरभमिषु संयमो युक्तः ।

१५) हे योगभाष्यात स्वतः व्यासानीच सांगितले असून, जो ईश्वर प्रासादाने आपण होऊन वरच्या पायरीवर गेला आहे, त्याला खालच्या

पायरीवर संयम करण्याची आवश्यकता नाही, असा त्याचा अर्थ आहे. ७-- 'पैल पांडुरंगाची मूर्ति उभी आहे' इत्यादि अभंगाचा आध्यात्मिक अर्थ करावा असे लेखक म्हणतात, पण ऋषभदेव वणव्यात शिरले, ते वणव्यातच कां शिरले, त्याचा अध्यात्मपर अर्थ कां करू नये, इत्यादि प्रश्न लेखकाला सोड-विणे भाग होते. पैलतीरीच कां उभा राहिला, इत्यादि प्रश्न खरोखरच त्यांना निरर्थक वाटले नसले, तरी ते मला वाटतात. हा माझ्या बुद्धीचा दोष आहे असे मी मानून घेतो. ८– ब्रह्मवेत्त्याचे सशरीर आकाशगमन श्रीमच्छं-कराचार्यांना मान्य होते, याविषयी त्यांच्याच सूत्रातून एक उदाहरण देतो. चवथ्या अध्यायाच्या दुसऱ्या पादातील "स्मर्यते च" या चवदाव्या सूत्रावरील भाष्य पहावे.

१६) " स्मर्यतेऽपि च महाभारते गत्युत्क्रान्त्योरभाव:–
' सर्वभूतात्मभूतस्य सम्यग्भूतानि पश्यत: ।
देवा अपि मार्गे मुह्यन्त्यपदस्य पदैषिण: ' इति ।

ननु गतिरपि ब्रह्मविद: सर्वगतब्रह्मात्मभूतस्य स्मर्यते– ' शुक: किल वैयासकिर्मुमुक्षुरादित्य-मंडलमभिप्रतस्थे पित्रा चानुगम्याहूतो भो इति प्रतिशुश्राव' इति । न । सशरीरस्यैवायं योगबलेन विशिष्टदेशप्राप्तीपूर्वक: शरीरोत्सर्ग इति द्रष्टव्यम् । सर्वभूतदृश्य त्वाद्युपन्यासात् । न ह्यशरी गच्छंतं सर्वभूतानि द्रष्टुं शक्नुयु: तथा च तत्रैवोपसंहृतम् ।'

शुकस्तु मारुताच्छीघ्रां गतिं कृत्वाऽन्तरिक्षग: ।
दर्शयित्वा प्रभावं स्वं सर्वभूतगतोऽभवत् ' इति ।
तस्मादभाव: परब्रह्मविदो गत्युत्क्रान्त्यो: ।
गतिश्रुतीनां तु विषयमुपरिष्टाद्व्याख्यास्याम: ॥

भावार्थ:–सर्व भूतांचा आत्मा, भूतांना बुद्धीने आत्मरूप पाहणारा आणि प्राप्यस्थानशून्य असलेला. अशा ब्रह्मवेत्त्याच्या पदाची इच्छा करणाऱ्या देवांनाही त्याचा मार्ग समजत नाही. या भारतवचनात ब्रह्मवेत्त्याला मरणही नाही, व दुसऱ्या लोकात जाणेही नाही असे सांगितले आहे. यावर पूर्वपक्षी म्हणतो, 'शुक आदित्यमंडळाकडे जात असता त्याच्या बापाने त्याला हाक मारली, असे महाभारतात सांगितले आहे. तेव्हां ब्रह्मवेत्त्यालाही गति आहे असे म्हणावे लागते.' यावर सिद्धान्ती म्हणतात, 'हे पूर्वपक्षीचे म्हणणे बरोबर नाही. शुकाचे हे आदित्यमंडळाकडे गमन स्थूलशरीरसहित आहे, स्थूलशरीराला सोडून नाही; कारण सर्व भूतांनी जातांना त्याला पाहिले असे महाभारतात सांगितले आहे. स्थूलशरीररहित होऊन जाणाऱ्याला सर्व

भूतांना पाहता येणे शक्य नाही. या अर्थाचा श्लोक महाभारतात आहे. शुक तर वायुपेक्षाही शीघ्रगतीचे अवलंबन करून अंतरिक्षामध्ये गेला, आणि आपला प्रभाव दर्शवून सर्व भूते व्यापून राहिला, या आचार्यांच्या वचनावरून योगी ब्रह्मवेत्त्यांना सशरीर आकाशगमन काही अशक्य नाही, हे वेदान्ती म्हणवून घेणाऱ्याने कबूल केलेच पाहिजे. ऋषभदेवाचे वणव्यात शिरणे लीलारूप होते, प्रारब्धरूप नव्हते; कारण ऋषभदेव अवतार असून, अवताराला कर्म नसते असे शास्त्र सांगत आहे.

१७) लेखक कोठे तर ब्रह्मवेत्ते म्हणविणाऱ्या पाश्चात्यां (थिऑसाफिस्ट) प्रमाणे इतिहासाची रूपके करितात, व कोठे इतिहास जसाच्या तसा प्रमाण घेतात ! त्याला संयोगपृथक्त्वन्यायासारखे न्याय देखील लावीत नाहीत. तेव्हा आपल्याला आवडत नाही ते घ्यावयाचे नाही असा लेखकाने दृढ निश्चय केला आहे असे दुःखाने म्हणावे लागते. समर्थप्रताप ग्रंथातील कथा खरी मानण्याइतका भोळसर विसाव्या शतकात मी अजून आहेच ! म्हणून माझा विश्वास तुकाराममहाराज देहासुद्धा वैकुंठास गेले असाच आहे, व तो असाच रहावा ही मी जन्मजन्म आशा करितो. लेखकांनी शेवटी तुकाराममहाराजांच्या नांवाचा त्रिवार घोष केला आहे, तेवढा त्यांचा उपदेश मानून मी तुकाराममहाराजांच्या नामाचा सप्तवार घोष करून हा वेडावांकडा लेख श्रीज्ञानेश्वर महाराजांचे चरणी समर्पण करितो.

ता. २९ मे १९१३ आपला,

गुलाबराव गुंडोजी मोहोड, माधानकर

□□□□

## २८. मुमुक्षु मासिकातील पत्र ३

[ जानवे घालून ब्राह्मण, क्षत्रिय की वैश्य व्हायचे ?–जाती गुणकर्माने मानावी काय ? –संस्कार कोणावर करायचे ? –जन्माने जाती मानावी काय ? –यज्ञोपवीतादी भेदचिन्हे कशाला ?–धर्मात आग्रह नको–हे यज्ञोपवीतप्रकरण मत्सर वाढविणारेच आहे. ]

# यज्ञोपवीत धारणाचा हक्क

।। श्रीज्ञानेश्वरमाऊली ।।

१) वि. वि. मुमुक्षूत गद्य लेख लिहिण्याचे आज्ञापत्र पोचल्यामुळे मी हा लेख पाठवीत आहे. या लेखाच्या पूर्वीचे दोन लेख नुकतेच 'यष्टी'त येऊन गेले आहेत. हा तिसरा लेख आहे. पूर्वीच्या दोन लेखात वेदोक्त प्रकरणासंबंधी बरेच उद्घाटन केले आहे. व इतरांनी वेदाचा अधिकार

मागणे युक्तिदृष्टचा बरोबर कसे नाही, हे मी आपल्या मते सिद्ध केले आहे. आता दुसरा मुद्दा या मुद्द्यामुळेच उत्पन्न झालेला आहे. तो मुद्दा प्रत्येकाचा यज्ञोपवीताचा अधिकार हा होय. सुतार, सोनार, शिंपी, रंगारी, न्हावी, कहार वगैरे लोक यज्ञोपवीत घालीत असून घालण्याची खटपटही करीत आहेत. मीही त्यापैकीच एक आहे. पर केवळ यज्ञोपवीताने माझे समाधान होत नसून मला प्रश्न उत्पन्न होतात ते असे :– १–आम्ही यज्ञोपवीत घालणाऱ्यांनी स्वतः काय ब्राह्मण म्हणवून घ्यावयाचे, की क्षत्रिय म्हणवून घ्यावयाचे, किंवा वैश्य म्हणवून घ्यावयाचे ? २–वर्ण हे गुणकर्माने मानावयाचे, संस्काराने मानावयाचे किंवा जन्माने मानावयाचे ? ३– इतकेही करून आम्ही जे द्विज होणार ते काय धर्माकरिता की द्वेषाकरिता ? ४– आज नाही तर उद्या तरी चर्चारहित द्विजत्व आम्हाला मिळणे शक्य आहे काय ? आता या चारही प्रश्नांची क्रमाने समीक्षा करू.

२) प्रथमपक्षी आम्ही यज्ञोपवीत घालणारे सर्व १– ब्राह्मण झालो तर सर्व कामधंदे सोडून देऊन आम्हाला केवळ भिक्षुकच झाले पाहिजे; आणि सर्वच भिक्षुक झालो तर सरकारला जबरदस्तीने या भिक्षुकांना नोकर करावे लागेल. नाही तर सर्वच रिटोळ भिक्षुकांना भिक्षा देणार कोण ? २– सर्वच आम्ही क्षत्रिय झालो, तर त्याचा प्रतिकार आजपासूनच करणे सरकारला हिताचे होईल. बरे, ३– सर्वच वैश्य झालो तर आपसात चढाओढ लागल्यावाचून राहणार नाही. याप्रमाणे वरवर निरीक्षण केले तरी पहिला मुद्दा चांगलासा टिकत नाही.

३) आता दुसऱ्या प्रश्नात तीन पक्ष असून, त्यांचा विचार केला असताही समाधान होत नाही. कारण, गुणकर्माने जाति मानल्या तरी उठलासुटला यज्ञोपवीत घालण्यास अधिकारी होऊ शकत नाही. शिवाय सर्व गुणकर्म एकत्र दिसणारी व्यक्ति एखादीच कदाचित् सापडू शकेल, व तशी हल्लीच्या ब्राह्मणात देखील सापडणे कठीण. शिवाय, गुणकर्मासंबंधी निरनिराळे वाद उपस्थित होण्याचा संभव आहे. अहिंसा हा गुण खरा, परंतु वैद्यक क्रिया न केल्यास तो दोषावह होतो. त्याचप्रमाणे सत्यही प्रसंगविशेषी दोषावह होते. ज्या सत्याने हिंसा होत असेल ते सत्य असत्यापेक्षा वाईट असे शास्त्रात सांगितले आहे. शास्त्रालाच मानावयाचे नसल्यास मग उगीच ब्राह्मण होण्याची तरी खटपट कशाला करावी? सारख्या प्रकारची गुणकर्मे सारख्या मनुष्यांच्या अंगी येणे शक्य नाही. मन वश करण्याला कठीण आहे.

४) आता दुसरा पक्ष संस्कारांसंबंधी आहे. संस्कार हे गुणकर्मवान् जातिमति व्यक्तीस करावयाचे, की जन्मजातिमति व्यक्तीस करावयाचे? प्रथमपक्षी सर्वांचेच मन सारखे ताब्यात नसल्यामुळे सर्वांच्या अंगी चांगले गुणकर्म टिकत नाहीत; व त्यामुळे एखादा लग्न झालेला मनुष्य क्षणात शूद्र, क्षणात क्षत्रिय होऊ शकेल, व एखादा तर अंत्येष्टीच्या वेळीही चांडाळ होऊं शकेल. असे झाल्याने संस्कारांचा निर्बंधच राहणार नाही. द्वितीयपक्षी, जन्म-जाति काही आहे, असा निश्चय झाला पाहिजे. पण तसा निश्चय आम्हा जानवे घालणाऱ्यांच्या मनात असता, तर आम्ही ती परंपरा बंद पडच दिली नसती ! काही दुःखद परिस्थितीमुळे ती बंद पडली असे जर म्हणावे, तर एक वेळ विच्छिन्न झालेल्या परंपरेला पुनः मरु व देवापि यांच्यावाचून मूळ-स्वरूप देण्याला शास्त्र नाही.

४) एवढ्याचकरिता जन्माने जाति मानावी या पक्षाचे ग्रहण केले तर आम्ही जन्माने द्विज आहो असे मानणे भाग पडते पण तसे आम्ही म्हटले म्हणजे धर्मशास्त्रान्वये जन्माने शूद्र असा कोणता तरी वर्ण ठेवावाच लागेल. जन्माने ब्राह्मण होण्याची खटपट करू लागलो तर मग जन्माने शूद्र मानून राहणारा वर्ग कोणता ? कदाचित् आम्हाला असाही यत्न करावा लागेल की, आम्ही उच्च वर्णात जात आहो म्हणून आमच्या खालच्या लोकांना शूद्रवर्णाकरिता राखून ठेवावे लागेल ! पण ते पुनः उच्च वर्णात येऊ लागले म्हणजे आम्ही त्यांना न येऊ दिले तर कलह व येऊ दिले तर धर्मनाश, अशी स्थिति येणार!

६) यावर कोणी म्हणेल की, आम्ही सर्व एका देवाची लेकरे असून एकजाति होणार, तर असे म्हणणाऱ्यांना माझेही असे सणसणीत उत्तर आहे की, मग यज्ञोपवीतादिक भेदाची चिन्हे पाहिजेत कशाला ? पुष्कळ आर्य-रहित देशात एकजाति आहे. यज्ञोपवीतादि चिन्हे उलटी भेद करणारी आहेत, सर्वसंकर करणारी नाहीत. बरे, यज्ञोपवीत घालून आम्ही सर्वच ब्राह्मण झालो तरी आमच्यापेक्षा वरिष्ठ आपल्याला मानणारे लोक आमच्या डोळ्यांसमोर राहतीलच. कारण लिंगाईतांच्या चन्नबसवाचार्यांनी लिंग व यज्ञो-पवीत घालणाऱ्यांना वैदिकत्व नाही, यज्ञोपवीत सोडून लिंग घालणाऱ्यांनाच वैदिकत्व आहे असे ‘ वीरशैवोत्कर्षदीपिके ’ त स्पष्ट म्हटले आहे. तेव्हा त्या एका लिंगाईत समाजाशी तरी आमच्या यज्ञोपवीत घालणाऱ्यांचे कायमचे भांडण

राहीलच; किंवा त्यांना तरी भांडण मिटविण्याकरिता आपले लिंग सोडून यज्ञोपवीत घालावे लागेल, पण आमचा जसा आमच्या धर्मावर विश्वास नाही, तसा तेही लोक आपला धर्म सोडून देण्यास तयार होतील काय ? वीरशैवोत्कर्षदीपिका ग्रंथ देखील त्या मतांत प्राचीन असून प्रमाण आहे.

६) आता तिसरा प्रश्न घेऊ. एखादी गोष्ट धर्मासाठी करावी म्हटली की, मग तिच्याविषयी कोणत्याहि विकाराने बनलेला आग्रह चालत नाही. मृत्यु जसा कोणत्याहि जरूरीची अपेक्षा करीत नाही, तसा धर्मही कोणाच्याही वैकारिक जरूरीची अपेक्षा करीत नाही. आता धर्म मनुष्यानें आपल्या सोईकरिता केला असे ज्यांचे म्हणणे असेल त्यांना वेदाची व यज्ञोपवीताचीच काय जरूर ? कारण ज्यानें भांडण मिटेल असा 'फ्री मेसन' सारखा धर्मच करणे त्यांना इष्ट आहे. याप्रमाणे तिसऱ्या प्रश्नातील पहिला पक्ष दुर्बल आहे.

७) दुसरा पक्ष विचारात आणण्यायोग्यच नाही. कारण आमच्या सरकाराने जातीजातीत द्वेष करू नये, असा दृढ कायदा केला असून, आंतून–बाहेरून शांतता राहावी अशी, त्यांची खटपटही आहे. तेव्हा हा प्रश्न कसा उद्भवतो ?

८) याप्रमाणे चवथा प्रश्नही विचारात येण्यासारखा नाही. कारण, जोपर्यंत धर्माचे बीज आहे तोपर्यंत आमच्या द्विजत्वाचा प्रतिकार दुसरीकडून सुरूच राहणार व त्यामुळे मागेपुढे सरकारला देखील हिंदुधर्मशास्त्र बदलविता येणे शक्य नाही. तेव्हा वेदोक्तप्रकरणाप्रमाणे हे अन्य यज्ञोपवीतप्रकणही कोणत्याही दृष्टीने निष्फल मत्सर वाढविणारेच होईल असे मला वाटते. कळावे.

ता. २८ आगष्ट १९१३
हर्दा.

आपला,
गुलाबराव गुंडोजी मोहोड

□□□□

[धर्मात बदल करावा काय ?–धर्माचे स्वरूप : विकाररहित धर्मपालन–महात्म्यांचे विकार : यशोधनराजा–जगदुद्धाराची काळजी–क्षेपकवादाची सोपी रीती–शिवगंगामठाचे शंकराचार्य–जगन्नाथपुरीचे शंकराचार्य–महाराजांचा वेदोच्चार]

# धर्माचे स्वरूप : शंकराचार्य

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली ॥

**रा. रा. मुमुक्षुकर्ते यांस :–वि. वि. मी हा लेख पाठवीत आहे, त्याचा कृपा करून स्वीकार व्हावा.**

धर्म ईश्वरप्रणीत की जीवप्रणीत ?

**१) धर्म ईश्वरप्रणीत आहे किंवा तो मनुष्यांनी आपल्या सोयीकरिता निर्माण केला आहे ? असे दोन पक्ष साधारणतः ज्यांच्या मनावर पाश्चात्य ज्ञानाचा संस्कार झाला आहे, त्यांच्या दृष्टीपुढे असतात. दुसऱ्या पक्षाचे म्हणणे–** धर्माच्या कडक नियमांना झुगारून देऊन समाजाच्या सोयीचे बदल त्यात करीत असावे **असे असून, पहिल्या पक्षाचे म्हणणे असें आहे की,** 'ज्याने तो दिला आहे, त्याच्याशिवाय त्यात कोणत्याही प्रकारचा बदल होणे शक्य नाहीं.' **फळाच्या दृष्टीनें पाहिले तर दोन्ही पक्षात मोठासा भेद नाही, पण 'बीजाच्या दृष्टीने भेद' आहे. मनुष्यांच्या सोयीचा धर्म करणे, हे दुसऱ्या पक्षाचे म्हणणे व प्रसंगी आपद्धर्म पाळणे हे पहिल्या पक्षाचे म्हणणे एकच आहे. पण दुसरा पक्ष पूर्वीच्या धर्माला अगदीच झुगारून देण्याला तयार असतो, व पहिला पक्ष, ईश्वरानेच संपद्धर्म व आपद्धर्म सांगून ठेविले आहेत, आपत्काल संपला की, पुनः संपद्धर्म मनुष्याने पाळावा, अगदीच पूर्व धर्माचा परित्याग करू नये, असे म्हणतो. हाच दोहो पक्षांतील बीजदृष्टीने व फलदृष्टीने भेदाभेद होय.**

धर्माचे स्वरूप : विकाररहित धर्म पालन

**२) मला असे वाटते की, दोन्ही पक्षांचे फल जर एकच आहे, तर पूर्वधर्मत्याग केला पाहिजे, या दुसऱ्या पक्षाचा म्हणण्याला काही प्रमाण नाही; म्हणून पहिल्या पक्षाप्रमाणेच जर धर्माचा विचार केला, तर त्याचे स्वरूप असे दिसते की, कोणताही विकार त्याला प्रतिबंधक असून वैकारिक मनुष्याच्या हातून त्याचे प्रतिपादन कधीही सम्यक् होत नाही. 'धर्म प्रतिपादन करिताना विकारांचा परमाणु देखील त्यात मिसळला नसला पाहिजे.' मनुष्य जीव कोटीतील असल्यामुळे, त्याचे ठिकाणी विकार हे असणारच. परंतु खरा धार्मिक असल्यास विकार उत्पन्न होऊन देखील धर्माचे प्रतिपादन जसेच्या तसेच करूं शकतो. याविषयी प्रमाण आहेत–**

शक्नोतीहैव यः सोढुं प्राक् शरीरविमोक्षणात् ।
कामक्रोधोद्भवं वेगं स युक्तः स सुखी नरः ॥२३॥
भ. गीता अ. ५

असे भगवंतांनी म्हटले आहे. याचा भावार्थ असा आहे की, विकार उत्पन्न होत असतात, परंतु त्यांच्या वेगाला तो सहन करतो. या म्हणण्याचा आशय असा की, प्रेताला जसे विकार होत नाहीत, तसे समाधीमध्ये योग्याला विकारच उत्पन्न होत नाहीत. पण व्युत्थानकाळी ते उत्पन्न होतात; तथापि तो त्यांच्या वेगांना सहन करूं शकतो. उपवासावर ज्यांची श्रद्धा व प्रेम आहे, त्यांना उत्पन्न झालेलाही क्षुधेचा वेग सहन करिता येतो हे दृष्ट आहे. तात्पर्य, विकार असूनही, विकाररहित प्रतिपादन करिता येणे शक्य आहे. कथासरित्सागरांत एक कथा आहे, तिचा सारांश असाः–

यशोधन राजाची गोष्ट–महात्म्यांचे विकार

३) कोणी यशोधन नावाचा राजा एका वैश्याच्या सुंदर मुलीची मागणी करीत होता तिचे स्वरूप असे होते की, एक वेळ ज्याने तिला पाहिले, त्याने कामबाणांनी व्यथित होऊन शेवटी मृत्युमुखी पडावे. असे जेव्हा राजाने ऐकले, तेव्हा इचा मोह पडल्याने आपले राज्य कदाचित सुरळीत चालणार नाही, म्हणून त्यानें तिच्याशीं विवाह करण्याचे नाकारले. तेव्हा ती मुलगी वैश्याने प्रधानाला दिली. पण या राजाच्या कृत्याने मुलीच्या मनाला फार वाईट वाटून राजाचा सूड घेण्याकरिता त्याला तिने एक वेळ आपले मुख मोठ्या प्रयत्नाने दाखविले. त्यामुळे राजा कामबाणांनी व्यथित होऊन थोड्याच दिवसात व्याधिग्रस्त झाला व शतावधि वैद्यांच्या उपायांनीही काहीं गुण येईना. तेव्हा असे होण्याचे कारण काय ? हे प्रधानानें समजून घेऊन एकांतात राजाजवळ जाऊन हात जोडून तो म्हणाला, 'महाराज ! मी आपला दास आहे, तर माझी पत्नीही आपली दासीच आहे; तर इचा आपण अंगीकार करावा.' असे गोड शब्दांनी म्हणाला. तेव्हा राजा मरणोन्मुख होता तरी प्रधानाकडे डोळे वटारून म्हणाला, "मी कामाने पीडलो आहे खरा, परंतु मला अधर्म खपत नाही, समजलास ? माझ्या राज्यात अशा प्रकारचा अधर्म शिकविणे शासनार्ह असून, तू माझा आवडता म्हणून एक वेळ क्षमा करितो. पुढे ही गोष्ट काढशील तर शिक्षा करीन !" असे बोलून नंतर थोड्याच वेळाने राजा मरण पावला.

जगदुद्धाराची काळजी

४) महात्म्याना विकार उत्पन्न झाले तरी त्या विकारांचे समर्थन ते कधीच करीत नसतात. भगवंतांनी आपल्या व्यभिचाराचे कधी समर्थन केले

आहे काय ? पण आम्हा नवविवेकपटूंच्या ज्ञानावर पाश्चात्य विद्येचे संस्कार झाल्यामुळे त्याचे स्वाभाविक स्वरूप जाऊन फोडणीच्या वरणाप्रमाणे चटकमटकपणा त्याला आला आहे. गुरुसेवा न करिता जगदुद्धाराची काळजी आम्हाला जगत्कर्त्यापेक्षाही अधिक असल्यामुळे, भौतिक शास्त्राचा व वेदांताचा मेळ कसा होईल, त्याचा आम्ही यत्न करू लागलो ! 'अन्मूव्हिंग ईथर' म्हणजे ब्रह्म 'मूव्हिंग ईथर' म्हणजे माया, 'रिस्पॉन्स' म्हणजे आत्मा, अशी नवी सूत्रे शारीरक सूत्राच्या समन्वयअध्यायात प्रविष्ट करण्याचा आमचा यत्न आहे.

क्षेपकवादाची सोपी रीती

५) जेथे आम्हाला समन्वय करता येत नाही. तेथे आम्ही क्षेपकवादाचा अंगीकार करून समाधान करीत असतो. अनेक श्रुतींच्या समन्वयाकरिता क्षेपकवादासारखी सोपी रीति सोडून देऊन श्रमाने सूत्रे करणाऱ्या भगवान् व्यासांचे आम्हांस मोठे आश्चर्य वाटते. समुच्चय व विकल्पाने कर्मकांडाची व्यवस्था लावणाऱ्या जैमिनीचे करणे पोरखेळ नव्हे तर काय ? अरे ! जी वाक्ये आपणास पटत नाहीत, ती मागून घातली म्हटले म्हणजे झाले, झट्दिशी समाधान होते. मग हा एवढा द्राविडी प्राणायाम पाहिजे कशाला ? हा माझा तर्कटीपणा बाजूस ठेविला तरी धर्माचार्यांच्या मनावर देखील या क्षेपकवादाचा पगडा बसत चालला आहे. हे सुचिन्ह नव्हे असे दुःखाने म्हणावे लागते. हल्लीचे धर्माचार्य जीव असल्यामुळे त्यांना विकार होणे जरी संभवनीय असले, तरी उत्पन्न झालेल्या विकारांचा साक्षी होऊन व्युत्थानकाळी धर्माचे प्रतिपादन यथार्थ करणें हेच त्यांचे पहिले व खरे कर्तव्य आहे, असे मला वाटते.

६) आपल्या २८ आगष्ट सन १९१३ इसवीच्या अंकात श्रीकृष्ण त्र्यंकटेश शुक्ल, मु. चोपडे (पूर्वखानदेश) यांचा लेख* आला आहे. त्यात

---

*रा. रा. मुमुक्षुकर्ते यांस :– वि. वि. शिवगंगामठाचे शंकराचार्यपीठाधिपति श्रीसुब्रह्मण्याभिनवसच्चिदानंदभारती शके १८३३ साली येथे येऊन गेले. ते म्हणतात की, "शांकरदिग्विजय" विद्यारण्यांचा नाही. यास प्रमाण प्रथमसर्गातील नववा श्लोक. त्या श्लोकात, नवकालिदासाच्या नावाचा उल्लेख आहे, व विद्यारण्यांनी 'नवकालिदास' हे पद कुठेही धारण केलेले दिसत नाही. शिवाय ही वाणी विद्यारण्यांच्या वाणीसारखी दिसत नाही. भागवतचंपूकाराच्या वाणीसारखी दिसते. "भागवतचंपूकार आणि दिग्विजयकर्ता एकच" असे त्यांचे म्हणणे आहे, डिंडिमकारांनी माधवाचार्यांचा उल्लेख केला आहे. अद्वैतराज्यलक्ष्मीकारांचेही मत तेच आहे हे पुन्हा सांगायला नको. शिवगंगास्वामींचा अभिप्राय असा कां असावा, हे त्यांचा समागम जास्त न झाल्यामुळे चांगले कळले नाही. याचा विचार विद्वानांनी करावा, ही विनंति आहे. कळावे.

मुमुक्षु ता. २८ ऑगस्ट १९१३ आपला जिज्ञासु, श्री. व्यं. शुक्ल,

मु. चोपडे, पूर्व खानदेश

शिवगंगामठाचे शंकराचार्य श्रीसुब्रह्मण्याभिनवसच्चिदानंदभारती यांचे "शांकरदिग्विजय विद्यारण्यकृत नसून भागवतचंपूकारांचा आहे" असे म्हणणे दिले आहे, व त्यावर योग्य आक्षेपही घेतला आहे. १–आचार्यांचे म्हणणे––"नव कालिदास" हे नाव विद्यारण्यानी कोठे धारण केले नाही; पण "स्वतःचा आत्माशीर्वाद घेताना कवि आपले ठिकाणी पूर्व कवींचा आरोप करीत असतात," ही गोष्ट साहित्यप्रसिद्ध आहे. २–पुनः आचार्यांचे म्हणणे की, भाषाही विद्यारण्यासारखी दिसत नाही. पण एकच पुरुष अनेक प्रकारच्या भाषा लिहू शकतो, हे माझ्यासारख्या अल्पमति मनुष्याच्या ग्रंथांवरून देखील दिसून येण्यासारखे आहे. ३–डिंडिमकार व अद्वैतराज्यलक्ष्मीकारांना झुगारून देऊन आचार्यांनी असे कां म्हणावे? या श्री. शुक्लांनी केलेल्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, आचार्यांना इंग्रजी येवो किंवा न येवो, परंतु कर्णोपकर्णी पाश्चात्य क्षेपकवादाचा त्यांच्या मनावर संस्कार झाला आहे, यांत संशय नाही.

### जगन्नाथपुरीचे शंकराचार्य

७) मागे चार पांच वर्षांपूर्वी मी जगन्नाथाला गेलो होतो, तेव्हा तेथील शंकराचार्यांचे व माझे प्रत्यक्ष भाषण झाले. त्यात ते म्हणाले की, उपलब्ध असलेली सांख्यसूत्रे खास कपिलांची नव्हत! कारण सांख्यकारिकेच्या तुकड्यासारखी ती दिसून पडतात. तेव्हा मी त्यांना म्हटले की, "ईश्वरासिद्धेः" इत्यादि जी सूत्रे आहेत, त्या विषयाचा कारिकांमध्ये नामनिर्देशही नाही. तेव्हा सूत्रे कारिकांचा तुकडा आहे, असे कसे म्हणता येईल?" यावर "नवीन लोकांचे हे म्हणणे आहे, माझे नाही," असे आचार्यांनी म्हटले.

८) हे आचार्य फार सरळ असून गुरुस्थानी मला पूज्य आहेत. परंतु अशा प्रकारचे प्रतिपादन धर्माचार्यांच्या मुखातून निघाले म्हणजे मजसारख्या शूद्राला तर 'ब्राह्मणोऽस्य मुखमासीत्' इत्यादि पुरुषसूक्तातील मंत्र, 'स्त्री-शूद्रद्विजबंधूनां त्रयी न श्रुतिगोचरा' इत्यादि पुराणातील श्लोक, सर्व मागून लुच्च्या लोकांनी घातले आहेत, असे म्हणण्याला काहीच प्रत्यवाय राहणार नाही.

### शूद्रांचा वेदोच्चार आणि श्रीमहाराज

९) मी ब्राह्मणेतर जातीत जन्मालो असून माझ्या दुर्दैवाने लागलेल्या व्यसनामुळे कोणाशी बोलताना प्रसंगी मला वेदाचे प्रमाण देण्याचे काम पडते. परंतु मी आपल्या जातींपुढे, आपण शूद्रांनी वेद म्हणावे, असे सांगत नाही. कारण जरी मी व्यसनामुळे वेद म्हणतो, तरी मी पातक करीत असून त्याबद्दल मेल्यानंतर भगवान् सूर्यनंदन मला योग्य शासन करणार हे मी पूर्णपणे

जाणून आहे. या व्यसनातून सोडविण्याला मला कोणीही वैदिक ब्राह्मण भेटला नसून उलट धर्माचार्यही जर क्षेपकवादाचा अंगीकार करीत आहेत, तर मी वेद जरी म्हणतो तरी 'हे मी पातक करीत आहे' हा आपला समज सोडून देऊन, 'शूद्राला वेदाचा अधिकार नाही' इत्यादि मंत्रांना क्षेपक समजून, वेदाची प्रवृत्ति आपल्या जातीत करावी काय ? असे शुक्लांप्रमाणे मीही आचार्यांचे चरणाजवळ विचारण्याचे धाडस करितो. कारण मी शांकर-मताचाच अनुयायी आहे. प्रभूंनी आपले दीन लेकरू समजून मला उत्तर द्यावे. अमुक गोष्ट अमक्यांनी केली की नाही, ही गोष्ट कोणत्याही अनुमानिक साधनाने समजत नसून दिव्य दृष्टीनेच कळत असते, असा आर्ष इतिहासकारांचा समज आहे. त्यावर जर क्षेपकवादाने आचार्यमातेचा विश्वास नसेल तर मजसारख्या अडाणी मुलाने तरी तो कसा ठेवावा ? समर्थ बालभाषेतील गुणदोषाकडे पहात नाहीत, हा माझा विश्वास आहे. माझा लेख टीकात्मक समजून आपणहि अव्हेर न करिता आपल्या पत्री छापावा अशी आपणास विनंति आहे.

ता. ८–९–१९१३. आपला, गुलाबराव गुंडोजो मोहोड.
हल्ली मुक्काम हर्दा. मोकदम मौजे माधान,

□□□

## ३०. वेदाध्ययनाचा अधिकार

[ मराठा बांधवांचे चरणी विनंती–ब्राह्मण ब्राह्मणेतर विवाद अर्धवट शिक्षणामुळे–वेदाधिकार अर्थाबद्दल अक्षरांचे उच्चारणाबाबत नव्हे–जैनातील जातिभेद–दयानंदाचा वदतोव्याघात ]

# ब्राह्मणब्राह्मणेतर वाद

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली ॥

**रा. रा. मुमुक्षुकर्ते यासः– सा. न. वि. वि.**

**हा मी पांचवा लेख पाठवीत आहे, तो कृपा करून छापावा.**

अज्ञः सुखमाराध्यः सुखतरमाराध्यते विशेषज्ञः ।
ज्ञानलवदुर्विदग्धः ब्रह्माऽपि तं नरं न रंजयति ॥ भर्तृहरि, नीतिशतक.

१) या भर्तृहरीच्या म्हणण्याप्रमाणेच हिंदुस्थानातील अज्ञ जनांची स्थिती असून आम्हीही त्यापैकीच आहोत. येथील M. A. व विलायतेतील B. A. किंवा Matric झालेला मनुष्य सारखाच असतो असे अनुभवांती आढळून आले आहे. ही गोष्ट मला शिक्षण खात्यातील एका मोठ्या अधिकाऱ्याने सांगितली. काही देशी संस्थानातून खालचे शिक्षण फुकट मिळत

असले तरीं उच्च शिक्षणाचा अभाव असल्यामुळे एखाद्या तत्त्वावर श्रद्धाही विद्यार्थ्यांना ठेविता येत नाही. किंवा निर्णय करण्याकरिता तीव्र बुद्धिही त्यास संपादन करिता येत नाही. मी काही देशी संस्थाने पाहिली असून तेथे आमच्या जातीचे व ब्राह्मणांचे जे सख्य नसलेले दृष्टीस पडते तो तरी अर्धवट शिक्षणाचाच परिणाम होय, असे माझे मत आहे. अर्धशिक्षित मुलांना देशी संस्थानिक पुढे शिक्षण देतील तर फार बरे होईल. सार्वभौम ब्रिटिश सरकारची राज्य करण्यामध्ये जी अनेक धोरणे आहेत त्यांत कोणत्याही धर्माच्या आड न येणे हे धोरण महत्त्वाचे आहे. त्यामुळे ब्रिटिश सरकारच्या राज्याला मोठी बळकटी असून त्याला कोणत्याही प्रकारे भीति नाही. 'ब्राह्मणांशी सख्य केल्यानेच ब्रिटिश राज्याला अधिक बळकटी आहे' असा हिंदी बांधकामाच्या इतिहासात 'हेवेल' Havel साहेबाने जो दंश दाखविला आहे, त्यात माझ्या मते पुष्कळ सत्यता आहे. अजूनही हिंदुस्थानात मोठा ब्राह्मणवर्ग असा आहे की, धर्म करण्याला उत्तम सवड मिळाल्यास, सरकारला यत्किंचित् तरी धक्का पोचवावा असे, ऐहिक सुखाकरिता त्यांच्या मनात सुद्धा येणार नाही, असे मला वाटते. ही मानसिक स्थिति ब्राह्मण-वर्गाच्याच वांटयास आली नसून पुष्कळ धार्मिक हिंदूंच्याही वांटयास आली आहे. त्याबद्दल लेखकाच्या मनाची साक्ष लेखकाला पुरेशी आहे. ब्रिटिश सरकारने आम्हाला धर्मस्वातंत्र्य दिले आहे हे उपकार पुष्कळ असले, तरी आमचा धर्म आम्हाला ते सक्तीने पाळावयाला लावतील तर त्यांचे आमच्या-वर आणखी अनंत उपकार होतील. दुसऱ्या धर्मास इजा न करिता आमचा धर्म आमच्याकडून सक्तीने पाळवून घेणे ही गोष्ट ब्रिटिश सरकारच्या मनात आल्यास अत्यंत सुलभ आहे. देशी संस्थानिकांना ही मागणी सध्या करतां येण्यासारखी स्थिति नाही, तरी ब्रिटिश सरकाराप्रमाणे देशी संस्थानिक जर ज्याचा धर्म त्याला पाळू देतील तर आपसातील भांडण मिटून त्यांच्याही राज्याला पुष्कळ बळकटी येईल. धर्मबाबतीत ब्रिटिश सरकारने स्वीकारलेले धोरण मोठ्या प्रमाणावर आहे, तेच लहान प्रमाणावर स्वीकारणे देशी संस्थानिकांना अत्यंत हितावह आहे.

२) विद्येच्या दृष्टीने विचार केला, तरी वेदोक्त प्रकरणात आम्हा लोकांचा आग्रहीपणाच दिसून येतो. कुराण, बायबल, बौद्ध ग्रंथ किंवा जैन ग्रंथ जबरदस्तीने आम्हांला शिकवा, अशी आम्ही ओरड मुळीच करीत नाही. मग वेदच आम्हास शिकविले पाहिजेत, अशी कलहमूलक ओरड तरी कशाला

हवी ? जैन ग्रंथांचे अवलोकन केले, तरी देखील जन्मतः ब्राह्मणादि चार वर्णांचे कडक नियम दृष्टीस पडतात. मूर्तिपूजक श्वेतांबर जैनाचार्य हेमचंद्र सूरिप्रणीत अर्हन्नीतिग्रंथात तर ब्राह्मणानीं शूद्राशी व्यवहार केल्यास प्रायश्चित्त सांगितले आहे. शिवाय वेद शूद्रांनी म्हणू नये असे जे ब्राह्मणवर्गाचे म्हणणे आहे ते तरी केवळ स्वरांसहीत अक्षरांविषयीच असून अर्थाविषयीचे मुळीच नाही. भाषांतराविषयीं तर अतिहीन वर्णाना देखील अधिकार स्कांदसूतसंहितादिग्रंथांत सांगून ठेविला आहे. तेव्हा अर्थ शिकण्यास प्रत्यवाय नाही तर अक्षरावर इतर वर्णांचा तरी का आग्रह असावा ? नुसत्या वेदपठण करणाऱ्याला अलीकडील वैय्याकरणी ब्राह्मण शास्त्री देखील दोष देत असतात. त्याला देखील अर्थापेक्षा अक्षरांचे महत्व वाटत नाही. मग ते इतर वर्णांस कां वाटावे ? बरे, अर्थ समजू दिल्यावर मग चोरी ती कशी होत असते ? केवळ अक्षरे पढू नयेत एवढे म्हटल्यानेच चोरी होत नाही.

३) दिगंबर जैन ग्रंथांत स्त्रियांना मोक्षच होत नाही. असे म्हटले आहे; परंतु भाषांतराने हीन वर्णांना व स्त्रियांना देखील मोक्ष होतो असे वैदिकधर्मांत म्हटले आहे. तेव्हा 'आम्हांला सवलती दिल्या नाहीत' असे म्हणून अक्षरांविषयींच आग्रह धरण्यांत विशेष काय आहे ? ब्रह्मसूत्रांत जो वेदाच्या अर्थाचा निषेध सांगितला आहे, तो अक्षरश्रवणपूर्वकच सांगितला आहे, केवळ अर्थाचा निषेध सांगितला नाही. असे असता आम्हाला अक्षरेच पढू दिली पाहिजेत असा आग्रह धरणे इहलोकाची इच्छा करणाऱ्याला मुळीच शोभत नाही; आणि परलोकाची इच्छा असेल तर ज्याला जी अक्षरे सांगितली आहेत तीच घोकली म्हणजे झाले. वेदोक्ताचा अधिकार मागणारांच्या मनात आम्ही क्षत्रिय आहोत म्हणून आम्हाला अधिकार द्या असे येते, हे तरी कलीत अवशिष्ट राहिलेल्या धर्माच्या एका पादाचे सुदैव होय; कारण शूद्रास वेदाचा अधिकार नाही इत्यादि वचनांवर विश्वास ठेवूनच ते आपला क्षत्रियपणा पुढे करीत आहेत; म्हणून हे लोक दयानंदापेक्षा अधिक विचारी आहेत असे मला वाटते.

४) दयानंदाने तर शुक्लयजुःसंहितेच्या २२६ व्या अध्यायांतील दुसऱ्या मंत्राचा मनसोक्त अर्थ करून शूद्राला वेदाध्ययनाचा अधिकार आहे, असे स्पष्ट म्हटले आहे; आणि गुणकर्माने वर्णव्यवस्था मानून तीन वर्णांचेच उपनयन करावे असे म्हटले आहे. तेव्हा हा परस्परविरोध नित्य चिंत्य असाच राहणार. आमच्यामध्ये 'शूद्राला वेदाधिकार नाही,' या वचनावर विश्वास ठेवण्यापुरता तरी ओलावा असल्यामुळे देशी संस्थानिकादि सर्व

स्वजातिबांधवांपाशी मी गरीब विनंति करितो की, बापहो ! आपसांत भांडू नका. धर्मबाबतींत तरी ब्रिटिश सरकारच्याच धोरणाचे अनुकरण करा. अर्थ जर तुम्हाला शिकतां येतो तर अक्षराविषयी उगाच आग्रह धरू नका. ज्याचा त्याचा धर्मवेडेपणा ज्याच्या त्याच्याजवळ राहू द्या. केवळ अक्षरे न पढविण्याने तुमच्या बुद्धीच्या उन्नतीस अडथळा होत नाही. बिभीषणाला जसे रामापासून राज्य मिळवावयाचे होते, त्याप्रमाणें मला ब्राह्मणांपासून काही मिळवावयाचे नाही. माझ्या व्रतादिकांस पैसे देणारे बहुधा ब्राह्मणेतरच असून उलट हर्दा, थूगांव आदि ठिकाणी ब्राह्मणांच्या हातून माझ्याविरुद्ध थोडासा प्रयत्नही झाला होता. असे असताही मला जे विचारानुकूल वाटते तेच लिहितो; विकाराने काहीही लिहीत नाही. माझी विनंति मानिल्यास आपले सर्वांचे हितच आहे. म्हणून गरीबाच्या वाणीचा अव्हेर करू नका. निदान विचार तरी करा. श्रीआळंदीवल्लभ ज्ञानेश्वरमहाराज आपणा सर्वांस सुविचार व सुबुद्धि देवोत !

आपला,

मुंबई ता. २८।९।१९१३. गुलाबराव गुंडोजी मोहोड

भाद्रपद, व. १३।१८३५ मुकदम माधान, हल्ली मु. मुंबई.

□□□□

## ३१. जातिभेदविषयक संवाद

[ खानपानादी व्यवहार–ब्राह्मणांनी विद्या चोरली काय ?–धर्मांतर व देशांतर–धर्मातील अनीतीचे प्रकार–पतितपरावर्तन–सर्व धर्मांचे ऐक्य विचाराने, आचाराने नव्हे–ब्राह्मणांना कठीण धर्म व इतरांना सोपा कां ?–धर्माचे ऐहिक प्रयोजन मुळीच नाही–विश्वकुटुंबी महात्मे कसे वागतात ?–जातिभेद रजोगुणाच्या संकोचासाठी–दयेचा अर्थ–हिंदु धर्म नष्ट होईल काय ?–कठीण शास्त्रांचे प्रयोजन. ]

# ब्राह्मणब्राह्मणेतर वाद

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली समर्थ ॥

रा. रा. मुमुक्षुकर्ते यांस :–वि. वि. मी पुढील लेख पाठवीत आहे, तो कृपा करून छापावा, हा लेख जिज्ञासु व धार्मिक यांच्या संवादरूपाने असून कांही किरकोळ मुद्यांची यात चर्चा केली आहे.

१) जिज्ञासु :–ब्राह्मणांनी आमच्या हातचे जेवण जे नाकारले आहे ते आमच्यापासून त्यांनी विद्या चोरून ठेविली तेव्हा आम्ही कदाचित् विष देऊ, या भीतीने नव्हे काय ?

धार्मिक :–छे, भलतेच ! तू कूर्मपुराण ऐकून पहा. त्यात शूद्राचे हातचे कोणकोणते पदार्थ खावेत ते लिहिले आहे; व ते राजाच्या अन्ना-प्रमाणे परीक्षून पहावेत असेही कोठे लिहिलेले नाही. घरच्या स्वयंपाकापेक्षा त्या पदार्थात विषाचा विनियोग करता येणे अधिक सोपे आहे, असे असून ब्राह्मणांनी शूद्रावर विश्वास टाकला आहे. शिवाय सर्व ऐहिक धंदे ब्राह्मणांनी इतर जातींच्या हाती दिले आहेत. केवळ तोंडाचाच धंदा आपल्याकडे घेतला आहे. प्रत्येक जातीने एकी केली तर ब्राह्मणाला घर बांधून देण्याला सुतार–लोहार देखील मिळणार नाहीत. ही कल्पना त्यांचे मनात आली नसेल असे म्हणता येणार नाही; पण त्यांनी तडजोड केली नाही. शूद्रापेक्षा घरच्या बायकोला विष घालता येणे अधिक सोपे आहे, पण त्या भीतीनेही स्त्रियांना वेद पढवावे असे म्हटले नाही. इतिहासाचे अवलोकन केले तर सर्वच ब्राह्मण ब्रह्मचारी होते असे नाही. कोणाला स्त्रीचा प्रेमा नव्हता असेही नाही. म्हणून अशा प्रकारच्या खुळचा कल्पना करणे तुझ्यासारख्या जिज्ञासूला शोभत नाही असे मला वाटते. धंदे चोरून ठेविल्याने जितके आजच्या कालात लोकांचे अडत आहे, तितके धर्म चोरून ठेविल्याने अडत नाही. पश्चिमेकडे राष्ट्रीय बाब व धर्माची बाब हे दोन निराळे मानले जातात, त्याचेही कारण हेच आहे. याचा तू चांगला विचार कर व व्यर्थ भांडणाचे मूळ मनातून काढून टाक.

२) जिज्ञासु:–यापेक्षा धर्मांतर करणे मला बरे वाटते. हिंदुधर्माच्या मताप्रमाणे धर्मांतर करणे चांगले आहे किंवा नाही ?

धार्मिक:–मुळीच नाही. दुसऱ्या राष्ट्रांत जाऊन वसाहती करणे जसे राष्ट्राला घातक आहे, त्याप्रमाणे धर्मांतर करणेही धर्माला घातक आहे. तसेच दुसऱ्या देशातील लोक आपल्या देशात येऊ देणे जसे राष्ट्राला घातक आहे, तसे दुसऱ्या धर्मातील लोक आपल्या धर्मांत घेणेही घातक आहे. शिवाय धर्मांतर केल्याने अमुक धर्म उच्च व अमुक धर्म नीच अशी भेदबुद्धि उत्पन्न होत असते. सर्व धर्म परमेश्वराकडे सारखेच जातात अशी समबुद्धि राहत नाही. बरे, धर्मांतर करण्याने भांडणाचे मूळ निघून जाईल असे जे वाटते, ती निखालस चूक आहे. कारण सर्वच लोक प्रत्येकाला आपआपल्या धर्मात घ्यावयाला लागले, तर भांडण उलटे चौपट जुंपणार आहे. कारण हिंदूचा मुसलमान केलेला हिंदूंस चालत नाही. छत्तीसगडातील ख्रिस्ती केलेले चांभार पुनः आपल्या धर्मात जातात म्हणून मिशनरी लोक त्यांना ख्रिस्ती करण्याला भितात. मुसलमानांना फारसे ख्रिस्ती करीत नाहीत.

३ ) जिज्ञासुः—— हिंदुधर्मांत काही अनीतीचे प्रकार फार आहेत म्हणतात.

धार्मिकः—तसे ते सर्वच धर्मांत आहेत. लिंगपूजा करण्याचा विधि जसा हिंदुधर्मात आहे, तसा पूज्याचे मांस खाण्याचा विधि ईशपुत्रधर्मांत (ख्रिश्चन) आहे. कारण धर्म केवळ नीतीवर अवलंबून नसून आगमावर अवलंबून आहे. ही बाब बरीच विस्ताराची आहे. ती थोडक्यात सांगण्याने तुला समजावयाची नाही.

४ ) जिज्ञासु :—— मग पतितपरावर्तनाविषयी आपले काय म्हणणे आहे ?

धार्मिकः—कर्ममार्गाने पतितपरावर्तन करण्याला मी अनुकूल नाही, पण भक्तिमार्गात पतितपरावर्तनाविषयी मी अनुकूल आहे. कारण आपली पूर्वीचीच भक्ति संस्काराने दृढ होणारी असते. धर्मांतर केलेल्यांची मरताना मानसिक स्थिति चांगली नसते, हे मॅक्समूलरनी दिलेल्या गोरे शास्त्रीच्या उदाहरणावरून तुला कळेल. पूर्वीचे प्रेम काढून दुसऱ्या ठिकाणी ठेवणे साधारण मनुष्याला असाध्य आहे. महात्म्यांविषयी मी काही बोलत नाही; कारण ते धर्माधर्माचे पलीकडे गेलेले असतात. संदीपनीसारख्या गुरूलाच पुत्रापेक्षा शिष्यावर अधिक प्रेम ठेवता येते. पण तुझ्या माझ्यासारख्याला तर दत्तक घेतलेल्या आईवर प्रेम ठेवता येत नाही, हा स्पष्ट अनुभव आहे व त्याचमुळे दत्तक मातापुत्रांची भांडणें कचेरीपर्यंत जातात हे आपण पाहतो. जे धर्मांतर करितात त्यांचे आईबापांइतके देखील धर्मावर प्रेम नसते. तेव्हा त्यांच्या हातून धर्मकार्य ते काय होणार ? धर्म सर्वांच्या आत असणारी मनोवृत्ति आहे. तिचे मूळ अंतःकरणाला अधिक चिकटलेले असले पाहिजे. पण बाह्य कुटुंबाच्या प्रेमाइतकीही किंमत तिला जो देत नाही, तोच अनेक धर्मांतरे करितो.

५ ) जिज्ञासुः——मग सर्व धर्मांचे ऐक्य कसे ओळखावे ?

धार्मिकः—तेआचाराच्या द्वाराने ओळखावयाचे नाही, तर विचाराच्या द्वाराने ओळखावे लागते. बरे, जातिजातींमध्ये एकत्र भोजन जरी झाले, तरी सर्वांना सर्व थोडेच खाऊ मागणार आहेत ? पंक्ति श्रीमंतांच्याच होतात, गरिबाला कोणी पुसत नाही. ज्या जातींच्या हातचा परस्पर व्यवहार आहे त्या जातींनी आपल्यातील गरिबांना तरी आश्रय देऊन पहावा म्हणजे झाले. असे प्रत्येक जातीने केले तर भांडणाचे मूळ नाहीसे होईल व उपाशी

**कोणी मरणार नाही. लहान संघावाचून मोठी संघशक्ति उत्पन्न होत नसते;** शिवाय आपत्काली, युद्धात, प्रवासात व प्राण जात असताना खानपानाचा अडथळा हिंदुधर्मानेही शिथिल केला आहे; **पण धष्टपुष्ट असूनही आपले पायांवर उभे न राहता परान्न झोडणे हिंदुधर्मास पसंत नाही इतकेच.**

६) जिज्ञासु :– **सर्वांना जर आपापल्या धर्माप्रमाणे एकच फळ मिळते तर ब्राह्मणांच्या माथी एवढे कठीण धर्म कां लावून दिले व ते त्यांनी तरी कां पाळावेत ? कोणता तरी एखादा सोपा धर्म पाळावा म्हणजे झाले.**

धार्मिक :–**ही गोष्ट तू ईश्वरास विचार. मत्स्याला सहज पाण्यावर तरता येते व मनुष्याला अतोनात श्रम करावे लागतात. कोण विषमपणा हा ! पुरुष व स्त्री सारख्याच दर्जाची असून गर्भाचे दुःख बायकांनाच कां अधिक ? मला वाटते, ते त्यांच्या कर्माप्रमाणे आहे. जसे पाणी सर्व झाडांना साधारण कारण असून त्याचे त्याचे बीज असाधारण कारण आहे. ज्या कर्माने रोग उत्पन्न होतो त्या रोगावरील वर्ज्य पदार्थांच्या वैद्यशास्त्रीय नियमांचा त्रास त्याच कर्मांनी सोसावा लागतो. तो जर सोसला नाही तर रोग वाढतो व वैद्यशास्त्राचे काही चालत नाही; जितका जितका रोग जास्त तितका त्याला वर्ज्य–प्रतिबंध जास्त. तसेच जितका जितका आपल्या कर्माने जो खाली उत्पन्न होतो तितके तितके त्याला जास्त प्रतिबंध असतात. तसाच जितका जो उंच उत्पन्न होतो तितकी त्याला जबाबदारी जास्त असते. सर्वच गोष्टी सर्वांना सुलभ नाहीत. मनुष्य उच्च आहे, पण त्याला आकाशात उडण्याकरिता विमानादिकांचे श्रम करावे लागतात. पक्ष्यांना ते करावे लागत नाहीत; तर त्यांना बोलण्यावगैरेचे इतर प्रतिबंध आहेत. तसे उच्च ब्राह्मणवर्गाला कठीण धर्म सांगितला आहे; खालच्या वर्गाला तेवढा कठीण सांगितला नाही, तर इतर वैदिक प्रतिबंध अधिक आहेत. मिळून बेरीज सारखीच. म्हणून कोणी कोणाबद्दल मत्सर करण्यात काही अर्थ नाही. आता वेद म्हटल्याने आम्ही तुम्हाला स्वर्ग देऊ असा कोणी पट्टा लिहून दिल्यावरची गोष्ट निराळी,**

७) जिज्ञासु :–**मग भक्तीने एकत्र झालेल्या सर्वांनी सर्वांचे हातचे जेवावे काय ?**

धार्मिक :–**छे, जेवणे हे भक्तीचे फळच नव्हे. भक्तीचे फळ एकादशी. जेवणे तर कुत्र्याच्या योनीत देखील सुलभ आहे. त्याच्याकरिता पतितोद्धार कशाला पाहिजे ? जेवताना चित्राहुति घालणे इत्यादि कर्मकांडाची जरूरी**

**आहे. एवढ्याकरिता जेवणे यथाव्यवहारच झाले पाहिजे.** धर्माचे ऐहिक प्रयोजन मनात धरून धार्मिक व सामाजिक प्रश्नांचा मेळ घालण्याची तू खटपट करू नको.

८) जिज्ञासु :—**महात्मे विश्वकुटुंबी असले पाहिजेत असे म्हणतात. आणि आपले मनात तर आपलेपणाचा संकोच फारच दिसतो.**

धार्मिक :— **विश्वकुटुंबी वर्तन म्हणजे ब्रह्मरूपाने विश्व हे एक आहे असे पाहणे होय, जगद्रूपाने ते एक आहे असे पाहणे नव्हे. नथनी व बाळ्या एकाच सोन्याच्या होतात, म्हणून नथनी कानांत व बाळी नाकात घालणे शोभेल काय ? घट व शराव यांमध्ये माती एक असते, पण तेवढ्याने शरावामध्ये पाणी भरणे हिताचे होत नाही. जगद्रूपाने जर आपलेपणा वाढवावयाचा असेल तर जेवणाच्या ताटावरील माशा वारण्याचे काही कारण नाही. डसणाऱ्या चिलटांकरिता मच्छरदाणी नको व प्लेगजंतूंच्या निवारणार्थ कमिशन बसविण्याचे काही प्रयोजन नाही. तुझ्या बायकोवर व मुलावर प्रत्येकजण हक्क दाखवू लागला तर तुला आवडेल काय, हे खरेच सांग बरे ? अशाने तर समाजाच्या सुधारणेच्याऐवजी उलटा लवकरच नाश होईल. दायविभाग-कायद्याची जरूरी राहणार नाही. कोणी कोणास उपसर्ग देऊ नये इतका आपलेपणा वाढवावा, असे तुला म्हणता येणार नाही. कारण सर्वत्र जर आपलेपणा आहे तर उपसर्ग कोण कोणाला देणार ? व उपसर्ग देणारा उरला आहे तर आपलेपणा कशाचा ?**

९) जिज्ञासु :— **अशाने तर उच्च मनोवृत्तिही नाहीशा होतील व आपली जाति सोडून दुसऱ्या जातीवर कोणी दया करणार नाही.**

धार्मिक :—**मनुष्यादिक जातिभेद सत्वगुणाच्या संकोचाकरिता नाहीत, तर रजोगुणाच्या संकोचाकरिता आहेत.** जेवणें, खाणे, लग्नकरणें इत्यादि विषयांना आळा बसावा म्हणूनच शास्त्र जातिभेद सांगते. **दया वगैरे सात्विक धर्म आहेत ते कोणावरही करण्याकरिता जातिभेद अडथळा करीत नाहीत. शिवाय दया करणाराला जेवण्याच्याऐवजी जवळचे अन्न दुसऱ्याला द्यावे लागते. तेव्हा जातिभेदाविषयी दयेचा प्रश्नच उत्पन्न होत नाही. आता एखादी महारीण जर विधवा झाली तर तिला एखाद्या ब्राह्मणाने बायको करून घेणे या दयेला जातिभेद अडथळा करतो खरा, पण तेवढा अडथळा स्वतःची मुलगी विधवा झाली तरी तो करतो.**

१०) जिज्ञासु :–हिंदुधर्मापेक्षा इतर धर्माचे लोक सृष्टीत फार आहेत.

धार्मिक :–पहिले कारण की, हिंदुधर्माकडून इतर धर्मांवर आपत्ति आल्या नाहीत. उलट हिंदुधर्मावर मात्र सर्व बाजूंनी आपत्ति आल्या असूनहीं त्याचे तेवीस कोटी लोक आज हयात आहेत. इतका आपत्काली टिकाव धरणे हे काहीं थोडे नव्हे.

११) जिज्ञासु :– आम्हांला असे वाटते की, एकादे दिवशी हिंदुधर्म अगदी नष्ट होईल. कारण त्याची योगशास्त्रासारखी शास्त्रे फार कठीण आहेत, व ती थोडक्याच लोकात रूढ होण्यासारखी आहेत.

धार्मिक :–हिंदुधर्म अगदी स्वाभाविक आहे. सांसारिक सुख सगळ्या-नाच सारखे मिळत नाही, हा सृष्टिनियम आहे. त्यामुळे कंटाळून जाऊन विषयाचा परित्याग करणारे जे थोडके लोक निघतील त्यांच्याकरिताच योग-शास्त्रासारखी शास्त्रे हिंदुधर्मांत आहेत. सृष्टीतील दुःख बंद पडावयाचे नाही, तोपर्यंत वैराग्य बंद पडावयाचे नाही, व जोपर्यंत वैराग्य बंद पडावयाचे नाही, तोपर्यंत योगशास्त्रही बंद पडावयाचे नाही. आता थोड्या माणसांजवळ ते राहील एवढे खरे, पण ते थोड्यांकरिताच आहे. सुखदुःखाच्या अनु-मानानें कर्माचा नियम अबाधित आहे; व जडाच्या हातून कार्य होत नसल्यामुळे चेतनसंबंधी नियम अबाधित आहेत. एवढ्याचकरिता हिंदुधर्म अबाधित आहे. वत्सा, माझे स्पष्ट मत असे आहे की, ज्यांनी त्यांनी आपल्या धर्माप्रमाणे वागूनच सिद्धि मिळवावी. परमेश्वर कोणाचाही पक्षपाती नसल्यामुळे, तो त्यातच राजी आहे.

हे बोलणे चालले असता जिज्ञासूने धार्मिकाला अनुमोदन देऊन शेवटी तोही धार्मिक झाला. हे पाहून लेखकास फार आनंद वाटतो. म्हणून ही आनंदाची बातमी मुमुक्षुकारांचे चरणी समर्पण केली आहे.

आपला,

हर्दा, ता. ३०।१०।१९१३ गुलाबराव गुंडोजी मोहोड

□ □ □

[ हिंदु मुसलमानात धार्मिक दृष्टीने सख्य की द्वेष ?–धार्मिक लढाया–कर्म, उपासना व ज्ञान=शर्यत, तारिकत व हकीकत हे ईश्वरापासुन आले–ख्रिश्चन धर्मात क्रिया ईश्वरापासून तर तत्त्वज्ञान जीवबुद्धीतून म्हणून धर्म व तत्त्वज्ञानाची फाटाफूट–तापसी व सुफी मनानें एकच–ख्रिश्चन मुसलमानांचे ऐक्य–हिंदुमुसलमानांचे ऐक्य–गवताप्रमाणे ७७० वेळा जन्म–ईश्वर विसरणें म्हणजे संसार, बायकामुले संसार नव्हे– अज्ञानानें बंध–अल्ला म्हणजे आई–कुराणात ईश्वरमातृत्व–हिंदु ख्रिश्चनांचे ऐक्य–बुद्ध हिंदूचा अवतार–विचार दृष्टीनें सर्व धर्मांचे ऐक्य पण आचारभिन्नता–हिंदु मुसलमानातील द्वेष धार्मिक नसून राजकीय–धर्मतत्त्वांचा ध्यानानें शोध घ्यावा. ]

# मुसलमान, ख्रिश्चन व हिंदुधर्म

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली ॥

मुंबईस आपण सांगितल्याप्रमाणे मी हा लेख पाठवीत आहे; तो कृपा करून येत्या अंकी छापावा.

१) माझ्या मते हिंदुमुसलमानांत धर्मासंबंधी सर्वदा सख्य आहे; कारण द्वेष धार्मिक किंवा राजकीय असा दोन प्रकारचा असूं शकतो. त्यांत धार्मिक द्वेषच लोकांच्या धर्मश्रद्धेने परंपरागत टिकू शकतो. "वारांगनेव नृपनीतिरनेकरूपा" या भर्तृहरीच्या म्हणण्याप्रमाणे राजकीय द्वेष कधीच चिरकाळ टिकू शकत नाही. माझ्या मते हिंदुमुसलमानात धार्मिक द्वेष उत्पन्नच झाला नाही व होणे शक्य नाही. ह्याकरिता प्रथम मुसलमान धर्मदृष्टि घेऊन, नंतर हिंदुधर्मदृष्टीने विचार करू.

२) रसुलिल्ला महंमद पैगंबर जोपर्यंत होते तोपर्यंत हिंदुस्थानाशी व मुसलमानांशी तादृश संबंध इतिहासाने सिद्ध होत नाही. महंमद पैगंबराच्या व आर्येतर लोकांच्याच धर्माकरिता लढाया झाल्या असतील. कदाचित् मुसलमानी इतिहासाचे परिशीलन केले म्हणजे हिंदुस्थानात त्यांच्या राजकीय इतिहासाचेच स्वरूप प्रकट झाले असे दिसून येते. मौलालीच्या मुलांपासून शिया व सुन्नींतील लढा मुसलमानात आपसात चालू आहे; आणि तो लढा मुसलमानांच्या धार्मिक इतिहासात नमूद झाला आहे. कदाचित् कोणाच्या मते मौलालीच्या मुलांपासून हा लढा नसेलही. पण तो हिंदुमुसलमानांतील लढ्याच्या पूर्वीचा खास असून धार्मिक इतिहासाच्या स्वरूपाने तो पुढे आला आहे. हिंदूंच्या धार्मिक इतिहासात जसे देवासुरसंग्रामाने ठाणे

दिले त्याचप्रमाणें मुसलमानांच्या धार्मिक इतिहासात शियासुन्नीतील लढ्याने कायमचे ठाणे दिले आहे म्हटल्यास फारशी अतिशयोक्ति होणार नाही.

३) हिंदुधर्मात ज्याप्रमाणे कर्मकांड, उपासनाकांड व ज्ञानकांड असे तीन विभाग आहेत, तसेच 'शर्यत, तारिकत, आणि हकीकत' असे मुसलमानी धर्मातही आहेत. हकीकती लोक सुफी धर्माचे असून सुफी धर्म महंमद पैगंबरापासूनच निघाला आहे असा त्या लोकांचा समजही आहे. काही शर्यती मुसलमानांनीं हकीकती मुसलमानांचा छळ केल्याचा इतिहास आहे. पण तसाच एका काळीं हकीकती लोकांचा शर्यती लोकांपाशी मान होता, असेही इतिहास आहेत. सर्व कांड व धर्म परमेश्वरापासूनच आले आहेत, या समजुतीमुळे हिंदुधर्मात मात्र असा भयंकर प्रकार घडला नाही.

४) खिश्चियन धर्माची स्थिति तर याहीपेक्षा विलक्षण आहे. त्या लोकांची समजूत अशी आहे की, क्रियाकांडात्मक धर्म ईश्वरापासून आला असून तत्त्वज्ञान (फिलॉसफी) जीवबुद्धीतून निघाले आहे. त्यांची ही समजूत परंपरागत चालत आल्यामुळे धर्माची व तत्त्वज्ञानाची कायमची फुटाफूट झाली आहे.

५) हिंदूंचा व मुसलमानांचा असा समज आहे की, कर्मकांड व ज्ञानकांड किंवा शर्यत व हकीकत या सर्व गोष्टी ईश्वरापासूनच आल्या आहेत. महंमद पैगंबर आपल्या आयशा नामक स्त्रीच्या मांडीवर निजले असता 'बेहस्ता-(स्वर्गा-) पेक्षाही हा मित्र वरिष्ठ आहे,' असे उद्‌गार काढल्याची गोष्ट सुफी सांगत असतात. केवळ मृगचर्म मात्र घेऊन राहणारा तापस व लोकरीचे टोपरे घालून राहणारा सुफी हे शरीराने दोन असले तरी मनाने एकच म्हटले पाहिजेत.

६) खिश्चन धर्माचे व मुसलमानी धर्माचे कधी ऐक्य झाले तर सुफी धर्माच्या द्वारेच होईल असे मॅक्समुल्लर साहेबाने आपल्या पुस्तकात म्हटले आहे; पण माझ्या मते हिंदुधर्माचे व मुसलमानी धर्माचे ऐक्य होईल असे म्हणावे लागत नाही; तर पुष्कळसे आजच आहे. १–मी वारंवार उत्पन्न होणाऱ्या गवताप्रमाणे ७७० वेळ जन्मलो – हफत् सद हफ्‌रात् कॉलिफ दीदा अम् । मिस्लसब्जा कि बारहारो हिदा अम् ॥ असे म्हणून पुनर्जन्माचे तत्त्व जलालुद्दिन रूआ साहेब यांनी आपल्या " मस्नवी ए मानवी "नामक ग्रंथात कबूल केले आहे. २– परमेश्वराला विसरणे याचेच नाव संसार आहे, बायकामुलांचे नांव संसार नाही " –चीष्त दुनिया अस् खुदा गाफिल बुदन । नैकमाषेनुक्रवो फर्जन् दजन् ॥ इत्यादि फारशी वचनात 'अज्ञानापासूनच बंध होतो' या आर्यांच्या कल्पनेशी सुफीच्या कल्पनेचे

साम्य आहे ३– ऋग्वेदादि कर्मकांडाला जसे आर्यांनी मुंडकोपनिषदात अपरा विद्या मानले आहे, तसे पोथीपासून ज्ञान होणार नाही, असे एका पार्शी बथतेत म्हटले आहे. ४– हिंदु धर्मातही " कनिष्ठा प्रतिमापूजा " इत्यादि वाक्ये असून सुफी धर्मातही मूर्तिपूजक म्हणजे एकनिष्ठ भक्त अशी अलंकारिक भाषा होऊन गेली आहे. इमाम गज्जालीसाहेबांच्या पूर्वी सुफी धर्माची भाषा अलंकारिक होती. त्यात मूर्तिपूजकांचा कोणत्या ना कोणत्या तरी दृष्टीने समन्वय झालाच होता, आणि हा सर्व प्रकार मुसलमान हिंदुस्तानात येण्याच्या पूर्वी झाला असल्यामुळे, अर्थातच मुसलमानांच्या व हिंदूंच्या धार्मिक द्वेषाला कोणतेही कारण उरले नाही. हिंदुस्थानात मुसलमान आल्यावर देखील शेखमहंमद, बाबा रसखान वगैरे हिंदुधर्मी झाल्याच्या कथा भक्तचरित्रात आहेत. ५– ' अल्ला ' या संस्कृत शब्दाचा अर्थ आई असा असून ईश्वरमातृत्वाच्या अपेक्षेने कुराणात तो जशाच्या तसाच घेतला आहे. ६– कोणी हिंदुधर्मातील अल्लोपनिषत् मुसलमानधर्माला मूळ आहे असे म्हणतात. एका पंडिताचा पूर्वीचा श्लोक आहे. तो येथे देतो:–

अल्ला देवो देवपूजा नमाजो, कल्पा मंत्रो तीसरोजे व्रतानि ।
काजी स्मार्तो पंडितस्तत्र मुल्ला ख्वाजाचार्यो नैव शास्त्रप्रभेद: ।।

कोणत्याच धर्मबंधात न राहून वाटेल तसे वागणे मात्र हिंदुधर्माला संमत नाही. याविषयी एका कवीने म्हटले आहे:––

न संध्या संधत्ते नियमितनमाजा न कुरुते ।
न वा मौजीबंधो न च खलु कृत: सोन्नतविधि: ।
न रोजान् जानीते व्रतमपि हरेर्नैव कुरुते ।
न काशी वा मक्का; शिव शिव न हिंदुर्न यवन: ।।
" राम रहिमा करिमा केशव अलखनाम सब एकहि है ।
जिसकू तुम बिसमिल्ला कहते वोही बिस्नु हमारा है ।। "

७) अशी संतांची वाक्येही आहेत. ही हिंदुमुसलमानधर्माविषयी स्थिति असून भविष्योत्तर पुराणान्वये तर हिंदुधर्माशीं व ख्रिश्चन धर्माशी मुळचेच ऐक्य आहे. असेच हिंदुधर्माचे व बौद्ध धर्माचेही ऐक्य आहे. बुद्धाला हिंदु अवतार मानतात हीच त्याची मोठी साक्ष आहे. हिंदु धर्माचे म्हणणें एवढेच आहें की, विचारदृष्टीने सर्व धर्म एक, म्हणूनच सर्वांना गोडीगुलाबीने वागता येत असून, अधिकारी पुरुषांच्या सोयीप्रमाणे आचार मात्र प्रत्येकांचे भिन्न आहेत; व तें तसेच राहू देणे, प्रत्येक समाजाला भूषणावह आहे.

८) शिया व सुन्नींतील लढा किंवा रोमन कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट लोकांतील लढा ज्याप्रमाणे धार्मिक होऊन बसला आहे, तसा हिंदूमुसलमानांतील लढा धार्मिक होण्यास जागा राहिली नाही. इतकेही करून हिंदूमुसलमानातील लढा कोणाला कल्पावयाचाच असेल, तर अग्निपूजक अशा पार्शी लोकांशी व सैतानाने ज्याचा उपदेश केला आहे अशा आणखी कोणाशी तो सामान्यच कल्पिता येतो, म्हणून विशेषतः हिंदूमुसलमानात धार्मिक द्वेष नाही, व तो उत्पन्न होणे शक्यही नाही. हिंदु व ख्रिश्चन लोकांशी तर भविष्योत्तरपुराणवाक्याने द्वेष नाही हे सिद्ध होत आहे. ख्रिश्चन लोकांनी उपदेशाचा जो मार्ग धरला, त्यापेक्षां मुसलमानांनी कडक तरवारीचा मार्ग धरला असेल व त्यामुळे हिंदूंत व त्यांच्यात काही काळपर्यंत लढा उत्पन्न झाला असेल; तर तो धर्मामुळे आहे असे कधीही म्हणता येणार नाही इहलोकच्या कोणत्याही कारणामुळे उत्पन्न होणारा द्वेष, ते कारण नष्ट झाले की नष्ट होत असतो. दोघां समर्थांचा काही कारणामुळे उत्पन्न होणारा द्वेष दोघेही आपल्या गरिबीत सोडून देत असतात. किंवा दोघां अज्ञान्यांचा द्वेष शहाण्याने नियमन केले म्हणजे ते सोडून देतात. मला वाटते, पूर्वी जो हिंदुमुसलमात लढा दिसत होता तो अज्ञानामुळेच असून, दयाळू इंग्रजसरकारच्या हाती आता राष्ट्र आल्यामुळे व त्यांचे नियमन शहाणपणाचे असल्यामुळे हिंदुमुसलमानच काय, पण जितके हिंदुस्थानात धर्म असतील, त्या सर्वांना लढा सोडून गोडीगुलाबीने वागण्याची उत्तम संवय झाली आहे. स्कंदपुराणात 'ज्याचा त्याचा धर्म पाळू द्यावा, तोच राजा उत्तम' असे म्हटले आहे, व तशी स्थिति आज हिंदुस्थानात आहे. म्हणून आपापल्या धर्मात खरे काय आहे हे उत्तम रीतीने जाणून विचार करावा. धर्मश्रेष्ठावर कोणीही हात टाकीत नाहीत.

९) धर्माची आवश्यकता युरोपासही भासू लागली आहे. युरोपमध्ये युद्धसामग्री जितकी जास्त तितकी त्याची बळकटी जास्त अशी स्थिति झालेली आहे. पण प्रत्यक्ष युद्धप्रसंग होईल तेवढा टाळण्याचा प्रत्येक राष्ट्र खटपट करीत असते. त्याचे कारण एखाद्या क्षुल्लक गोष्टीकरिता अतिशय प्राणहानि होण्याचा संभव आहे. म्हणून त्यांना फार भीति वाटते. जडशास्त्राची दृष्टि युद्धसामग्री सुलभ कशी होईल या विचाराकडे बरीच झुकली आहे. हिंदुस्थानात ब्राह्मणांच्या हाती धर्म असून राजकीय व्यवस्था ठेवण्याचे काम क्षत्रियांचे होते, त्यामुळे आपसात व परकीयात कितीही द्वेष वाढला तरी त्याचा धर्माशी प्रत्यक्ष संबंध येऊन पोचला नाही.

म्हणूनच हिंदुस्थानांत कोणाशीही धार्मिक द्वेष उत्पन्न होणे शक्य नाही. युरोपला देखील शांतता कायम ठेवण्याकरिता कोणत्या तरी धर्माचा अवश्य आश्रय करावा लागेल. म्हणून मला असे वाटते की, उगीच अन्य गोष्टीत न पडता आपआपल्या धर्मात खरे काय आहे, याचा ध्यानाच्या योगाने शोध करावा. ध्यानस्थ पुरुषाचा योगक्षेम परमात्मा करितोच. शिवाजीऔरंगजेबांच्या काली ऐतिहासिक लढा प्रत्यक्ष असता देखील शेख महंमदबाबासारखे मुसलमान महात्मे हिंदूंशी मिळूनच होते. माणिकप्रभु वगैरेंच्या स्थानी अजूनही हिंदु-मुसलमानांच्या पूजा होतात. तेव्हा हिंदुमुसलमानांत द्वेष आहे असे समजणे चांगले नव्हे. हा लेख श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या चरणी समर्पण करितो.

ता. ५।३।१९१४ गुलाबराव

□□□□

## ३३. योग आणि विपर्यास

[ वैराग्यावाचून योगाभ्यास–चमत्काराने फसगत–योगाचा अधिकार कोणाला ?–वैराग्य व अभ्यासाची जरूरी–चमत्कारांनी योग नष्टप्राय होईल–योग आलजी ऐवजी इझम झाला–योगावरील प्रश्न–सविकल्पातून निर्विकल्प कसे होते ?–प्रमाणवृत्तीचा निरोध प्रमेयात की विषयात ?–निद्रेचा निरोध कसा ?– प्राणायाम व ईश्वप्रणिधान–कुंडलिनीची प्रथम भावना की प्रथम साक्षात्कार?–साक्षात्कार ही योगाची अन्त्य दशा की मध्यदशा?–सत्व व तमाचा निरोध कसा करावा ?– योगात या सर्वांची उत्तरे आहेत. ]

# भोंदू योग्यांना प्रश्न

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली ॥

१) हिंदुस्थानात प्राचीनकाली योगशास्त्राची भरभराट होती, हे कोणासही नाकबूल नाही; पण हल्लीच्या काळी त्याच्या नावाखाली भलत्याच गोष्टींचा प्रचार होत आहे, असे मला वाटते. साधारण संवयी देखील योगाच्या नावाखाली मोडत आहेत. वेदान्त व्यवहाराशी जुळवून घेण्याची जशी खटपट होऊ लागली आहे, तशी योगाविषयी खटपट चालली आहे. " अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते " असे भगवंतांनी मनाच्या निरोधाविषयी सांगितले असून " अभ्यासवैराग्याभ्यां तन्निरोधः " (पातंजल योगदर्शन, पाद १, सूत्र १२) असे पतंजलीचे सूत्र आहे. परंतु अलीकडे अविरक्त लोकही योगाचा खेळ करून दाखविण्याची खटपट करितात व त्यात भोळे लोक किमयेच्या नादी लागून फसणाऱ्याप्रमाणें फसतात. असे पुष्कळ योगी म्हणविणाऱ्यांचे दर्शन घेऊन माझ्या हे आढळण्यात आले आहे.

२) मोठमोठे शिकलेले लोक देखील एखादा क्षुल्लक चमत्कार पाहून योगाच्या नावाखाली फसले जातात. सर्वांवरच सारखा प्रयोग लागू पडत नाही, हे मेस्मेरिझम्चे तत्त्व योगास लागू करून, भोंदू योगी अधिकारीपणाचे बंड माजवीत असतात; व एखाद्याने प्रश्न विचारला तर 'अनुभवाच्या गोष्टींत युक्ति कशाला पाहिजे ?' असे म्हणत असतात. कित्येक योग्यांनी दाखविलेले चमत्कार अत्यंत अडाणी गोंड कोरकूंच्या जातीतही मी त्याच तत्त्वावर पाहिले आहेत. सारांश, योग म्हणजे कोल्हाटयांची कसरत अशी स्थिति होऊन राहिली आहे. रामकृष्णमिशन, श्रीकृष्णमिशन वगैरे लहान मोठया सभा योगाविषयी हल्ली हिंदुस्थानात विख्यात आहेत. त्यातून कोणी माझ्या प्रश्नांचे उत्तर देतील या आशेने मी पुढील प्रश्न लिहीत आहे. या प्रश्नांची उत्तरे योगशास्त्रात आहेत असा माझा निश्चय आहे, पण ते मलाच उलट कोणी विचारण्याच्या भ्रांतीत पडू नये. कारण मी गरीब व यःकश्चित् असल्यामुळे लाददेव, लदादेव, लादनेवाला साथ देव। या म्हणीप्रमाणेच स्थिति व्हावयाची.

३) मला वाटते की, गणिताच्या योगाने भावी अनुमान ठरवून एखाद्या पुलाचा नकाशा काढून पुढील योजना ठीक करिता येते, त्याप्रमाणेच कितीही अनधिकारी पुरुषास योगशास्त्राची कल्पना ठीक देता येते. त्याच्या विशेष अवस्थेसच मात्र अनुभवाची जरूरी आहे. "अथ योगानुशासनं" (योगदर्शन पाद १, सूत्र १) या सूत्रांतील 'अथ' शब्दाचा अर्थ करिताना भाष्यकारांनी हा आनंतार्यार्थी नाही, असे म्हटले आहे; म्हणजे काही विशेष अधिकार प्राप्त झाल्यावरच योग करावा असा विशेष अर्थ कोणी समजूं नये, तर प्रत्येकास आपल्या अवस्थेत थोडाबहुत योग करिता येतो, असा त्याचा ध्वनि आहे. अभ्यासाचे व वैराग्याचे पाठबळही त्याच नियमानें वाढवीत गेले पाहिजे. पण अलीकडे पहावे तर त्राटक, प्राणायाम, हातवारे इत्यादि अभ्यासाच्या मागे लोक लागले असून, वैराग्याविषयी शून्य आहे. त्यामुळेच इंग्रजी भाषेत योगास 'आलजी' ology हे नांव प्राप्त होण्याच्या ऐवजी–'इझम्' ism असे नाव प्राप्त झाले आहे ! "ते समाधावुपसर्गा व्युत्थाने सिद्धयः" (योगदर्शन पाद ३, सूत्र ३७) या सूत्रात महर्षिवर्यांनी सिद्धींची निंदा केली आहे. पण आताचे योगी अत्यंत क्षुल्लक सिद्धीच्या मागे लागले आहेत. यांच्याकडून एक साधारण आक्षेप येत असतो, तो असा या क्षुल्लक कृति करून दाखविल्या नाहीत तर योग अगदी नष्टप्राय होऊन जाईल !' या आक्षेपाला माझेही उत्तर आहे की, या क्षुल्लक कृति

दाखविल्या तर योग अगदी नष्टच होऊन जाईल ! कारण त्याच्या योगाने अभ्यासाचे पाठबळ जे वैराग्य ते नाहीसे होऊन संसारात प्रत्येक गोष्ट इच्छाशक्तीने मिळवून घेऊ अशी हाव सुटत असते.

४) दुसरा या लोकांचा आक्षेप असा की, वनात जाऊन बसणाऱ्या साधूंचा आम्हांस सध्या उपयोग नाही. काही समाजाचे कार्य करणारे महात्मेच पुढे आले पाहिजेत. हा आक्षेप मला शिरसामान्य आहे; परंतु इतका समाजावर उपकार करणे देखील अत्यंत वैराग्याशिवाय होत नाही, हे देखील या आक्षेपकांनी लक्षांत ठेवले पाहिजे. घरात एकांतीं बसून अग्नीत प्राण देण्याला जशी देहाची आशा सोडावी लागते, तशीच ती धारातीर्थी प्राण देण्यालाही सोडावी लागते. आपला तळिराम गार करण्याच्या उद्देशाने कोणताच उद्योग साध्य होत नाही. पण दुसऱ्यांवर अंमल चालवावयाचा इतकाच सध्याच्या योगाचा अर्थ होऊन राहिला आहे. पण ही शक्ति थोडी-बहुत सगळ्यांसच लाभली तर जीवनार्थकलहामुळे योगी लोकांमध्येही परस्पर युद्ध होणार नाही काय ? हिप्नॉटिझम्सारख्या क्षुल्लक गोष्टी आपल्या-कडे वामतंत्रातून अनेक ठिकाणी चमकत आहेत. म्हणून तिकडे लक्ष न देता खऱ्या योगसंबंधातच मी काही प्रश्न करण्याचे धाडस करीत आहे. मी लेकरू म्हणून माझ्या तोंडावर थापड मारून माझी समजूत घालण्याच्या उद्देशाने तरी कोणी या प्रश्नांची उत्तरे दिल्यास मी त्यांचा मोठ्या आनंदाने स्वीकार करीन व उत्तरे पटल्यास त्या महात्म्याच्या दर्शनाचाही प्रसंग लवकरच आणीन.

५) प्रश्न १ ला :–चित्तवृत्तींचा निरोध हे योगाचे प्रयोजन आहे, आणि त्याकरिता काही ध्यानाची आलंबने सांगितली आहेत. पण चित्ताचा हा एक स्वभाव आहे की, जिकडे त्याला लावावे, तेच त्याचे व्यसन होते. मनाचेंनि एक निकें । जे देखिलिया गोडीचिया ठाया सोके असे तातांनी स्पष्ट म्हटले आहे. तेव्हा आलंबनाचे अत्यंत ध्यान करिता करिता ध्येयाकार झालेले चित्त ध्येयाचा उपमर्द करून सविकल्प आलंबनास सोडून निर्विकल्प समाधीत प्रवेश करिते कसे ? यावर कोणी असे म्हणेल की, स्थूल स्थूल आलंबने सोडीत जाऊन सूक्ष्म सूक्ष्म आलंबने घेत जावे. तर यात त्रिपुटी कायम राहते; म्हणजे कितीही सूक्ष्म आलंबने घेतले तरी ध्यान करणारा पृथक् राहतोच. किंवा अत्यंत केले तर ध्यान करणारा ध्येयाच्या आकाराने भासू लागतो. स्त्रीचे ध्यान करणारा स्वप्नात स्त्री भोगणाराच होतो, स्त्री होत नाही, हे साधारण सर्वांस माहीत

आहे. पण अतिशय ध्यान केले तर मरणानंतर तो कदाचित स्त्रीही होईल. तेवढ्यानें ध्याता निर्विकल्प होईल, हे म्हणणे संभवनीय नाही. बरे, योगापासून ज्ञान झाल्यावर तो निर्विकल्प होईल असे म्हटले तर हे पोपटी उत्तरही बरोबर नाही. कारण विवेकख्यातीचा देखील निर्विकल्प समाधीत रोध होतो, असे योगसूत्रात सांगितले आहे ते वाचून पहावे. आता एक वेळ आरशातील तोंड पाहिल्यावर ज्याप्रमाणें आरशातील प्रतिबिंबाची गरज नसते, त्याप्रमाणे विवेकख्याति झाल्यावर तिची गरज राहत नाही, असे उत्तर काहीं वेदान्तग्रंथ चावणारे, चोखणारे देतील हें मी जाणून आहे. पण विवेकख्याति हा वृत्तिसंधीचा मेळ असल्यामुळे, गरज नसली तरी प्रयत्नविशेषावाचून तिचा रोध व्हावयाचा नाही व तसा योग्यांचा अनुभवही आहे, इकडे या ग्रंथरसिकांनी लक्ष दिले पाहिजे.

६) दुसरा प्रश्न असा आहे की, प्रमाण, विपर्यय, विकल्प, निद्रा आणि स्मृति या पांच प्रकारच्या वृत्तींचा निरोध करावा म्हणून पतंजलिसूत्रात पहिल्याच पादात सांगितले आहे. त्यावर प्रश्न असा की, प्रमाणवृत्तीचा निरोध प्रमाणाला जाणणारा जो प्रमाता त्यात होतो, की प्रमाणाचा जो विषय त्यात होतो ? प्रथमपक्षी आत्म्यांतच वृत्तीचा संकोच झाल्यामुळे वृत्तिनिरोधाचा प्रयत्न संभवणार नाही, आणि द्वितीयपक्षी समाधीला जडता येऊन निर्विकल्प ध्यानाच्या ऐवजी पुरुष सविकल्पच दृढ होत जाईल. "तत्र स्थिरं चित्तमन्यत्रापि स्थितिपदं लभते" असे तर भाष्यकारांनी स्पष्ट म्हटले आहे; तेव्हा त्याचा अभिप्राय कसा ? कारण कोणत्याहि ठिकाणी लागलेले चित्त आपले तादृश लागलेले व्यसन सोडून देऊन दुसरे व्यसन लावून घेईल, हे संभवनीय दिसत नाही. आता 'अन्यत्र' याचा अर्थ 'सदृश विषय' असा कोणी अर्थ करून उत्तर देईल, तर ते उत्तर एखाद्या मुलीस शोभण्यासारखे आहे. अत्यंत विसदृश अशी निर्विकल्पस्थिति त्यापासून कशी प्राप्त होईल, या प्रश्नाला तें उत्तर समाधानकारक नाही.

७) पुन: असे की, अभावप्रत्ययालंबना वृत्तिर्निद्रा असे योगसूत्रात म्हटले असून तिचा अभ्यासवैराग्यांनी निरोध करण्यास सांगितले आहे व पुढे "स्वप्ननिद्राज्ञानालंबनं वा" (पाद १, सूत्र ३८.) या सूत्रात योगाला निद्रा साधनीभूत आहे, असेही सांगितले आहे. या सूत्राचा 'सात्विकी निद्रा' असा वाचस्पतीने अर्थ केला आहे. परंतु मागील निद्रालक्षणसूत्राशी तो

विरुद्ध आहे. कारण सत्व, रज, तम हे भेद भावपदार्थांचे नव्हेत, हे सहा शास्त्रांपैकी कोणासही नाकबूल करता यावयाचे नाही. तथापि दुर्जनतोषन्यायाने तसे घेऊन चालले तरी निद्रावृत्तीचा निरोध करताना तिचा साक्षात्कार अवश्य करावा लागेल. कारण साक्षात्कार न केलेल्या वृत्तींचा निरोध होणे संभवनीय नाही. साक्षात्कार न केलेल्या वृत्तीचा निरोध होईल, तर दुसऱ्या माणसाच्याही वृत्तीचा निरोध करिता आला पाहिजे, व त्यामुळे एक योगी झाला म्हणजे सर्व जगासच समाधि लागण्याचा प्रसंग येईल ! बरे, निद्रेचा साक्षात्कार म्हणजे झोप येणेच होय. झोपेमध्ये अभ्यास व वैराग्य कायम कसे ठेवावे ? याप्रमाणे दोन प्रश्न झाले.

८) तिसरा प्रश्न असा की, "प्रच्छर्दनधारणाभ्यां वा प्राणस्य" (पाद १, सूत्र ३४) या सूत्रांत प्राणायाम हा योगाचा वैकल्पिक उपाय आहे, असे सांगितले आहे. आणि 'तज्जपस्तदर्थभावनम्' (पाद १, सूत्र २८) या सूत्रात ईश्वरप्रणिधान हा दुसरा एक योगाचा उपाय सांगितला आहे. जप हा प्राणायामापेक्षा बाह्य आहे, हे कोणासही कबूल होण्यासारखे आहे. परंतु प्राणायामापेक्षा त्या ईश्वरप्रणिधानाचे फल मोठे सांगितले आहे. आता अदृष्टद्वारा ते फळ आहे असे कोणी उत्तर देईल तर शुक्लकर्माचा देखील निरोध करावा असा योगशास्त्रांत विधि आहे. हा प्राणायामातील जप म्हणावा तर मानसिक जपाने देखील सूक्ष्म नाडींची क्रिया चालू होते, हा निश्चय आहे. आणि प्राणायामापेक्षां कमी प्रतीच्या 'नियम' नांवाच्या अंगात कायिक, वाचिक, मानसिक प्रणवजपाची गणना हठप्रदीपिकाकारांनी केली आहे. कुंडलिन्यादिकांची प्रथम भावना आहे, कीं साक्षात्कार आहे ? आद्यपक्षी श्रुतीतील अमुकच नाडीने प्राण न्यावा हा नियम व्यर्थ होईल; आणि दुसऱ्या पक्षी योगज दृष्टीवाचून साक्षात्कार होणार नाही. तर ती योगज दृष्टि कोणती ?

९) चौथा म्हणजे शेवटचा प्रश्न हा की, साक्षात्कार ही योगाची अंत्यदशा आहे की मध्यदशा आहे ? प्रथमपक्षी योगात त्रिपुटी सर्वदा कायम राहील, आणि द्वितीयपक्षी ध्यान साक्षात्काराच्या पलीकडे जाऊ शकते, असे मानावे लागेल. तसे मानले तर प्रसंगी ईश्वरापेक्षाही मन व्यापक होऊन ईश्वरालाही गौण मानण्याचा प्रसंग यईल. अथवा साक्षात्काराशी ऐक्य होण्यापुरतेच ध्यान मानले तर सालंबनयोगात अहंकारनिवृत्ति होणार नाही, आणि निरालंबनयोगात ईश्वरस्थ मनाचा व्यापार व्यर्थ होईल.

यांप्रमाणे सहस्रावधि प्रश्न आहेत. या सर्वांचे उत्तर शपथपूर्वक योग्यांना देता येते असा माझा निश्चय आहे. शिवाय निरोध क्रियेचाच होत असतो, स्थिर-पदार्थाचा निरोध होत नाही. रजोगुण हा क्रियास्वभाव असून तमोगुण व सत्वगुण हे स्थिरस्वभाव आहेत, असे सांख्य, वेदान्त व योगशास्त्रांचे स्पष्ट म्हणणे आहे तेव्हा सत्व व तमाचा निरोध कसा करावा? एका गुणाच्या उत्पत्तीने दुसऱ्या गुणाचा निरोध होतो हे जरी खरे आहे, तथापि त्याच गुणापासून दुसऱ्या गुणाची उत्पत्ति होते, हेही तितकेच खरे आहे. म्हणून गुणाच्या निरोधाकरिता गुणभिन्न प्रयत्नाची आवश्यकता आहे. तो प्रयत्न आत्म्याचा, चिदाभासाचा, की प्रकृतीचा ? प्रथमपक्षीं ब्रह्म विकारी होईल, द्वितीय पक्षी असंप्रज्ञात समाधीत आभासनिरोध होणार नाही आणि तृतीयपक्षी गुणांचे संक्रमण चालूच राहील, म्हणून योग घडणार नाही.

याप्रमाणे थोडेसे प्रश्न लिहिले आहेत, यांचे उत्तर कृपा करून कोणी द्यावे. या थोड्याशा प्रश्नांचीं उत्तरे दिल्यास प्राणायाम, दृष्टियोग व मुनि-चित्तसाक्षात्कार यांतील भयंकर अडचणीचे प्रश्न करीन. यांचे उत्तरच नाही, असे मात्र कोणी समजू नये. उत्तर खास आहे. योगियांनी खटपट करावी. आता कोणी म्हणेल कीं मोठे मोठे शब्द प्रश्नात उगीच घातले आहेत, तर असे म्हणणाऱ्यांकरिता माझे हे प्रश्नच नाहीत. ज्यांनी योगशास्त्र वाचून त्याचा थोडा तरी अनुभव घेतला आहे, अशांनाच मी हे प्रश्न विचारीत आहे. एकादा टोपण योगी या प्रश्नांनीं जर भंडावून गेला तर शिकलेल्या लोकांनी प्रश्न विचारून अशा गुरूला भंडावून सोडावे असे माझे मतच आहे. बरोबर न समजता पुत्राने आईबापांची सेवा सोडून व स्त्रियांनी पतीचीं सेवा सोडून बोवांच्या नादी व्यर्थ लागू नये अशी माझी गरीबाची सर्वांस विनंति आहे. आणि जे वैदिकमार्गावर अवलंबून असतील ते योगीच आहेत असे मीच समजतो. त्यांनी उत्तर दिले नाही, तथापि (हरकत नाही. कारण) त्यांचा अपमान करण्याकरिता हे प्रश्न नाहीत, तर योगाचे अनेक खेळ करून दाखविणाऱ्या सर्वांकरिता आहेत.

ता. २६।३।१४ गुलाबराव.

□ □ □

[ वेदरहित आत्मज्ञानी–ब्रह्मज्ञान्याला प्रारब्ध नाही–बहिणाबाई वसिष्ठांचा अवतार–भोंदूंच्या तोंडावर पैजारा–श्रवणादिकांनी व गुरुकृपेने आत्मज्ञान होते–भक्तीचे वर्म–ज्ञानोत्तर भक्ति–माझ्या ग्रंथात यापेक्षा अधिक काहीं नाही ]

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली ॥

१) स्त्रीशिक्षणाविषयी आमच्या समाजात अनेक प्रकारची ओरड चालली आहे, परंतु स्वधर्माने व खऱ्या भगवद्भक्तीने, शाळेतून शिक्षण न घेता देखील ते जन्मोजन्मी मिळतच असते. माझ्या सुदैवाने, न मागता माझ्याकडे बहिणाबाईची कविता आली आहे. बहिणाबाई ह्या तुकाराम-महाराजांच्या शिष्यांपैकीं एक असून 'शिष्यादिच्छेत्पराजयं' एवढी कृपा तुकाराममहाराजांनी त्यांच्यावर केली होती. हा अर्थवाद प्रगट केल्यावाचून राहवत नाही. बहिणाबाईच्या कवितेत भक्तिज्ञानाचे उद्‌गार इतके स्पष्ट आहेत की, अद्वैतसिद्धीपर्यंत वेदांत पढणाऱ्याला ते डोलवून सोडतील यात संशय नाही. बृहद्योगवासिष्ठाप्रमाणे त्यांचा दृष्टिसृष्टिवाद शुद्ध आहे. शांकरभाष्याप्रमाणें त्यांची कविता शास्त्रीय आहे. बहिणाबाईंचे १३ जन्म स्त्रियांचेच झाले. त्यांत त्या कोण्या शाळेत शिकावयास गेल्या नव्हत्या. बहिणाबाईचे उद्‌गार इतके स्पष्ट आहेत की, माझा तर्काचा अभिमान व वेदांताच्या शोधाचा अभिमान एकाच अभंगात त्यांनी घालवून मला लाज वाटावयास लावली ! भागवताप्रमाणे हे पुस्तक गळ्यात मंगळसूत्र करावे असे मला वाटू लागले ! मायेचे अनिर्वाच्यत्व वेदांताच्या शास्त्रीय युक्त्यांनी यांनी सिद्ध केले आहे. वेदरहित आत्मज्ञानी यांना खपत नसून, वेदाचे रहस्य यांना कळले आहे असे माझे मत झाले आहे. ब्रह्मज्ञानियाच्या निवृत्तिमार्गाला प्रारब्धाचा स्पर्श नाही, हे यांचे मत ऐकून तर, ह्या वसिष्ठाचा अवतार आहेत काय, अशी शंका येते. परंतु त्यांनी आपल्या १३ जन्मांची हकीगत दिल्यामुळे ही शंका आंतल्याआत दाबून ठेवावी लागते. नाहीतर निश्चय केला असता ! यांचे वाक्य असत्य असेल ही शंका आणण्याकरिता जन्मल्या दिवसापासून आईच्या वाक्यावरील विश्वास काढून टाकण्याची संवय केली पाहिजे ! बहिणाबाईंची कविता व त्यांचे चरित्र वाचून त्यांचे मागे जगात आता संतांचे कार्य उरलेले नाही ही एक कल्पना माझ्या मनाला शिवून गेली. हे मी नुसती स्तुति करून

लिहीत नाही, तर तात स्मरून लिहीत आहे. पंचपादिका, विवरण-प्रमेयसंग्रह इत्यादि ग्रंथांतील गूढ प्रमेये या कवितात अति स्पष्ट उतरली असून त्यांना "स्वधर्माचे पाठबळ व भक्तीचा शिक्का" मिळाला आहे, आणि असे होऊनही द्वैत किंवा विशिष्टाद्वैत इकडे कल गेला नाही; तर "शुद्ध शांकरमतच" प्रतिबिंबित झाले आहे. छापखान्याची चूक सोडून दिली तर कवितेची भाषा वामनपंडिताइतकी तरी शुद्ध आहे. त्यांच्या सर्वच कविता चांगल्या आहेत; पण मला आवडलेल्या कांही कवितांचा मासला देतो–

१. प्रपंच असत्य कळो आला जया । विषय हे तया नावडती ।। १ ।।
उदासीनापरी वर्तती प्रपंची । आशा हे मनाची सांडोनिया ।। २ ।।
मनाचा स्वभाव संकल्पविकल्प । होय साक्षीरूप तयांचाही ।। ३ ।।
बुद्धीचा निश्चय अनुसंधानी चित्त । अहंकारी हेत अहंकाराचा ।। ४ ।।
सर्वही मायिक व्यवहार जाणती । निश्चय अद्वैती ठेवोनिया ।। ५ ।।
बहेणी म्हणे माया सत्य ना असत्य । श्रीगुरूने तथ्य सांगितले ।। ६ ।।

सुरेश्वराचार्यांचे बृहदारण्यकावरील वार्तिक वाचून नंतर हा अभंग वाचून पहावा, म्हणजे मखखी कळेल.

२. असत्य हे माया म्हणो जातां दिसे । सत्य म्हणतां नसे ज्ञानदृष्टी ।। १ ।।
ऐसा हा संदेह निवारी सद्गुरु । विवेकनिर्धारु करोनिया ।। २ ।।
ब्रह्मा हरिहर मायेचेचि गुण । माया ब्रह्मी जाण बोलो नये ।। ३ ।।
माया कल्पनीत, अकल्पित ब्रह्म । न कळे याचे वर्म कोणे परी ।। ४ ।।
माया हे सावेव किंवा निरावेव । न कळे याचा ठाव कोणें परी ।। ५ ।।
बहेणी म्हणे याचे वर्म कळावया । वोळंगावे पायां सद्गुरूच्या ।। ६ ।।

३. ब्रह्मापासूनिया झाली म्हणे माया । उपाधि हे तया केवि घडे ।। १ ।।
करावा निवाडा सद्गुरुवचने । भेद निरसून विकल्पाचा ।। २ ।।
माया ब्रह्मी नाही ऐसे म्हणो जरी । स्वतंत्रता तरी म्हणो नये ।। ३ ।।
बहेणी म्हणे ऐसा संदेह मायेचा । निरसी जो साचा तोचि गुरु ।। ४ ।।

४. ब्रह्म तो अद्वय श्रुतीचे संमते । वेगळी माया ते म्हणो कैसी ।। १ ।।
कोणासी पुसावे मायेचे ठिकाण । सद्गुरूवांचून सत्य जाणा ।। २ ।।
सुवर्ण-कंकण नाममात्र भिन्न । ज्ञानदृष्टी जाण ओळखावे ।। ३ ।।
तोय-तरंग एक भेद नाममात्र । ऐक्य हे सर्वत्र ज्ञानदृष्टी ।। ४ ।।
सूत-वस्त्र दोन्ही ऐक्यता सहजे । ज्ञानदृष्टि वोजे पाहिलिया ।। ५ ।।
बहेणी म्हणे ऐसा पाहतां विवेक । सहजचि ऐक्य मायाब्रह्मी ।। ६ ।।

२) श्रीमच्छंकराचार्यविरचित विवेकचूडामणीत आणि विद्यारण्यकृत पंचदशीत मायाब्रह्माविषयी यापेक्षा अधिक शास्त्रीय विवरण काय सापडते अशी माझी संस्कृत वाचकांना कर जोडून विनंति आहे. हठयोगादि साधने आत्मज्ञाना-च्या दृष्टीने तुच्छ असून मनोनिरोधाच्या दृष्टीने योगाची थोडीशी जरूर आहे, हे तत्त्व शास्त्रीय तऱ्हेने बहिणाबाईने सांगितले आहे ते पहा–

५. सांसारिक ज्ञाने तरसी संसार । हा तुझा निर्धार जाय वाया ।।१।।
यालागी मूळ आत्मज्ञान साधी । तोडोनी उपाधि अंतरीची ।।२।।
स्वर्गासी जाशील ते जरी साधिले । व्यर्थ तेणे गेले पूर्व तुझे ।।३।।
ब्रह्मांडी चढविला प्राणवायु जरी । व्यर्थ ते अवधारी जाई लया ।।४।।
मंत्र-उपासने साधिली दैवते । श्रम तोचि तेथे फळा आला ।।५।।
बहेणी म्हणे शोध करी आत्मतत्वाचा । मग तुज कैचा जन्ममृत्यु ।।६।।

६. माझिया हा मने घेतला उच्चाट । पहावे वैकुंठ पंढरी हे ।।१।।
सांडोनिया सर्व कामधाम धंदा । वेधले गोविंदा गोपिराजा ।।२।।
अधरापासूनि भेदियेलीं चक्र । इंद्रिये एकत्रे करूनिया ।।३।।
प्राणाचा निरोध करूनि पाहिले । निश्चये गाइले नाम तुझे ।।४।।
तंव पुढे नाद गर्जताती नाना । तेथील धारणा ठाकियेली ।।५।।
सोहंशब्द तोहि अरुणचि पाहे । लक्षीं लक्ष जाये मिळोनिया ।।६।।
सद्गदित कंठ दाटताचि मन । करोनिया स्नान चंद्रभागा ।।७।।
बहेणी म्हणे देव विठ्ठल पाहिला । द्वैतभाव गेला हारपोनि ।।८।।

पहिल्या अभंगात आत्मज्ञानाकरिता योग तुच्छ सांगून दुसऱ्या अभंगात मनोनिरोधाकरिता योगाची अपेक्षा किती आहे हे सांगितले आहे.

आता माझ्या अत्यंत आवडीचे काही अभंग देतो––

७. निवृत्तीसी नाही प्राक्तनाचे फळ । अनभव केवळ जाणती ते ।।१।।
निर्धारी आपुले असत्य शरीर । मानुनी विचार सार घेती ।।२।।
नाहीं दंड जैसा निस्पृहा रायाचा । तैसा प्राक्तनाचा निवृत्तीसी ।।३।।
बहेणी म्हणे पाहे प्राक्तन वरिष्ठ । प्रवृत्ति हे श्रेष्ठ मानी तया ।।४।।

८. शरीराचे माथां वर्तते प्राक्तन । शरीर ते जाण प्रकृतीचे ।।१।।
ज्ञानियांचे मत देह हाच मिथ्या । प्राक्तनाची कथा तेथे कोण ? ।।२।।
प्राक्तन भोगवी भोग तो शरीरी । ज्ञानिया अंतरी सुखरूप ।।३।।
बहेणी म्हणे देहप्राक्तन तोवरी । विचार अंतरी निश्चयाचा ।।४।।

३ ) हे अभंग नव्हेत, तर ब्रह्मज्ञानीपणा गाजवून प्रारब्धाच्या नावाखाली अनन्वित कृत्ये करणाऱ्या व साधु म्हणविणाऱ्यांच्या तोंडावर मारण्याकरिता पैजारा आहेत ! ब्रह्मज्ञानियाला प्रारब्धाचा स्पर्श नाही. बृह्योगवासिष्ठासारखे कठीण ग्रंथ वाचून नंतर या अभंगाकडे लक्ष द्यावे, म्हणजे हे तत्त्व बहिणाबाईने किती स्पष्ट केले आहे हे कळून येईल. वामनपंडिताला सुद्धा इतके हे तत्त्व स्पष्ट करता आले नाही. आतां वेदाविषयी त्यांचे म्हणणे पहा–

९. असावे स्वधर्मे जाणावे ते वर्म । जेणें कर्मे ब्रह्म हात वसे ॥१॥
तेव्हां ते आतुडे ब्रह्म सर्व गत । भूती भगवंत सर्व होय ॥२॥
कर्म आणि ब्रह्म वेगळे न भासे । तया कर्म दिसे ब्रह्मरूप ॥३॥
बहेणी म्हणे ब्रह्म बळेचि भाविता। कर्म अधःपाता घालील देखा ॥४॥

१०. वेदांसी विरुद्ध म्हणें आत्मज्ञानी । पडला तो पतनी रौरवाचे ॥१॥
ऐसे ते चांडाळ न पडावे दृष्टी । ज्यांच्यानें हे कष्टी उभय कुळ ॥२॥
वेदांसी विरुद्ध असता सर्वथा । अनर्थ परमार्थी हाचि एक ॥३॥
बहेणी म्हणे त्याचे जळो आत्मज्ञान । त्याने नारायण वैरी केला ॥४॥

४ ) पंडित श्रेष्ठांनो ! आचार्यपरंपरेत वेदान्तश्रवणाविषयी सांगितलेला नियमविधि या अभंगात नाही काय ?

आत्मज्ञान हे कांहीं डोळे दाबून झगझगीत तेज पाहणे नव्हे, तर ते गुरुसंतकृपेने व श्रवणादिसाधनांनी उत्पन्न होते, असे स्पष्ट सांगतात–

११. आत्मज्ञान डोळां दिसे ऐसे नाही । लक्षी जैसें पाही कांही मना ॥१॥
बुद्धीचा उपरम होईल सर्वही । आत्मज्ञान ठायी पडे तेव्हां ॥२॥
आत्मज्ञान नव्हे सुवर्णाचा गोळा । चंद्रसूर्यमेळा सांपडेल ॥३॥
बहेणी म्हणे ज्ञान साधेल संगती । संतांचे निश्चिती बुद्धियोगे ॥४॥

५) "संतांचे संगतीं शास्त्राचे आधारे" असे एका ठिकाणी स्पष्ट म्हटले आहे. कांही अभंगात तर उपनिषदांचे भाषांतर जशाचे तसेच पण मार्मिकरीतीने उतरले आहे. महाराष्ट्रातील संतांना न्यायादि शास्त्रीय ज्ञान नव्हते असा आक्षेप करणाऱ्यांनी ते वाचून पहावे. मी विस्तारभयास्तव लिहीत नाही.

आता भक्तीविषयी आईसाहेबांचे काय म्हणणे आहे ते पहा--

१२. भक्तिप्रेमसुख न कळे आणिका । पंडिता वाचका वैदिकासी ॥१॥
जीवन्मुक्त जरी झाला आत्मनिष्ठ । भक्तिप्रेमसुख दुर्लभ त्या ॥२॥
अभेदुनी भेद स्थापिला पै अंगीं । वाढावया जगीं प्रेमसुख ॥३॥
बहेणी म्हणे देव कृपा करिल कांही । तरीच हे ठाईं पडे वर्म ॥४॥

६) 'देव देऊळ परिवारु। कीजे कोरुनि डोंगरु। तैसा भक्तीचा व्यवहारु। कां न व्हावा', या तातांच्या ओवीचेच ह्या अभंगात प्रतिबिंब पडले आहे. गीतेच्या मधुसूदनी टीकेतील ज्ञानोत्तर भक्ती हीच आहे. मी अशी शिफारस करितो की, बहिणाबाईंचा कवितासंग्रह मुमुक्षुजनांनी अवश्य वाचावा; कारण माझ्या ग्रंथांत या कवितांपेक्षा अधिक कांहींच नाही; किंबहुना पुष्कळ कवींच्या ग्रंथांत नाही. उगीच निंदा होईल म्हणून त्यांची नावे देत बसत नाहीं. माझ्या ग्रंथां-पेक्षा पूर्वी महाराष्ट्र ग्रंथ चांगले झाले नाहीत असे माझ्या ठिकाणी पूज्यबुद्धि ठेवणारे कांही म्हणतात, त्यांनाही हा कवितासंग्रह चांगले खाद्य आहे. मला कोणीं कांही प्रश्न विचारल्यास त्यांना हे पुस्तक वाचण्यास सांगण्याचाच मी नियम केला आहे.

ता. २।४।१९१४ गुलाबराव.

□□□□

## ३९. पाश्चात्यांचा वेदान्त

[ वेदान्त व व्यवहार– प्लेटोचे तत्त्वज्ञान आणि नीचता–साक्रेटिसचे वाक्य–डेकार्ट, कांट, थियॉसफी–आर्यांचे शील–हिप्नॉटिझम–मुसलमानाचा योग हिंदूला कां ?– धर्माचरणाचे महत्त्व–हिप्नॉटिझमने धनप्राप्ती–योगात प्रथम वैराग्य, नंतर अभ्यास व पुनः-परवैराग्य–आज अभ्यासच सर्वस्व–भोंदूयोग्यांना प्रश्न–विकार आणि चक्रे–धारणा आणि समाधि–लय योगातील दृष्य रंग–योग व हिप्नॉटिझमचे अधिकारी वेगवेगळे ]

# हिप्नॉटिझम व योग

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली ॥

१) वेदान्ताची व व्यवहाराची जुळवणूक करण्याची अलीकडे सुशिक्षित म्हणविणाऱ्यात जी प्रवृत्ति आहे तिचा आमच्या हिंदुधर्मावर समाधानकारक परिणाम होणार नाही अशी चिन्हे आताच दिसू लागली आहेत. 'वैराग्याचेनि काही । ज्ञानासी तगणेचि नाही.' असे पूज्यपाद तातांचे म्हणणे आहे व सर्वोपनिषदांचा सिद्धांतही तसाच आहे. व्यवहाराशी जुळून वेदान्त आहे, अशा प्रकारचें उदाहरण भगवद्गीता आहे, असे अलीकडील विद्वान् म्हणत असतात;

परंतु तिच्यातील "अवघीं कर्तव्ये वैराग्यमूलक आहेत" हे खऱ्या वेदान्त्यास कळून येण्यासारखे आहे. व्यवहाराशी वेदान्त जुळविण्याकरिता काही विशिष्ट गोष्टीला ब्रह्माप्रमाणे सत्य मानावे लागते, आणि त्यामुळे काही विशिष्ट अनर्थ घडून घेतात. उदाहरणार्थ–हिंदुस्थानचा वेदान्त व प्लेटोचे तत्त्वज्ञान या दोहोंकडे पहा, म्हणजे घोटाळा सहज दिसून येईल. आत्म्याला पुनर्जन्म आहे असे वेदान्तास जरी कबूल आहे, तरी ते वेदान्ताचे मूळ तत्त्व नव्हे; केव्हाना केव्हातरी या पुनर्जन्माचा ज्ञानाच्या योगाने नाश झाला पाहिजे, असे वेदान्ताचे सांगणे आहे.

२) हेच पुनर्जन्माचे व आत्म्याच्या अमरत्वाचे तत्त्व Plato ला मान्य आहे, पण श्रुतिद्वारा व्यापक परब्रह्माची त्याला ओळख झाली नसल्यामुळे, त्या ज्ञानाचा त्याने भयंकर विपर्यास केला आहे. Plato आपल्या Republic ग्रंथात म्हणतो की, " पुरुष व बायका या सर्वांचेच काम राष्ट्ररक्षण हे आहे. माथेफिरू कविलोक राष्ट्रांतून घालवून दिले पाहिजेत. जी मुलें आंधळी पांगळी असतील त्यांना ठार मारून जी राज्योपयोगी असतील तेवढीच ठेविली पाहिजेत. मुलांवरील आईबापांची सत्ता अजिबात नाहीशी करून केवळ सरकारची सत्ताच त्यांच्यावर ठेविली पाहिजे." आत्मा अमर आहे म्हणून आंधळ्या-पांगळ्यांना ठार मारण्यांत प्लेटोला काहीच वाटत नाही ! शरीराची त्वचा काढून परोपकार करण्यास सांगणारी हिंदूवेदान्तातील भूतदया कोणीकडे व आत्म्याच्या अमरत्वाखाली आत्मस्वार्थाकरिता आंधळ्यापांगळ्यांना ठार करण्यास सांगणारे plato चे नीच उद्गार कोणीकडे ? जीवन्मुक्तांचे प्राण लोकान्तराला न जाता येथेच लीन होतात असे श्रुतीने सांगितले आहे; पण सॉक्रेटीस मेला तेव्हा "अथेन्स सोडून मी एका सुखरूप देशास जाईन," असे त्याने क्रेटोला सांगितलेले प्रसिद्ध आहे.

३) याप्रमाणे डेकार्ट, कांट वगैरेंची स्थिति हिंदुवेदान्ताशी तुलना करून पाहताना दिसून येण्यासारखी आहे. थिऑसफीनें तिकडच्या व इकडच्या तत्त्वज्ञानात तुलना करण्याची खटपट केली आहे खरी, परंतु ती यशस्वी झाली आहे असे मला वाटत नाही. "कोणत्याही प्रकारचा विकार मनात न धरून शास्त्रनिरूपण करावे, हे आम्हा आर्यांचे आनुवंशिक शील आहे," परंतु पश्चिमेकडे पाहिले तर निराळी स्थिति. १–एक तत्त्ववेत्ता 'आत्मा अमर आहे' ह्या समजुतीवर दुसऱ्याची आंधळी पांगळी मुलें जिवंत मारावयास सांगतो. २–तर दुसरा तत्त्ववेत्ता आपण अमर आहो म्हणून आत्महत्या करून

घेतो ! ३–हिंदुवेदान्त व्यवहाराशी जुळविल्यास असेच कांही तरी विलक्षण प्रकार घडत जातील. ४–योगाविषयी हीच स्थिति आहे.

४) योगाच्या नावाखाली हिप्नॉटिझम हे फारच पुढे येत आहे. शंभरदीडशे रुपयांची पुस्तके बोलावून मी Hypnotism चा अभ्यास केला आहे, आणि मजवर Hypnotism चालावयाचा नाही असे मीं कोणत्याही Hypnotist ला आव्हान करून सांगतो !

५) हिंदु योगी म्हणविणारे बरेच असून त्यात ब्राह्मण व सदाचारी फारच थोडे आहेत. अलीकडे तर कित्येक मुसलमानसुद्धा योगी म्हणवून, ब्राह्मणांना उष्टी भाकरी व उष्टे पाणी पिण्यास देताना मी पाहिले आहे ! "कित्येक योग्यांना पूर्वजन्मीच्या आयाबहिणी भेटण्यापेक्षा बायकाच पुष्कळ भेटतात ! परंतु पूर्वजन्मीची बायको भेटली म्हणून या जन्मी विवाह केलाच पाहिजे (काय? पण) या आचाराकडे कोण लक्ष देतो!"

६) एक मुसलमान योगी काही दिवस समाधीत राहून बाहेर निघाला आहे व लोकांना योग शिकविण्याकरिता मुसलमान करीत आहे. कां बरे असे असावे? हिंदुधर्मी असल्याने योग होत नाही असा ईश्वराने ताम्रपट लिहिला आहे काय ? लोकांनी योग शिकावयाचा आहे तर तो हिंदुधर्मांतच शिकावा असे कां बरे म्हणू नये ? आघाडयाच्या बिया खाऊन पिंपळाच्या पानादिकांचे विवर करून ६ महिने पुरून घेता येते ! याला काही योगच पाहिजे असे नाही. खटपट केली तर या प्रयोगाने एखादे कुत्रे देखील ८।१५ दिवस जमिनीत पुरता येईल ! योगातील प्रणवाबद्दल बिसमिल्ला जपण्याची पाळी कां यावी ? हे धर्मरक्षण करण्याचे लक्षण आहे काय ? अशा योगाने हिंदूंचा हिंदूपणाच नष्ट होईल की काय, अशी भीति वाटून राहिली आहे. सर्वच लोक काही योगी नसतात, म्हणून "मोठ्या समाजांतील धर्माचे रक्षण आचारानेच होत असते." 'आचारप्रभवो धर्म:' अशी स्मृति आहे. योग म्हणजे 'एकाग्र चित्त होणे' इतकेच जर लक्षण असेल, तर ते कोणत्याही ठिकाणी होऊ शकेल. अनसूयेप्रमाणे पतीच्या चरणावर लक्ष ठेवणे हा योगच होय. त्याच्याकरिता साधूंच्या मागे लागणे नको. योगाकरिता पीराचे थडगे जर पुजावयाचे असेल, तर शालिग्राम मूर्तीने काय केले आहे ?

हिप्नाटिझम्

७) हिप्नाटिझमची दिशा संपत्ति मिळविण्याच्या साधनाकडे वळली आहे. प्रत्येक मनुष्य जर संपत्ति मिळविण्याकरिता हिप्नाटिझम शिकू लागेल, तर

एखाद्याने एखाद्याकडे सहज टक लावून पाहिल्यास, हा मला हिप्नाटिझम करण्याच्या बेतात आहे असा अर्ज सरकारकडे करण्याची पाळी येणार नाही काय ? "पतंजलींच्या योगशास्त्रात प्रथम वैराग्य सांगितले असून नंतर अभ्यास सांगितला आहे व अभ्यासालाही दूर करण्याकरिता पुनः परवैराग्य सांगितले आहे. तात्पर्य, अभ्यासाला दोन्हीकडे वैराग्याची जोड पाहिजे असे योगशास्त्राचे म्हणणे आहे." आणि सध्याचे आम्ही योगी तर "अभ्यासच सर्वस्व आहे" असे घेऊन बसलो आहोत. शिवाय आमच्या अशा विपर्यस्त योगीलोकांमध्ये दत्तात्रेयांचे अवतारच फार आहेत, म्हणूनच आमच्याकडे गुरुचरित्रांतील फलश्रुति ऐकून पुष्कळ शिष्य येतात ! दत्तात्रेय ब्रह्मचारी ब्राह्मण. त्यांना मुसलमान, वरदी इत्यादिकांच्या जन्मात येऊन पूर्वजन्मीच्या बायका शोधण्याचे कोणते काम पडले, हे कांही समजत नाही.

६) आता योगाविषयी पुनः दोन तीन प्रश्न लिहून हा लांबलेला लेख आटपतो.

१–शरीरातील चक्रे विकाराच्या आघातांनी नेहमी मुकुलित होत असतातात. अत्यंत नवशिक्या योग्यालाही हा अनुभव असला पाहिजे, तरच हा योग पुढे शिकता येतो. तेव्हा विकार दाबले असता सर्व कमळे उघडतात काय ? आणि जर उघडत असतील तर कमलाकमलावर प्राण नेण्याची आवश्यकता काय आहे ? आणि उघडत नसतील तर विकाराच्या आघाताने कमले मुकुलित होतात हा अनुभव खोटा आहे, असे तरी अलीकडच्या योगीबोवांनी म्हणण्याचे धाडस केले पाहिजे; म्हणजे त्यांचे योगज्ञान सध्याच्या युगाला अनुसरून आहे असे म्हणून तरी स्वस्थ राहता येईल.

२–योग्याने धारणेच्या स्वाधीन व्हावे की नाही ? प्रथम पक्षी त्याला स्थूल धारणा सोडून सूक्ष्मावर जाता येणार नाही, आणि द्वितीय पक्षी त्रिपुटी कायम राहून समाधि घडत नाही.

३–लययोगानें रंग जे डोळ्यात दिसतात, त्यांचा चक्राशी कोणत्या प्रकाराने संबंध आहे ? कारण, संबंध नाही म्हटल्यास, षण्मुखी मुद्रा व्यर्थ होईल. हृदयज्योतिःसंवित् इचा प्रकाश पडतो तो व डोळ्यातील रंग एकच आहेत काय ? कारण चक्राचा प्रकाश हृदयज्योतीच्या प्रकाशाने होत असतो.

७) या सर्व प्रश्नांचे उत्तर योगशास्त्रात यथायोग्य आहे, ते अलीकडच्या योगी म्हणविणाऱ्यांनी खटपट करून दिल्यास माझे समाधान केल्याचे श्रेय

त्यांना प्राप्त होईल. "जे वैदिक मार्गाने जात आहेत त्यांचा आचारच योग" असल्यामुळे त्यांच्याविषयी माझे काही म्हणणे नाही. परंतु हिप्नाटिझम व योग यांचा मेळ घालणाऱ्यांनी, किंवा अवतार म्हणवून घेऊन उच्च जातीला पाया पडावयास लावणाऱ्यांनी, माझ्या प्रश्नांची अवश्य उत्तरे द्यावी अशी मी त्यांना विनंति करितो. योगाचे आणि हिप्नॉटिझमचे अधिकारी तरी पहा! योगाचा अधिकारी कोण, तर साधनचतुष्टयसंपन्न निधड्या मनाचा पुरुष; आणि हिप्नॉटिझमचा प्रयोग तर स्त्रियांवरच फार लागू पडतो !

आपला,

ता. ९ एप्रिल १९१४ गुलाबराव

□□□□

## ३६. योगाने गुरुपरीक्षा.

[संसारतप्ताचे दोन प्रकार–वर्णाश्रमानें चित्तशुद्धि झालेले व दुःखाने पश्चात्तापदग्ध–साधूची लक्षणें–श्री एकनाथांनी व श्री तुकारामांनी सांगितलेल्या कसोट्या–संशयी साधकांचे तीन प्रकार १) अधिकार नसलेले, २) फसलेले, ३) साधनसंपन्न–मूर्धाधारणेत द्विदल-चक्रावर गुरुदर्शनाची रीती–शिष्यपरीक्षा ]

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली ॥

१) संसाराने खरा तापलेला मनुष्य असला की, त्याला खरा साधु मिळतो हा नियम आहे, तरी तो साधारण आहे; कारण संसारतापाने तापलेले पुरुषच दोन प्रकारचे असतात; १ वर्णाश्रमाच्या योगाने ज्यांची चित्तशुद्धि झाली आहे असे; आणि २ प्रथम संसारामध्ये अधर्माने वागून नंतर दुःखामुळे पश्चात्ताप पावलेले असे. पैकी पहिल्या प्रकारच्या विरक्तांना अवश्य सत्पुरुष भेटतो हा नियम बरोबर आहे, पण दुसऱ्या प्रकारच्या विरक्तांमधून भागवतात सांगितलेल्या कदर्यूप्रमाणे एकादाच महात्मा तरून जातो. संत ओळखावे कसे, हे पुष्कळ लोकांना गूढ येऊन पडले असते. एकनाथी भागवतात संतांची अनेक चिन्हे सांगितली आहेत. अमुक चिन्हांनीच त्यांनी राहिले पाहिजे असे काही त्यांना बंधन नाही; त्यामुळे संतांच्या नावाखाली वाटेल त्याला फसवेगिरी करता येते. तथापि कितीही खोटे वाटले तरी त्याच्या मुळाशी काही तरी खरे असलेच पाहिजे, हे अनुमानसिद्ध आहे; म्हणून सर्वच जरी फसवेगिरी करीत असले, तरी त्यात सत्पुरुष असलेच पाहिजेत, हे आपल्या बुद्धीस कबूल करावे लागते. पण संत ओळखण्याची काही तरी कसोटी आपल्या हाती असल्याशिवाय कोणीकडे जावे, कोण

आपल्यास फसविणार नाही, अशी खात्री वाटत नाही ! केवळ नीतीच्या मार्गाने वागणारे साधु असतात असेच आपण लक्षण केले, तर पुराणातील वामदेवादिकांचे उदाहरण देऊन दुसरे लोक आपणास अडविण्यास तयार असतात. पुराणावर विश्वास नाही म्हटले की, आपण नास्तिक ठरलोच; आणि तें बरोबरही आहे. अशा रीतीने आपली पहिली कसोटी उपयोगात फारशी येत नाही.

२) आता दुसरी कसोटी म्हणजे

" पाण्यामध्ये मासा झोप घेतो कैसा । जावे त्याच्या वंशा तेव्हां कळे ॥
तुका म्हणे संत ओळखावे कैसे । आपण व्हावे तैसे तेव्हां कळे ॥ "
" तुका म्हणे येथे पाहिजे जातीचे । येरा गबाळाचे काम नाही ॥ "

ही आहे; पण ही कसोटी अन्योन्याश्रयदोषाने ग्रस्त आहे. कारण आपण संत होण्याकरिता सत्समागम करावा म्हणून शास्त्रात सांगितले आहे आणि संत झाल्याशिवाय तर सत्समागम घडावयाचा नाही ! याप्रमाणे दोन्हीकडून पेचात आणणारी ही कसोटीही व्यवहार्य कितपत होईल ही शंका आहे. हीच कसोटी धरून बसल्यास एखाद्या महात्म्याला ब्रह्मज्ञान झाले तर तो क्षणात तद्रूप होतो, परंतु असे उत्तम अधिकारी फारच थोडे. बहुतेक मध्यमाधिकारी मुमुक्षुच अधिक असतात. तेव्हा त्यांच्याकरिता तिसरी एकादी कसोटी शोधून काढली पाहिजे. एखाद्याच्या वचनानें उत्तम अधिकाऱ्याला ब्रह्मज्ञान झालेच, तर त्याचा तोच गुरु होतो, मग त्याच्या गुणदोषांकडे पाहण्याची जरूर पडत नाही. कारण ब्रह्मज्ञानानंतर काही मिळवावयाचे नसते. वेश्या, कुत्रा, यांना देखील दत्तात्रेयस्वामींनी आपले गुरु म्हटले होते. तेव्हा अशांच्याबद्दल काही म्हणणे नाही; पण

३) संशयी साधकही तीन प्रकारचे असतात; १–अंगी अधिकार नसून उतावळेपणानें सत्समागम करून वैराग्याचा तडाखा न सोसवल्यामुळे घरी परत जाऊन, गुरूच्या नावाने खडे फोडणारे; २–दुसरे, अंगी चांगले गुण असून गुरु चांगला न मिळाल्यामुळे पस्तावून आपल्या घरी गेलेले; आणि ३–तिसरे, साधनसंपत्ति अंगी असून लोकांचे फसविणे ऐकून कोणीकडे जावे हा विचार करणारे.

४) या तीन प्रकारच्या लोकांपैकी पहिल्यांना तर काही उपाय नाही. दुसरे लोकही चांगले, परंतु संशयी असल्यामुळे या जन्मात त्यांच्या हातून खऱ्या साधूंचा देखील अपमान होण्याचा संभव आहे. म्हणन मनाची तयारी

नसली तर घरीच राहून त्यांनी आपले चांगले गुण वाढवीत राहावे; म्हणजे ह्या जन्मांत गुरु मिळण्याचा उपाय किंवा गुरु तरी खास भेटेल.

५) तिसऱ्या प्रकारच्या संशयी साधक लोकांकरिता मात्र उपाय आहे. आणि तो भगवान् पतंजलींनीं सांगून ठेविला आहे. ते म्हणतात, "मूर्धज्योतिषि सिद्धदर्शनं " पाद ३, सूत्र ३२ यावरील भगवान् व्यासांच्या भाष्याचा आशय असा आहे की, मस्तकामध्ये एक प्रकाशमय छिद्र आहे, तेथे संयम केला असता पृथ्वी, स्वर्ग व अंतरिक्ष यातील सिद्धांचे दर्शन होते. याचे विशेष रहस्य असे आहे कीं, त्यांतून जो आपला गुरु असतो तो आपल्या द्विदल-चक्रावर दिसतो. हीच सत्पुरुष शोधण्याची उत्तम रीत आहे.

६) ज्याचे सदाचरण व ब्रह्मज्ञान महशूर असेल त्याचा अपमान कोण-त्याही रीतीने करू नये; परंतु ज्या संबंधात संशय असेल व जो गुरु व्हावा अशी इच्छा असेल, त्याला प्रथम 'मला मूर्धाधारणा सांगा, म्हणजे मी आपल्या स्वरूपाचा निश्चय करीन' असे स्पष्ट म्हणावें. आता धारणा, ध्यान व समाधि तिन्ही एकाच ठिकाणी करण्याला संयम म्हणतात. कोणी म्हणेल की, पूर्वीच्या कसोटीप्रमाणे यातही अन्योन्याश्रय आहे, तर हे म्हणणे बरोबर नाही; कारण संध्येतील प्राणायामातच सुधारणा करून ज्यांनी तो वाढविला आहे, त्यांना प्रत्याहाराकरिता व धारणेकरिता गुरूला असा प्रश्न विचारता येतो; पण पूर्वीच्या कसोटीत तशी काही सोय नाही, म्हणून अन्योन्याश्रय होतो. गुरूंनीही 'तूं द्विदलचक्रावरच माझ्या खऱ्या स्वरूपाची प्रथम ओळख करून घे व नंतर मला पहा' असे शिष्याला म्हणावे. हा सांप्रदायिक परिपाठ आहे; परंतु तो अलीकडील गुरूंनी बिलकूल सोडून दिला आहे. कोणी म्हणतात, वरील सूत्रात सांगितलेले सिद्धदर्शन देवताविशेषांचे आहे, साधूंचे नव्हे; तर त्यांनी याच सूत्रावरील "भवदेवादिकांचे ग्रंथ" वाचून पहावे, अशी त्यांस मी शिफारस करितो. या कसोटीने मिळालेल्या गुरूपासून कोणी फसला आहे असा इतिहास कोणी दाखवून दिल्यास मी त्याला शरण आहे असे उघडपणे कबूल करीन; परंतु गुरु पहाण्याची कसोटी मात्र आमच्या हाती असावी, आणि गुरूंनी मात्र शिष्याला कसून पाहू नये, असा ज्या लोकांचा समज असतो त्यांच्याकरिता कोणतीच कसोटी उपयोगात पडत नाही. फसणे हे त्यांच्यापाठी दैवानेच लागले आहे.

७) मूर्धासंयम ही जशी गुरु पहाण्याची कसोटी आहे, तशी "मूर्धापरिषेकादिक शिष्य पहाण्याचीही कसोटी" आहे. शिष्यांनी गुरूची कसोटी

पाहतांना गुरूंनीही शिष्यांची कसोटी पहावी. येथे जे टिकतात तेच धर्माचे आधारस्तंभ होऊन राहतात. कोणाचे म्हणणे असे आहे की, ईश्वराच्या अनुग्रहानेच गुरु मिळतो. पण याला उत्तर, गुरूवाचून ईश्वरानुग्रह होत नाही, असेही शास्त्रात सांगितले आहे. हे आहे. ईश्वरानुग्रहाने गुरु मिळतो हे खरे, पण ईश्वरानुग्रह तरी उगीच होतो की कर्माने होतो ? प्रथमपक्ष श्रुतिसंमत नाही आणि द्वितीयपक्ष आम्हांला इष्ट आहे. म्हणूनच वर्णाश्रमाची परंपरा जेव्हा आपण होऊन साधु म्हणविणारे असुर मोडतात, तेव्हा जगताचे कल्याण करण्याकरिता पुनः परमेश्वराला अवतार घेऊन तिचे स्थापन करावे लागते. व नंतर पुढे योग्य सोपानक्रम सुरू होतो.

८) यापेक्षा गुरु किंवा संत सांपडण्याची युक्ति दुसरी कोणती चांगली असेल असे मला वाटत नाही. आता योगावर आमचा विश्वासच बसत नाही असे ज्यांचे म्हणणे असेल, त्यांनी मग ब्रह्मचर्यादि नीतीवरच कां विश्वास ठेवावा ? कारण तिचेहि फळ काही ऐहिक नाही, पारलौकिकच आहे. याप्रमाणे लिहिलेला लेख श्रीतातांचे चरणी समर्पण करितो.

ता. २३ एप्रिल १९१४ मुमुक्षु

□□□□

## ३७. श्रीहरी केशव वाळिंबे.

बहिणाबाईंचा अभंग

[ कर्म आणि ब्रह्म एकच–सिद्ध व साधक स्थितीतील फरक–घृतायुर्न्याय–सिद्धावस्थेत कर्म सोडणे हाही अहंकार; म्हणून धर्माचरण सुटत नाही–कर्म व ब्रह्माची विषमसत्ता म्हणून अविरोध–कृष्ण, शुक, जनक, राम, वसिष्ठ हे सर्व समान–ज्ञानी कसाही वागू शकतो पण पूर्वसंस्कारानुसारच वागतो–वर्णाश्रमाला तुच्छ समजणें देहाभिमानाचे लक्षण–अज्ञानी, मंदज्ञानी व दृढज्ञानी यांची विहित कर्मानि किंवा उपासनेनें हानी होत नाही–जीवन्मुक्तीत भजन हा स्वभाव. ]

# वर्णाश्रम व ब्रह्मज्ञान

॥ श्रीज्ञानेश्वर माऊली ॥

१) शंका :–संत बहिणाबाई मातुश्रीच्या अभंगांचे पुस्तक पान १२१ मध्ये असा एक अभंग आहे :—

"कर्म तेचि ब्रह्म, ब्रह्म तेंचि कर्म । ऐसे जिनें वर्म जाणितले" ॥

'ब्रह्म आणि कर्म एकच आहे' असे या अभंगात आहे. कर्म साहंकारी असून कर्तृतंत्र आहे. वस्तुतंत्र ब्रह्माचे ठिकाणी कर्माची गति नाही. असे जर

आहे, तर सदर अभंगात कर्म व ब्रह्म एकच आहे असे मातुश्री बहिणाबाई सांगतात, त्याबद्दल खुलासा कसा ?

२) समाधान :—कर्म आणि ब्रह्म एकच आहे असे जे या अभंगांत म्हटले आहे ते सिद्ध स्थितीला लागू असून " असावे स्वधर्मे जाणावे ते कर्म । जेणे कर्मे ब्रह्म हात वसे " या अभंगांत कर्म ब्रह्माचे साधक आहे असे दाखविले आहे, ते साधकाला लागू आहे. आतां कर्म साधनरूप आहे असे सांगूनही ते व ब्रह्म एकच आहे, असे त्याच अभंगात जे सांगितले आहे, ते "घृतायुर्न्यायाने" सांगितले आहे. म्हणजे आयुष्याचे साधक घृत असल्यामुळे ज्याप्रमाणे घृताला आयुः हे नाव आहे (त्याप्रमाणे ते समजावे.)

३) आतां या अभंगात जे कर्म व ब्रह्म एकच आहे, असे सिद्धाच्या स्थितीला अनुसरून सांगितले ते बरोबरच आहे. कारण ब्रह्मज्ञान झाल्यावर कोणत्याच पदार्थास पृथकता राहत नाही. कर्म कर्तृतंत्र आहे खरे, परंतु तेवढ्याने ते मंदज्ञानाच्या विरोधी आहे; दृढज्ञानाच्या विरोधी नाही. कारण मंदज्ञानामध्ये ब्रह्मध्यानाची अपेक्षा आहे. कारण न्यायदर्शनाधारे मन एकाच काळी दोन वस्तूंकडे लागत नाही. आत्मा अकर्ता आहे व कर्म कर्तृत्वबुद्धि घेतल्याशिवाय होत नाही. म्हणूनच मंदबोधाचे रक्षण करण्याकरिता विधिपूर्वक संन्यासाची अपेक्षा आहे, आणि ज्यांना संन्यासाचा अधिकार नाही त्यांना वर्णाश्रमकर्माने अपूर्व उत्पन्न होऊन येथे किंवा अन्य ठिकाणी ब्रह्मज्ञान मिळते; अपूर्व तीव्र उत्पन्न होईल तर येथेच मिळते.

४) पण जनकाप्रमाणे ज्याचे दृढ ज्ञान आहे त्याच्या ज्ञानाच्या विरोधि कर्म नाही. उलट कर्म न केल्यानेच ब्रह्मज्ञानी पुरुषाला आग्रह होणार आहे, जसे ' मी कर्म करीन ' हा अहंकार आहे, तसे ' मी कर्म करणार नाही ' हाही अहंकारच आहे. ब्रह्मज्ञानाची जोपर्यंत जरूर आहे तोपर्यंत मी कर्म करणार नाही, हा अहंकार उत्पन्न होत नाही. कारण त्याचे मन तेव्हा दुसरीकडे गुंतलेले असते. दुसरीकडे गुंतलेल्या मनाला एखादी वस्तु मी मुद्दाम सोडली असा अहंकार उत्पन्न होत नाही; पण साक्षात्कारी पुरुषाला निदिध्यासनाची आवश्यकता नसते, त्यामुळे पूर्वसंस्काराने प्राप्त झालेल्या वर्णाश्रमधर्माचा तो जर विरोध करील तर दुसरीकडे मन न गुंतल्यामुळे " मी कर्म मुद्दाम सोडणार " या अहंकारापासून त्यास अलिप्त राहता येणार नाहीं. बरे, ते कर्म ब्रह्माहून निराळे समजावे तर अद्वैत समजून द्वैताची भावना केल्यासारखे होईल.

५) शिवाय, कर्मब्रह्माची विषमसत्ता आहे. समसत्ता नाही. विरोध समसत्तेत असतो, विषमसत्तेत नाही. त्यामुळेच सिद्धाला कर्म व ब्रह्म यांचा विरोध वाटत नाही. म्हणूनच मातुश्री बहिणाबाईने ती दोन्ही एकच आहेत असे सांगितले आहे. याविषयी स्मृतीत एक श्लोक प्रसिद्ध आहे.

कृष्णो भोगी शुकस्त्यागी उभौ जनकराघवौ ।
वसिष्ठः कर्मकर्ता च ते एते ज्ञानिनः समाः ॥

अर्थः–श्रीकृष्ण जरी भोग भोगीत होते, शुकाचार्य जरी विरक्त होते, राजा जनक व राजा रामचंद्र जरी राज्य करीत होते, व भगवान् वसिष्ठ जरी वर्णाश्रमकर्म आचरीत होते, तरी ते सर्वच समानज्ञानी होते.

६) आता जीवन्मुक्तिसुखासाठी ब्रह्मध्यानाची अपेक्षा आहे असे जे म्हणणे, ते चौथ्या भूमिकेचेच आहे, सातव्या भूमिकेपर्यंत जाऊनही पुरुष इच्छेस वाटेल तसा वागू शकतो, हे वासिष्ठात उत्पत्तिप्रकरणात सांगितले आहे. ब्रह्मज्ञानी झाल्यावर निषिद्ध कर्म जर तो करील तर त्याला एक प्रकारचा अहंकार उत्पन्न होईल; कारण ज्याचा जो स्वभाव पूर्वसंस्कारांनी बनलेला असतो, त्याच्या विरुद्ध थोडीशी देखील गोष्ट करावी म्हटली की अहंकार उत्पन्न होतो. आपले स्वाभाविक श्वासोच्छ्वास चालतात, परंतु ते आपल्या गावीही नसते. तिकडे काही लक्ष द्यावे लागत नाही, परंतु वैद्याने छाती तपासताना जर लांब श्वास सोड म्हटले, की मंदबुद्धिपूर्वक ते काम करावे लागते.

७) जे लोक ब्रह्मज्ञान झाल्यावर वर्णाश्रमधर्माला तुच्छ समजतात व निषिद्धकर्म आवडीने करतात, त्यांच्या शाब्दिक ज्ञानामुळे त्यांना देहाभिमान दृढ झाला आहे असे समजावे. १– अत्यंत अज्ञानी असेल तर त्याने आस्थेने वर्णाश्रम करावे. २– मंदज्ञानी असेल तर त्याने वैराग्यपूर्वक संन्यासाने राहावे; आणि ३– दृढज्ञानी असेल तर त्याला गुरुपरंपरारक्षणार्थ पूर्वसंस्काराने घडून येणारे विहित स्वाभाविक कर्म केल्याने हानी नाही. ४– ही गोष्ट कर्माविषयी आहे तशी उपासनेविषयीही आहे. मधुसूदनाने आपल्या गीतेच्या गूढार्थदीपिका नामक टीकेच्या उपोद्घातात म्हटले आहे की,

"जीवन्मुक्तिदशायां तु न भक्तेः फलकल्पना ।
अद्वेष्टृत्वादिवत्तेषां स्वभावो भजनं हरेः ॥"

जीवन्मुक्तिदशेमध्ये भक्तीच्या फलाची कल्पनाच नसते; अद्वेष्टृत्वादि गुण जसे स्वभावतःच असतात, त्याप्रमाणे श्रीहरिगुणानुवाद गाणे हाही त्यांचा स्वभावच होऊन राहतो.

आपला,
हर्दा, ता. ७।४।१९१५ गुलाबराव

[ धर्मोपदेशक होण्याची हाव–पुराणे भाकड कथा ?–सर्वधर्म ऐक्याचा खटाटोप–धर्मोपदेशकाचे कार्य–१) तत्त्वसारायण हा थियॉसफीचा संस्कृत ग्रंथ शांकरज्ञानविरोधी–खलात कुटून केलेला समन्वय–२) सिद्धान्तसूत्रे निरंजनभाष्यातील आधुनिक उत्क्रांति वाद–३) महानुभावांचे योगवासिष्ठ, युगधर्म, अन्यव्यावृत्ती व वज्रशुचि उपनिषद्–श्रीतुकाराम, मध्वमुनीच्या नावावर मानभावांचे अभंग–गुरूची कोणती आज्ञा पाळावी ?–स्तन्य देणारे श्री ज्ञानेश्वर–वंशप्रचारक शंकराचार्य–बीज पुरुष उपनिषद्–अंकुर वासिष्ठ–वेदान्ती कोणाशी चर्चा करीत नाहीत ?–वेदान्त्यांचा समज. ]

# धर्मसंकटाचे स्वरूप

॥ श्रीज्ञानेश्वर माऊली ॥

१) आज जी आम्हावर अनेक प्रकारची संकटे आहेत, त्यात धर्मसंकट सर्वात मोठे आहे. त्यांत आश्चर्य करण्याची गोष्ट ती ही की, ते संकट परक्यांपासून नसून, आम्हीच ते आपल्या हातांनी आपणावर आणून घेतले आहे ! मुसलमान लोकांकडून पूर्वी आमच्या धर्माला जो त्रास पोहोचला तसा आम्हाला आता कोणताही त्रास नाही. परक्यांकडून धर्माला कितीही त्रास झाला तरी तो बाह्यस्वरूपाचाच होणार; अंतःस्वरूपाचा होणे शक्य नसते. ऋषींच्या यज्ञात राक्षसांनी दगडमाती टाकली, पण त्यांचे तप भंग करण्यास ते समर्थ झाले नाहीत. हल्ली धर्माच्या अंतरंगाला आम्ही स्वतःच त्रास देत आहोत. याचे कारण आमच्यामध्ये प्रत्येकाला धर्मोपदेशक होण्याची हांव सुटली आहे, हे होय. संस्कृत राहो, पण संप्रदायसिद्ध वेदान्तभाषा वाचून देखील ही धर्मोपदेशक मंडळी आपले मत बनवून घेत नाहीत ! एक म्हणतो, जैन ग्रंथांमध्ये वेदातील अमुक मंत्राचा अर्थ फार चांगला केला आहे; एक म्हणतो, पारशी ग्रंथात फार चांगला केला आहे; पण इतिहासपुराणांवरून वेदांचा अर्थ करावा ही जी आमच्यात ऋषींची परंपरा, तिच्याविषयी मात्र फारच थोडे बोलतात. कारण आमच्या पुराणात बहुधा 'भाकड कथाच' लिहिल्या आहेत असे त्यांना वाटत असते ! पारशी वगैरे लोकांच्या मनातून जसे काही रागद्वेष नाहीसेच झाले आहेत ! एक कृष्णचरित्र बंगालीत मी पाहिले होते. त्यांत कृष्णाचे शत्रु जे शिशुपालादिक ते जे बोलले ते बहुधा खरे व इतर सर्व वाक्ये खोटी असे विधान केले आहे ! म्हणजे शत्रु जसे काही खरेच कबूल करीत असतात ! शिवाय कृष्णाचे अमुक शत्रु हे तरी

पुराणावरूनच समजले गेले आहे; तथापि पुराणाला कल्पित म्हणण्याचे धाडस करण्यात चरित्रकाराने कमीपणा केला नाही.

२) दुसरे, या धर्मोपदेशक नव्या टोळीची हांव धर्माचे ऐक्य करण्याविषयीची आहे. 'प्रमाणसिद्ध शब्दवृत्तींचा समन्वय होत असतो,' हा प्राचीन सिद्धांत हे नवे लोक विसरतात; आणि धर्माचे शब्द खलात घालून कुटून त्यांचा समन्वय करण्याची खटपट करितात. त्यामुळे संप्रदायशुद्ध दृष्टि अगदी निघून जाते व मग पाकसिद्ध अन्न कोणते व भिक्षेचे अन्न कोणते हाही निर्णय करता येत नाही. "धर्मोपदेशकाची जरूर दैवी लोकांतील धार्मिक शैथिल्य कमी करण्याकरिताच असते;" आसुर लोकांना ताळ्यावर आणण्याकरिता भगवान् स्वतःच अवतीर्ण होत असतो. शंकराचार्यांनी वर्णत्रयातील धर्मशैथिल्य दूर करण्याकरिताच उपदेश केला; परंतु रावण, कंस इत्यादिकांना धर्माच्या मार्गावर आणण्याकरिता काही धर्मोपदेशक देवांनी पाठविले नाहीत! धर्मावर दृढ श्रद्धा आहे परंतु दिशा चुकली आहे, अशांचेच मार्गदर्शक धर्मोपदेशक होतात. रागद्वेषांच्या प्रवाहामध्ये सांपडून देहबुद्धीच्या डोहात अविश्वासाच्या भोवऱ्याने खाली वर जाण्याचा जे अनुभव घेत असतात, त्यांना दंडच प्रशामक असल्यामुळे, भगवंताच्या अवताराचीच तेथे अपेक्षा असते. पण आज पैशाच्या लालचीने हवा तो मनुष्य हवा त्याला धर्मोपदेश करितो; आणि त्यात आश्चर्य हे की, धर्मज्ञ अशा हिंदुस्थानातच हा प्रकार पुष्कळ होतो! त्यामुळे धर्मोपदेशकांना संप्रदायसिद्ध ज्ञानाची मोठीशी महती वाटत नसल्यामुळे मान राखण्याकरिता कोणत्या तरी ग्रंथातून काही तरी नवे सांगावे लागते. त्यामुळे इतर धर्मास वेदधर्मांत हात घालावयास सांपडतो. अशी उदाहरणे सध्या आर्यवाङ्मयांत देखील सांपडत आहेत, हे दुर्दैव होय. याविषयी मी एकदोन उदाहरणे येथे देतो :—

१ 'तत्त्वसारायण'

३) एक 'तत्त्वसारायण' नावाचा संस्कृत ग्रंथ तेलंगी लिपीत छापलेला आहे. तो वसिष्ठांनी केला आहे असे त्यात लिहिले आहे. तो अतिशय जुना आहे असेही तेथल्या लोकांचे म्हणणे आहे. शिवाय या ग्रंथात व्याससूत्रांचे विवरण केले आहे. या ग्रंथाला थिऑसफीचा गंध स्पष्ट येतो! हा ग्रंथ मद्रास लायब्ररीतच उपलब्ध झाला आहे. या ग्रंथातील रामगीतेत रामांनी हनुमंताला म्हटले आहे की :—

"यज्जीवब्रह्मणोरैक्यं कार्यकारणयोरपि ।
मतमद्वैतिनां तत्स्याज्जीवोत्पत्तिश्च तन्मते ।। ६ ।।
उत्पत्त्यनभ्युपगमे तस्य नाशो न सिध्यति ।
अनाशे द्वैतनित्यत्वात्कोपोऽद्वैतश्रुतेर्ध्रुवम् ।।७।।" अध्याय ३.

**येथे मारुतीने** "उत्पत्त्यसंभवात्" **(जीवोत्पत्तीचा असंभव आहे) या ब्रह्मसूत्रावरील शांकरभाष्यानुसार शंका केली, तिचे उत्तर रामाने दिले आहे. ब्रह्म कारण व जीव कार्य मानल्यासही अद्वैत कायम राहू शकते जीवाचा नाश जर होणार नाही, तर द्वैतच कायम राहील, म्हणून अद्वैतमतात जीवोत्पत्ति मानलीच पाहिजे असे शांकरभाष्याच्या विरुद्ध म्हटले आहे. बरे, त्वंपदवाच्यार्थाचा बाध होतो इतकाच अर्थ करावा आणि शांकरमताला जुळवून घ्यावे, तर पुढे दोन श्लोकात त्वंपदलक्ष्यार्थाचा देखील लय होतो असे शहाणा राम सांगतो !**

"जीवस्य द्विविधस्यापि विनाशं द्विविध श्रुणु ।
जीवस्त्वंपदवाच्यार्थः संसारी देहवानयम् ।। ८ ।।
अविधा जनितस्यास्य विनाशो विकृतेरिव ।
आभ्यंतरविकारेषु तप्तायःपिंडवत्सतः ।। ९ ।।
अन्यस्त्वंपदलक्ष्यार्थोऽसंसारी साक्षिचेतनः ।
कूटस्थः प्रत्यगात्माख्यो बिंबभूतो परस्य च ।। १० ।।
ब्रह्मविद्योद्भवस्यास्य स्फुलिंगस्येव पावकात् ।
विनाशः प्रकृतौ स्वस्यां ब्रह्मण्यद्वयचिद्घने ।। ११ ।।"

**भावार्थ इतकाच की, "जीव व त्याचा नाश दोन प्रकारचा आहे. त्वंपदवाच्यार्थ जीव अविद्येपासून उत्पन्न झालेले कार्य असल्यामुळे विकृतीप्रमाणेच त्याचा स्पष्ट नाश होतो; आणि त्वंपदलक्ष्यार्थ ब्रह्मविद्येचे कार्य असल्यामुळे ठिणगी जशी अग्नीत लीन होते तसा तो ब्रह्मात लीन होतो."**

**४) पण अंशत्व वगैरे कल्पना वाच्यार्थासच आहेत, लक्ष्यार्थास नाहीत; हे वेदान्ताचे तत्त्व या श्लोकातून अगदी नाहीसे झाले आहे. उघड उघड वेदान्ताचा प्रमाद या ग्रंथात केला आहे तो असा :—**

"आरंभवादमाश्रित्य स्वारुरुक्षुर्विचारयेत् ।
परिणामं समाश्रित्य त्वभ्यासी भावयेत्परम् ।। २२ ।।
विवर्तवादस्त्वरूढे स्वयमेवहि सिध्यति ।
जल्पस्तदनुरोधेन गच्छेत्स्वानर्थमात्महा ।। २३ ।।
रज्जुसर्पस्थाणुचोरवन्ध्यापुत्रादिगोचरः ।
विवर्तवादो नैवेष्टो मुमुक्षोः संसृतेः परम् ।। २४ ।।
भृंगकीटदधिक्षीरमृद्घटाद्येकगोचराः ।
परिणामसुवादोऽयं ध्रुवमिष्टतमो मतः ।। २५ ।। अध्याय ३.

भावार्थ :-- "योगावर चढण्याची इच्छा करणाऱ्याने आरंभवादाचा विचार करावा, म्हणजे तुकडे तुकडे मिळून जगत् झाले असे समजावे; अथवा लहान लहान वस्तु मिळून मोठ्या वस्तु झाल्या असे समजावे. आणि जो अभ्यासी आहे त्याने परिणामवादाचा विचार करावा, म्हणजे एका मोठ्या वस्तूतून अनेक लहान लहान विकारी वस्तु निघाल्या आहेत असे समजावे. रज्जुसर्प किंवा शिंपेवरील रुपे याप्रमाणे जो विवर्तवाद आहे तो आपोआपच पुढे समजतो. तो बोलून दाखविण्यात पाप आहे, कारण तो मुमुक्षूला इष्ट नाही. दुधाच्या दह्याप्रमाणे किंवा मातीच्या घटाप्रमाणे मुमुक्षूने परिणामवादाचाच विचार करावा."

५) आहे की नाही हा खलात कुटून केलेला समन्वय? विवर्तवाद म्हणे बोलून दाखवू नये! तर मग त्याचे रज्जुसर्पादि दृष्टांत जगात कां सापडतात? विवर्तवाद सांगितला म्हणजे लोक उन्मत्त होतात, या भीतीने हा काही तरी समन्वय केला आहे! हिंदूंच्या वेदान्तावर धाड घालण्याकरिता नीतीचे आमिष दाखविणे बऱ्याच लोकांना फावते. वेदान्ताकरिता नीतीच्या विरुद्ध कोणी बोलले, तर याची Bad character आहे असे म्हणण्याला लोक आपल्यातर्फे तयारच आहेत, असे या ग्रंथकारांना पक्के माहीत आहे.

६) वरील श्लोकात दाखविलेला विचार थिऑसफीच्या ग्रंथांतून मात्र आढळतो. 'वेदांत व थिऑसफी' या पुस्तकात असे म्हटले आहे की, "अष्टोत्तरशत उपनिषदांवरूनच थिऑसफी सिद्ध करून देणे आम्हाला कठीण आहे; परंतु सर्वांच्या पलीकडचे असे जे तत्त्वसारायण ह्यातून मात्र आम्ही थिऑसफीचे तत्त्व बरोबर काढून देतो. पण मनुष्य दुराग्रही नसला पाहिजे."

७) येथे 'सामान्यसिद्ध युक्तीची अवहेलना करणारा तो दुराग्रही' हा न्यायशास्त्राचा प्राचीन अर्थ मात्र कोणी समजू नये; तर दुराग्रही म्हणजे आमचे न ऐकणारा, असा समजावा! योगवासिष्ठात सर्वत्र विवर्तवादाचा अंगीकार आहे तो कोणालाही नाकबूल नाही. परंतु वसिष्ठाने तत्त्वसारायणात त्याचा निषेध केला आहे! आता आम्हांला क्षेपकवाद मान्य नसल्यामुळे, भविष्यवादी वसिष्ठांनी पुढे लोक थिऑसफिस्ट होणार असे समजून ह्यांच्याकरिता हा ग्रंथ केला असेल, असे काही तरी म्हणणे भाग आहे!

क्षेपकवाद म्हटल्यासही आमची काही हानि नाही. कारण, संमत नसणे हे दोन्हीकडे सारखेच आहे. अनुकूल वाक्य तर मुलांचेही प्रमाण होते, मग ग्रंथाची गोष्ट कशाला पाहिजे!? हे घोटाळ्याचे एक उदाहरण झाले. आता दुसरे सांगतो:--

'सिद्धान्तसूत्रें'

८) आनंदाश्रमात व्यासांची 'सिद्धांतसूत्रे' निरंजनाच्या भाष्यासह छापली आहेत. ती सूत्रे कदाचित् बरोबर असली, तरी अलीकडील मेंदूवाद व डार्विनचा उत्क्रांतिवाद यांचा दंश भाष्यकारांच्या मतात दाखविला आहे. ते वाक्य येणेप्रमाणे:–"अत्रेदं बोध्यम् । गवाश्वादीनां यत्प्रकृष्टं ज्ञानं नैपुण्यं च नावलोक्यते तन्मूर्धनानस्य दौर्बल्यान्मनुजानामपि तथात्वं चेत्तथैवावलोक्यताम् । अत एव चिन्ताचिकीर्षूणामपि न यावन्मूर्धनीनप्राबल्यं तावत् ध्यानधारा न संभवेदिति ।। "

भावार्थ:–" येथे असे समजावे की, गाई, घोडे, इत्यादिकांना जे चांगले ज्ञान नसते त्याचे कारण त्यांचे डोके दुर्बल असते हे होय. मनुष्याचेही मस्तक दृढ व सशक्त नसले की, त्याच्याकडून विचार, ध्यानधारणादि होत नाही असे समजावे. " पण वानरांमध्ये हुशार असणाऱ्या मारुतीचे वजन किती होते हे वाल्मीकीने लिहिले नाही ही घोडचूक झाली म्हणावयास हा निरंजन कसा चुकला हे आश्चर्य वाटते! अशा प्रकारचे वाक्य या भाष्यांतच सापडले; दुसरे कोठे सापडले नाही. आता संस्कृत म्हणूनच हे ग्रंथ मानावयाचे असल्यास, श्रुतिसंप्रदायविरुद्ध अंश तरी यातील मान्य नाही असे म्हणावयास काही प्रत्यवाय नाही. आणखीही या निरंजनभाष्यात वेदांत विरोध व नव्या मताचे समन्वय पुष्कळ आहेत ते स्थळ संकोचास्तव दाखविता येत नाहीत. याप्रमाणे दोन उदाहरणे झाली. आता तिसरे देतो–

'मानभावांचा योगवासिष्ठ'

९) श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे म्हणून छापलेले योगवासिष्ठ मजकडे अभिप्रायार्थ आले आहे, ते उत्सुकतेने वाचून पाहिले. त्यातील 'युगधर्मप्रकरण' श्रुतिस्मृतिपुराणांशी मिळत नसून मानभावांच्या युगधर्मप्रकरणाची बहुतेक प्रतिकृति त्यात वठली आहे ! १– वेदान्तात चैतन्य परब्रह्म सांगितले आहे. मानभाव मतात चैतन्य नांवाची एक माया सांगितली आहे, आणि २– चैतन्याच्या पलीकडे परमेश्वर सांगितला आहे. "३– कृतयुगामध्ये आत्म्याची उपासना करणे हाच धर्म असून, त्याने या चैतन्य-मायेची प्राप्ती होते, पण मोक्ष होत नाही; कृतयुगात जे हरिहरांची भक्ति करितात त्यांना त्रेतायुगात

जन्म होतो आणि त्रेतायुगात भक्ति करणे हाच धर्म आहे. त्याने कैलास-वैकुंठाची प्राप्ति होते, पण मोक्ष होत नाही; द्वापारांत यज्ञ हा धर्म आहे, तो केल्याने स्वर्गाची प्राप्ति होते; कलीमध्ये तीर्थक्षेत्रव्रतदान हा धर्म आहे, तो केल्याने अंतराळ लोकांची प्राप्ति होते; चारही केले तर अंतराळ लोक मिळतो, दोन किंवा तीन केल्यास ‘ अष्टौ देवयोनि ’ लोक मिळतो, आणि एखादा केल्यास कर्मभूमीतील यक्षिणीची प्राप्ति होते. या चारही युगांच्या धर्माने मोक्ष होत नाही. असे मानभावांच्या युगधर्म नावाच्या प्रकरणात स्पष्ट म्हटले आहे. तो ग्रंथ मानभावांच्या लिपीत माझ्याजवळ लिहिलाही आहे. अशाच प्रकारचा युगधर्म ह्या छापलेल्या वासिष्ठात लिहिलेला आहे ! तो उपलब्ध श्रुतिस्मृतिपुराणात कोठेही दिलेला नाही. अष्टौदेवयोनि व अंतराळ हे मानभावांच्या प्रकरणातच लोक आहेत, श्रुतिस्मृतिपुराणात नाहीत. ते या योगवासिष्ठात कोठून आले कोण जाणे ?

१०) शहामुनीच्या ‘ सिद्धांतबोधा–’ तही १७ ते २० अध्यायांपर्यंत हरिहरादिकांची निंदा व मानभावाच्या “ अन्यव्यावृत्ति ” प्रकरणांतील देवतांचे निरूपण केले आहे ! म्हणून तोही ग्रंथ अशाच प्रकारचा एक होय. एका लिखित ‘ वज्रसूचि ’ उपनिषदेत एक श्लोक लिहिलेला आढळला, तो येणेप्रमाणे:––

“कर्मयोनिर्देवयोनिः अंतरालं सुरालयम् ।
सत्यवैकुंठकैलासं क्षीराब्धिर्भैरवस्तथा ॥
विश्वरूपं च चैतन्यं एतन्मायास्वरूपकम् ।
मायापरं भवेद् ब्रह्म तत्परं केवलं विभु ॥ ”

भावार्थ:––“कर्मभूमीच्या वर अष्टौदेवयोनि आहे. त्याच्यावर अंतराळ आहे, त्याच्यावर स्वर्ग आहे, त्याच्यावर सत्यलोक आहे, त्याच्यावर वैकुंठ आहे, त्याच्यावर कैलास आहे, त्याच्यावर क्षीराब्धि आहे, त्याच्यावर अष्ट-भैरव आहे, त्याच्यावर विराट्स्वरूप आहे, त्याच्यावर चैतन्य नांवाची माया, त्याच्यावर ब्रह्म आणि त्या ब्रह्माच्या पलीकडे विभु आहे !” अशा प्रकारची लोकरचना श्रुतिस्मृतीत इतरत्र कोठेच आढळत नाही फक्त मानभावांच्या “अन्यव्यावृत्ति” नावाच्या प्रकरणात मात्र आढळते. या योगवासिष्ठातही तिचा दंश आढळतो. शिवाय या योगवासिष्ठात अभ्यासाच्या मार्गातही पुष्कळ चुका आहेत. अगदी ऐक्यपर अद्वैताला या वासिष्ठात स्पष्ट शब्द वापरला नाही, तर साम्यपर असे संदिग्ध शब्द वापरले आहेत.

मानभावांचे अभंग

**११) त्याचप्रमाणे तुकाराममहाराजांच्या नावावर एक अभंग प्रसिद्ध आहे तो येणेप्रमाणे:--**

भक्ति देवतांची करिती । पद वैकुंठ कैलास देती ।।१।। फळ सरल्या जन्मा येती । पुन: चौऱ्यांशी भोगती ।।२।। ऐसी देवतांची गती । स्वहित नाही यांहीचे हातीं । भक्ता ठाव कैसा देती । विश्वमायेचा हा फेरा ।।३।। न चुके ब्रह्मा विष्णु रुद्रा । क्षीरसागरीं नारायण । दश योनि तो भोगुन अवतारादिक येती जाती । इतरांची कोण गती ।।४।। तुका ध्याती अविनास । गेले होते मोक्षपदास ।।५।।

**तुकाराममहाराजांच्या नावावर असलेला दुसरा अभंग :–**

आद्य सूनका खरा पसारा सबकूं मालुम होता है । सारा सून जिनोने देखे वोई मारग चलते है । चलते मारग चलते जाना कईक सून मिलते है । मायारूप भरा है सारा उनकू साई कहते है । साई है सो सबसे न्यारा बडा महेल ऊचा है । आप अकेला दुजा नही गुरुसाहेबने देखा है । सद्‌गुरूकी सेवा करना उसकू मेवा मिलता है । तुका बोले आनेजानेंका नही काम वहा रहता है ।। २ ।।

**याचप्रमाणे मध्वमुनींच्या नावावर एक अभंग प्रसिद्ध आहे :–**

ज्ञान म्हणजे काय कैसे आहे वर्म । जीवशिव आत्माराम ज्ञान नाही ।। सोहंपद तत्त्वंपद पाही । असिपदा ठायी ज्ञान नाही ।। मध्वनाथ म्हणे ज्ञान ते पलाड । गुरुकृपा थोर ज्ञान आहे ।।

**मध्वनाथाच्या नांवावर प्रसिद्ध असलेला दुसरा अभंग :–**

साजन मजवर रुसून गेला हा जीव झाला वारा । एक डाव घरा येईल तरी बरा ।। कर्मभूमि म्यां सोधून पाहिली देवयोनीमंदी नाही । घेतली अंतराडची गाही । म्यां स्वर्गामंदी सोधून पाह्यलं ठाव लागला नाही । वैकुंठ कैलास सोधलं बाई । खिरसागर म्यां सोधन पाह्यलं सवालाख सिपाई । जातो मग भैरवाचे ठायीं ।। तेथून एक मार्ग चालला विश्वरूपाच्या ठाया । तेथ मशीं कळूं आला वर्ताया ।। चैतन्यघाट चढून गेली झाली सजनाची भेट । तेव्हां माझं सचित होतें नीट ।। मध्वमुनीची हाव पुरली हा जीव झाला धीट । हारपली प्रपंचाची खटपट ।। २ ।।

**मध्वमुनिच्या नांवावर तिसरा अभंग :–**

निराकार निर्गुण निरंजन ज्योती मज वावा । अनंत ब्रह्मांडाच्या वरती स्वरूप ओळखावा ।। तेहतिस कोटी देव पाहिले इंद्रसभेंत । वर्था त्यांची खटपट त्यामंदी नाही भगवंत ।। दखनामंदी जागा पाहिली एक पंढरपुर । भीमातीरी उभा राहिला इस्नु अवतार ।। मध्वनाथ म्हणे तेथही चैन नाही जीवा । अनंत ब्रह्मांडाच्या वरती स्वरूप ओळखाव ।। ३ ।।

**१२) याप्रमाणे एक नाही अनेक ठिकाणी असे घोटाळे झाले आहेत. या वरील अभंगात मानभावांची लोकरचना व जयानंदी पंथाची लोकरचनाच**

विशेषेकरून दिली आहे. तीच या योगवासिष्ठातही दाखविली आहे. "गुरूचे कोणतेही वाक्य पाळावे या न्यायाने तातांचे वाक्य मला पाळले पाहिजे, परंतु सन्निध गुरु असतील तरच कोणतीही आज्ञा पाळावी अशी आज्ञा लागू आहे." म्हणून ज्ञानेश्वरीच्या विरुद्ध हे योगवासिष्ठ असल्यास हा ग्रंथ मला प्रमाण नाही असे मला स्पष्ट म्हणता येते. ज्ञानेश्वरीत आत्मोपासनेची प्रशंसा केली आहे, आणि या योगवासिष्ठांत युगधर्मान्वये तिची व्यावृत्ति केली आहे. हे मी पुराव्यानिशी सिद्ध करून देण्यास तयार आहे.

१३) लहानपणी मी आपले मामाचे घरी असताना मला काही कारणा करिता मानभाव मताचा जो दृढ परिचय करून घेण्याचा प्रसंग आला त्यामुळे हा भेद मला स्पष्ट कळला आहे. याप्रमाणे स्पष्ट नजरेस येणाऱ्या चुका या ग्रंथात आहेत. आता संप्रदायसिद्ध वेदान्तदृष्टीने असणाऱ्या चुका तर अनंत आहेत. त्या स्थलसंकोचास्तव लिहिता येत नाहीत. म्हणून हा ग्रंथ तातांचा नव्हे असे वाटते किंवा असला तरी तो आमच्याकरिता केला नाही असे दु:खाने म्हणावे लागते. "आम्हा वारकरी लोकांना स्तन्य देणारे जरी प्रत्यक्ष तात आहेत, तरी वंशप्रचारक शंकराचार्य आहेत. उपनिषद् बीजपुरुष आणि वासिष्ठ अंकुरपुरुष आहेत. या चौकडीच्या अद्वैतात कोठे भेद सापडत नाहीं," मग या ओवीबद्ध वासिष्ठांतच तो कां यावा हे समजत नाही ! ग्रंथातील ओव्या युगधर्म-प्रकरणात पांचव्या अध्यायात वगैरे वाचून पहाव्या. आता कोणी म्हणेल की, श्रुतिस्मृतीत नसलेल्या गोष्टी मानभाव मतातून घेतल्या म्हणून काय झाले ? तर हे म्हणणे स्वाभिमान कमी करणारे असून श्रुतिस्मृतिपुराणांचा अपुरेपणा दाखविणारे आहे आणि वेदान्ताचे ठिकाणी अपूज्यबुद्धि उत्पन्न करून यज्ञभंजक आहे, म्हणून प्रमाण नाही. "श्रुतिस्मृतिपुराणांचा अपुरेपणा ज्यांना कबूल आहे, अशांशी प्रामाणिक चर्चा करणे हे वेदान्ती कर्तव्यच समजत नसतात." आम्हां आर्य वेदान्त्यांचा असा समज आहे की, "श्रुतिस्मृतिपुराणांव्यतिरिक्त ज्ञानच कोणत्याही धर्मात नाही. यद्यपि परिष्कारग्रंथात प्रक्रियाबाहुल्य आहे, तथापि ह्या सर्वांत सिद्धान्त एकच आहे, भिन्नभिन्न व भलते नाहीत." चैतन्याला माया असे कधीही म्हटलेले नाही, किंवा चैतन्याला ब्रह्मविद्या देखील म्हटले नाही. तर ती देखील "श्रौतशब्दजन्य सात्त्विकवृत्तिपरिणति" आहे, असेच म्हटले आहे. म्हणून विद्या व अविद्या कोणत्याच मायेत चैतन्याचा समावेश होत नाही. आता ही काथ्याकूट पुरे करितो व हा लेख श्रीज्ञानेश्वरतातचरणी समर्पण करितो.

श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वरमहाराजकी जय !

१४) ता. क. :–अभिप्राय नाइलाजास्तव लांबला आहे. या लेखांत अशुद्ध अभंग वगैरे जे दिले आहेत, ते तसेच छापावे; कारण ते उपहासार्थ दिले आहेत ते गाथ्यात नसून आमच्या इकडे लोक म्हणतात. जयानंदी हा पंथ एक आमच्या इकडे आहे, त्यांत आनंददेव मानला असून, मानभाव एकावर एक जसे १० लोक मानतात, तसे त्यांत एकावर एक ४३ लोक मानले आहेत ! आणि हरिहरादिक सर्व, दत्तात्रेयाच्या खाली असल्यामुळे त्यांची भक्ति करण्यात काही अर्थ नाही असे दोघांनीही स्पष्ट म्हटले आहे. या ग्रंथाबरोबर इतर ग्रंथांवर दिलेला अभिप्रायही छापावा. कारण या ग्रंथांचा इकडे फार सुळसुळाट आहे. आपल्या पत्रांतील अधिक जागा घेतल्याबद्दल क्षमा असावी.

मुमुक्षु
ता. १२ । ७ । १९१४

आपला,
गुलाबराव गोंडूजी मोहोड

□□□□

## ३९. मानभावांचे योगवासिष्ठ–२.

मुमुक्षु गुरुवार ता. ६ ऑगस्ट सन १९१४

[ पंडगीतेतील मानभाव धर्म व महंतवर्य दत्तराज–मी यौक्तिक भाषा वापरणारा–आत्म्याचे अनेक अर्थ–आत्मा चैतन्यरूप की चैतन्याच्या पलीकडे ?–आत्मा जड की चेतन ?–तीन प्रकारचे चैतन्य–देवतांची नावे व चक्रांचा क्रम भलताच–मणिपूराचा घोटाळा–पवनाने कर्मयोग कसा साधतो ?–योगविरुद्ध प्रतिपादन–संप्रदायवेदान्ताचा अर्थ ]

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली ॥

१) केसरीतील लेखकानें ज्ञानदेव मानभावी ग्रंथकारात झाला आहे, हे सिद्ध करण्याविषयी मला आव्हान केले आहे. त्यावर मी लेखांक २ रा* लिहिलाच आहे. परंतु ऐतिहासिकदृष्टचा हे सिद्ध होण्याची संधि मला अकस्मात् सांपडल्यामुळे मी पुनः इतकेच लिहितो की, मानभावांच्या लिपीत ज्ञानदेवाची केलेली पंडुगीता मजजवळ आहे, व तीत आमचा महानुभावधर्म संपूर्ण आहे, असे महंतवर्य दत्तराज यांच्या सहीचेच हल्ली मजजवळ पत्र आहे. हे फार सरळ असून प्रसंगी ते ग्रंथ दाखविण्यासही तयार आहेत. ते पत्र पहावयाचे असल्यास माझ्याजवळ येऊन पहावे, इतकेच मी याविषयी लिहू शकतो.

२) आतां गोविंदसुत यांनी ता. ३०।७।१४ च्या मुमुक्षुत[१] जे माझ्याविषयी लिहिले आहे, तशी भाषा वापरण्याला मीं तयार नाही; कारण येथे सामान्य

* हा लेख पुढे पत्र ४० मध्ये दिला आहे. १. पा. १९३

संबंध नसून व्यक्तीचा संबंध आहे. परंतु गोविंदसुत यांना मी इतकेच विनवून सांगतो की, नुसता विश्वास ठेवावयाला मी कोणास लावीत नाही व लावणारही नाही. हा काल चिकित्सेचा आहे हे मला ठाऊक आहे. गोविंदसुत म्हणतात की, हा ग्रंथ मी वरवर वाचला आहे; तर तसे मुळीच नाही. त्यांच्याजवळून जरी मी पुनः वाचून घेतला, तरी मी आपले बोलणे सिद्ध करण्यास तयार आहे. गोविंदसुताची भाषा कोठे कडक व कोठे नम्रतारूप आहे, तिचा अर्थ कसा होत असतो; हे सर्व वाचकास माहीतच आहे. मी यौक्तिकच ( Argumentative ) भाषा वापरणारा आहे. शिवाय माझ्याविषयी, 'मी दुसऱ्या कामाला बसलो असताना गडबडीने अभिप्राय दिला गेला,' इत्यादि जी अनुमाने गोविंदसुताने काढली आहेत, त्यांवरही उलट बोलण्याची माझी इच्छा नाही. कारण ती पंचावयवरूप ठरविताना सर्वच वाचकांना कठीण पडणार आहे. तेव्हा आपल्याच अनुमानाचे निरसन करीत बसण्यात मला काही हांशिल वाटत नाही. आतां गोविंदसुताच्या भाषेची काळीकुट्ट पुटे सोडून देऊन त्यानी दिलेल्या मुद्यांसंबंधीच मी लिहितो.

३) त्याचा पहिला मुद्दा असा:–**गोविंदसुत म्हणतात** " चोहीं युगधर्मी वर्तता । मोक्ष नाहीं सर्वथा । **हे मानभावांचे म्हणून मानलेले मत गुलाबरावांना प्रस्तुत ग्रंथाच्या पांचव्या प्रकरणाच्या ओवीत सापडले, त्याच ओवीचे पुढचे दोन चरण** ' आत्मज्ञानावीण रघुनाथा । निश्चिता नोहिजे । ' **हे पाहण्यात आले असते तर याच प्रकरणातील १५ व्या ओवीत लिहिल्याप्रमाणे हा युगधर्म ' वेदे बोलिला यथोक्त ' असो, अगर गुलाबरावांच्या म्हणण्याप्रमाणे मानभावी मताचा असो, पण त्याचा उपसंहार शेवटी 'आत्मज्ञानंविना पार्थ सर्वंकर्म निरर्थकं' यात केला आहे असे स्पष्ट होत आहे."**

**४) यथामति उत्तर :–**"आत्मज्ञानावीण रघुनाथा । निश्चिता नोहिजे ।" **हे ओवीचे दोन चरण मला माहीत होतेच. आतां हा युगधर्म** ' वेदे बोलिला यथोक्त ' **असे १५ व्या ओवीचे जे उदाहरण दिले आहे, त्याविषयी माझे म्हणणे असे की, १–चार वेद, ब्राह्मणे आणि अष्टोत्तरशत उपनिषदे इतक्या श्रुतिसमुच्चयात हा युगधर्म कोठे आहे हे कोणीही दाखवून द्यावे ! अशी मी विनंती करितो. २–मानभावी मताचा असला तरीं उपसंहार आत्मज्ञानात झाला आहे, हे गोविंदसुताचे म्हणणेही वेदांतयुक्तीस धरून नाही. कारण गोविंदसुतांनी वेदांत वाचला आहे असे त्यांच्या भाषेच्या वजनावरून दिसण्याचा**

संभव आहे, त्यामुळे कदर्थी वाक्यामध्ये उपक्रम असून उपसंहार दुसऱ्या वाक्यामध्ये असणे असा वेदांताचा संप्रदाय नाहीं, हे त्यांना ठाऊक असले पाहिजे.

'उपक्रमोपसंहारावभ्यासोऽपूर्वता फलम् । अर्थवादोपपत्तिश्च लिंगतात्पर्यनिर्णये ॥'

असे सर्व वेदांतवेत्ते मानतात. उपक्रमपराक्रमांत अप्पयादीक्षिताचार्यांनी कदर्थी वाक्यांचे विशेषेकरून खंडन केले आहे. ३–गोविंदसुत म्हणतात–''आत्मज्ञान मानभावांचे मानावयाचे असल्यास गोष्ट निराळी, परंतु अशाने सर्व संतांनाच मानभाव म्हणावे लागेल,'' पण आत्मज्ञान एवढ्या शब्दानेच ते मानभावांचे नाही, असे ठरत नाही. कारण, आत्मा या शब्दाचे भिन्न भिन्न अर्थ शास्त्रकारांनी केले आहेत. १–आत्मख्याति म्हणून बौद्धांचा ग्रंथ आहे, तो विज्ञानवादाला पोषक आहे आणि तो वेदांताचा विरोधी आहे. २–आत्मज्ञान म्हणून जैनग्रंथातही आढळते. परंतु तेथे आत्मा म्हणजे 'पुद्गलद्रव्यरहित जीव व ईश्वराचे भेदज्ञान' असा आहे. याविषयी ''ज्ञानाधिकरणमात्मा । स द्विविधः'' इत्यादि तर्कसंग्रहांतील पंक्ति पहाव्यात. ३–वेदांतातील आत्मज्ञान शब्दाचा अर्थ तर त्वंपद व तत्पद यांच्या लक्षणेने जीव व ईश्वर यांचे आभासवादान्वये बाधसमानाधिकरण किंवा प्रतिबिंबवादान्वये मुख्यसमानाधिकरण करणे असा आहे. अशा प्रकारचे आत्मज्ञान या वासिष्ठात नाही, व त्याचा उपक्रमाशी मेळ नाही. म्हणूनच तो तातांचा असला तरी वेदांती लोकांकरिता नाही, एवढे माझे म्हणणे आहे.

५) आता गोविंदसुतांचा दुसरा मुद्दा असा आहे की, ''चैतन्यरूप आत्मा आहे, किंवा चैतन्याच्या पलीकडे आत्मा आहे, याविषयीही पुष्कळ बोलता येईल. पण स्थलसंकोचास्तव तसे करता येत नाही.'' उत्तर–पण तसे अवश्य बोलावेच अशी मी गोविंदसुतास विनंति करितो. कारण, 'चैतन्यमात्मा' असे शिवसूत्र असून ''तदनन्यत्वमारंभणशब्दादिभ्यः'' इत्यादि सूत्रांनी व त्यावरील शांकरभाष्य व भामतीप्रभृति टीकांनी आत्मा चैतन्यरूप आहे असेच सिद्ध होत आहे. तातही आपल्या ग्रंथात असेच म्हणतात :—

''एवं विशेष सामान्य । दोहीं नातळे चैतन्य ॥
तें भोगिजे अनन्य । तेणेंसीं सदा ॥''—अमृतानुभव.

६) यद्यपि अमृतानुभवाच्या पांचव्या अध्यायात ''तैसा सच्चिदानंदू । आत्मा हा ऐसा शब्दू । अन्यव्यावृत्तिसिद्धू । वाचक नोहे ॥'' असे म्हटले आहे, तथापि त्याचे समाधान 'सत्ताचि कीं सुखप्रकाशू । प्रकाशूचि सत्ता उल्हासू । हे न निवडे मिठांशू । अमृती जेवीं ॥' या ओवीने त्याच अध्यायांत

तातांनी केले आहे. सत्ता, चैतन्य व आनंद हे तीन पृथक् भासतात तेव्हा ते मिथ्या ते असतात, आणि सत्यस्वरूपाने ते वस्तुतः एकच आहेत. वृत्तीने जो त्यांचा वेगळेपणा भासतो तो तुच्छ आहे, असाच ह्या तातांच्या दोन्ही ओव्यांचा अर्थ आहे. 'ज्ञानाज्ञान गिळुनी । ज्ञानमात्र जें' असे तर तातांनी स्पष्टच म्हटले आहे. तेव्हा वृत्तिनिष्ठ चैतन्याभासाहून निराळा चैतन्यरूप आत्माच तातादिकांस संमत आहे. पंचपादिकाकार पद्मपादाचार्य "आनंदो विषयानुभवो नित्यत्वं चेति संति धर्माः ब्रह्मणो ह्यपृथक्त्वेऽपि पृथगिवावभासंते ।" असे स्पष्ट म्हणतात. पंचपादिकाकारांचे उल्लंघन कोण्याही प्रकरण-काराने आजपर्यंत केले नाही असा वेदांतसंप्रदाय आहे. यद्यपि "साक्षित्व चैतन्य सत्ता । गुण ब्रह्माचिया माथा । आरोपिले गा वृथा । मायागुणे ।" असे समर्थांनी म्हटले आहे, तथापि जिने ब्रह्माच्या माथ्यावर चैतन्याचा आरोप केला ती माया चैतन्याहून निराळी आहे असा त्याचा स्पष्ट अर्थ होतो. कारण आरोप्य आणि आरोपक ह्या दोन्ही वस्तु एक नसतात. शिवाय ही ओवी शब्दाच्या शक्तिवृत्तीसच लागू होते. लक्षणावृत्तीस लागू होणार नाही. लक्षणावृत्तीस लागू केली तर सर्व वेदांताचा आजच नायनाट होईल !

७) बरे, या योगवासिष्ठातील कृतयुगाच्या धर्माचरणाने आरोपित चैतन्य प्राप्त होते, असे म्हणावे तर तेही योग्य नाही. कारण आरोपित चैतन्यधर्माचा आचरण करणाराच प्राप्य, असे कधीही होत नाही ! यद्यपि आपले मूळस्वरूपच सर्वांना प्राप्त आहे, तथापि ते आरोपित नाही. याविषयी "कर्मकर्तृव्यपदेशाच्च" (ब्रह्मसूत्र) व त्यावरील शांकरभाष्य पहावे.

८) बरे, गोविंदसुत म्हणतात की, "चैतन्याच्या पलीकडे आत्मा आहे, यावरही पुष्कळ बोलतां येईल," तर बोलावेच असे मी पुनः विनवितो. चैतन्याच्या पलीकडे आत्मा काय चैतन्यरूप आहे की जडरूप आहे ? कारण, ज्या वस्तु द्वंद्वसत्वानेच प्रादुर्भूत असतात त्यांच्यामध्ये तृतीयत्व संभव-नीय नसते. जड व चैतन्य ह्या वस्तु अंधार व प्रकाश याप्रमाणे तशा वस्तु आहेत. यद्यपि संध्याकाळ तिसरेपणा आहे असे वाटते, तथापि त्यात तिसरेपणा नसून त्यात प्रकाश व अंधाराचे मिश्रण आहे. त्याप्रमाणे संसर्गरूप अध्यासाने जड व चैतन्याचे जे मिश्रण वाटते तेच तृतीयत्व आहे, असे जर गोविंदसुत म्हणतील, तर ते चैतन्याच्या पलीकडचे कधीच असू शकणार नाही. कारण

"सर्व आरोपित पदार्थांना चतन्यच अधिष्ठान आहे, जड अधिष्ठान होत नाही," असा वेदांताचा सिद्धांत आहे. आणि याविषयी कोणत्याच ग्रंथात भेद होणे शक्य नाही. कारण असे मानण्यालाच वेदांत म्हणतात.

९) पुनः याच योगवासिष्ठांत पांचव्या अध्यायाच्या २० व्या ओवीत कृतयुगींचे निरूपण चालले असताना असे म्हटले आहे

> "तिये युगीं धर्मू आत्मउपास्ति । जे यथोक्त आचरती ।
> ते चैतन्यप्राप्ति पावति । निर्धारिंसी ॥ २० ॥"

आणि चहूंयुगींच्या धर्मांनीही मोक्ष मिळत नाही, असे पुढे म्हटले आहेच ! तेव्हा मानभावांच्या मतात चैतन्य नावाची माया एक देवता असून त्या मताशी हे म्हणणे जुळतेही. कारण मानभावमतातील पारिभाषिक चैतन्य प्राप्त झाले असता मानभावांना संमत असा मोक्ष प्राप्त होत नाही हे खरे आहे. कारण चैतन्याच्या पलीकडे ते परमेश्वर मानतात. पण वेदांती लोकांची गोष्ट तशी नाही. वेदांतात तर "चैतन्यच ब्रह्म" असा सिद्धांत केला आहे. तेव्हा चैतन्याची प्राप्ति होऊनही मोक्ष होत नाही, कारण चैतन्याची प्राप्ति हे कृतयुगीच्या धर्मांचे फळ आहे. आणि आत्मज्ञानाने मोक्ष होतो. तेव्हा चैतन्याहून निराळे असे हे आत्मज्ञान कोणते ? हे गोविंदसुत सांगतील तर मजवर उपकार होतील. बरे, कृतयुगींच्या धर्माने प्राप्त होणारे हे चैतन्य मानभावांचे न घेतले व वेदान्तातीलच चैतन्य आहे असे घेऊन चालले, तर त्याविषयी प्रश्न उत्पन्न होतो तो असा :-

१०) वेदांतात तीन प्रकारचेच चैतन्य आजपर्यंत उपलब्ध होत आहे; शुद्ध चैतन्य, शबल चैतन्य व आरोपित चैतन्य. शुद्ध चैतन्यच परब्रह्म आहे, असा सर्व वेदांताचा समन्वयपूर्वक सिद्धांत आहे. शबलचैतन्य दोन प्रकारचे आहे, ईश्वररूप आणि जीवरूप. आरोपित चैतन्य फक्त समर्थांच्या ग्रंथांतच सांगितले आहे, आणि त्याचा जीवचैतन्यातच समावेश होतो. नाही तर व्यर्थ गौरवदोष येईल. "कारणावाचून अधिक पदार्थ मानण्याला गौरव म्हणतात." जीव हा मोक्षाला अधिकारी असून तो शुद्धचैतन्यात मिळाला म्हणजे मोक्ष होतो, असे काही ग्रंथकार म्हणतात, आणि ईश्वरचैतन्यात मिळाला असता मोक्ष मिळतो असे भाष्यकार व विवरणकार म्हणतात. हा मोक्ष काही ब्रह्म-लोकांतल्या मोक्षाप्रमाणे नव्हे, तर ज्ञानानेच प्राप्त होतो, असे या सर्वांचे म्हणणे आहे. म्हणून चैतन्यप्राप्तीच्या पलीकडे मोक्ष आहे असा वेदांतनिष्कर्ष निघणे शक्य नाही.

११) आता ब्रह्मलोकप्राप्ति म्हणजेच चैतन्यप्राप्ति; असा एखादा विवक्षित अर्थ जर गोविंदसुत करतील तर तोही या योगवासिष्ठाच्या विरुद्धच होणार आहे. कारण त्रेतायुगाच्या धर्माने कैलासवैकुंठादिक प्राप्त होतात असे या योगवासिष्ठात सांगितले असून चहुंयुगींच्या धर्मफळातच ते येत असल्यामुळे मोक्ष नव्हे, असा–अर्थातच त्यावरून निष्कर्ष निघतो.

१२) बरे, चैतन्याच्या पलीकडे असलेला आत्मा जड आहे, असा दुसरा पक्ष घेऊन चालले तर जडाची प्राप्ति म्हणजे मोक्ष ठरणार आणि तसा वेदांताचा सिद्धांत कोठे उपलब्धच नाही. आता 'सत्ता पुरुष व चैतन्य प्रकृति' अशा प्रकारचे जे तातांनी म्हटले आहे ते योगवृत्तीला अनुसरून म्हटले असल्यामुळे वेदान्त जर गोविंदसुतांना माहीत आहे, तर त्याविषयीं विवाद नाही हेही त्यांना ठाऊक आहे हे मी घेऊन चालतो व अधिक लिहीत नाही. याप्रमाणे दोन मुद्दे झाले.

१३) आता अभ्यासाच्या मार्गांत चुका कोणत्या याविषयी प्रश्न केला आहे, व तो अभिनंदनीय आहे. यावरून गोविंदसुतांना योगाभ्यासाचीही माहिती आहे असे वाटते. म्हणून मी त्यांच्या प्रश्नाला यथामति उत्तर देतो.

"तरी प्रथम परवस्तुपासुनु । जाला लयनु । लयनापासुनी गहनु । कृतिपकु पैं ।। १९ ।। कृतिपकापासौनी सत्पेशु । सत्पेशापासौनी आर्यानिर्देशु । तेथुनु जाला प्रकाशु । जोतिसांख्यु ।। २० ।। सांख्यापासौनु कैसा । केवळ अकारिया परियेसा । समरु जाला जैसा । सांख्यसदृशु ।। २१ ।। समरीपासौनु गुणऋतु जाला । गुणऋते ऋतिवासा रचिला । तेयापासौन उपेंद्रु जन्मला । उपेंद्रे रचिला निद्राहीनु ।। २२ ।। निद्राहीने रचिलें पिंडब्रह्मांड । चतुर्विध भूतग्राम प्रचंड । सप्तद्वीपावती नवखंड । पृथ्वी पर्वत ।। २३ ।।"––योगवासिष्ठ, अध्याय ९.

१४) हा क्रम श्रुतिस्मृतिपुराणांत कोठेही नाही, व तो देहचतुष्टयवादाशी समन्वित होणे शक्यही नाही. यातील २२ व्या ओवीवर जी टीप दिली आहे तीत 'ही देवतांची नांवे आहेत' असे म्हटले आहे. पण श्रुतिस्मृतिपुराणांत ही देवतांची नावे कोठेही नाहीत, किंबहुना मानभावांच्या मतांतही नाहीत आणि कोण्या योगशास्त्राच्या संस्कृत ग्रंथातहि नाहीत. बरे, याचा जो दहाव्या अध्यायांतील २९ ते ३४ या ओव्यात लय सांगितला आहे, तो एका देवतेचा पहिल्या चक्रावर व दुसऱ्या देवतेचा श्रीहाट चक्रावर असा सांगितला आहे. पण असे योगाभ्यासात होणे अशक्य आहे. कारण त्रिकूट, श्रीहाट, गोल्हाट, औटपीठ ही चक्रे पश्चिम मार्गाची असून

समाहंकारानेच या चक्रांवर चढावे लागते, असा योगियांचा अनुभव आहे. विषमाहंकाराने चढल्यास प्राणाचा विच्छेद होऊन मृत्यु होतो. पण अशा क्रमाने देवतेचा लय करू गेल्यास प्राणाचा विच्छेद झाल्यावाचून रहात नाही, हे अभ्यासांतील चुका ज्याअर्थी विचारल्या आहेत, त्याअर्थी गोविंदसुतांना माहीत असलेच पाहिजे. माहीत नसले तर माझा गरीबाचा तेथे काय उपाय आहे ?

९५) पुनः दहाव्या अध्यायातील २८ व्या ओवीत 'षट्चक्रे भेदून गेल्यानंतर मणिफूळ मार्गाने आकाशांत जातो' असे म्हटले आहे, आणि मणिफूळ शब्दावर मणिपूर अशी टीप दिली आहे. परंतु मणिपूरचक्र हे षट्चक्रांतर्गतच असून षट्चक्रांच्या पलीकडचे नाही. तेव्हां षट्चक्रे भेदून गेल्यावर मणिपूर पंथाने वायु कसा जातो हे गोविंदसुत कळवितील तर बरे होईल. टीपेत जी ज्ञानेश्वरीतील ओवी दिली आहे तीतून, षट्चक्रे भेदून गेल्यानंतर वायु मणिपुरासी झंजतो, असा अर्थ निघत नाही. परंतु वासिष्ठाच्या ओवींत तर 'षट्चक्रें भेदुनु निर्धारी' असे स्पष्ट वचन आहे. बरे, मणिपूराच्या मार्गाने षट्चक्रे भेदून असा ओवीचा अर्थ केला तरी होत नाही; कारण मणिपुराचा मार्ग स्वाधिष्ठानापासून जसा सरळ तसा पुढे प्राण चढविण्याला सरळ नाही कारण अनाहत चक्रावर प्राण नेताना हार्दसंकोचधारणा सर्व योगी करीत असतात, तीही गोविंदसुताला ठाऊक आहे असे मी घेऊन चालतो. तेव्हा ह्या अभ्यासातील चुका नव्हेत काय ? असे मीच गोविंदसुताला विनवून विचारतो. किंवा अशा प्रकारच्या धारणादिकांची चक्रभेदाला जरूर नाही असे तरी गोविंदसुताने ह्मणावे, ह्मणजे मी अगदी तोंड मिटून बसेन ! काही लिहिणार नाही. यद्यपि पतंजलियोगांत मनोनिरोधास षट्चक्रभेदाची आवश्यकता सांगितली नाही, तथापि जेथे षट्चक्रनिरूपण केले आहे, तेथे सर्वत्रच अशा धारणादिकांची जरूरी आहे, असा सर्व योगियांचा अनुभव आहे. पुनः याच ग्रंथांत सातव्या अध्यायांत– "कर्मयोगु तो पवनें । हठयोगु तो मनें । ध्यानें लयो ज्ञानें । राजयोगु ॥ ११ ॥" असे ह्मटले आहे. आणि पुढे या चार योगांची लक्षणे करताना असे ह्मटले आहे :– "यमनियम तो कर्मयोगु । प्राणप्रत्याहारु तो हठयोगु । धारणाध्यान लययोगु । राजयोगु येरे दोन्ही ॥।१४॥ (अध्याय ७)." तेव्हां ११ व्या ओवीत कर्मयोग हा वायूने साधतो, असे ह्मटले असून १४ व्या ओवीत प्राणायामाचा समावेश हठयोगात केला आहे. आणि यमनियमांना कर्मयोग ह्मटले आहे. यमनियम जर

कर्मयोग होय, तर पवनाच्या योगानें तो कसा साधतो ? त्यात वायूचे काय कार्य असते ? हठयोग जर मनानेच होतो, तर त्यात प्राणायामाचा समावेश कां केला ? शिवाय "ज्ञानावृत्ती राजयोगे प्राणायामासने हठे।" इत्यादि स्मृतिवचनासही ह्या ओव्या विरुद्ध आहेत. सर्व योगग्रंथात आसन हे तिसरे अंग सांगितले असून या ग्रंथात ते आठवे अंग सांगितले आहे व राजयोगाचे समाधीची व त्याची एकता केली आहे ! परंतु " प्राणायामासने हठे।" असे स्मृतिग्रंथात म्हटले आहे ते कसे? ह्या अभ्यासातील चुका नव्हेत काय ?

१७) याप्रमाणें गोविंदसुतांच्या मुद्यांचे माझ्याच्याने देवविले तसे उत्तर दिले. या लेखात काही पारिभाषिक शब्द आले आहेत, परंतु वेदान्त व योग माहीत असल्यामुळे गोविंदसुतांना ते कठीण जाणार नाहीत. आता संप्रदाय-वेदांतदृष्टीने या ग्रंथात ज्या अनंत चुका आहेत, त्यांवर एक मोठे पुस्तकच लिहिले पाहिजे ! माझी प्रकृति सुधारल्यावर कदाचित् तेही मी लिहीन. आणि काही चुका वर दाखविल्याही आहेतच; परंतु "संप्रदायवेदांत म्हणजे वारकरी वेदांत," असा जो गोविंदसुतांनी अर्थ केला आहे, तो माझा नाही; तर १– उपनिषदे, २– स्मृति व ३– पुराणांतील अद्वैतकांड ४–ब्रह्मसूत्रे व त्यावरील श्रीमत् शंकराचार्यांची भाष्ये ५– पंचपादिका आणि ६– विवरणे इत्यादि क्रम हा (संप्रदायवेदान्त) होय. आता या मुद्याव्यतिरिक्त दुसरी जी गोविंदसुताची भाषा आहे तिला उत्तर देणे दांत खाऊन हात तोडण्यासारखे मला वाटत असल्यामुळे मला त्याची जरूर नाही.

ता. २।८।१४ आपला,

मुकदम माधान, गुलाबराव गोंडूजी मोहोड.

हल्ली वस्ती उमरावती.

---

## श्रीज्ञानेश्वरांचे योगवासिष्ठ.

( मुमुक्षु, गुरुवार तारीख ३० जुलै, सन १९१४, लेखक–गोविंदसुत, )

१. दैवदुर्विलासाच्या फेऱ्यांत ज्याप्रमाणे कित्येक राष्ट्रें आणि व्यक्ति सांपडतात, त्याप्रमाणें त्या राष्ट्रांच्या व व्यक्तींच्या कर्तृत्वाची साक्ष पटविणारे ग्रंथ हेही कालचक्राच्या चरकांत सांपडत असतात ! त्यांपैकी कित्येक ग्रंथ पुडचा बांधण्याकरितां वाण्याच्या दुकानाचा रस्ता पकडीत आहेत, तर कित्येक ग्रंथ अज्ञातवासांत कैक वर्षे धूळ खात पडले आहेत ! पण धूळ खात खात शेवटीं धुळीस मिळणाऱ्या या ग्रंथांना धुळचाची सत्कार्योत्तेजक मंडळी धुंडाळून काढून उजेडांत आणीत आहे, हे पाहून आनंद होतो. या मंडळी-पैकीं श्रीयुत गोविंद काशीनाथ चांदोरकर यांनी 'श्रीज्ञानेश्वरांचे योगवासिष्ठ' मिळवून ते छापवून नुकतेच प्रसिद्ध केलेले माझ्या पाहण्यात आले. योगवासिष्ठांतील श्लोकांचा

' नेटका भावार्थ ' काढून ज्ञानोबांनी ग्रंथ लिहिल्याबद्दल नामदेवाचा व ' योगवासिष्ठ स्वातमपत्र ' लिहिल्याबद्दल विसोबा खेचरांचा, असे तत्कालीन साधूंचे दोन्ही आधार चांदोरकरांनी आपल्या प्रस्तावनेत दिलेच आहेत. या तत्कालीन पुराव्यावरून ज्ञानोबांनी योगवासिष्ठाचे सार काढले होते, हे सिद्ध होत आहे. प्रस्तुतचा ग्रंथ प्रकाशकास कोठे उपलब्ध झाला, हे त्यांनी प्रस्तावनेत न लिहिल्यामुळे चिकित्सक मंडळीत मोठा घोटाळा उडून गेला होता, पण ' निवृत्तिज्ञानदेवसोपानमुक्ताबाई ' यांच्या सांप्रदायिक मठांतच हा ग्रंथ उपलब्ध झाल्याचे केसरीत प्रसिद्ध झाले असून या ग्रंथाच्या पुष्टीकरणार्थ गोमांतकातही एक प्रत चांदोरकरास मिळाली आहे. मात्र ती अपुरी आहे. काशीस एक प्रत असल्याचे नुकतेच मी एका ज्ञानोबाच्या चरित्रात वाचले. संशोधकाचा शोध चालू असेलच.

२. या चिमुकल्या साररूप ग्रंथात दहा प्रकरणे असून ओवीसंख्या ११२४ आहे. कोणत्याही विषयात प्रवेश करण्याला प्रथम ज्ञान–जाणीव पाहिजे, त्या जाणिवेला स्फूर्ति–स्फुरण पाहिजे. नंतर त्या ज्ञानस्फूर्तीने त्या विषयाचा बोध झाला पाहिजे. यासाठी कोणत्याही कार्यारंभी त्या त्या हृदयस्थ देवतांना आवाहन करून त्यांच्या स्तुतिस्तौत्याने आपले प्रसन्नात:करण झाल्यावर त्या देवतांच्या साह्याने ग्रंथाला आरंभ करावा, असा आपल्यात शिष्टसांप्रदाय आहे. त्याप्रमाणे प्रथमत: या ग्रंथात ज्ञानरूप गणपति, स्फुरद्रूप सरस्वती आणि बोधरूप सद्‌गुरु यांचे स्तवन करून त्यांच्या प्रसन्नतेचा प्रसाद मागून घेतल्यावर ऋषि, मुनि, योगी, तापसी, ब्रह्मवेत्ते, दिगंबर इ. ची वर्णने देऊन नंतर संत, सद्‌गुरु व सच्छिष्य यांची लक्षणे, इतका विषय पहिल्या तीन प्रकरणात आला आहे. चौथ्या प्रकरणात षड्‌दर्शनादि मतमतांतरें, पांचव्यांत युगधर्म, सहाव्यांत गृहस्थाश्रमनिषेध, सातव्यात अष्टांगयोग, आठव्यात स्वरूपस्थिति, नवव्यात सृष्टिरचना व पंचीकरण आणि दहाव्यात सृष्टीचा, देहाचा व कर्माकर्माचा निरास व उपसंहार याप्रमाणे विषय आहेत. गाण्यामध्ये चिजा काही नवीन नसतात पण त्या रागरागिणीत वठविण्याचे कसब पाहून तज्ज्ञ मंडळी मान डोलवतात, तद्वत् अध्यात्मग्रंथात विषय काही नवीन असतात असे नाही, पण त्यांची मांडणी आत्मप्रत्ययाने झालेली आहे किंवा नाही हे पाहून मान डोलविली पाहिजे किंवा नाक मुरडले पाहिजे. समर्थ म्हणतात, ग्रंथ ' शास्त्रेंसहित ' तर पाहिजे, पण त्यात 'मुख्य आत्मप्रचीति' आहे किंवा नाही हं पाहिले पाहिजे.

३. ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावर प्रकाशकांकडून तो तज्ज्ञ मंडळीकडे अभिप्रायार्थ पाठविला जातो, त्याप्रमाणे हा ग्रंथ वारकरी पंथाचे अध्वर्यूपैकी ह. भ. प. गुलाबरावमहाराज, विष्णुबुवा जोग, व विठ्ठलभक्त ल. रा. पांगारकर यांजकडे अभिप्रायार्थ गेला होता, त्यावरून एकसमयावच्छेदेकरून या त्रैमूर्तींचा अभिप्रायरूप अवतार तारीख १६ जुलाई रोजी 'मुमुक्षू' च्या उदरी प्रगट झाला. तो जणूं या ग्रंथाच्या मूळावरच झाला की काय असे दिसून आले! या ग्रंथावर या त्रैमूर्ति वारकऱ्यांनी केलेले वार वरवर विचाराचेच केलेआहेत असे दिसले! अशा वारांनी एकमताने या ग्रंथाचे जणूं तीनवार तिरटीम करून टाकन ग्रंथ ज्ञानोबाचा नाही म्हणून खाडदिशी ठरवून टाकले ! इतकेच नव्हे, तर गुलाबराव म्हणतात, ' हा मानभावी कावा !' वाहवा ! विष्णुबुवा म्हणतात, 'हे तोतयाचे बंड !' खाशी सोय !

यावर पांगारकर मखलाशी करून सांगतात की, 'हा ग्रंथ वरवर चाळला तरी याची तऱ्हा निराळी असल्यामुळे हा ज्ञानोबाचा नव्हे खास ! पण ज्ञानोबाचा ठरला तर याचीं किंमत कांही निराळी होईल ! ' ज्ञानेश्वरीहून निराळ्या तऱ्हेच्या या ग्रंथावरील हा तऱ्हेवाईक अभिप्राय वाचला म्हणजे 'कोण हा धटिंगण !' म्हणून न कळत उद्गारलेला मनुष्य जावई आहे असे मागाहून समजल्यावर, तोच धटिंगण ' जावयाची कीड आणि ती इतकी रोड ' दिसलेल्या सासूबाईच्या गोष्टींचे स्मरण होते ! पांगारकरांचा हा वरवरचा अभिप्राय व त्यासंबंधाने प्रेमाने केलेला हा विनोद आपण वरच्यावरच सोडून देऊन गुलाबरावमहाराजाकडे वळूं या.

४. गुलाबरावमहाराजाकडे हे पुस्तक गेले त्यावेळी ते तत्त्वसारायण, सिद्धांतसूत्रे, शहामुनीचा सिद्धांतबोध व काही अभंग वगैरेतून थिऑसफी, उत्क्रांतिवाद, मानभावादि मते ही घुसडली जाऊन त्या ग्रंथांचा व पंथाचा वऱ्हाडात फार सुळसुळाट झालेला आहे, त्यावर लेख लिहिण्याकरिता बसले होते. थिऑसफी व उत्क्रांतिवाद यावर मुमुक्षूचे साडे-तीन कॉलम होतील इतका मजकूर लिहून झाल्यावर शहामुनीचा सिद्धांतबोध घेऊन त्यातील मानभावी मतावर काय लिहावे, हा विचार चालला असता त्या संधीत हा ग्रंथ हाती आला ! अर्थात् अशा वेळी, नदीवरील ब्राह्मणाकडे लग्नाची अक्षत आली असता त्या ब्राह्मणाकडून त्या अक्षतेची जी वाट लागते, त्या ब्राह्मणाप्रमाणेच गुलाबरावमहाराजांची स्थिति होऊन हा ग्रंथही त्यांना मानभावांचा दिसला ! आणि मानभावादि मतांच्या सुळ-सुळाटावरील टीकेच्या वाहत्या गंगेच्या ओघात या ग्रंथाबद्दलही हात धुवून घेऊन ग्रंथ मानभावाचा ठरवला असावा, असे त्यांचा एकंदर अभिप्राय आणि विशेषेकरून त्यांच्या ताज्या कलमातील, इतर ग्रँथांच्या सुळसुळाटाची प्रसिद्धि अवश्य व्हावी म्हणून त्यांची चाललेली तळमळ यावरून उघड दिसते. तसे नसते तर इतर ग्रंथात व अभंगांत झालेली मतामतांची घुसडाघुसड बाहेर काढण्याकरिता लिहिलेल्या लेखातच या ग्रंथाच्या अभिप्रायाची घुसडाघुसड करून ' इंद्राय तक्षकाय स्वाहा ' असे त्यांनी केले नसते खास! गुलाबरावमहाराजांनी या पुस्तकाचा स्वतंत्र रीतीने, खोल दृष्टि घालून विचार केला, तर प्रत्येक प्रकरणाचा उपक्रम जरी त्यांच्या समजुतीप्रमाणे कोणत्याही मताने केलेला असला, तरी त्याचा उपसंहार शेवटी आत्मज्ञानात, सत्संगतीत केलेला आहे, असे त्यांच्या नजरेस येईल, आणि त्यावरून हा ग्रंथ तातांचा आहे असे जरी त्यांना म्हणता आले नाही तरी हा ग्रंथ अध्यात्माचा आहे असे त्यांना म्हणावे लागेल यात संशय नाही ! गुलाबरावमहाराज हे खालील कारणावरून हा ग्रंथ मानभावाचा ठरवितात:– (१) ग्रंथातील प्रकरण ५ वे हे मानभावाच्या ग्रंथातील युगधर्माशी जुळत असून तो मानभावांचा ग्रंथ त्यांजपाशी आहे. (२) अभ्यासाच्या मार्गात पुष्कळ चुका आहेत. (३) या ग्रंथात आत्मोपासनेची युगधर्मा-न्वयें व्यावृत्ति केली आहे, हे पुराव्यानिशी सिद्ध करण्यास ते तयार आहेत. (४) संप्रदाय-वेदान्तदृष्टीने असणाऱ्या चुका तर या ग्रंथात अनंत आहेत !

या आक्षेपापैकी पहिल्या आक्षेपासंबंधाने मानभावी ग्रंथ पुढे आलेला नाही, तरी तो आणवण्याची जरूरही पण नाही; प्रस्तुत ग्रंथावरूनच त्याचा निकाल होत आहे. तो असा की, 'चोही युगधर्मी वर्तता । मोक्ष नाही

सर्वथा' हे मानभावांचे म्हणून मानलेले मत गुलाबरावमहाराजांस प्रस्तुत ग्रंथाच्या पांचव्या प्रकरणांतील ज्या ओवींत सांपडले, त्याच ओवीचे पुढले दोन चरण 'आत्मज्ञानावीण रघुनाथा । निश्चिता नोहिजे' हे पाहण्यांत आले असते, तर याच प्रकरणांतील पंधराव्या ओवींत लिहिल्याप्रमाणे हा युगधर्म 'वेदें बोलिला यथोक्त' असो, अगर गुलाबरावांच्या म्हणण्याप्रमाणे मानभावी मताचा असो, पण त्याचा उपसंहार शेवटी 'आत्मज्ञानेंविना पार्थ सर्वकर्म निरर्थकं' यांत केला आहे असे स्पष्ट होत आहे, आतां ग्रंथ मानभावी ठरविण्याकरिता आत्मज्ञान हेही मानभावांचे म्हणावयाचे असेल तर मात्र कांही बोलणें नाही; पण मग ज्ञानोबाराय, समर्थ, तुकाराम, एकनाथ इ० चटसारे आत्मज्ञानी संत मानभाव म्हणावे लागतील ! असो.

गुलाबरावमहाराजांच्या अभिप्रायांत चैतन्यरूप आत्मा किंवा चैतन्याच्या पलीकडे आत्मा इ० वर चर्चा आलेली आहे, त्यावरही पुष्कळ बोलतां येईल. परंतु अनेक कारणांनी त्यावर बोलणें निदान या ग्रंथाच्या अभिप्रायाच्या प्रसंगांत तरी इष्ट नसल्यामुळे आपण तो विषय सोडून देऊ. बाकीच्या मुद्यांसंबंधाने गुलाबरावमहाराजांस माझा विनंतिरूपानें एवढाच प्रश्न आहे कीं, ग्रंथ थोतांडी आहे असा स्पष्ट ठराव करण्यापूर्वी अभ्यासाच्या मार्गांत पुष्कळ चुका असतील तर त्या कोणत्या, हे स्पष्ट दाखवावयास नको काय ? आत्मोपासनेची व्यावृत्ति झालेली पुराव्यानिशी सिद्ध करण्याची तयारी आहे तर ग्रंथप्रकाशक अगर वाचक पुराव्याचे माप पदरांत घेण्यास तयार नसल्यामुळे घोडे अडले की काय ? वारकरी पंथाचा संप्रदायिक वेदांत कोणता व त्या दृष्टीने या ग्रंथांत अनेक चुका आहेत त्यापैकी एक तरी दाखवण्यास नको होती काय ? आमच्यासारख्यांनी केवळ गुलाबरावमहाराजांच्या वचनावर विश्वास ठेवला, तरी 'बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर' अशा मासल्याचे आधुनिक चिकित्सकांचा हल्ली किती सुळसुळाट झालेला आहे हे महाराजांस, विदित आहेच, त्यांची कशी समजूत पडणार ? यासाठी गुलाबरावमहाराजांना माझी विनंति आहे की, 'समग्र ग्रंथ पहिल्यावीण । उगाच ठेवूं नये दूषण' ही आज्ञा तातांची नसली तरी समर्थांची आहे ती ध्यानी आणून समग्र ग्रंथाचे निरीक्षण करूनच आपण अभिप्राय दिला असेल याबद्दल मला संशय नाही; पण तो अभिप्राय 'हा सूर्य आणि हा जयद्रथ' या झोंकांत आला, म्हणजे त्या ग्रंथांबद्दल व अभिप्राय देणाऱ्याच्या पूज्यतेबद्दल मुमुक्षूच्या अंत:करणांत लख्ख उजेड पडतो, माझ्या विनंतीचा गुलाबरावमहाराजांकडून अनादर होणार नाही अशी मला उमेद आहे.

□ □ □

मुमुक्षु ता. ६ ऑगष्ट १९१४

[ या योगवासिष्ठातील ‘ युगधर्म ’ मानभावांचा आहे श्रुतिस्मृतिपुराणोक्त नव्हे— मूळ योगवासिष्ठ शांकरमताचे–मानभावमताला मी वाईट म्हणत नाही–वेदान्तग्रंथातील घोटाळे–इतिहासदृष्टी मला नको ]

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली ॥

रा. रा. मुमुक्षुकर्ते यांसः—

१) मी दिलेल्या योगवासिष्ठाच्या अभिप्रायावर कोणाच्या संक्षिप्त सहीने केसरीच्या ता. २१।७ च्या अंकात मजकूर आला आहे. त्यात “ मानभावात कोणी ज्ञानदेव झाला की नाही हे गुलाबरावला सिद्ध करणे प्राप्त आहे ” असे म्हटले आहे. यावर माझे म्हणणे असे आहे की, मानभावात ज्ञानदेव झाला की नाही हे सिद्ध करण्याची आवश्यकता मला नाही. शिवाय चांदोरकरांची व माझी ओळख नाही. ते कोणाला फसविणारे आहेत असे माझे म्हणणेही नाही. माझे म्हणणे इतकेच की, योगवासिष्ठात युगधर्म नावाच्या प्रकरणात जो मजकूर सापडतो तो मानभावांच्या ग्रंथांवाचून उपलब्ध श्रुतिस्मृतिपुराणात मुळीच मिळत नाही. आणि “ कर्मयोनि देवयोनि ” इ. श्लोकांचा व शांकर वेदांताचा समन्वय होणेच शक्य नाही, असे मी पंडितांच्या सभेत छातीस हात लावून सिद्ध करण्यास तयार आहे ! मूळ योगवासिष्ठ शांकरमताच्या वेदान्ताचा आहे असे माझे मत आहे; व तेही मी सिद्ध करून देण्यास तयार आहे. पूर्वी सिद्धांतबोधावरून जे मानभावांविषयी मी काही लिहिले होते तसे या ग्रंथाविषयी माझे वरवर म्हणणे नाही; तर स्वतः ग्रंथ हातात घेऊन सिद्ध करून देण्यास मी तयार आहे.

२) एवढ्यावरून मानभावमत वाईट आहे असे मी प्रतिपादन करतो असे कोणी समजू नये व मला त्याची जरूरही नाही. अद्वैत वेदान्ताशी कधीही समन्वय न होण्यासारखा, व्याकरणाने शब्दार्थ कितीही बदलविले तरी दुसरा अर्थ न होण्यासारखा, मानभावग्रंथावाचून श्रुतिस्मृतिपुराणात उपलब्ध नाही असा, आणि एखाद्या लिखित ग्रंथात श्लोक कोणी घालून दिल्यास देखील अद्वैतवेदान्ताशी फुटून पडेल असा मजकूर या वासिष्ठात आहे, हे मी सिद्ध करून देतो ! मग तो तातांनी जरी केला असला तरी तातांच्या अमृतानुभवादि ग्रंथांच्या विरुद्ध असल्यामुळे तो आमच्याकरिता केला असे मला वाटत नाही. मी आपले म्हणणे केव्हाही सिद्ध करून देण्यास तयार आहे.

मला हल्ली ज्वर येत आहे, म्हणून सिद्ध करून मागणाऱ्याने येथे आल्यास मजवर उपकार होतील. नाहीतर माझी प्रकृति सुधारल्यावर भेट झाल्यास दोन्ही ग्रंथ हातात घेऊन सिद्ध करून देईन. यापेक्षा जास्त लिहिणे माझ्याकडून होत नाही.

३) मानभावांमध्ये कोणी ज्ञानदेव झाला की नाही अशा दृष्टीने मी पूर्व लेखही लिहिला नव्हता. कारण प्रत्यक्ष वेदान्तभेद सापडला असता अर्थापत्तिप्रमाणाचे अवलंबन करावे असे मला वाटले नाही व वाटतही नाही. वेदान्तग्रंथात अशा प्रकारचे घोटाळे कोणाच्या तरी नावावर होतात याच संबंधांत उदाहरणे मी पूर्व लेखात दिली आहेत ती पाहिजे असल्यास पुन्हा कोणी वाचून पहावी. 'इलेक्ट्रिसिटीचे ठोके आणि परब्रह्म एकच आहे' असे ज्यांचे म्हणणे असेल त्यांच्याशी चर्चा करण्याची मला काही जरूर नाही. "पण योगवासिष्ठ अद्वैतवादाचा असून, सांप्रदायिक शांकरमतात, समन्वय हाच पहिलेपासून परिशुद्धीचा मार्ग ठरत आला असल्यामुळे, तद्विरुद्ध वचनांचा तेथे समावेशच नाही" असे मी स्पष्ट म्हणतो. यावर माझ्या प्रकृतीत त्राण आहे तोपर्यंत पाहिजे तितकी लेखालेखी करण्यास मी तयार आहे. अमुक नावाचा मनुष्य झाला किंवा नाही हा वाद इतिहासाचा असून तो सतत संदिग्धच राहणार. तेव्हा त्याबद्दल मला काहीच बोलण्याची इच्छा नाही. इतके लिहूनच मी केसरीतील लेखकाची क्षमा मागतो.

आपला,

ता. २४ । ७ । १९७४

गुलाबराव गोंडूजी मोहोड,

मुकद्दम माधान, हल्ली मुक्काम अमरावती

□□□□

## ४१. आचार्य व ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान एकच

।। श्रीज्ञानेश्वरमाऊली ।।

१) सा. न. वि. वि. मी बाळशास्त्री हुपरीकर यांनी लिहिलेला "विद्यारण्य व ज्ञानेश्वर यांच्या वेदान्तावरील मतांचे तात्पर्य" नांवाचा निबंध वाचला. त्यात शंकराचार्य, विद्यारण्य व तात यांच्या मतात भेद दाखविले आहेत. माझ्या मते तातांच्या मतात व शांकरमतात भेद नाही. 'तातचरणभूषण' नावाच्या ग्रंथात मी असे प्रतिपादनही केले आहे. पुनः 'मायेचा अंगीकार न करून नुसत्या स्फुरणपक्षाचाच तात अंगीकार करितात' असे मानले तर

'श्रीकांत' मताचे व 'वैमर्षण' मताचे तात आहेत, असे जबरदस्तीने म्हणावे लागते, आणि ही दोन्ही मते तर प्रत्यक्ष वेदविरुद्ध आहेत. जेथे तातांनी अज्ञानाचा अंगीकार केला नाही, त्या ठिकाणी तो शंकराचार्य व विद्यारण्यही करीत नाहीत, असे विवरणादि पुराव्यानिशी सिद्ध करण्यास मी तयार आहे. *म्हणून शंकराचार्यमतात व तातमतात भेद नाही, असे मी म्हणतो.

२) परंतु तातांचे मत शंकराचार्यांच्या मताहून निराळे आहे असे काहीं वारकरी लोकांचे म्हणणे आहे, हे मला येथे एका हरदासांनी सांगितले. मी प्रत्यक्ष कोणा वारकऱ्याचे तोंडून ऐकिले नाही. परंतु खरोखरच पुष्कळ वारकऱ्यांचे असे मत असेल तर ते वर्तमानपत्रद्वारे प्रसिद्ध झाल्यास, मला पटेल तर मी त्याचा अंगीकार करीन, मात्र त्यांत वेदविरुद्ध जी वर दोन मते सांगितली ती टाळतां आली पाहिजेत. मला वाटते, वारकरी लोकांचे तसे मत असणे शक्य नाही. हरदासबोवांनी खोटे सांगितले असल्यास व वारकऱ्यांचे तसे मत असल्यास कोणी वारकरी महात्म्याने हरदास येथे उमरावतीस आहेत तोपर्यंत जरूर प्रसिद्ध करावे, अशी जर जोडून विनंति आहे. कळावे.

आपला,
गुलाबराव गुंडोजी मोहोड.
माधानकर, हल्ली मुक्काम अमरावती

मुमुक्षु. १५ आक्टोबर, १९१४

---

* टीप – या लेखावर वे.शा.स. बाळशास्त्री हुपरीकर यांनी महाराजांस पत्र पाठवून हा वाद वर्तमानपत्रातून चालविण्याची इच्छा प्रदर्शित केली होती. पण लवकरच महाराज तिरोभूत झाल्यामुळे तो प्रश्न तसाच राहिला. पुढे महाराजांचे पट्टशिष्य गुरुभक्तिपरायण श्रीनारायणराव पैकाजी पंडित उर्फ श्रीबाबाजी महाराज यांनी स्वकर्तव्य म्हणून तो वाद पुढे मुमुक्षु मासिकातून चालविला व "शंकराचार्यमतात आणि तातमतात भेद नाही हे विवरणादि पुराव्यानिशी सिद्ध करण्यास मी तयार आहे" ही महाराजांची प्रतिज्ञा पुरी केली. तो वाद पत्र ४४, ४५ मध्ये दिला आहे. तसेच विविधलेखसंग्रह भा. २ मध्ये श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा चिद्विलासवाद या लेखात आणि अमृतानुभवकौमुदीच्या ७८ पानांच्या प्रस्तावनेत "श्रीशंकराचार्य आणि श्रीज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान एकच आहे" हे निर्णायक पुराव्यानिशी युक्तिसिद्ध मांडून आपले गुरुऋण श्रीबाबाजीमहाराजपंडितांनी पूर्णपणे फेडले आहे.

## माझ्यासंबंधी गैरसमजुती

मुमुक्षु गुरुवार ता. १९ नोव्हे. १९१४

[ स्वत:ला शूद्र म्हणण्याचे कारण– ग्रंथरचना महाराजांची की ब्राह्मणांची ?– महाराज ग्रंथ ऐकून इकडचे तिकडचे लिहितात– शौचाचे वेळी ग्रंथवाचन– यक्षिणीसाधन ?– गृहस्थाश्रमाच्या आग्रहाचे कारण– ब्रह्मचर्याच्या दोन परीक्षा– परिस्थितीने अधर्मात गेलो तरी दुसऱ्याला धर्म सुचवून मरेन ]

।। श्री ज्ञानेश्वरमाऊली ।।

**रा. रा. मुमुक्षुकर्ते यांस:–**

**१) स्वत:ची महती गाणे हे प्राचीन अर्वाचीन सज्जनमंडळीत वाईट गणले गेले आहे.**

'परै: प्रोक्ता गुणा यस्य निर्गुणोऽपि गुणी भवेत् ।
इंद्रोऽपि लघुतां याति स्वयं प्रख्यापितैर्गुणै: ।।'

**असे एक सुभाषितही प्रसिद्ध आहे. परंतु अधर्माला प्रतिबंध करण्याकरिता स्वत:ची महती देखील गावी असे वसिष्ठ म्हणतात. या वचनाचा आधार धरून एकतीस वर्षे न काढलेले उद्‌गार काही परिस्थितीमुळे काढणे भाग पडत आहे. त्याबद्दल वैदिक संत मंडळींच्या चरणाजवळ मी क्षमा मागून घेतो. काही ब्राह्मणव्यक्ति, माझ्याविषयी तरी हलके मन करीत असल्या, तरी त्यांनी माझ्याविषयी लोकात फारसे वाईट मत फैलाविले नाही, परंतु ब्राह्मण होण्याकरिता हपापलेले ब्राह्मणेतर माझ्याविषयी गैरसमजुती लोकात उत्पन्न करीत आहेत, त्यात सर्वांनी मिळून एकत्र जेवावे असे म्हणणारे काही वारकरीही आहेत. ह्या गैरसमजुती कसकशा फैलावल्या आहेत त्या क्रमाने देऊन त्यांचे यथामति उत्तर देतो.**

**२)** पहिली:–**'गुलाबराव महाराज देखील स्वत:ला कागदपत्री 'क्षत्रिय' लिहितात.'**

प्रतिकार:—**आमच्या काही मंडळीने 'क्षत्रिय' लिहिण्याचा प्रचार नवीन पाडला आहे. यापूर्वी आम्ही आपल्यास ' तिरोळे कुणबी ' लिहीत होतो. ते काही असले तरी स्वत:ला मी ' क्षत्रिय ' लिहीत नाही, ' शूद्र ' लिहितो. घटकाभर खोटी कल्पना करून 'मी द्विज आहे' असे जरी घेऊन चाललो तरी अनंत कालापासून संस्कारविछिन्न झाल्यामुळे कलियुगाच्या शेवटी होणाऱ्या मरु व देवापि या दोन महात्म्यांशिवाय मला क्षत्रियत्व देणे दुसऱ्याच्या हाती नाही, हे वैदिक धर्मावर विश्वास असल्यामुळे मला ठाऊक**

आहे. बरे, वैदिक धर्मावर माझा विश्वासच नसला, तर मग मला द्विजत्वच कशाला हवे आहे ! इतर लोकांना काय कलाकौशल्य साधता येत नाही ?

३) दुसरी:–ब्राह्मण स्वतः ग्रंथ करितात व त्यांवर गुलाबराव महाराजांचे नाव घालतात. ब्राह्मणांनी गुलाबरावांस मुद्दाम पुढे केले आहे.

प्रतिकार–ही गोष्ट अत्यंत खोटी आहे. या गोष्टीचे प्रत्यंतर दाखविण्याकरिता मी केवढ्याही मोठ्या समाजात ग्रंथ रचण्यास तयार आहे. शिवाय मजजवळ असलेल्या मंडळीलाही माझे सर्व ग्रंथ सध्या समजत नाहीत. शिवाय मी स्वतः ग्रंथ रचतो की नाही हे प्रत्यक्ष येऊन वाटेल त्याने पहावे; नाहीतर पुढे ‘ गुलाबराव आमच्या जातीचेच होते, त्यांना पुढे करून ब्राह्मणांनी काहीतरी ग्रंथ रचले ’ असा कुत्सित वाद गुप्तपणे लोकांनी सुरू करण्याचा संभव आहे.

४) तिसरी:–गुलाबरावाला मंडळी ग्रंथ वाचून दाखवितात व नंतर ते इकडचे तिकडचे लिहितात.

प्रतिकार:–या म्हणण्यावर असा प्रश्न आहे की, मी जे ग्रंथ लिहितो ते समजून लिहितो की न समजून लिहितो ? पहिल्या पक्षी ‘चित्सुखी’सारखे ग्रंथ समजावून देणारा मजजवळ कोण आहे, याचा शोध अवश्य करावा. अथवा ‘चित्सुखी’सारख्या ग्रंथातील अक्षरे वाचून त्यांतील प्रमेये तरी या मंडळीतील कोणी लिहून दाखवावी. उमरावतीस येण्यापूर्वी हे ग्रंथ मजजवळ नव्हते हे सर्व मंडळीस ठाऊकच आहे. मागाहून उमरावतीस येऊन मला १०।११ वर्षे झाली. त्यापूर्वी संस्कृत व्याकरण शिकलेल्या वाचकांशी माझा संबंधच पडला नाही; आणि उमरावतीस यऊन जरी हे ग्रंथ मी मागविले, तरी त्यांचा समजदार वाचक मला कोणीच मिळाला नाही. या माझ्या म्हणण्याची सत्यता पाहण्याकरिता कोणाहीजवळ कोणीही शोध करावा ! याबद्दल मी सरसकट परवानगी देतो. या चित्सुखीसारख्या ग्रंथाचे उतारे माझ्या ग्रंथांत समीक्षापूर्वक आले आहेत. अनार्य भाषेतील ग्रंथ मात्र मी दुसऱ्याकडून वाचून घेतो हे खरे आहे. वेदांतग्रंथही मी दुसऱ्याकडून अलीकडे वाचून घेतो, पण त्यांचे पूर्वप्रमाण मीच सांगत असतो. यावरून मी कोणी अलौकिक आहे असे भासविण्याचा माझा प्रयत्न नाही, तर ही वस्तुस्थिति खरी आहे की नाही, हे माझ्या जातिबांधवाने येऊन पहावे.

५) चवथी—'गुलाबरावमहाराज शौच्याच्या वेळेस ग्रंथ वाचतात. त्यांनी काहीतरी यक्षिणीसाधन केले म्हणूनच त्यांना शौच्याला इतका वेळ लागतो.'

प्रतिकार—चार वर्षांपूर्वी मला शौच्यास इतका वेळ लागत नसे, हे सर्व मंडळीस ठाऊक आहे. पुण्याकडील मंडळीशी देखील माझा पहिला परिचय झाला तेव्हा इतका वेळ लागत नव्हता. हा वेळ मला रोगामुळे लागतो. शिवाय शौच्याच्या वेळी जप करून प्रसन्न होणाऱ्या देवता वेदांतज्ञान सांगू शकतात असे उपलब्ध तंत्रवाक्याने जर हे आक्षेपक सिद्ध करतील तर बरे होईल; कारण अशा क्षुद्र देवतांची साधने तंत्रांतच असावयाची. शौच्याला फार वेळ लागतो म्हणून करमणुकीकरता मी आडून दुसऱ्याने वाचलेले ग्रंथ ऐकतो हे खरे आहे; परंतु ते ग्रंथ 'शौच्याला पाणी घेऊन गेलेच पाहिजे' असा नियम जी भाषा सांगत नाही त्या भाषेचेच असतात. आता शौच्याचा रोग असल्यामुळे एनिमा घेण्याकरिता पाणी मागण्यासाठी मला कधी कधी तोंडाने हांका मारणे भाग पडते. माझा हा रोग कोणी बसवून देईल तर हे पाप मी पुढे करणार नाही हे शपथ घेऊन सांगतो.

६) पांचवी——'गुलाबरावमहाराज ब्रह्मचर्याला पुष्टि देत नाहीत.'

प्रतिकार—ही गोष्ट अत्यंत खोटी आहे. माझे मत यासंबंधी इतकेच आहे की, हिमालयावर सतत समाधि लावून बसल्याशिवाय अधुकल्ल्या मधुकल्ल्या खाऊन रामराम जपणाऱ्या माझ्यासारख्याला कडक ब्रह्मचर्य साधत नाही, मग ते झांकून नेण्याकरिता भलते प्रयत्न करण्यापेक्षा विवाह करणेच उत्तम असे मी स्पष्ट म्हणतो. म्हातारा, रोगी, मध्यमप्रकृति, आणि एकाही दिवसापुरते खावयास नाही असा दरिद्री, ही चौघे वर्ज्य करून बाकी राहिलेल्या सर्वांनी विवाहच करावा असे मी स्पष्ट लिहून ठेवले आहे. ब्रह्मचर्य पाळावयाचेच असेल तर दोघांनी मिळून पाळावे, पण विवाहावाचून राहू नये. साधु होऊन उपद्याप करणे मला पसंत नाही.

७) आता ब्रह्मचर्याच्या दोन परीक्षा आहेत; पहिली बाह्य आहे ती अशी :—१—गण्यरज्जु कंठापासून स्तनापर्यंत घेऊन नंतर मस्तकावर धरावा. त्या रज्जूत बालकाच्या मस्तकाप्रमाणे मस्तक आले म्हणजे ब्रह्मचर्य आहे असे समजावे. पण या परीक्षेला अपवाद असण्याचा संभव आहे. २—दुसरी परीक्षा अशी आहे की, साधुपुरुषाला एक दिवसभर खुर्चीसारख्या उच्च आसनावर बसलेले ठेवून अन्नपाणी न देता त्याचे स्वर पहावे. स्वर

तिथि, वार व घटकेप्रमाणें बरोबर पालटत गेले पाहिजेत आणि ज्या स्वरांत जे तत्त्व चालते ते त्या त्या वेळी त्याच स्वरांत बरोबर चालले पाहिजे; म्हणजे ब्रह्मचर्य आहे असे समजावे. (i) तत्त्व पाहणे ते योग येत असेल तर आपल्या तत्त्वाशी मिळवून पहावे आणि (ii) योग येत नसेल तर कांशाचा आरसा समोर धरून पहावे म्हणजे रंगांची प्रतिबिंबे स्पष्ट कळतात. (iii) तसेच त्याचे वजन पाण्यावर कागद टाकून पहावे. कातणीचे घर मिळाल्यास चांगले पाहतां येते. पुनः मी प्रबळ निग्रह करीत असलो तरीही मला मानसिक विकार कधीं कधी उत्पन्न होतात. हे दौर्बल्य माझ्यामध्ये आहे. म्हणूनही मी आपल्या ग्रंथांत असे लिहिले. योगाभ्यासाहून निराळ्या वेळी माझे हे क्षणिक मानसिक दौर्बल्य दूर करण्याचा यत्न जर कोणी सांगेल तर मी त्याला तातांप्रमाणे समजून त्याच्या म्हणण्याप्रमाणे आपल्या ग्रंथांतून हा भाग काढून टाकीन.

८) सहावी :—‘बोवा शूद्र म्हणवितात, तर बोवाच्या मुलाला मुलगी मिळणार नाही.’

प्रतिकारः–मिळणार नाही तर माझ्या वंशाचे जसे व्हावयाचे असेल तसे होईल. परिस्थितीने बलेकरून मला अधर्मांत ओढून नेले तरी मी तोंडाने दुसऱ्याला धर्म सुचवून मरेन हा माझा निश्चय आहे.

हा लेख कृपा करून लवकर छापावा. याची सर्व जबाबदारी मजवर आहे.

मुकदम माधान हल्ली, मु. अमरावती आपला,
ता. १।११।१४ गुलाबराव गोंडूजी मोहोड

□□□

## ४३. गोरक्षण–धार्मिक व वैद्यक दृष्टी

[ वचन बळ असेल तर परमेश्वर व्यक्त होतोच असा वैदिक सिद्धान्त– वैदिक धर्म निःपक्षपाती–गोरक्षणाला मुसलमान धर्माचाही विरोध नाही– गोमांसभक्षणाने रोगोत्पत्ती असा वैद्यकातील इतिहास– क्षय संग्रहणी वगैरे रोगांवर पचगव्याचा उपयोग– धर्मतः अर्थतः व कामतः गोरक्षणाची जरूरी– ब्राह्मणांतील धर्म जाईल पण गायीतील धर्म कधीच जाणार नाही]

॥ श्रीज्ञानेश्वर माऊली ॥

आर्याः– आळंदिपति करुणाघन वंदुनि तच्चरणपंकजा भावे ।
गोचरणधूलिधूसर पांडुरंगसम निजांग शोभावे ॥१॥

निर्विकार परमात्मा व्यापक सर्वत्र शुद्ध सामान्य ।
प्रकटे विशेष परि तो वेद वदे जेथ पूज्यता मान्य ।।२।।
वर्णधर्म जन सोडिति तै गाई रक्षिजे असे वाचे ।
वदले संत महाजन जे आवडले अखंड देवाचे ।।३।।
कृष्णदास म्हणवी तो व्हावा गोरक्षणासि अनुकूल ।
गोवर्धन धरुनि नखीं गोपाळें पाळिले स्वगोकूल ।।४।।
सत्संप्रदायिकांनी धेनूतें पाळणे अशी आज्ञा ।
गर्वे वा नम्रत्वें संमत हे कार्य होय सर्वज्ञा ।।५।।

१) ज्या ज्या विषयी वचनबळ असेल त्या त्या ठिकाणी परमेश्वराची उपलब्धि होते असा वैदिक धर्माचा सिद्धान्त आहे. एकादी वस्तु मलिन असो किंवा निर्मल असो, परमेश्वराचे वास्तव्य तीत नाही असे नाही; परंतु त्याला व्यक्त कसे करावे हे श्रुतिमातेलाच ठाऊक आहे. सामान्य रूपानें निर्गुण परमेश्वराचे वास्तव्य सर्वत्र असून अवताररूपाने व विभूतिरूपाने विशेष वास्तव्य आहे. देव, मनुष्य व तिर्यक् या योनींमध्ये परमेश्वराचे अवतार व विभूति स्पष्ट दृष्टीस पडतात. एवढ्यावरूनच आमचा वैदिक धर्म अत्यंत निःपक्षपाती आहे. सर्वांवर पूज्यबुद्धि, किडामुंगीपासून तो उच्च प्राण्यांपर्यंत सर्वांवर भूतदया, अशी बुद्धि याच धर्मापासून उत्पन्न होते. सर्वत्र ब्रह्मबुद्धि ठेवावयास सांगणाऱ्या जगज्जननी भगवती श्रुतीच्या उपदेशापुढे आपले वीतभर पोट जाळण्याकरिता व निर्दयपणाने मांस भक्षण करून पुष्ट होण्याकरिता काढलेल्या Cow has not a soul ‘गाईला आत्माच नाही’ इत्यादि वाक्यांची मातब्बरी काय? गाईचे रक्षण करण्याविषयी अनेक श्रुतिस्मृति उपलब्ध आहेत; त्यांचा स्थलविशेषी उद्गार करीन.

२) गोरक्षणाविषयी हिंदु व जैन या दोन धर्मांचे अत्यंत एक मत असून, मुसलमान धर्माचाहि विरोध येईल असे वाटत नाही. कारण मुसलमानांच्या जुबे करण्याच्या मंत्रामध्ये गाईचे नाव कोठेही नाही; तो मंत्र असा--

“नवितोअन् अरबाराकोतन् दुश्मन् हलालन् तैय्यबन्
सुन्नतन् खैरुल इभ्राईल बिस्मल्लाह अल्लाह अकबर”

या मंत्रात दुम्मा नावाची एक मेंढराची जात आहे तिचा उल्लेख केला आहे. श्रीमद्भागवतांत यज्ञाच्या हिंसेविषयी अति खाणाऱ्यालाच थोडे खावे म्हणून जो संकोच सांगितला आहे तसाच संकोच मुसलमानी मतासहि

लागू असला पाहिजे. नाहीतर दुम्मा म्हणून जर कोणत्या तरी पशूवर आपत्ति यावयाची आहे, तर प्राणी म्हणून मनुष्यावरहि येण्याचा संभव आहे. बाबासाहेब शेखमहंमद यांनी हिंसेचा स्पष्ट निषेध केला असून, कबीर, नानक या यवनमतांतील सार वेचून घेणाऱ्यांनी हिंसेवर तडाखा झाडला आहे.

३) वैद्यशास्त्राचा इतिहास पाहिला तर गाईचा अपमान केल्यामुळे व तिची हिंसा झाल्यामुळे कित्येक रोगांचे आमच्या देशांत ठाणे होऊन बसले आहे. 'अतिसारचिकित्साध्यायां'त अशी कथा आहे––

"भगवंतं खलु आत्रेयं कृताह्निक कृताग्निहोत्रमासीनमृषिगणपरिवृतमुत्तरे हिमवतः पार्श्वे विनयादुपेत्याभिवाद्य अग्निवेश उवाच–भगवन्, अतिसारस्य प्रागुत्पत्तिनिमित्तः लक्षणोपशमनानि प्रजानुग्रहार्थमाख्यातुमर्हसीति ॥ १ ॥

अथ भगवानात्रेयस्तदग्निवेशवचनमनुनिशम्योवाच–श्रूयतामग्निवेश । सर्वमेतदखिलेन व्याख्यायमानम् ॥ २ ॥

आदिकाले खलु यज्ञेषु पशवः समालभनीया बभूवुर्नारंभाय प्रक्रियन्ते स्म । ततो दक्षयज्ञप्रत्यवरकालं मनोः पुत्राणां मरिष्यन्नाभागेक्ष्वाकुकुकुविडचर्येत्यादीनां च ऋतुषु पशूनामेव अभ्यनुज्ञानात् पशवः प्रोक्षणमवापुः । अतश्च प्रत्यवरकालं पृषध्रेण दीर्घसत्रेण यजमानेन पशूनामलाभाद्गवामालभः प्रवर्ततितः । तं दृष्ट्वा प्रव्यथिता भूतगणास्तेषां चोपयोगादुपकृतानां गवां गौरवादौष्ण्यादसात्म्यत्वादशस्तोपयोगाच्चोपहताग्नीनामुपहतमनसाम अतिसारः पूर्वमुत्पन्नः पृषध्रयज्ञे ॥ ३ ॥"

अर्थ :–"अग्निहोत्र व आह्निक इत्यादि ज्यांचे संपूर्ण झाले आहे अशा सुखासनस्थ भगवान् आत्रेयांना अग्निवेश म्हणाले, भगवन् मला अतिसाराची उत्पत्ति सांगा. १. तेव्हा भगवान् आत्रेय म्हणाले, सर्वांनी ज्या प्रकारची उत्पत्ति सांगितली आहे, त्याच प्रकारची उत्पत्ति तुला सांगतो; ऐक. २. पूर्वी यज्ञामध्ये पशूची हिंसा होत नव्हती. परंतु पुढे इक्ष्वाकु वगैरेंच्या यज्ञात पशूंची हिंसा होऊ लागली. पुढे पृषध्रांनी दीर्घकालपर्यंत एक यज्ञ केला. त्यात पशु न सापडल्यामुळे त्याने गाईचा वध करण्यास आरंभ केला, त्यामुळे सर्वांवर कृपा करणाऱ्या त्या जगन्मातेसाठी सर्व प्राण्यांना ताप होऊ लागला. गाईचे मांस अतिशय जड, अविहित व अयोग्य असल्यामुळे पृषध्र राजाच्या यज्ञातच अतिसाराची उत्पत्ति झाली. तोपर्यंत या पृथ्वीवर अतिसार म्हणून ठाऊक नव्हता."

४) असा या वचनांचा भावार्थ असून याचा विशेष विचार मी संप्रदायसुरतरूत केला आहे. गाईच्या शुद्ध दुधाचा, शुद्ध तुपाचा, शुद्ध ताकाचा व दह्याचाही अनेक रोगांवर उपयोग सांगितला आहे, सुवर्ण उगाळून नुस्ते गाईचे दूध क्षयावर फार उपयोगी होण्यासारखे आहे. दही एकंदर वैद्यशास्त्रात जड सांगितले आहे; तरी गाईचे दही (सं)ग्रहणीवर अत्यंत उपयोगी आहे. गाईचे ताक तर अत्यंत उपयोगी असून हजारो औषधे दिली तरी गाईचे ताकावाचून संग्रहणी जात नाही असे स्पष्ट म्हटले आहे. आमच्या पाश्चात्त्य भ्रातृवर्गालाही ताकाचे महत्व चांगले कळू लागले असून, ताकाने म्हातारपण येत नाही असे त्यांचे लेख आंग्लवैद्यक मासिक पुस्तकांतून चमकत आहेत. हे गुण गाईच्या ताकात विशेष आहेत. गाईच्या तुपाचा तर आरोग्य स्थितीत व रोगी स्थितीत सारखाच उपयोग आहे.

५) तात्पर्य, धर्मतः अर्थतः कामतः गाईचे रक्षण करणे आम्हां आर्यांचे पहिले कर्तव्य असले पाहिजे असे मला वाटते. द्वैत, विशिष्टाद्वैत, केवलाद्वैत, इत्यादि वैदिकमतात अनेक भेद असले तरी गोरक्षण करण्याविषयी त्या सर्वांचे मतैक्य आहे. त्यामुळे गोरक्षण करणे म्हणजे कोणत्याही धर्माचा द्वेष करणे नसून, त्यात केवळ स्वधर्मपालनच आहे. ब्रिटिश सरकारानी जो 'ॲनिमल ॲक्ट' केला आहे, त्याचेहि उल्लंघन गाईचा अपमान करणाऱ्याकडून होते. म्हणून सर्वांनी इकडे लक्ष देऊन, "जी आपल्या वासराकडे न पाहाता आम्हा मनुष्यपुत्रांचे दुग्धाने रक्षण करिते, त्या धेनुमातेची चरणसेवा करण्यात आपले आयुष्य सतत उपयोगात आणावे. आपत्कालीं गोरक्षणच श्रेष्ठ आहे," असे एकनाथस्वामींनी म्हटले आहे. गाई व ब्राह्मण वैदिक धर्माचा मुख्य पाया आहे, तथापि प्रसंगविशेषी कलीतील ब्राह्मण धर्म सोडतील असे म्हटले आहे, परंतु गाईमधील धर्म निघून जाईल असे वाक्य कोठेहि नाही. म्हणून वेदोक्ताचा व्यर्थ हट्ट धरणाऱ्या लोकांचा ब्राह्मणांशी थोडासा विरोध असला तरी गोरक्षणाकरिता त्यांनी उत्तम झटले पाहिजे. तात्पर्य, कोणीच धेनुजननीचा अव्हेर करू नये अशी माझी गरिबाची सर्वांच्या चरणांजवळ विनंति आहे. तिचा आलंदिवल्लभकृपेने सर्वच स्वीकार करोत.

आपला,

गुलाबराव गुंडोजी मोहोड.

मुकदम माधान, हल्ली मुक्काम मुंबई, सरदारगृह.

गुरुवार, आश्विन शु. २ शके १८३५

गोरक्षण मासिक

[ श्रीगुलाबरावमहाराजांचे मनोरथ पूर्ण करण्याचा प्रयत्न-शंकराचार्य मतातील मायावाद ज्ञानदेवांनी अज्ञानी लोकांच्या दृष्टीने केलेला अविद्येचा अंगीकार-अज्ञानखंडन व ज्ञानखंडन-आचार्य व विद्यारण्यांचा चिद्विलास-विवर्तवाद-समसत्ता व विषमसत्ता-अज्ञान शब्दमात्र-तिघांचेही ऐकमत्य. ]

# शंकराचार्य व ज्ञानेश्वरांचे ऐकमत्य

मुमुक्षु ता. १ सप्टेंबर १९१७

**रा. रा. मुमुक्षुकर्ते यांस, वि. वि.**

**१) वेदशास्त्रसंपन्न बाळशास्त्री हुपरीकर (संस्कृत शिक्षक राजाराम हायस्कूल कोल्हापूर) यांनी "विद्यारण्य व श्रीज्ञानेश्वर यांच्या मतांचे तात्पर्य" ह्या नांवाचा निबंध लिहिला असून त्यात विद्यारण्यांचे वेदान्तावरील मत व श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वेदान्तावरील मत यांतील भेद दाखविला आहे. व तसाच श्रीशंकराचार्य व श्रीज्ञानेश्वर या मथळ्याखालीं शंकराचार्य व श्रीज्ञानेश्वर यांची वेदान्तावरील मते सांगून त्यांतीलही भेद दुसऱ्या एका निबंधात दाखविला आहे. यावर श्रीगुलाबरावमहाराजांनी,** "विद्यारण्य किंवा श्रीज्ञानेश्वरमहाराज त्याचप्रमाणे श्रीशंकराचार्य व श्रीज्ञानेश्वरमहाराज यांच्या वेदान्तावरील मतात मुळीच भेद नाही, तर ज्या ठिकाणी श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अज्ञानादिकांचा अंगीकार केला नाही व त्यांचे खंडण केले त्याच ठिकाणी श्रीशंकराचार्य व विद्यारण्य हेही अज्ञानाचा अंगीकार करीत नाहीत" **असे सिद्ध करून दाखविण्याची प्रतिज्ञा मागे आपल्या पत्रातून केली होती. पण तो त्यांचा मनोरथ पूर्ण न होता त्यांचे देहावसान झाल्यामुळे तसाच अपूर्ण राहिला. म्हणून त्यांचे मनोरथ आपण यथाशक्ति पूर्ण करावे या इच्छेने मी आपल्या पत्रातून वे. शा. सं. बाळशास्त्री हुपरीकर यांच्या दोन्ही निबंधांची समीक्षा करण्याचे योजिले आहे. तरी त्याला आपल्या पत्रात जागा द्याल अशी आशा आहे.**

**२)** "तमोरजः सत्वगुणा प्रकृतिर्द्विविधा च सा" **पंचदशीतील तत्त्वविवेक प्रकरणातील या श्लोकात विद्यारण्यस्वामींनी अज्ञानाचा अंगीकार केला आहे. त्याच प्रमाणे,**

एवमयमनादिरनन्तो नैसर्गिकोऽध्यासो मिथ्याप्रत्ययरूपः कर्तृत्वभोक्तृत्वप्रवर्तकः सर्वलोकप्रत्यक्षः ॥ **ही पंक्ति देऊन श्रीशंकराचार्यांनी ब्रह्मसूत्रशांकरभाष्यात मायेचा अंगीकार केला आहे.**

३) पण वे. शा. सं. बाळशास्त्री हुपरीकर यांनी "अपूर्व ज्ञानाक्षरी । वसता ज्ञानाची थोरी । शब्दार्थाची उजरी । अपूर्व नव्हे" ही ओवी देऊन ज्ञानविरोधी अज्ञानाची सिद्धि नाही, कारण—अहो आत्मेन जे बाधे । ते आत्मेनसी नांदे । ऐसी कायसी विरुद्धे । बोलणी इथे ॥ ज्या अज्ञानाचा आत्म्याने बाध होतो ते ज्ञानाच्या विरोधी असलेले अज्ञान आत्म्याचा आश्रय करून कसे राहील? कारण विरोधी पदार्थ "एकाधिकरणक" नसतात. याचप्रमाणें अमृतानुभवातील ७ व्या अध्यायातील अज्ञानखंडणपर ओव्या प्रमाण देऊन "श्रीज्ञानेश्वर-महाराजांचे मतात अज्ञानाची सिद्धी नाही" असे दाखविले आहे.

४) पण माझ्यामते श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अज्ञानाचे सर्वथा खंडन केले नसून, अंधार जर पदार्थाचे ज्ञान होऊं देईल तर त्याला अंधार म्हणणें जसे व्यर्थ आहे; म्हणजे नुसता अंधार हा शब्दच राहतो. अंधाराचा जो धर्म "पदार्थाचे ज्ञान न होऊं देणे" तो प्रगट होत नसल्यामुळे अंधाराची प्रतीति नाही. त्याप्रमाणें अज्ञान या शब्दाने दाखविलेला धर्म "स्वरूपाचे ज्ञान न होणे" तो प्रगट न झाल्यामुळे त्याला अज्ञान म्हणणे व्यर्थ आहे. कारण आत्म्याला परोक्ष करणारी वृत्तीच असल्यामुळे व "वृत्ति हे अज्ञानकार्य असले तरी अज्ञानाचा धर्म तिचे ठिकाणी नाही" पदार्थ दाखविणाऱ्या अंधारास अंधार म्हणणें जसे शब्दमात्र आहे किंवा सुवर्णाची गौर किंवा अंबिका करून त्या सुवर्णावर केलेल्या मूर्त्यारोपामुळे सुवर्णबोधाचा लोप होत नसून त्याला अंबिका किंवा गौर इत्यादिक नावे देऊन सुवर्णाहून शब्दभिन्नमात्र प्रतीति आपणाला येते तसें अज्ञानाच्या योगाने ज्ञानाचा (आत्म्याचा) लोप होत नसून उलट "अज्ञानकार्य जी वृत्ति तिच्याने आत्म्याचा प्रकाश होतो." ह्मणून अज्ञान हे शब्दमात्र आहे.

५) अपूर्वा ज्ञानाक्षरी । वसता ज्ञानाची थोरी । शब्दार्थाची उजरी । अपूर्व नव्हे की ॥ २७५ ॥ (अमृ. अ ७)—ज्ञान आणि अज्ञान हे दोन्ही शब्दच भिन्न आहेत, ह्यांचा अर्थ भिन्न नाही. असा या ओवीचा भावार्थ आहे. या विवेचनात रज्जूच्या ठिकाणी भासलेला सर्प जरी रज्जूवर भासतो तरी ज्याप्रमाणे तो रज्जूवर मुळीच नसतो व त्याची स्थिति व निवृत्ति शब्दमात्र आहे, त्याप्रमाणे अज्ञान हे अज्ञान्याच्या दृष्टीने जरी असले तरी त्याच्या योगाने आत्मस्वरूपाचा लोप होत नाही; ह्मणून त्याची प्रतीति व निवृत्ति शब्दमात्र आहे, असे अज्ञानाचे व ज्ञानाचे खंडन करून

**श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सिद्ध केले आहे. अज्ञान्याच्या दृष्टीनेही अज्ञान नाही असे त्यांनी प्रतिपादन केले नाही. हा अर्थ ज्या ओव्यात त्यांनी प्रतिपादन केला आहे त्या ओव्या मी येथे देतो–**

एवं माध्यानीची दिवी । तम धाडी ना दिवो दावी । तैसी उभयतां पदवी । शब्दां झाली ॥ ९५. अ. ६. ॥ आता अविद्या नाहीपणे । नाही तियेते नाशणे । आत्मा सिद्ध मा कोणे । काय साधावे ? ॥ ९६.६ ॥ बागुला आला म्हणिजेते । बोलणे जैसे रिते । कां आकाश ओळंबते । तळहातीं कायी ? ॥ ९९.६ ॥ तैसी निरर्थके जल्पे । होवोनिया सपडपें । शोभती जैसे लेपे । रंगावरी ॥ १००.६ ॥ एवं शब्दैकजीवने । बापुडी ज्ञानें अज्ञानें । साचपणे उणे । चित्रींचे जैसी ॥ १०१.५ ॥

**६) ही अज्ञानाची शब्दमात्र प्रतीति ज्ञानदृष्टीनेच आहे असे सांगून** जैसी स्वप्नीं स्वप्नमहिमा । तमीं मानू असे तमा । तेवि अज्ञानगरिमा । अज्ञानींचि ॥ **या ओवीत अज्ञान्याचे दृष्टीने अविद्येचा अंगीकार केला आहे. श्रीज्ञानेश्वर-महाराजांचे अज्ञानखंडन**–अज्ञाने जेथे असावे । तेणे सर्व नेण होवावे । ऐसी जाति स्वभावे । अज्ञानाची ॥ **या ओवीत सांगितल्याप्रमाणे अज्ञान जर आहे तर अज्ञानाचा जो जातिस्वभाव–काहीच समजू न देणें–हा प्रगट झाला पाहिजे. व हा जातिस्वभाव प्रगट होत नसला तर तर ते अज्ञान शब्दमात्र समजावे. या मुद्याला धरून आहे. याप्रमाणे** एवं कोणेही परी । अज्ञानभावाची उजरी । न पडेचि नगरीं । विचाराचिये ॥ अमृ. अ. ७. ओ. ७७ ॥ **यात सांगितल्या-प्रमाणे ज्ञानकाळी अज्ञानाची 'असिद्धि' व** "अविद्येचे अडवे । भुंजीत जीवपणाचे भवे । तया चैतन्याच्या धांवे । धांवेकारू जो ॥ मोडोनिया मायाकुंजरू । मुक्तिमोतियाचा डोंगरू । जेवविता सद्गुरु । श्री निवृत्ति वंदू ॥ जयाचेनि कृपातुषारे । परतले अविद्येचे मोहरे । परिणमे अपारे । बोधामृते ॥" **यात सांगितल्याप्रमाणे अज्ञानकाळी अविद्येचे ग्रहण श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीही केले आहे.श्रीज्ञानेश्वरमहाराजांप्रमाणें श्रीशंकराचार्यांनी आपल्या विवेकचूडामणीमध्ये ज्ञानकाळी अज्ञान नसून अज्ञानाचे कार्य जे विश्व ते आत्मस्वरूपच आहे. त्याची भिन्न प्रतीति मुळीच नाही, असे सांगितले आहे. ते श्लोक येणे प्रमाणे–**

यत्र भ्रान्त्या कल्पितं यद्विवेके । तत्तन्मात्रं नैव तस्माद्विभिन्नम् । भ्रांन्तेर्नाशे भ्रान्तिदृष्टाहितत्वं । रज्जुस्तद्वद्विश्वमात्मस्वरूपम् ॥ ३८८ ॥ तरंगफेनभ्रमबुद्बुदादि सर्वं स्वरूपेण जलं यथा तथा । चिदेव देहाद्यहमन्तमेतत् सर्वं चिदेवैकरसं विशुद्धम् ॥ ३९१ ॥

**७) त्याचप्रमाणे** "तदनन्यत्वमारंभणशब्दादिभ्यः" **या सूत्रात अज्ञानाची शब्दाने स्थिति व शब्दाने निवृत्ति असल्यामुळे ते अधिष्ठानस्वरूपच आहे, असे आचार्यांनीही प्रतिपादन केले आहे. आचार्यवेदान्त किंवा विद्यारण्यवेदान्त**

या दोहोंतही अज्ञानाचे कार्य जे जगत् ते ब्रह्माचे ठिकाणी विवर्तस्वरूप मानले आहे, व विवर्तकार्य हे अधिष्ठानाशी विषमसत्ताक असल्यामुळे अधिष्ठानाहून कधीच भिन्न नसते. समसत्तेतील दोन पदार्थच दोन्ही सत्य असल्यामुळे परस्पर विरोधी असतात. विषमसत्तेतले दोन पदार्थ विरोधी नसतात. तर त्यापैकी जो पदार्थ सत्य असेल तत्स्वरूपच तो दुसरा मिथ्या पदार्थ असतो. विषमसत्तेतले दोन पदार्थ अभिन्न असून भिन्न भासणे हेच अज्ञान किंवा मिथ्या प्रतीति आहे. आचार्यांनी अध्यासाचे लक्षण असेच केले आहे. "अध्यासो नाम अतस्मिंस्तद् बुद्धिः ।" विषमसत्ताक दोन वस्तूंपैकी मिथ्यावस्तूचे ठिकाणी सत्यबद्धि होणे याचे नाव अध्यास आहे, व ते कार्य विवर्त असून आपल्या अधिष्ठानाहून भिन्न नाही असे समजणे हे ज्ञान आहे. अर्थातच ज्ञानकाली विवर्तकार्य अधिष्ठानस्वरूपच असते. त्याचप्रमाणे ज्ञानकाळी अज्ञानाची सिद्धी विद्यारण्यांनाही संमत नाही. "आकाशादिस्वदेहान्तं तैत्तिरीयश्रुतिरीरीतम् । जगन्नास्त्यन्यदानन्दादद्वैतब्रह्मता ततः ।।" इत्यादि श्लोकांनी आरंभ करून पंचदशीतील 'ब्रह्मानंदे अद्वैतानन्दः' या प्रकरणात ज्ञानकाली अज्ञानप्रतीति मुळींच नसते व ज्ञानदृष्टीने अज्ञान शब्दमात्र आहे असे बालस्य हि विनोदाय धात्री वक्ति शुभां कथाम् ।। या बावीसाव्या श्लोकापासून— बालकाख्यायिकेवेत्थं भवस्थितिरुपागता ।। या सत्तावीसाव्या श्लोकापर्यंत अज्ञानाची सिद्धि व निवृत्ति दोन्ही शब्दमात्रच आहेत असे त्यांनी प्रतिपादन केले आहे. व त्याचप्रमाणे पंचदशीच्या कूटस्थदीपप्रकरणात व विवरणप्रमेयसंग्रहात "यत्र प्रमाणाभावेऽप्यपरोक्षं दृष्यते तत्र साक्षिप्रत्यक्षतेतिहि वेदान्तमर्यादा" या वाक्याने साक्षीचे स्वतःप्रामाण्य सिद्ध करून अज्ञानाच्या योगाने ज्ञानाचा लोप होत नाही. असे प्रतिपादन केले आहे. याप्रमाणे श्रीज्ञानेश्वरमहाराज, विद्यारण्य व श्रीशंकराचार्य या तिघांनीही अज्ञानकाळी अज्ञानाचा स्वीकार करून अज्ञान नुसते शब्दमात्र आहे. व त्याची ज्ञानकाळी मुळीच स्थिति नाही, तसाच तिन्ही काळी आत्म्याचे ठिकाणी त्याचा संपर्क नाही असे ऐकमत्य दाखविले आहे.

८) आता श्रीज्ञानेश्वरमहाराज अज्ञानकाळीही अज्ञान मानीत नाहीत, चैतन्यस्फूर्तिवाद मानतात असे गृहीत धरल्यास यावर मी असे विचारतो की, ती स्फूर्ति तत्स्वरूप आहे ? की भिन्न स्वरूप आहे ? प्रथमपक्षी निरवयव व निर्गुण अशा ब्रह्माचे ठिकाणी सावयवत्व काय म्हणून दिसते ? श्रीज्ञानेश्वरमहाराजांप्रमाणे इतर सर्व जीवांनाही ब्रह्मबोध कां होऊ नये ? सर्वांना

**ब्रह्मबोध आहे व सर्व मुक्त आहेत असे मानल्यास शास्त्रप्रवृत्ति व्यर्थ होईल. परब्रह्म नित्य असल्यामुळे व त्याची स्फूर्तीही नित्य असल्यामुळे जगतही नित्य होईल. मग जगाचा प्रेत्यभाव किंवा आविर्भाव संभवणार नाही. जाग्रद्दशेत आपल्या चेतनत्वाची जशी प्रतीति आहे तशी सुषुप्तिकाली कां नसते ? आता ब्रह्मस्फूर्ती तत्स्वरूपच असून भ्रमाने त्याहून भिन्न स्वरूपाची भासते–असे म्हणाल तर याच भ्रमाला आचार्यादिक भ्रम मानतात. मग श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या मतात अज्ञानाचा अंगीकार नाही, असे म्हणण्यात काय अर्थ आहे?** दुसरापक्ष **संभवत नाही कारण आकाशाचा धर्म अंधार आहे असे म्हणण्यासारखे हे म्हणणे आहे. मायेशिवाय परब्रह्म जगद्रूप झाले आहे असे मानणारे शुद्धाद्वैतवादी व प्रत्याभिज्ञावादी आहेत. यांचे मत श्रुतिविरुद्ध असल्यामुळे मान्य नाही व त्याचे खंडन करिता येते. याप्रमाणें श्रीज्ञानेश्वर-महाराजांचे मत मानल्यास तेही श्रुतिविरुद्ध आहे असे म्हणावे लागेल. असो यापुढील समीक्षा वे. शा. सं. बाळशास्त्री हुपरीकर यांचेकडून उत्तर आल्या-वर करीन. कळावे**

आपला,  
नारायण पंडीत

□□□□

## वेदशास्त्रसंपन्न बाळशास्त्री हुपरीकर यांचे उत्तर

मुमुक्षु, ता. १ नोव्हेंबर १९१७

रा. रा. मुमुक्षुकर्ते यांसः–

वि. वि. श्रीयुत नारायण पंडित यांनी आम्ही मागे लिहिलेल्या "विद्यारण्य व ज्ञानेश्वर" आणि "शंकराचार्य व ज्ञानेश्वर" या दोन निबंधावर आपल्या पत्रांत आक्षेप घेतले आहेत; त्याबद्दल आम्ही यथामति उत्तर लिहून पाठवित आहो; तर आपण त्यास आपल्या पत्रांत जागा द्याल अशी आशा आहे.

अज्ञान या शब्दाने दाखविलेला धर्म स्वरूपाचे ज्ञान न होणें तो प्रगट न झाल्या-मुळे त्याला अज्ञान म्हणणे व्यर्थ आहे; कारण आत्म्याला अपरोक्ष करणारी वृत्तिच असल्यामुळे, व वृत्ति हे अज्ञानकार्य असले तरी अज्ञानाचा धर्म तिचे ठिकाणी नाही, शिवाय अज्ञानाच्या योगाने ज्ञानाचा (आत्म्याचा) लोप होत नसून उलट अज्ञानकार्य जी वृत्ति तिच्याने आत्म्याचा प्रकाश होतो. म्हणून हे शब्दभाग आहे, असे पूर्वपक्षकाराचे म्हणणे आहे.

पण हे म्हणणे सुसंगत दिसत नाही. कारण, अज्ञान जर शब्दमात्र आहे म्हणजे त्या शब्दाचा अर्थ जर काहीच नाही, तर ते भाव–रूप होऊन जगतास कारण कसे होईल ? आत्म्याला जर वृत्तिच अपरोक्ष करील तर "घटद्रष्टा घटाद्भिन्नः सर्वथा न घटो यथा" या

न्यायाने वृत्तीस आत्मा अपरोक्ष झाल्याने (दृश्य झाल्याने) आत्मा हे जीवाचें स्वरूप नव्हे असे म्हणण्याचा प्रसंग प्राप्त होईल ! ज्या वृत्तीस आत्मा प्रकाशित करतो ती वृत्ति आत्म्यास प्रकाशिते हे बोलणे विरुद्ध आहे व त्या योगाने "येनेदं सर्वं विजानाति तं केन विजानीयात् । व यतोवाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह" इत्यादि श्रुति व्यर्थ होतील. दोरीवरच्या सर्पानि दोरी लुप्त होत नाही, त्याप्रमाणे अज्ञानाने जर आत्मा लुप्त होत नाही, तर जीवाचा अध्यास होतो असें कसे म्हणता येईल ? केवळ 'अज्ञान' शब्दाने जर जगत्कार्य भासत असेल, तर ते कोणत्याही शब्दांनी भासावयास पाहिजे. मग शब्दमात्र अज्ञान व जगत्कार्य यांचा कार्यकारणभाव कशाला हवा ? सारांश शशशृंग व खपुष्प इत्यादि शब्दांप्रमाणे अज्ञान या शब्दाची प्रवृत्ति झाली असल्यामुळे त्यास भावरूप व कारण म्हणणे हें विसंगत आहे. म्हणून आधी वर जे सांगितले आहे तेच श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अमृ. अ. ६ ओ, ९५, ९६, ९९, १००, १०१ यांत सांगितले आहे, असे आमचे म्हणणे आहे. पूर्वपक्षकारही "अज्ञाने जेथे असावे । तेणे सर्व नेण होावे" व "एवं कवणेही परी । अज्ञानभावाची उजरी । न पडेचि नगरी । विचाराचिये॥" या ओव्यांवरून अज्ञान हें शब्दमात्रच समजतात. शब्दमात्र म्हणजे फक्त शब्दाचेंच अस्तित्व होय; त्यामुळे अर्थाचे अस्तित्व् आहे असे सिद्ध होत नाही, हे उघड आहे. अमृतानुभवांतील द्वितीय प्रकारणांतल्या ओव्या गुरुस्तुतिपर असल्यामुळे त्या अज्ञानाचे अस्तित्व सिद्ध करण्यात पुरेशा नाहीत असे आमचे मत आहे. अविद्या ही मुळीच नसताना ती भावरूप आहे असे मूढ मानतात. याप्रमाणे वार्तिककारही म्हणतातः–

अविद्यमानैवाविद्या वस्तुतत्त्वविचारणात् ।
अविचारेण मूढांनां वज्रादपि दृढायते ॥

या वचनावरून मूढांनी अविद्येस भावरुप मानले तरी तिचे मूळचे स्वरुप अभावरुपच आहे, हेच आम्ही आमच्या मागील निबंधांत सांगितले आहे.

तत्ववेत्याच्या दृष्टीने भावरुप अज्ञान नसो; पण मूढांच्या दृष्टीने भावरुप अज्ञान असले तरी याविषयी श्रीज्ञानेश्वर काय म्हणतात ते पहाः–

मृगजळ जेथे नुमंडे । तेथें असे पां कोरडें ।
मा उमेडे तेथे जोडे । वोल्हामु काई ॥१॥
दिसताचि स्वप्न लटिकें । हे जागरीं होय ठावुकें ।
तेंवि अविज्ञाकाळी सतुकें । अविद्या नाहीं ॥ २ ॥

तत्ववेत्याच्या ठिकाणी मृगजळासारखें अज्ञान न भासो; पण अज्ञाच्या ठिकाणी मृगजळासारखे ते अज्ञान भासते, म्हणून ते कार्य उत्पन्न करण्यास क्षम होईल काय ? ज्याप्रमाणे मृगजळाच्या योगाने जमीन भीजत नाही त्याप्रमाणे अज्ञानाच्या योगाने काही एक कार्य होत नाही. (१) स्वप्न खोटे आहे हे जागृतीत कळते तथापि ते दिसत असतानाच खोटे असते. त्याप्रमाणे ज्याकाली जीवांना अविद्या भासते त्याकाली सुद्धा ती नाही (२) त्या ज्ञानेश्वरांच्या वचनावरून अज्ञांना देखिल शब्दमात्रच अज्ञान असते. ह सिद्धान्त कायम ठरतो; पण तो त्याला भावरुप मानतो ही गोष्ट निराळी होय.

पुन्हा पूर्वपक्षकार असें म्हणतातः–

"आचार्यवेदान्त किंवा विद्यारण्य वेदान्त या दोहोंतही अज्ञानाचे कार्य हे जगत् विषमसत्ताक ब्रह्माचे ठिकाणी विवर्तरुप मानीले आहे व विवर्तकार्य विषमसत्ताक असल्यामुळे अधिष्ठानांहून कधीच भिन्न नसते; समतत्तेतील दोन पदार्थ दोन्ही सत्य असल्यामुळे परस्पर विरोधी असतात. विषम सत्तेचे दोन पदार्थ विरोधी नसतात. त्यापैकी जो पदार्थ सत्य असेल तत्स्वरुपच तो दुसरा मिथ्या पदार्थ असतो. विषम सत्तेतील दोन पदार्थ असून भिन्न भासणें हेच अज्ञान किंवा मिथ्या प्रतीति आहे."

यावर आम्ही असे विचारतो कीं, जीवास ज्याप्रमाणे "जीव, रज्जूचे ठिकाणी सर्प भ्रम होतो. त्याप्रमाणे हा भ्रम जीवास झाला, साक्षीस झाला, चिदाभासास झाला किंवा ईश्वराला झाला ? असे चार विकल्प संभवतात, प्रथमपक्षी स्वत: जीवासच जीवभ्रम भासतो असे म्हणणे अशक्य आहे; कारण भ्रमास पाहणारा अन्य कोणीतरी असेल तर भ्रमाची सिद्धी होईल, नाही तर होणार नाही. म्हणून प्रथम पक्ष संभवत नाही. द्वितीयपक्षी साक्षीस भ्रम होतो असे म्हटल्यास, साक्षी असंग निर्विकार असल्यामुळे त्यास भ्रम होतो हे म्हणणे सिद्ध होत नाही. तृतीयपक्षी चिदाभास हा जड असल्यामुळे त्याला भ्रम झाला असे म्हणता येत नाही. चतुर्थपक्षी भ्रम झाला असे म्हटल्यास भ्रमाची निवृत्ति ईश्वरासच करावी लागणार आहे मग जीवास वेदान्तविचार करण्याचे प्रयोजनच राहणार नाही. याप्रमाणें भ्रम कोणास झाला हे जर सांगता येणें कठीण आहे तर जीव या विवर्ताची सिद्धी कशी करावयाची व कोण करणार ? विषमसत्ताक सर्प रज्जूहून भिन्न असत नाही असे मानले तरी रज्जूज्ञानाने सर्पनिवृत्ति झाल्यावर रज्जू ही भिन्नच वाटत असल्याने तो तर कधीच भिन्न नसतो असे मात्र म्हणता येत नाही. अध्यासकाली दोन पदाथ भासतात हे म्हणजेच असंगत होय, कारण अज्ञानकाली एक सर्पच भासत असतो व ज्ञानकाळी एक रज्जू भासत असते; म्हणून अध्यासकाळी व ज्ञानकाली दोन पदार्थ भासतात असे म्हणता येत नाही. याचप्रमाणे रज्जूसर्पाचे ठिकाणी अभिन्नता आहे ही गोष्ट खरी धरली तरीहि सर्पाची भिन्नता समजणे हेच अज्ञान किंवा मिथ्थ्या प्रतीति आहे असे पूर्वपक्ष जर म्हणतात; पण त्यांचे हे म्हणणे खरे कसे होणार ? आम्हास तर असे वाटते की रज्जू व सर्प यांची भिन्नता समजणे–"रज्जू आहे, सर्प नाही–" असे समजणे हे ज्ञानच होय. अभिन्न असून भिन्न आहे अशा म्हणण्याने विवर्तवादाची सिद्धि होत नाही. रज्जूची सत्ता सत्य आहे व सर्पाची सत्ता मिथ्या आहे याच दोन विषमसत्ता होत; याप्रमाणे दोहोस दोन नावे जरी प्राप्त झाली तरी सर्पभ्रान्तिकाली एकच सर्पसत्ता भासत असते; दोन्ही सत्तांचा भेद भासत नाही. दोन्ही सत्तांचा भेद जर भासेल तर अधिष्ठानसत्तेचे ज्ञान होवून मिथ्या सर्वसत्तेची निवृत्तीच होत असल्याने अभिन्न असून भिन्न भासणे हे अज्ञानाचे लक्षण होत नाही, व असल्या अज्ञानाच्या योगाने विवर्तवादाचीही सिद्धी होत नाही हे उघड आहे.

पुन: पूर्वपक्षकार असे म्हणतात–"श्रीज्ञानेश्वरमहाराज चैतन्यस्फूर्तीवाद मानतात' असे धरल्यास यावर मी असे विचारतो कीं ती स्फूर्ती तत्स्वरुप आहे की भिन्नस्वरुप आहे ? प्रथमपक्षी निरवयव व निर्गुण अशा ब्रह्माचे ठिकाणी सावयत्व काय म्हणून दिसते?"

पण आमचे म्हणणे असे आहे कीं ज्यावेळी स्फूर्तीचे ठिकाणी हे चित्त व हा आत्मा असा भेद करीता येत नाही तर चित्तास "चित्त" असे म्हणता न येवून तेहि असंग होते, किंबहुना सर्वास आत्मस्वरुपताच येते, त्यावेळी सावयव निरवयव किंवा सगुण व निर्गुण इत्यादि भेद स्फूर्तीत भासतील हे म्हणणे अशक्य नव्हे काय ? अर्थात स्फूर्ती व जगत् यांचाहि भेद करता येत नाही हे निराळे काय सांगावे ?

श्री गौडपादाचार्यहि असेच म्हणतात–

"चित्तस्पंदितमेवेदं ग्राह्यग्राहकवद्द्वयम् ।
चित्तं निर्विषयं नित्यप्रसंगं तेन कीर्तितम् ।।

जगताचे प्रेत्यभाव व आविर्भाव होतात हे म्हणणे भ्रममूलक आहे, हे वरील विवेचनावरून पूर्वपक्षकारांच्या लक्षात येईल असे वाटते.याप्रमाणे अमुक पदार्थ सचेतन आहे व अमुक एक पदार्थ अचेतन आहे हे म्हणणे तरी सिद्ध व्हावे ? कारण जेथे एका आत्म्याचीच सिद्धि आहे तेथे वरील प्रकारची द्वैते राहतील हे म्हणणेच असंभवनीय होय. द्वितीय पक्षाचे निरसन मागील विवेचनात आलेच आहे. म्हणून येथे विश्रांति घ्यावी हेच बरे.

आता श्रीज्ञानेश्वरांचे मत श्रुतिबाह्य म्हणावे लागेल, असे पूर्वपक्षकार म्हणतात, पण, ' आम्हास ते श्रुतिबाह्य होईल असे वाटत नसल्यामुळे, प्रसंगानुसार त्याबद्दल आम्ही विवेचन करणार आहो. तथापि आम्ही श्रीयुत पंडित यांना इतकाच सवाल करतो की–

"न निरोधो न चोत्पत्तिर्न बद्धो न च साधकः ।
न मुमुक्षुर्न वै मुक्त इत्येषा परमार्थतः" ।

या श्रुतिवचनात उत्पत्ति प्रलय बंध साधन मुमुक्षुत्व व मुक्ति हे प्रकार नाहीत असे सांगितले आहेत ते नास्तिकपणाचे लक्षण कीं काय ? ही श्रुति असल्यामुळे तिला नास्तिक म्हणण्याचे धाडस कोण करणार आंहे ? ब्रह्मवेत्त्यास तत्त्वज्ञान झालेले असते म्हणून तो एकटा मुक्त होईल म्हणावे तर कोणीहि मुक्त नाहीत असे श्रुतिच सांगत आहे, या अज्ञानामुळे बंध साधन वगैरे प्रकार आहेत म्हणावे तर कोणी बद्धहि नाहीत व साधकहि नाहीत असा श्रुतीचा इषारा आहे त्यावरून कोणी अज्ञा नीहि नाहीत व कोणी ज्ञानीहि नाहीत असे म्हणावयास नको काय ? या सर्व गोष्टींचा श्रीयुत पंडित विचार करतील अशी आम्हास आशा आंहे.

ता. ३०–१–१९१७

**बाळशास्त्री हुपरीकर**
संस्कृत शिक्षक, राजाराम कॉलेज,
कोल्हापूर

सूचना:–आमच्या या लेखासंबंधी श्रीयुत पंडित यांचेकडून योग्य उत्तर येईल तरच त्यासंबंधी विचार करण्यात येईल.

□□□□

## ४५. आचार्य व ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान एकच–२

मुमुक्षु ता. २१ जानेवारी १९१८

रा. रा. मुमुक्षुकर्ते यांस.–

१) सा. न. वि. वि. वे. शा. स. बाळशास्त्री हुपरीकर यांनी माझ्या गरीबाच्या विनंतीकडे लक्ष देऊन ता. १ सप्टेंबर १११७ या अंकात दिलेल्या माझ्या लेखाचे उत्तर दिले हे पाहून त्यांच्या सौजन्याबद्दल आनंद होतो न होतो तोच त्यांचे आलेले उत्तर वाचल्यावर शेवटी त्यांनी केलेली सूचना वाचून खेद वाटला. कारण त्यांना माझ्या आक्षेपात काहींच राम वाटला नाही व म्हणूनच 'रा. पंडिताकडून योग्य उत्तर आल्यास त्यासंबधी विचार करण्यांत येईल, असा त्यांनी मला इषारा दिला. माझ्या सारख्या अल्पश्रुत मनुष्याकडून त्यांच्यासारख्या बहुश्रुत विद्वांनास पटेल असे उत्तर कसे लिहतां येईल याची मला चिन्ता पडली. कारण माझे बुद्धीने ते जरी समर्पक उत्तर असले तरी ते त्यांना कसे पटावे ? एकाचे समर्पक उत्तर सर्वांनाच पटते असे अलिकडे वर्तमानपत्रांतून अर्वाचीन विद्वान लोकांच्या चाललेल्या चर्चेवरून तरी दिसत नाही. तेव्हा योग्य उत्तर आल्यास विचार करण्यात येईल असा रोख जवाब दिल्यावर वादाचे कामच राहत नाहीं. दुसऱ्यांच्या आक्षेपांचे उत्तर देता आले नाही तर उत्तर न देतां चूप राहण्यानें आपली बाजू सांभाळली जावून अनायासेच लोकांमध्ये आक्षेपकारांचे आक्षेप योग्य नव्हते असा समज पसरतो. अशाप्रकारची टाळाटाळी करणे विद्वानांस उचित नाही. अल्पश्रुत समाजही बहुश्रुत समाजासी चर्चा करिता करिता बहुश्रुत होतो. किंबहुना बहुश्रुत समाजाची अल्पश्रुत समाजानेच मातब्बरी आहे. वे. शा. सं. बाळशास्त्रीं हुपरीकर यांना जेव्हा मी त्यांच्या मताप्रमाणे श्री ज्ञानेश्वर महाराज व श्री शंकराचार्य यांच्या मतांत भेद आहे असे कबूल करीन तेव्हांच माझे उत्तर योग्य आहे असे वाटेल की काय ? श्रुति युक्ति व स्वानुभव परंपरा या तीन प्रमाणांना धरूनच वेदान्तात सिद्धान्त–मण्डन करीत असतात. व जोपर्यंत माझे प्रतिपादन वरील तीनप्रमाणबहिर्भूत होत नाहीत तोपर्यंत ते अयोग्य आहेत असे शास्त्रीबुआंनाच काय पण कोणत्याही विद्वानाला म्हणण्याचा अधिकार नाही. असो ! हा लेख वाचून शास्त्रीबुआंचे समाधान झाल्यास ठीकच आहे, न झाल्यास त्यांनी माझे प्रतिपादन कोठे प्रमाणबहिर्भूत झाले हे दाखविले पाहिजे.

२) श्री ज्ञानेश्वर महाराज ज्याप्रमाणे सिद्धावस्थेंत किंवा जीवनमुक्तावस्थेत अविद्या व तिचे कार्य जगत् हे काहींच नसून सर्व चेतनविलास किंवा स्फूर्ति आहे असे मानतात त्याचप्रमाणे श्री शंकराचार्य व विद्यारण्य हेही सिद्धावस्थेंत अविद्या व तिचे कार्य संसार याचा प्रत्यय मानीत नाहीत. तिघेही महात्मे अज्ञानाच्या दृष्टीने अविद्या आहे. परमार्थतः ती मुळीच नाही असे मानतात, असे दाखविण्याकरिता मी मागला लेख लिहला होता मला वाटते तो लेख थोडा संदिग्ध असावा म्हणूनच हुपरीकर शास्त्रीसारख्या विद्वानाचा कोठे कोठे समज चुकीचा झाला, नाहीतर त्यांचा तसा समज झाला नसता. आता हा लेख थोडा जास्त स्पष्ट लिहून शास्त्रीबुआंचा कोठे कोठे कसा कसा गैरसमज झाला हे दाखवितो व लेख जास्त लांबल्यामुळे एकाच अंकात घेता न आल्यास पुढल्याही अंकात आपण छापावा अशी मी आपणांस विनंती करतो.

३) वे. शा. स. हुपरीकर शास्त्री म्हणतात–श्री ज्ञानेश्वर महाराजांचे मते अज्ञान मुळीच नाहीं व आचार्य आदिक अज्ञानाचा अंगीकार करतात पण श्री ज्ञानेश्वर महाराजांनी अमृतानुभव हा ग्रंथ सिद्धानुवाद म्हणजे भक्त पुरुषांच्या अनुभवांचा अनुवाद किंवा ब्रह्मानंदामध्ये तल्लीन झालेल्या पुरुषाच्या तृप्तीचा ढेकर आहे असे–

तरी ग्रंथप्रस्तावो । न घडे हे म्हणो पावो ।।
तरी सिद्धानुवाद लाहो । आवडी करु ।।१।।
पढीयंते सदा तेचि । परि भोगी नवी रुचि ।।
म्हणुनि हा उचितुची । अनुवादु सिद्धु ।।२।।

इत्यादि ओव्यांत व श्री सिद्धानुवादे । श्रीमदनुभवामृते । इत्यादि संकल्पांत सांतिले आहेत. म्हणून हा अनुभवामृत ग्रंथ ज्ञानानंतरच्या सिद्धस्थितीचा अनुवादक असल्यामुळे त्या सिद्धदृष्टीने अज्ञान व तत्कार्यजगत् हे मुळीच नाही; हे बरोबर आहे. व हीच दृष्टी परमार्थस्वरूप म्हणजे त्रिकालाबाधित असल्यामुळे खरी आहे. म्हणून अज्ञान वस्तुतः नाहीच. भगवान् आचार्यही–

" तरंगफेनभ्रमबुद्बुदादि सर्वं स्वरूपेण जलं यथा तथा ।
चिदेव देहाद्यहमंतमेतत्सर्वं चिदेवैकरसं विशुद्धम् ।।१।।"

या श्लोकात सांगितल्याप्रमाणे ज्ञानोत्तर काळीं अज्ञान व तज्जन्य संसार काहीच नसून सर्व चेतनस्फूर्तिच आहे असेच मानतात. अशा परमार्थांत नसणाऱ्या अज्ञानाची व तज्जन्य संसाराची जीव कल्पना करून व तो

संसार खरा मानून संसारिक सुखदुःख भोगितो, असे भगवान् आचार्य, श्री ज्ञानेश्वर महाराज, विद्यारण्य हे तिघेही मानतात, असे मी म्हणतो. या नसलेल्या भावाला भावरूप समजणें यालाच अध्यास म्हणतात व या जीवाच्या ठिकाणच्या अध्यासाचे ग्रहण करूनच सर्व लौकिक वैदिक व्यवहाराची प्रवृत्ति झाली आहे असे–

"तमेतं पुरस्कृत्य सर्वे प्रमाणप्रमेयव्यवहाराः प्रवृत्ता लौकिकाः वैदिकाश्च"

असे या पंक्तीत आचार्यांनी म्हटले आहे.

४) शास्त्रीबोवा म्हणतात, "अज्ञान जर शब्दमात्र आहे, म्हणजे त्या शब्दाला जर अर्थ काहीच नाही तर ते भावरूप होवून जगतास कारण कसे होईल." हा प्रश्न शास्त्रीबोवांनी माझा लेख पूर्ण न वाचता किंवा न समजता मला विचारला आहे. ही अज्ञानाची शब्दमात्र प्रतीति ज्ञानदृष्टीनेच आहे असे श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या अमृतानभवातील ६ व्या अध्यायाच्या ९५।९६।९९ ओव्या प्रमाण घेवून मी सांगितले आहे. अज्ञानदृष्टीने अज्ञान शब्दमात्र आहे व ते जगत् करण्यास समर्थ आहे असे मी म्हटले नव्हते. परमार्थतः नसणाऱ्या स्वप्नातील व्याघ्रभीतीने जसा पुरुष ओरडून उठतो व स्वप्न जसे स्वप्नकाली प्रतीतिमात्रच आहे, जागृतीत आल्यानंतर त्याचे मुळीच अस्तित्व नसते, त्याप्रमाणे स्वरूपाचे ठिकाणीं अत्यंत सत्वाने राहणाऱ्या अज्ञानाच्या धर्माचा जीव आपले ठिकाणी अध्यास करितो व हा अध्यास जोपर्यंत ज्ञानानें निवृत्त होत नाही तोपर्यंत अज्ञ दृष्टीने सत्य असल्यामुळे अज्ञान किंवा अध्यास भावरूप होवून तो जगताचे कारण होवूं शकतो. ब्रह्मसूत्र अ. २ पा. १ सूत्र १४ यांत भगवान् आचार्यहि असेच म्हणतात––

सर्वव्यवहाराणामेव प्राग्ब्रह्मात्मता विज्ञानात्सत्यत्वोपपत्तेः स्वप्नव्यवहारस्येव प्राक् प्रबोधात्। यावद्धि न सत्यात्मैकत्वप्रतिपत्तिस्तावत्प्रमाणप्रमेयफललक्षणेषु विकारेष्वनृतत्त्वबुद्धिर्न कस्यचिदुपपद्यते। विकारानेव त्वहंममेत्यविद्यत्मात्मीयेन भावेन सर्वो जंतुः प्रतिपद्यते स्वाभाविकीं ब्रह्मात्मतां हित्वा। तस्मात् प्राग्ब्रह्मात्मताप्रतिबोधादुपपन्नः सर्वो लौकिको वैदिकश्च व्यवहारः। यथा सुप्तस्य प्राकृतस्य जनस्य स्वप्नउच्चावचान्भावान्पश्यता निश्चितमेव प्रत्यक्षाभिमतं विज्ञानं भवति प्राक्प्रबोधात्। नच प्रत्यक्षाभासाभिप्रायस्तत्काले भवति तद्वत्।"

५) याप्रमाणे अज्ञान्याचे दृष्टीने अज्ञान असून ज्ञान होवून ते निवृत्त होईपर्यंत भावरूप आहे असे सांगून 'नहि रज्जुसर्पो दृष्टो म्रियते नापि

मृगतृष्णिकांभसा पानावगाहनादि प्रयोजनं क्रियते" या पंक्तीने मिथ्या अज्ञान कार्यकारी कसे होवूं शकते अशी शंका घेवून "शंकाविषादिनिमित्त मरणादिकार्योपलब्धेः स्वप्नदर्शनावस्थस्य च सर्पदंशनोदकस्नानादिकार्यदर्शनात् ।। या पंक्तीने त्या शंकेचे निराकरण करून ते कार्यही खोटेच आहे (तत्कार्यमपि अनृतमेवेति चेद् ब्रूयात्) असे म्हणाल तर आचार्य म्हणतात,–स्वप्नकालीन सर्पदंशादिक कार्य जागृतीनंतर जरी मिथ्या होत असले तथापि त्या सुखदुःखादि कार्य मात्र सत्यच होते. (यद्यपि स्वप्नदर्शनावस्थस्य सर्पदंशनोदकस्नानादिकार्यमनृतं तथापि तदवगतिसत्यमेव फलं प्रतिबुद्धस्याबाध्यमानत्वात्) या प्रमाणे अज्ञान्याला ज्ञानदृष्टीने मिथ्या असणारे अज्ञान सत्य वाटत असल्यामुळे त्याचे ठिकाणीं ते सुखदुःखरूप संसार भासवूं शकते असे आचार्य मानतात. पुनः वरील सूत्रावरील भाष्यातच "यत्र त्वस्य सर्वमात्मैवाभूत्तत्केन कं पश्येत् इत्यादिना ब्रह्मात्मत्वदर्शिनं प्रति समस्तस्य क्रियाकारक फललक्षणस्य व्यवहारस्याभावम् वदंति सर्वे वेदान्ताः ।" या पंक्तीने ब्रह्मज्ञानी पुरुषाला संसाराची प्रतीति नाही असे त्यांनी सांगितले आहे. स्वप्नकाळी स्वप्नातील भाव सत्य असून जागृतीनंतर मिथ्या भासतात किंवा रज्जूवर भासणारा सर्प अज्ञानकाळी सत्य असून रज्जूच्या ज्ञानानंतर समूळ मिथ्या ठरतो, किंवा आईने बागूल आला म्हटल्यावर मुलगा सत्य मानून भितो व बागूल मेला म्हटल्याबरोबर सत्य मानून आनंदित होतो, त्याप्रमाणे जीवाला अज्ञान व त्याचे कार्य संसार हे सत्य वाटतात तोपर्यंत ते त्याचे दृष्टीने सत्य असून ज्ञानानंतर मुळीच नसल्यामुळे अज्ञान शब्दमात्र आहे असे मी मागे म्हटले होते. असे शब्दमात्रानी असणारे अज्ञान सत्य वाटल्यावर भावरूप ठरून ते जगताचे कारण होण्यास काय हरकत आहे? रज्जुद्रष्टा, जागृतीतला मनुष्य व आई हे सर्व ज्ञान्याच्या स्थानी असून सर्पद्रष्टा, स्वप्नद्रष्टा व मुलगा हे सर्व बद्धाचे स्थानी आहेत रज्जुद्रष्टयादिकांच्या दृष्टीने सर्पभावादिकांचा जरी अत्यंताभाव आहे तरी सर्पद्रष्टयादिकांच्या दृष्टीने सर्पादिक भ्रमाची भ्रमनिवृत्ति होईपर्यंत स्थिति असून ते सुखदुःखादि कार्य करण्यात समर्थ होतातच. या सर्व भ्रमाची अबाधित स्थिति नसल्यामुळे प्रतीतिकालीही ते नाहीतच हे खरे. पण ते मुक्तदृष्टीनेंच, बद्धदृष्टीने नाही. भिंतीवर काढलेले व्याघ्राचे चित्र मिथ्या असते; भिंतीहून पृथक् नसते, किंबहुना ती भिंतच होय पण ही भिंत आहे असे सम्यक् ज्ञान ज्या मुलाचे ठिकाणी नसते, जो त्या चित्राला खरे समजतो त्या मुलाचे ठिकाणी ते वाघाचे चित्र भीति उत्पन्न करीत

नाही काय ? वास्तविक बागूल नसून बागूल आला म्हटल्याने मुलाचे मनांत भीति व बागूल मेला म्हटल्याने आनंद उत्पन्न होत नाही काय ? मधुसूदन-सरस्वतींनी मिथ्या वस्तुही सत्य वाटल्यास कार्यकारी होते असे अद्वैतसिद्धीत प्रतिपादन केले आहे. गौडपादाचार्यहि म्हणतात "आदावन्तेच यन्नास्ति वर्तमानेपि तत्तथा । वितथैः सदृशास्संतोऽवितथा इव लक्षिताः ॥" शास्त्रीबोवा म्हणतात–"शब्द-मात्र म्हणजे फक्त शब्दाचे आस्तित्वच होय, त्यामुळे अर्थाचे अस्तित्व आहे असे सिद्ध होत नाही. अर्थात् अज्ञान हा शब्द जगद्रूप कार्य करण्यास कारण होत नाही हे उघड आहे. केवळ अज्ञान शब्दाने जर जगत्कार्य भासत असेल तर ते कोणत्याहि शब्दाने भासावयास पाहिजे. मग शब्दमात्र अज्ञान व जगत्कार्य यांचा कार्यकारणभाव कशास हवा ? सारांश, शशशृंग व खपुष्प इत्यादि शब्दाप्रमाणे अज्ञान या शब्दाची प्रवृत्ति झाली असल्यामुळे त्यास भावरूप व कारण मानणे विसंगत आहे. या शास्त्रीबोवांचे म्हणण्यात खाली दिलेले मुद्दे आहेत–

(१) शब्दमात्र म्हणजे शब्दाचेच अस्तित्व, अर्थाचे नाही.

(२) अज्ञान शब्दमात्र असल्यामुळे जगद्रूप कार्य करण्यास समर्थ नाही.

३) केवळ अज्ञान शब्दाने जर जगत्कार्य भासत असेल तर ते कोणत्याही शब्दाने भासावयास पाहिजे.

४) अज्ञान व जगत्कार्य यांचा कार्यकारणभाव सिद्ध होणार नाही.

आपला,

नारायण पैकाजी पंडित

□□□

१००८

# शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ४ | ९ | शिरोडादि | शिदोडादि |
| ४ | १२ | गुरुत्वाकर्षणक्तीची | गुरुत्वाकर्षणशक्तीची |
| ७ | १ | व्यरहितवस्तंचे | द्रव्यरहित वस्तूंचे |
| ७ | २३ | दश्य | दृश्य |
| १० | १६ | व्याष्टिरूप | व्यष्टिरूप |
| १६ | ४ | आगी | आंगी |
| २५ | १३ | प्रमवृत्ति | प्रेमवृत्ति |
| २८ | २८ | तं | तूं |
| ३० | १४ | सवथा | सर्वथा |
| ३१ | २९ | देंहेंद्रियाचैं | देंहेंद्रियाचैं |
| ३३ | ४ | प्राकृत | प्राकृतं |
| ३९ | ६ | ब्रह्मव | ब्रह्मैव |
| ४० | १३ | गट | प्रगट |
| ४६ | २७ | शद्धा | शुद्धा |
| ४७ | १७ | आगे | आंगे |
| ४८ | १८ | भागे | भोग |
| ६१ | १४ | प्राप्तकाळी | प्रात:काळी |
| ६७ | २२ | desroys | destroys |
| ७२ | २९ | गुरुडपुराण | गरुडपुराण |
| ९४ | ७ | तर गु | तर गुरु |
| ११९ | २९ | पाहुणार | पाहुणचार |
| १२८ | १९ | २५ | २६ |
| १३० | २७ | कलासात | कैलासात |
| १३८ | ५ | पर | परंतु |
| १६७ | २० | आमज्ञान | आत्मज्ञान |
| १६८ | २६ | वैराग्याचनि | वैराग्यावाचुनि |
| १९० | १ | चतन्यच | चैतन्यच |

१००८

## श्रीगुलाबराव महाराजांचे
## पत्रसंग्रह

३२ पत्रे :

प्रथमयष्टि व द्वितीययष्टींचा
उत्तरार्ध रु. ३/-

३७ पत्रे :

सप्तमयष्टि रु. ५/-

४७ पत्रे :

द्वादशयष्टि रु. ५/-

१ पत्र :

पंचदशयष्टि रु. ५/-

मयुर प्रकाशन
वच्छराज व्यास चौक,
महाल, नागपूर-२.

# श्रीगुलाबरावमहाराजांचे ग्रंथ

| | |
|---|---|
| चरित्र भाग १–२ | ८-०० |
| १. प्रथमयष्टि | ३-०० |
| * भक्तिपदतीर्थामृत | १-५० |
| २. प्रीतिनर्तनादि ग्रंथ | ५-०० |
| * रुक्मिणीपत्रिका (सार्थ) | ६-०० |
| ३. भागवतरहस्य भाग १-२ | |
| ४. स्त्रीगीतसंग्रह | २-०० |
| ५. अलौकिक व्याख्यानमाला | ५-०० |
| ६. स्वमंतव्यांश सिद्धान्ततुषार | १-५० |
| ७. उपदेशामृत पत्रे | ५-०० |
| ८. साधुबोध | ५-०० |
| ९. अभंगांची गाथा | |
| * पदांची गाथा | ५-०० |
| १०. प्रेमनिकुंज | ६-०० |
| ११. संप्रदाय सुरतरू | |
| १२. उपदेशामृत पत्रे | ५-०० |
| १३. वेदान्तपदार्थोद्देशदीपिका | २-०० |
| १४. प्रियलीलामहोत्सवादि ग्रंथ | ७-०० |
| १५. पंचदशयष्टि | ५-०० |
| १६. षोडषयष्टि (संस्कृत) | ५-०० |
| १७. समयोपदेश १–२ | ७-०० |
| १८. मनोहारिणी | ००-५० |
| १९. भक्तिसूत्रमालादि ४ ग्रंथ | २-०० |
| २०. योगप्रभाव १- २ | ११-०० |
| २१. योगरहस्य (१० ग्रंथ) | ५-०० |
| २२. नित्यपाठ | ३-०० |
| २३. आळंदीमहिमा | ००-२५ |
| २४. चित्तोपदेश व हरिपाठ | ००-२० |
| | ९५–९५ |

**योगविषयक ग्रंथ :**

| | |
|---|---|
| १. योगप्रभाव | ११-०० |
| २. योगरहस्य (दशग्रंथ) | ५-०० |
| ३. निदिध्यासन प्रकाश (य १) | ३-०० |
| ४. उपदेशामृत पत्रे भाग १ | ३-०० |
| ५. अलौ. व्याख्याने (ध्यान) | ५-०० |
| | २७–०० |

संपूर्ण पुस्तके मागविणाऱ्यास ५% कमिशन व रेल्वे खर्च फुकट मिळेल.

**श्री बाबाजीमहाराज पंडितांचे ग्रंथ :**

| | |
|---|---|
| १. ज्ञानेश्वरी गूढार्थ दीपिका ५ खंड | ३४-०० |
| २. हरिपाठ रहस्य | ३-५० |
| ३. विविध लेख संग्रह १–२ | ७-०० |
| ४. अभंग गाथा | ६-०० |
| ५. अमृतानुभव कौमुदी | |
| ६. आर्यधर्मोपत्ति | |
| | ५०–५० |

**डॉ. वा. ना. पंडितांचा प्रबंध ग्रंथ :**

| | |
|---|---|
| * शांकर तत्त्वज्ञानात भक्तीचे स्थान | २०-०० |
| * चिद्विलास आणि भक्तितत्त्व | ६-०० |
| | २६–०० |

**मधुर प्रकाशन, बच्छराज व्यास चौक, महाल, नागपूर–२.**

मुखपृष्ठ डिझाइन व मुद्रण:- मधुकर आर्ट्स, नागपूर.